# तो बोललेला शब्द हा मूळ बीज आहे

जेफरसनविले, इंडियाना अमेरिका

६२-०३१८

1 सुप्रभात, मित्रांनो. येथे असण्यात खूप आनंदी आहे. या सकाळी आपण थोडीशी लवकर सुरुवात करीत आहोत. लोकांना बसण्यासाठी समाधानकारक पुरीशी जागा नसलेली पाहून नेहमी दुःख होते, आणि मला ठाऊक आहे तुमच्यासाठी उभे राहणे हे कठीण आहे. मी या सकाळी सांगून टाकले आहे की हा समय असणार होता की जेव्हा मला खूप वेळ हवा होता. आणि मी विचार करतो ते फार चांगले होईल, जशी सभा सुरु असेल, की जर कोणी बसेल, इतर उभे राहतील, आणि अशा प्रकारे एक दुसऱ्याला आराम देतील आणि जर तुम्हाला बाहेर जायचे असेल आणि सभोवती फिरायचे असेल अगदी क्षणभर, लक्षात ठेवा, दीर्घकाळ सभा असल्याने ते पूर्णपणे ठीक असेल. मग आपण सभोवती अदलाबदल करु शकतो.

2 आणि आता, आपल्याला ठाऊक आहे येथे प्रार्थना मंदिरात एक विस्तृत आणि मोठ्या प्रार्थना मंदिराच्या उभारणीच्या कार्यक्रमात ते आहेत ज्यामध्ये पुरेशी बसण्याची जागा असेल. आणि मी विचार करतो येथे प्रार्थना मंदिरात केवळ सुमारे २५०, ३०० लोक बसू शकतील, आणि तेथे कदाचित आता एक शंभर यापेक्षा अधिक येथे आहेत. तेव्हा ते ... आणि मी आत आलो, लोकांना मागे आणि पुढे गाडी चालविताना पाहिले - सभोवती गाडी उभी करण्यासाठी जागा मिळू शकत नव्हती आणि अर्थात जेव्हा ते तेथे दरवाज्यावर आले आणि सभागृह गच्च भरलेले पाहिले आणि भिंती गच्च भरलेल्या, आणि इत्यादी, लोकांनी मग ... सर्वत्र व्यासपीठावर आणि इत्यादी, मग ते निघून गेले. आणि आपल्याला हवे आहे की परमेश्वराचा संदेश प्रत्येकाने ऐकावा जसा तो आपण आणण्याचा प्रयत्न करतो.

3 मला लागलीच घोषणा करायची आहे, मी बारा वाजेपर्यंत बोलण्याचा प्रयत्न करीन आणि मग नंतर ... आणि मी बारा वाजता विसर्जित करीन. आणि ते प्रत्येकाला वेळ देईल की जाऊन, काहीतरी खाण्यासाठी घ्यावे. या समयामध्ये सेवक, पाळक, भाऊ नेवील येथे, या वेळेदरम्यान बाप्तिस्मा सेवा घेतील. आणि तुम्ही लोक जे बाहेर जाल आणि खाण्यासाठी काहीतरी घ्याल आणि मग आपण परत येऊ आणि मी नक्की दोन वाजता उपदेशमंचावर असण्याचा प्रयत्न करीन, आणि मग या दुपारी पुढे जाईन.

4 आणि या आठवड्यात मी बराच वेळ प्रार्थनेत होतो, आणि जे काही मी लोकांना सांगण्याची इच्छा करतो, ते सांगण्यात यशस्वी ही झालो नसतो, जर मी ते सुमारे कदाचित त्यातील पाव, किंवा कदाचित तिसरा भाग, काढून टाकला नसता. आता, तेव्हा आम्ही तुम्हाला तुमच्या चांगल्या सहकार्याबद्दल धन्यवाद देतो सभेला येण्यासाठी आणि जे काही तुम्ही आमच्यासाठी केले आहे आणि आम्हाला सहाय्य केले आहे आणि आमच्यासाठी प्रार्थना केली आहे.

5 आणि काही क्षणांअगोदर मला एका वृद्ध पुरुष आणि स्त्री यांच्याशी बोलण्याचे सौभाग्य प्राप्त झाले जे ... आपल्याला ते भाऊ आणि बहीण कीड म्हणून ठाऊक आहेत जे इतक्या वर्षांपासून फार विश्वासू राहिले आहेत. ते काही क्षणांअगोदर थांबले. मी त्यांना येण्यासाठी सांगितले; मला त्यांना एका मिनिटासाठी पाहायचे होते आणि काय ते सौभाग्य होते अशा वृद्ध लोकांबरोबर बोलणे जे सुवार्तेचा प्रचार करीत होते जेव्हा मी अजून ही एक बाळ होतो. आणि गौरवी जुनी सुवार्ता सर्वदा चांगली होत आहे जेव्हा आपण मार्गाच्या शेवटास आलेलो आहोत.

6 आणि आता, येथे काही प्रार्थना वस्त्रे पडलेली आहेत आणि काही वेळानंतर मला त्यावर प्रार्थना करायची आहे. आणि आता, आपण अगदी एका क्षणासाठी प्रार्थनेच्या शब्दासाठी आपली मस्तके झुकवुया.

7 आमच्या स्वर्गीय पित्या, तू तुझ्या वचनात सांगितले: "जर मला पृथ्वीवरुन उंच केले मी सर्वांना माझ्याकडे आकर्षून घेईन." आणि, जीवनात आमचा तो हेतू आहे, की येशू ख्रिस्त हा अजूनही देवाचा पुत्र आहे, जगाचा तारक, ज्याला मर्त्य लोकांच्या पिढीसमोर उंच करावे. आणि मी फार खुश आहे हे माहिती असल्याने की मी तेथे राहतो जेथे असे लोक आहेत जे असा विश्वास करतात, आणि हजारोंबरोबर ज्यांनी त्याला त्यांचा तारणारा म्हणून स्वीकारले आहे.

आणि असे जाणून की हे जीवन संपल्यानंतर, तेथे दुसऱ्या बाजूला जीवन असेल जे इतके गौरवी असेल की हे परिश्रम आणि काही तास ज्यातून आपण जात आहोत या छाया आणि जीवनाच्या सावल्यांमधून येथे परीक्षेच्या भूमीवर, की जवळजवळ आपण कक्षेमध्ये प्रवेश करीत आहोत आता, उलट गणतीची वाट पाहत आहोत, कारण लवकरच तेथे वेळ येईल की जेव्हा देवाचा समय हा पूर्ण होईल. तो महान बाहू ज्याने इतका वेळ समयाला धरुन ठेवले आहे, शेवटी तो सोडून देईल आणि त्याची मंडळी या पृथ्वीवरुन पलीकडे बाहेर अंतराळात निघून जाईल त्या भूमीत जेथे तेथे आजार, दुःख, वृद्धावस्था, मरण नसेल. त्या करीताच आम्ही आज एकत्र जमलो आहोत, परमेश्वरा, की या गोष्टींबद्दल आमच्या भावना व्यक्त कराव्या.

8 हे जाणून आम्ही फार आनंदित आहोत की हे केवळ लोकांना काहीतरी व्यर्थतेत एकत्र आणणे नाही; की हे सिद्ध झाले आहे एक सर्वात महान वास्तव जे जगाला कधी ठाऊक आहे, की देवाचा पुत्र मेलेला नाही, ज्याने अभिवचने दिली होती, परंतु तो आमच्यामध्ये सदासर्वकाळासाठी जिवंत आहे. आणि या सकाळी आम्ही इतके आनंदित आहोत, परमेश्वरा, सर्व गोष्टींच्या वर, जरी जग आमच्या मालकीचे असेल आणि त्याचा आनंद घेण्यासाठी आम्ही शेकडो वर्षे तरुण असू, परंतु जे त्याला प्रेम करतात त्यांच्यासाठी जो समय पुढे ठेवलेला आहे त्याच्या तुलनेत ते केवळ एका हंगामासारखे असेल. तेव्हा, आम्ही आमच्या भावाला आणि बहिणीला त्या महान घडीकडे निर्देश करण्याचा प्रयत्न करीत आहोत जी आमच्याकडे येत आहे. आणि जसा तो समय येताना आम्ही पाहतो, प्रभू, आमची हृदये प्रदीप्त होत आहेत. आम्हाला तयारी करायची आहे.

9 एका पाठून एक आम्ही अरुंद मार्गाने जात आहोत. आताच आम्ही आमच्यामधून एकाला दफन केले. आपली बहीण बेल, तात्काळ गेली (तिच्या विनंतीनुसार), इतकी पटकन की आम्ही तिच्याबरोबर प्रार्थना करण्यासाठी तिच्याकडे पोहचू शकलो नाही, परंतु तसे जाणे ही तिची

विनंती होती ... असे पाहणे की ज्या सर्व गोष्टी आम्ही आमच्या हृदयात इच्छा करतो त्या तू आम्हाला पुरवितो. त्यातील एकही तू सोडत नाहीस. ते तू अभिवचन दिले आहे.

आता, आम्ही प्रार्थना करतो की आज तुला समजण्याचे हृदय तू आणशील - त्यांच्यासाठी जे तुला समजत नाहीत. पाप्यांना पश्चातापात; आजारी लोकांना देवाच्या आरोग्यज्ञानात आण. ओह, देवा, तुझ्या संतांना आशीर्वादित कर आणि त्यांची हृदये एकत्र बांध. आणि जशा या ध्वनिमुद्रणपट्ट्या शहरात आणि सर्वत्र देशभर, जगभर मंडळ्यांमध्ये जातील, सेवक भावांनी, ज्यांचा एकदा गैरसमज झाला आहे, आता समजू दे की तुझी मंडळी तयार व्हावी.

10 आणि आता ओह, प्रभू, ज्याने मला माझ्या आईपासून विभक्त केले, माझ्या जीवनातील सर्व दिवस मला खाऊ घातले आणि या घडीला मला आणले, तुझ्या कृपेने, असे वाटते की ही तुझी इच्छा होती की मी लोकांना स्पष्ट करावे की मी का त्याप्रकारे वागलो व त्याप्रकारे केले जे मी केले, ते अशाप्रकारे असावे की, प्रभू, तुझ्या दासाच्या असाधारणतेची, लोकांना चांगली समज असेल.

पित्या, या गोष्टी मान्य कर, आणि हे शास्त्रलेख आणि मजकूर आणि शब्द जे आम्ही येथे संपूर्ण आठवडा, प्रार्थना करुन आणि अभ्यास करुन लिहून ठेवले आहेत. ते सर्वत्र चांगल्या भूमीवर पडावे जेथे ते ऐकले जातील - एक भूमी जी त्यांना धरुन ठेवील आणि त्यांचे पोषण करील, आणि मग सर्व प्रशंसा तुला दिली जाईल, कारण आम्ही हे येशूच्या नावात मागत आहोत. आमेन.

11 बाहेर गाड्यांमध्ये बसलेल्या लोकांसाठी जे आत येऊ शकत नाही, मी येथे लहानसे साधन जोडीत आहे आता, आणि तुमचा रेडिओ ११५० ला सुरु करा आणि तुमच्या कारमध्ये सरळ तुमच्या रेडिओवर तुम्हाला संदेश मिळेल.

[आता येथे ही जोडणी आहे का? हे सुरु आहे, ते आहे का, ध्वनिमुद्रणपट्ट्यांसाठी?]

12 आता, माझ्या सर्व मित्रांसाठी दोन्ही येथील आणि जेथे कुठे या ध्वनिमुद्रणपट्ट्या प्रवास करतील, मला वाटते की कित्येक गोष्टी ज्या मी म्हणालो आणि केल्या त्यांचे स्पष्टीकरण लोकांना देण्याचा मी ऋणी आहे. कित्येक वेळेस लोक माझ्याकडे आले आहेत आणि म्हणाले, "आमचा पाळक म्हणतो, भाऊ ब्रॅन्हम, 'तुम्ही तसे का करता'? तुम्ही असे का म्हणालात? आणि या प्रकारे करण्यास तुम्हाला कोण लावते?" आता, माझ्या संपूर्ण हृदयाने, सर्वकाही जे मी केले आहे, मी ते उत्तम हेतूने केले आहे जसे कसे करावे मला ठाऊक आहे. आणि सर्वकाही जे मी म्हणालो आहे ते सर्व मी माझ्या हृदयापासून म्हणालो आहे. आणि ते मी एका उद्देशाने केले आहे; आणि या सकाळी देवाच्या सहाय्याने पवित्र शास्त्रामधून तो उद्देश आणि मी ते का केले ते स्पष्ट करण्याचा मी प्रयत्न करीन.

13 आणि आता तेथे कदाचित, एवढ्या आकाराच्या लोकांच्या जमावामध्ये, तेथे कदाचित कित्येक सेवक येथे बसलेले असतील, आणि तेथे कित्येक असतील जे हे ऐकतील, आणि मी इच्छा करतो आपल्याकडे पुरेसा वेळ असता जे काही मी विचार केला आहे मांडण्याचा आणि शास्त्रालेखीय करण्यासाठी ... ते सर्व शास्त्रलेखात आणण्यासाठी, खरंतर, लोकांपर्यंत आणण्यासाठी. परंतु माझ्या भावांनो: जरी अगदी तुम्ही माझ्याशी असहमत असाल - आता मी येथे आणि ध्वनिमुद्रणपट्टीसाठी, दोघांकरिता बोलत आहे - जो काही मी विचार करतो की ते बरोबर आहे, या माझ्या घेतलेल्या भूमिकेमुळे तुम्ही माझ्याबरोबर फारच असहमत असाल. आणि तुम्हाला माझ्याशी असहमत होण्याचा अधिकार आहे कारण तुम्ही ते कदाचित भिन्न पाहत असाल; परंतु मी आशा करतो की या सकाळी देवाच्या सहाय्याने, मी तुम्हाला ते कारण दाखविण्यास सक्षम असेन की का मी ही भूमिका घेतली आहे.

14 आणि मी येथे कधीही ... तेथे कित्येक वेळेस मी मंडळ्यांना, संप्रदायांना, स्त्रियांच्या पेहरावाला, पुरुषांच्या वर्तनाला रागावलो आहे. मी विचार करतो मी त्याला कसून शास्त्रलेखाद्वारे आधार दिला आहे. आणि कधीही एकदा नाही, देवाला माझे हृदय ठाऊक आहे की कोणाबद्दल ही मला कधी वाईट भावना असेल. काही फरक पडत नाही जर ते माझ्याबरोबर असहमत आहेत जितकी पूर्व पश्चिमेपासून दूर आहे, तरीही मी त्यांना प्रेम केले. आणि जोपर्यंत माझ्यामध्ये देवाचा आत्मा आहे मी नेहमी त्याच्या मंडळीला - त्याच्या लोकांना प्रेम करीन. काही फरक पडत नाही ते काय करतात, किंवा ते माझ्याशी कसे वर्तन करतात, त्याचे त्याच्याशी काही कर्तव्य नाही. तरीही मी त्यांना प्रेम करतो.

15 मी लक्षात करतो एकदा एक मोशे नावाचा मनुष्य. ते लोक नियमित (आपण आपल्या दक्षिणी अभिव्यक्तीत त्याला म्हणू) त्याला चीड आणीत - अगदी नियमित त्याला धावते ठेवीत. सर्वकाही कुरकुर किंवा तक्रार आणि इत्यादी. परंतु मोशे, जेव्हा गोष्ट निकरावर आणण्याची वेळ आली, जेव्हा देव म्हणाला, "त्यांच्यापासून स्वतःला वेगळे कर, कारण मी तुला घेऊन, एक नवीन राष्ट्र सुरु करणार आहे," मोशेने स्वतःला देवाच्या क्रोधाच्या मार्गात फेकले. म्हणाला, "मला घे, आणि लोकांना नाही," ज्यांना त्याने बंडखोर म्हटले होते, (त्याच्याविरुद्ध आणि देवाविरुद्ध बंडखोर) तरीही, त्याने त्यांना इतके प्रेम केले की तो म्हणाला, "मला घे आणि त्यांना वाचव." तो मोशेमध्ये ख्रिस्त होता.

आणि जर एक मनुष्य, फरक पडत नाही किती कोणीतरी त्याच्याबरोबर असहमत होते, जर त्याला त्याप्रकारे वाटत नाही मग तेथे ख्रिस्ताची कमतरता आहे मी विश्वास करतो - जर त्याच्या हृदयापासून, त्याच्या ओठांनी नाही, परंतु त्याच्या हृदयाने, जर त्याला मानवतेसाठी तसे वाटत नाही.

16 एक वेळेस मी थक्क झालो (फक्त केवळ या वेळेस विनोदबुद्धीने नव्हे), परंतु तेथे एक शिकागो सभा होती आणि एक निग्रो मनुष्य तेथे बसलेला होता आणि तो सारखे म्हणत होता, "मला डॉक्टर ब्रॅन्हमला पाहायचे आहे." त्याने एक भली मोठी टोपी आणि भला मोठा वधस्तंभ परिधान केला होता, आठ किंवा दहा इंच लांब आणि रुंद, त्याच्या छातीवर, आणि झगा आणि फार विचित्र वेष, गमतीदार अंगठ्या आणि मणी आणि इत्यादी. आणि भाऊ बॅक्सटर, जो माझा सहयोगी होता, त्याला मी सांगितले, त्याला सांग, "त्याला खोलीमध्ये आण; मी त्याला पाहीन." आणि तो माझ्याबरोबर खाली बसला आणि तो म्हणाला, "मी तुम्हाला काय म्हणू, एक 'फादर,' किंवा एक 'आदरणीय,' किंवा एक 'वडील,'

किंवा तुम्हाला काय हवे आहे की मी तुम्हाला काय मानावे?”

मी म्हणालो, “जर तू मला प्रेम करतोस, मला 'भाऊ' म्हण,” आणि त्याने, आदराने, तसे केले; आणि त्याचे शीर्षक मला दिले जे, ओह, मला ते कागदावर लिहिण्यासाठी काही ओळी लिहाव्या लागतील, मंडळीच्या नावाची शीर्षके , आणि मंडळीमध्ये त्याचे शीर्षक.

17 परंतु तो एक गोष्ट म्हणाला जी नेहमी माझ्याबरोबर राहिली. तो म्हणाला, “भाऊ ब्रॅन्हम, मला यामध्ये रस आहे.” त्याने सांगितले त्याला त्याच्या मंडळीत आणि त्याच्या गोष्टीत, कशात रस होता. तो म्हणाला, “मला एका जातीत रस आहे”; तो म्हणाला, “ती मानव जात आहे.”

मी म्हणालो, “तेथे आपण हात मिळवू.” मानवजातीतील प्रत्येकासाठी, प्रत्येक पंथासाठी, प्रत्येक रंगासाठी, आणि प्रत्येक व्यक्तीसाठी ख्रिस्त मरण पावला, तोच माझा रस आहे या सकाळी. आणि नेहमीच मी तो माझा रस बनविण्याचा प्रयत्न केला आहे.

18 आता, मला वाचायचे आहे, आणि मग फक्त.... मी प्रचार करण्याचे ध्येय ठेवीत नाही कारण ते कदाचित किमान असेल.... येथे जे काही मला सांगायचे आहे त्याला कदाचित मला चार किंवा पाच तास लागतील. तेव्हा सुमारे दोन तासानंतर आता, मग आपण विसर्जित करु आणि जेवण्यासाठी जाऊ, मग दोन वाजता परत येऊ. येथे दोनच्या अगोदर असा कारण मला अगदी दोनला सुरु करावयाचे आहे. सुमारे दीड वाजता येथे असा जर तुम्ही असू शकता. मग आज रात्रीसाठी आपण वेळेवर बाहेर असू.

या दुपारी मला तरीही टिफटन, जॉर्जियासाठी निघायचे आहे जेथे मला उद्या रात्री सभा घ्यावयाची आहे, हायस्कुलच्या सभागृहात तेथे - फक्त एक प्रचार सेवा. आणि मग तेथून, मला ठाऊक नाही. अगदी जेथे कोठे तो तेथून नेतृत्व करील. कित्येक स्थळांवर ... भाऊ अर्गनब्राईट आणि त्यांनी परदेशात सरळ तेथून सुरु करण्यासाठी बोलाविले आहे, संपूर्णपणे पश्चिमेकडे, कॅनडामध्ये, जगासभोवती. परंतु तुम्हाला कळेल.... मी विश्वास करतो तुम्हाला मी संपविल्यानंतर चांगले कळेल, जर देव मला सहाय्य करील तुम्हाला त्याप्रकारे देण्यासाठी ज्याप्रकारे मला ते दिले गेले; मग सेवेनंतर, तुम्हाला समजेल, मी आशा करतो.

19 आणि मग, जर तेथे कोणता प्रश्न असेल जे तुम्हाला समजत नसेल, मी तुम्हाला तुमचे पुस्तक आणायला सांगतो, आणि मग तुम्ही ज्यांच्याकडे ध्वनिमुद्रक आहे ते ध्वनिमुद्रणपट्ट्या घेऊ शकतात, आणि ते तुमच्या घरात ठेवा आणि खुल्या हृदयाने खाली बसा - अगदी खुल्या हृदयाने. फक्त ते तेथे ठेवा आणि म्हणा, “प्रभू, मी आता अगदी आरामात आहे; मी ऐकणार आहे”, आणि मग जेव्हा तुम्ही काहीतरी पकडाल, ध्वनिमुद्रक बंद करा आणि जा शास्त्रलेख घ्या. आणि पवित्रशास्त्र म्हणते, येशू म्हणाला, “ते ते आहेत जे माझ्याबद्दल साक्ष देतात,” पहा. शास्त्रलेखातून पाहूया आणि बघूया जर ते ठीक आहे.

20 आता, मला उघडायचे आहे ... (क्षमा करा? अगदी येथे. तो मला विभिन्न ध्वनिग्राहक यंत्र वापरण्यासाठी दाखवीत आहे. तेथे इतका जमाव आहे त्याचा या सकाळी, मला ठाऊक नाही कोणता सुरु करायचा.) आता, शास्त्रलेखात वळूया ... मी उत्पत्तीमध्ये सुरु करणार आहे, आणि आज रात्री प्रकटीकरणात संपविणार आहे. मी वचनाचा विश्वास करतो. उत्पत्ती, १ अध्याय सुरुवात करु, मी वचनाचा एक भाग वाचण्याची इच्छा करतो. आणि आता जर कोणाला कोणाची ... पेन्सिल आणि पेपर हवा आहे आणि इत्यादी कारण माझ्याकडे कित्येक शास्त्रलेख आहेत. या शास्त्रलेखावर मला सर्वदा वाचत राहायचे आहे.

प्रारंभी देवाने आकाश व ... पृथ्वी ही उत्पन्न केली.

आणि पृथ्वी आकारविरहित, व शून्य होती; जलनिधीच्या पृष्ठभागावर अंधकार होता. आणि देवाचा आत्मा जलावर तळपत राहिला होता.

आणि देव म्हणाला, प्रकाश होवो: आणि प्रकाश झाला.

देवाने प्रकाश पाहिला, की तो चांगला आहे: आणि देवाने ... प्रकाश व अंधकार हे एकमेकांपासून वेगळे केले.

देवाने प्रकाशाला दिवस, व अंधाराला रात्र म्हटले. आणि संध्याकाळ झाली व सकाळ झाली हा पहिला दिवस.

मग देव बोलला, जलांच्या मध्यभागी अंतराळ ... होवो, व ते जलांस दुभागणारे होवो.

असे देवाने अंतराळ केले, आणि अंतराळा खालच्या व वरच्या जलांस वेगळे केले: आणि तसे झाले.

देवाने अंतराळास आकाश म्हटले. आणि संध्याकाळ झाली व सकाळ झाली हा दुसरा दिवस.

... देव बोलला, आकाशाखालच्या जलांचा एक ठिकाणी संचय होवो, व कोरडी जमीन दृष्टीस पडो: आणि तसे झाले.

देवाने कोरड्या जमिनीस भूमी म्हटले; व जलांच्या संचयास समुद्र म्हटले: देवाने पाहिले की हे चांगले आहे.

आणि देव बोलला, हिरवळ, बीज देणारी वनस्पती, आणि आपापल्या परी सबीज, फळे देणारी फळ झाडे, भूमी, आपल्यावर उपजवो: आणि तसे झाले.

हिरवळ, आपापल्या परी बीज देणारी वनस्पती, व आपापल्या परी, सबीज फळे देणारी, फळ झाडे, भूमीने उपजविली: देवाने पाहिले की हे चांगले आहे.

आणि संध्याकाळ झाली व सकाळ झाली हा तिसरा दिवस.

21 आता, या सकाळी मला: "तो बोललेला शब्द हा मूळ बीज आहे" या माझ्या मजकुराचा वापर करुन सुरुवात करायची आहे. आता तेच काय ते आहे ज्यावर मला मजकूर ठेवण्याची इच्छा आहे - "तो बोललेला शब्द हा मूळ बीज आहे." आता जर तुम्ही लक्ष दिले देव बोलला, "त्याने आपापल्यापरी सबीज उपजवो." जे काही ते होते त्याने त्याच्यापरी उपजवायचे होते.

आता, हा देवाचा शब्द हा अनंत आहे. देव, अमर्याद असल्याने, एक गोष्ट बोलू शकत नाही आणि मग नंतर, एका चांगल्या निर्णयासाठी, काहीतरी इतरांमध्ये ते बदलेल, कारण देवाचा प्रत्येक निर्णय हा परिपूर्ण आहे. तो करु शकत नाही ... एकदा त्याचा शब्द बोलला गेला, तो कधीही मरु शकत नाही. तो पुढे, पुढे, पुढे जगतो, आणि कधीही मरु शकत नाही कारण तो देव आहे. त्याचा शब्द तेवढाच मरु शकत नाही जेवढा तो मरु शकत नाही. त्याच कारणामुळे आपण १ योहान ... किंवा संत योहान, १ अध्यायात वाचतो, की "प्रारंभी शब्द होता, आणि शब्द देवासह होता, आणि शब्द देव होता ... आणि शब्द देही झाला...." तोच शब्द जो प्रारंभी बोलला गेला त्याच्या अनंत उद्देशासाठी तो आला आणि देह बनला आणि आम्हामध्ये वस्ती केली - देवाचा शब्द.

22 काही वर्षांअगोदर मी ऐकले की एक स्त्री (आता हे कदाचित खात्रीलायक नसेल) जिने घडाळ्यांच्या आणि मनगटी घडाळ्यांच्या काट्यांवर टाकण्याच्या रेडियमला मिसळताना आपल्या जिभेने चाटले - ज्याने त्या स्त्रीला ठार केले. आणि वर्षांनंतर, तिची कवटी शवविच्छेदनासाठी राखलेली असताना, ते म्हणाले तुम्ही उपकरण घेऊ शकत होते, जे काही ते वापरत होते, आणि त्या कवटीच्या हाडावर ठेवीत, आणि कडकडाटाने तुम्ही अजून ही ते रेडियम तिच्या कवटीतून फिरत असताना ऐकू शकत होता, तिला मरुन कित्येक वर्ष झाल्यानंतर देखील. रेडियम नियमित जात असतो.

23 देवाचा शब्द नियमित जात असतो. मला सांगण्यात आले की जर आपण एक उपकरण उचलले जे ते पकडील, ती एका मनुष्याची वाणी, माझी वाणी जी आज मी बोलत आहे, आतापासून दहा हजार वर्षानंतर अजूनही ती हवेमध्ये पकडली जाईल. ते जणूकाही एका तलावाच्या मध्यावर एक गारगोटी टाकण्यासारखे आहे. आणि लहानशा सूक्ष्म लहरी त्या डोळ्यांना दिसेनाशा झाल्यावर देखील, सुरुच असतात जोपर्यंत ती तळाला जात नाही. आणि आपल्या वाण्यांच्या वायू लहरी नियमितपणे सभोवार आणि सभोवार जगभर फिरत असतात; त्यामुळे, मग आपली वाणी आपण काय म्हणतो ती आपला न्याय करील. आपली साक्ष सरळ आपल्या विरोधात उभी राहील. आपली स्वतःची वाणी आपल्या स्वतःच्या कानांमध्ये देवाच्या न्यायाच्या आसनासमोर घुमेल जेव्हा त्याचे महान उपकरण प्रत्येक वाणी पकडील जी बोलली गेली आहे - प्रत्येक शब्द जो पुटपुटला गेला आहे.

24 आणि आता तेथे केवळ एक मार्ग आहे ती वाणी थांबविण्याचा जी चुकीची आहे; ते म्हणजे पश्चाताप करा. देव केवळ ती थांबवू शकतो. जर ती नाही, ती पुढे जात राहील आणि अनंततेत तुम्हाला भेटेल. त्यामुळे, देव परिपूर्ण असल्याने आणि त्याची वाणी अनंत असल्याने, त्याच्या स्वतःच्या वाणीला त्याबरोबर पकडले जावे लागेल. त्यामुळे, तो प्रत्येक निर्णयामध्ये परिपूर्ण असायलाच हवा. कारण तो जेव्हा एकदा काहीतरी बोलतो, ते शेवटापर्यंत जाणेच आहे आणि परत न्यायनिवाड्यात पाठी येणे आहे.

25 आता, जर तुम्ही वास्तविक समंजस असाल, किंवा असण्याचा प्रयत्न कराल, तुम्ही पाहाल का मी नेहमी देवाच्या वचनासाठी भूमिका घेतली जी मी घेतली आहे; कारण, इतर सर्व गोष्टी नाश होणे आहे, देव हा अंनत आहे आणि त्याचे वचन हे अनंत आहे. आता, जसा तुम्ही अभ्यास करता, आणि मी अगदी जेवढा मी लांबलचक बोलू शकतो तेवढा बोलण्याचा प्रयत्न करणार आहे जेणेकरुन तुम्हाला शब्द समजतील; आणि ते मी ध्वनिमुद्रणपट्ट्यांसाठी देखील करतो - की तुम्हाला समजणेच आहे की हे पवित्र शास्त्र हा देवाचा शब्द आहे!

26 आता आपल्याला ठाऊक आहे की आपण एका न्यायनिवाड्यात येत आहोत, की देवाची वाणी कोठेतरी आपल्याला गाठणार आहे कारण ती प्रत्येक मर्त्य मानवाला ऐकण्यासाठी दिली गेली. ती घेऊन जाण्यासाठी सेवक जबाबदार आहेत, आणि जर ही देवाची वाणी प्रत्येक व्यक्तीला गाठणे आहे, मग तुम्हाला ती एकतर येथे किंवा न्यायाच्या आसनाजवळ ऐकणे आहे. तेव्हा जर मंडळीकडे देवाची वाणी आहे, मग तुम्हाला मंडळीची वाणी ऐकणेच आहे जसे आपले रोमन कॅथोलिक लोक आपल्याला सांगतात. आणि जेव्हा ते, त्यांच्यामध्येच, इतके गोंधळात आहेत आणि त्यांच्या शिकवणीमध्ये भिन्न आहेत, (ते रोमन, ग्रीक आणि विभिन्न प्रकारचे) मग तेथे कोणती एक जागा असू शकत नाही विश्वास असण्यासाठी कारण कोणती एक ती मंडळी आहे?

27 रोमन मंडळी बरोबर आहे किंवा ग्रीक मंडळी बरोबर आहे, किंवा इतर मंडळ्यांपैकी काही बरोबर आहेत? लूथरन बरोबर आहे का? बॅप्टिस्ट बरोबर आहे? मेथडिस्ट बरोबर आहे? प्रेसबायटेरियन बरोबर आहे? किंवा कोण बरोबर आहे जेव्हा त्यांच्यामध्ये इतकी भिन्नता आहे? एक ही जेवढी पूर्वेपासून पश्चिम दूर आहे तेवढी एकमेकींपासून दूर आहे, परंतु माझ्या मताने देवाची वाणी ही न्यायाधीश आहे. तेव्हा ती देवाची वाणी, आणि जर ती इतकी परिपूर्ण आहे, ती कोणत्यातरी परिपूर्ण स्रोतातून यावयास हवी आणि जर मनुष्ये एका मार्गाने आणि दुसऱ्या मार्गाने त्यांच्या संप्रदायांच्या तफावतीने ती आणतील, मग ते काय म्हणत आहेत यामध्ये तेथे विश्वास ठेवण्यासाठी निश्चितच कोणता मार्ग नसेल.

28 मी आशा करतो ते स्पष्ट आहे, पहा, कारण आणि जर एक म्हणतो हे या प्रकारे आहे ... एक म्हणतो तुम्ही या मंडळीत सामील व्हायलाच हवे: "या मंडळीकडे फक्त तारण आहे" - ती कॅथोलिक आवृत्ती आहे. ते लूथरन भोवती आले आणि म्हणाले ते तो मार्ग आहे. तेथे अजून काहीतरी घेऊन मेथडिस्ट आले, बॅप्टिस्ट काहीतरी घेऊन आले, पेन्टिकॉस्ट काहीतरी घेऊन आले; आणि तेथे असा काहीतरी गोंधळाचा जमाव भासत होता. मग जेव्हा तुम्ही हे लिखित वचन आपल्या भावांकडे नेता, त्यातील कित्येक जण म्हणतात, "बरे, ते दिवस आता नाहीत." दुसरा एक म्हणतो, "तो केवळ एक इतिहास आहे." दुसरा एक म्हणतो, "ते एक कवितांचे पुस्तक आहे." दुसरा म्हणतो, "मंडळीला ते बदलण्याचा अधिकार आहे." मग आपण कुठे उभे आहोत? विश्वासासाठी कुठे तेथे विसाव्याचे स्थान आहे?

29 जेव्हा देव, अनंत असल्याने.... मी विश्वास करतो जर आपला न्यायनिवाडा व्हावयाचा आहे (आणि नेहमी असणार) ... की जर आपला

कशाच्याद्वारे न्यायनिवाडा व्हावयाचा आहे, तो देवाच्या वचनाद्वारे असेल ज्याला कामगिरी सोपविली आहे. मग जर आपला त्या वचनाद्वारे न्यायनिवाडा होणे आहे, मग देव एक अन्यायी देव असेल जो अशा प्रकारचा गोंधळ पृथ्वीवर ठेवील. आणि बिचारे मानवी मन इतके गोंधळलेले आहे, की त्याला ठाऊक नाही काय करावे; आणि एक ह्याला सामील होईल मग एक त्याला सामील होईल, तो बिचारा माणूस विचार करण्याचा प्रयत्न करीत आहे तो योग्य स्थळ शोधण्याचा प्रयत्न करीत आहे. तो या संप्रदायाचे ऐकेल, मग तो दुसऱ्या संप्रदायाचे ऐकेल, आणि हे एक त्या एकापेक्षा चांगले भासते; तो जाईल आणि पहिली गोष्ट, तो पहिल्या एकाकडे परत पाठी येतो. त्याला अगदी कळत नाही काय करावे. परंतु जर देव कशाद्वारे तरी जगाचा न्यायनिवाडा करणार आहे, तो त्याच्या वचनाद्वारे असेल. मी तो विश्वास करतो.

30 आणि आता, माझ्या बंधूंनो - आता जेव्हा मी तसे म्हणतो, मला फक्त येथील लहानशा जमावाकरिता या सकाळी म्हणायचे नाही, परंतु मला म्हणायचे आहे जगभर जेथे या ध्वनिमुद्रणपट्ट्या पाठविल्या जातील - मी इच्छा करतो थोडा वेळ तुम्ही माझे सहन करावे आणि त्याचा विचार करावा, की न्यायनिवाड्यासाठी तेथे कोणतेतरी स्थळ असणे आहे. मग त्यांच्यातील काही म्हणतात, "किंग जेम्स आवृत्ती" किंवा विशिष्ट दुसरी आवृत्ती, आणि आता ते एक स्टॅंडर्ड आवृत्ती किंवा काहीतरी बनवीत आहेत.

31 मी विश्वास करतो जर देव एक सार्वभौम देव (जसा तो आहे) आहे, तो अनंत असा, त्याला ते पाहणे आहे; ते त्याच्यावर अवलंबून आहे. जर मला त्याच्या ठिकाणी स्वर्गात जायचे आहे, ते त्याच्यावर आहे की त्याने मला एक स्थळ देणे जेथे मला कळेल काय करावे - कुठेतरी जेथे तुम्ही तुमचा हात ठेवू शकता आणि म्हणता, "हे ते आहे." तुम्ही याबरोबर सहमत आहात काय? तेथे असणे आहे.... ते त्याच्यावर आहे. तो अन्यायी असेल.

32 जर मी म्हणालो, "प्रभू, मी एक लूथरन होतो," आणि तो दुसरा एक म्हणाला, "बरे, मी एक कॅथोलिक होतो," बरे, तेथे तुम्ही दोन एकमेकांना विरोध करीत आहात. आता, तो बिचारा माणूस काय करणार आहे? किंवा काय जर एक कॅथोलिक मंडळी बरोबर आहे? - मग सर्व लुथरनांचा नाश झाला आहे. काय जर लूथरन बरोबर आहेत? - सर्व कॅथोलिकांचा नाश झाला आहे.

पहा, तुम्हाकडे कुठेतरी असावे लागेल की विश्वासाला त्याचे विसाव्याचे स्थान मिळू शकेल. आणि माझ्याकरिता - मला ठाऊक नाही तुम्हाला त्याबद्दल काय वाटते, परंतु माझ्याकरिता पवित्र शास्त्र हे देवाचे अचूक वचन आहे. आणि मी विश्वास करतो की देवाने त्याच्या वचनाचे ध्यान राखले आहे की तेथे एक ही कानामात्रा अयोग्य ठिकाणी नाही.

33 माझी मुलगी, रिबेका, मागे तेथे, म्हणत होती, "डॅडी, आम्ही शाळेमध्ये सिद्ध केले आहे की हे जग दशलक्ष आणि दशलक्ष वर्षे जुने आहे; मग ते पवित्र शास्त्राच्या विरोधात नाही का?"

"नाही, महाशय," मी म्हणालो, "ते नाही."

"बरे," म्हणाली, "जर विभिन्न खडकांची आणि रचनेची आणि उध्वमुखी लवणस्तंभ आणि अधोमुखी लवणस्तंभ आणि इत्यादींचा अभ्यास सिद्ध करते की दशलक्ष वर्षे पाणी स्त्रवत होते, आणि देव बोलला त्याने स्वर्ग आणि पृथ्वी एका चोवीस तासात बनविली, ते चुकीचे सिद्ध... पवित्र शास्त्राचे खंडन करीत नाही का?"

मी म्हणालो, "नाही." जर तू लक्ष दिले देव मोशेला पवित्र शास्त्राबद्दल सांगत आहे, तो म्हणाला, "प्रारंभी देवाने आकाश व पृथ्वी ही उत्पन्न केली. - समय! त्याला किती वेळ लागला, ते आपले काम नाही. मग तो पुढे जातो आणि त्याच्या समयात आणण्यासाठी पृथ्वीमध्ये बीज टाकण्याची सुरुवात करतो. परंतु प्रारंभी - कदाचित शेकडो दशलक्ष खरब वर्षे असतील, युगांचा समय असेल, परंतु देवाने आकाश व पृथ्वी ही उत्पन्न केली, समय! ते त्याला कायम करते. ती पहिली गोष्ट आहे. पहा, तो चुका करीत नाही. पौल, तो महान प्रचारक म्हणाला ... तिमथ्याला सांगितले "स्वतःला सिद्ध करण्यासाठी अभ्यास कर, देवाचे वचन नीट विभागणारा अस." त्याचा खुल्या हृदयाने अभ्यास कर, आणि तेच काय ते मी करण्याचा प्रयत्न करतो.

34 आता, अशाप्रकारे वचनात असलेल्या माझ्या विश्वासाने, मग मी कोणता खाजगी अनुवाद घेऊ शकत नाही, कारण पवित्र शास्त्र म्हणते की पवित्र शास्त्र हे खाजगी अनुवादाचे नाही. आता आत्म्याने ते आताच प्रकट केले. मला शास्त्रलेख ठाऊक आहे, परंतु अगदी आता मला ठाऊक नाही अगदी नक्की ते शास्त्रलेखात कोठे आहे; परंतु तुम्ही जे लिहून घेत आहात, तुम्हाला ते आढळेल; मी विचार करतो ते पेत्रामध्ये आहे की पवित्र शास्त्र हे खाजगी अनुवादासाठी नाही.

त्यामुळे, जर तो प्रेरित लेखक म्हणाला ... आणि जर ते चुकीचे आहे, मग कितीतरी अधिक इतर भाग चुकीचा आहे? ते एकतर सर्व बरोबर आहे किंवा सर्व चुकीचे आहे. तुम्ही त्याला अजून काहीतरी बनवू शकत नाही. बरे, मंडळीबद्दल, तुम्ही म्हणता, "बरे, मग ती मंडळी...." नाही, जर तुम्ही मंडळीत जाता, मग कोणती मंडळी बरोबर आहे? कोणती मंडळी बरोबर आहे? पहा तुम्हाला परत अशा कोणत्यातरी गोष्टीवर येणे आहे ज्यावर विश्वास विसावला जाईल. आणि माझ्यासाठी, तो देवाच्या वचनावर आहे विश्वास करीत आहे की हे पवित्र शास्त्र लोकांसाठी देवाचा कार्यक्रम आहे - नेहमी असला आहे.

35 येशू म्हणाला शास्त्रलेख पूर्ण व्हावयास हवेत. ते म्हणजे, जे सर्व काही शास्त्रलेखात लिहिले गेले आहे - (आता हे ध्यानात ठेवा कारण तुम्ही ज्यांना ह्या ध्वनिमुद्रणपट्ट्या मिळत आहेत आता, ध्वनिमुद्रणपट्टीच्या शेवटी तुम्हाला आढळेल मी परत त्यावर मागे येईन) की ते सर्व जे शास्त्रलेखात आहे ते पूर्ण होणेच आहे. आता ते फक्त एक मिनिटभर झीरपू द्या, वर्ग, पहा. शास्त्रलेखात असलेले ते सर्व पूर्ण होणेच आहे. मग जर देव काहीतरी बोलला - तेथे तुम्ही आहात! ते पूर्ण होणेच आहे! किंवा जर ते झाले नाही, तो देवाचा शब्द नाही. मग जर तो आहे ... तो देवाचा शब्द नाही, मग आपण कोठे आहोत? असे काहीतरी घेऊया जे देवासारखे दिसते किंवा काहीही आपल्याला करायचे आहे. जसे

पवित्र शास्त्र म्हणते, "तर चला आपण खाऊ, पिऊ आणि मजा करु कारण आपल्याला उद्या मरावयाचे आहे," पहा.

36 आता, जर तो देवाचा शब्द नाही, मग आपण सर्व नाश पावलेले आहोत; आणि जर तो देवाचा शब्द आहे, देव हा निखालस सन्मानास योग्य आहे! तो देव ... जो सर्व सन्मानाचा झरा आहे, जो सर्व सन्मानाचा प्रारंभ आहे, जो सर्व सन्मानाचा स्रोत आहे, जो सर्व सत्याचा स्रोत आहे, ज्याला तो जे काही बोलला आहे त्यासाठी उभे राहणे आहे! आणि जर हा देवाचा शब्द नाही, मग देव कोण आहे? देव कोठे आहे? किंवा तेथे देव आहे का?

37 "ओह," तुम्ही म्हणता, "भाऊ ब्रॅन्हम, मला तो जाणवतो." ओह, अधर्मी त्याच्या मूर्तीची तीच गोष्ट तुम्हाला सांगू शकतो.

प्रवास तुम्हाला काहीतरी करतो, जेव्हा तुम्ही ते स्वतः पाहता.

"तेव्हा मी विश्वास करतो मी पाहू शकतो आणि हे बघतो."

"होय."

"मी विश्वास करतो जर मी.... मी विश्वास करतो कारण मी अशाप्रकारे बदललो आहे, कारण...."

मी देखील ते करतो, परंतु लक्षात ठेवा अधर्मी देखील तीच गोष्ट करतो. का आफ्रिकेची नैतिकता दाखविते ... त्यातील काही जमाती येथील अमेरिकन लोकांना जे स्वतःला ख्रिस्ती म्हणवितात त्यांना स्वतःची लाज वाटेल असे करतील - लोकांमधील ती नैतिकता आणि स्वच्छता जे अधर्मी मुर्त्यांची उपासना करतात. तेव्हा कदाचित तो देव आहे. पहा मला काय म्हणायचे आहे? तुम्ही पहा, जेव्हा तुम्ही गोष्टीच्या तोंडावर पाहता, तेथे मोठे भले वर्तुळ आहे जे तुम्हाला पार करायचे आहे; तेव्हा तुम्हाला कोठेतरी मागे येणे आहे आणि तुमचा हात ठेवणे आहे.

38 आता लुथरनांचे दावे घेऊया; ते अपयशी झाले! कॅथोलिकांचे दावे घेऊया; ते अपयशी झाले! बॅप्टिस्टांचे दावे घेऊया, पेन्टिकॉस्टलांचे; ते अपयशी झाले! म्हणून तुम्ही त्यांच्यावर आत्मविश्वास ठेवू शकत नाही. परंतु तेथे पवित्र शास्त्रात एकही गोष्ट लिहिलेली नाही परंतु जी देवाने कोणाद्वारे तरी ती सिद्ध केली नाही की ते सत्य आहे. हे सत्य आहे.

जसे मी नेहमी म्हणतो, "कदाचित माझा विश्वास तेथे पोहोचू शकणार नाही जेथे हनोख पोहोचला, परंतु मी नक्कीच कोणाच्यातरी मार्गात उभा राहणार नाही जो तेथे पोहोचू शकतो." महान विश्वास. आता, ही पार्श्वभूमी घेतो त्याच कारणामुळे की का मी पवित्र शास्त्रावर विश्वास करतो, आणि तेथूनच जेथून मी माझा मजकूर घेतो.

39 आता, पुढची गोष्ट मला सांगायची आहे, की मी विश्वास करीत नाही की पवित्र शास्त्र स्वतःशी विसंगत आहे, आणि मी जगभर, आवाहन केले आहे, कोणत्याही व्यक्तीला जो अशा गोष्टीचा दावा करतो, त्याने येऊन मला हे सिद्ध करुन दाखवावे. या, हे सिद्ध करा. पवित्र शास्त्र स्वतःशी विसंगत नाही; ते तुम्ही आहात जे पवित्र शास्त्राशी विसंगत आहात. देव स्वतःशी विसंगत असू शकत नाही. जर तो आहे, मग तो देव नाही. आणि जर हा शब्द देव आहे मग ... आणि तो विसंगत आहे मग तुम्ही देवाला स्वतःशी विसंगत असे बनविता; मग तुमचा देव कोठे आहे? तेव्हा एक प्रकारे घट्ट होते, नाही का? - ते किचकट आहे.

40 जर देव स्वतःशी विसंगत आहे, मग तो माझ्यापेक्षा किंवा तुमच्यापेक्षा अधिक नाही, कारण तो स्वतःशी विसंगत असू शकतो. ते वचन तेथे आहे, परंतु ते ज्ञानी व विचारवंतांच्या नजरेपासून गुप्त ठेवलेले आहे.

त्यामुळेच कोणीतरी म्हणते की मत्तय २८:१९, जेथे: "तुम्ही जाऊन, सर्व राष्ट्रांतील लोकांस शिकवा, त्यांस पित्याच्या, पुत्राच्या, आणि पवित्र आत्म्याच्या नावाने बाप्तिस्मा द्या"; प्रेषितकृत्य २:३८ म्हणते, "पश्चाताप करा आणि येशूच्या नावात बाप्तिस्मा घ्या" - हे विसंगत आहे." हे विसंगत नाही!

41 सर्वजण ज्यांचा कधी बाप्तिस्मा झाला आहे, त्यांचा पिता, पुत्र, आणि पवित्र आत्म्याच्या नावातच बाप्तिस्मा व्हायला हवा होता. आणि जर तुमचा बाप्तिस्मा येशू ख्रिस्ताचे नाव वापरुन झाला नसेल, तुमचा पिता, पुत्र, व पवित्र आत्म्याच्या नावाने बाप्तिस्मा झालेला नाही! तुमचा बाप्तिस्मा कोणत्यातरी शीर्षकांत झालेला आहे जी एका नावाशी संबंधित आहेत. जर ते बरोबर प्रकटीकरण नसेल, मग पवित्र शास्त्र चुकीचे असते जेव्हा ते पुढे गेले, आणि सर्वजणांचा येशू ख्रिस्ताच्या नावात बाप्तिस्मा झाला. परंतु जर पवित्र शास्त्र बाप्तिस्मा देते ... येशूने त्यांना पिता, पुत्र आणि पवित्र आत्म्याच्या नावात बाप्तिस्मा घेण्याचा आदेश दिल्यानंतर, प्रेषितांपैकी प्रत्येकजण सर्व युगांतून खाली सर्वांचा येशू ख्रिस्ताच्या नावात बाप्तिस्मा झाला, मग पवित्र शास्त्र पूर्णपणे स्वतःशी विसंगत आहे. परंतु जर तुम्ही त्याकडे पाहिले ... त्यांनी अगदी ते केले जे त्याने सांगितले. शीर्षके नाहीत, परंतु नाव. तेव्हा तेथे विसंगती नाही.

42 कितीतरी अधिक येथे मी बाहेर काढू शकत होतो जे मी अगदी लिहून ठेवले आहे, की जेथे लोक म्हणतात की ते स्वतःशी विसंगत आहे. मी पंचवीस वर्षे विचारले (आता जवळजवळ तीस) कोणीतरी मला दाखविण्यासाठी. ते तेथे नाही. नाही, महाशय. तेथे ते आहे, ते सत्य, सर्व सत्य, आणि सत्य सोडून अजून काही नाही, आणि आपला विश्वास सरळ तेथे विसावतो, अगदी तेथे देव काय बोलला त्यावर. त्याचा अनुवाद करण्याचा प्रयत्न करु नका; फक्त ते बोला ज्याप्रकारे ते बोलते. कोणता खाजगी अनुवाद टाकू नका, आणि मी विश्वास करतो की तेथे आणखीन काही नाही....

43 आता, मी आशा करतो की जर हे दुखावते त्याचा तसा अर्थ नाही; मी सांगण्याचा प्रयत्न करतो मी का विश्वास करतो जो काही मी विश्वास करतो आणि ज्याप्रकारे मी वर्तन केले जे मी वर्तन केले - त्या गोष्टींचे ज्या मी केल्या आहेत. मी स्वतःला जगाला दाखविण्याचा प्रयत्न करीत

आहे, की मी हे केले आहे कारण ही माझी खात्री आहे.

मी विश्वास करतो की कोणता ही शब्द ज्याची या पवित्र शास्त्रात भर घातली जाईल आणि ते करण्याचा जो कोणी अपराधी असेल, त्याचा वाटा जीवनाच्या पुस्तकातून काढून टाकला जाईल - प्रकटीकरण २१: "जो कोणी ह्यात भर घालील किंवा ह्यातून काढून टाकील...." मी विश्वास करीत नाही की कोणताही पंथ, कोणती मतप्रणाली, अजून काहीही, परंतु फक्त तो शब्दशः देवाचा शब्द ही देवाची योजना आहे. अजून काहीही हे पापमय आहे व त्याच्याशी व्यवहार केला जाईल आणि अनंत काळासाठी नाश केले जाईल - कोणताही मनुष्य, कोणताही पंथ, कोणताही संप्रदाय, किंवा काहीही जे भर घालील त्यामध्ये किंवा या वचनातून एक विरामचिन्ह काढून टाकील. देव, जो कालचा देव नाही ज्याने एक पुस्तक लिहिले आणि मनुष्यांच्या जमावाच्या हाती दिले आणि त्यांना गोंधळात जाऊ दिले आणि अजून सर्वकाही, आणि मग त्या पुस्तकाने तो जगाचा न्यायनिवाडा करणार आहे! परंतु तो देव ज्याने ते लिहिले तो जिवंत आहे! - त्यामध्ये राहतो आणि त्याचा शब्द कायम करतो. (आता ध्वनिमुद्रणपट्ट्यांचा अभ्यास करताना, अगदी तेथे तुम्ही अगदी बारकाईने त्याचा अभ्यास करावा असे मला वाटते - तो शेरा, पहा.)

44 आता, मी उत्पत्तीमध्ये सुरुवात केली, मी आता प्रकटीकरणात आहे हे एकत्र आणीत आहे की हा देवाचा शब्द आहे. प्रकटीकरण म्हणते की जो कोणी ह्यातून काढून टाकील किंवा भर घालील ह्यामध्ये, त्याचा भाग, जीवनाच्या पुस्तकातून, बाहेर काढला जाईल. मी शास्त्रलेखाकडे येईन ... काही वेळानंतर उल्लेख करीन. प्रकटीकरण शेवटचा अध्याय.

आता तो १ अध्याय दाखवीत आहे, काय? शब्द काय आहे? - आता, तो अनंत आहे. त्यामध्ये हस्तक्षेप होता कामा नये, भर घालू नये, किंवा काढून टाकू नये, पहा. त्यामध्ये हस्तक्षेप होता कामा नये - देव त्याकडे पाहतो. त्यामध्ये भर घालता कामा नये - काहीही त्यामध्ये. काहीही त्यामधून काढून टाकता कामा नये कारण तो अनंत आहे, पहा. आता, तुम्हाला ते आधारासाठी दाखविण्यासाठी, जे काही मी सांगण्याचा प्रयत्न करीत आहे, ते यामध्ये आहे (उत्पत्ती ते प्रकटीकरण) ते आणखीन कशाबरोबर ही मिसळले जाणार नाही.

45 आता, येथेच जेथे आपण भिन्न होणार आहोत - येथून ते या दुपारचे पाच वाजेपर्यंत, पहा. येथेच जेथे आपण भिन्न होणार आहोत. कितीजण सहमत होतील की हे देवाचे न्यायनिवाड्याचे पुस्तक आहे, की देवाच्या वचनाद्वारे आपला न्यायनिवाडा केला जाणार आहे? त्यामध्ये भर घातली जाणार नाही किंवा त्यातून काढून टाकले जाणार नाही. मग हे असे का केले गेले आहे? आता आपण यामध्ये येत आहोत. का हे असे अशा उद्धट प्रकारे केले गेले आहे? आता, आपण उत्पत्ती आणि प्रकटीकरणाच्या मध्ये ते शोधून काढणार आहोत, अगदी सरळ आपल्या समयात, खाली इतर समयांमधून.

46 आता, ध्वनिमुद्रणपट्ट्यांकरिता मला ते खरोखर स्पष्ट करु द्या. आता, मी वचनाचा विश्वास का करतो हे तुम्हाला मी सांगितल्यानंतर आणि देव याबद्दल काय म्हणाला, आणि कसे त्यातून काढून टाकता कामा नये किंवा भर घालू नये, त्यातून काढू नये, मला याच्या खोल भागात जायचे आहे, या लांब मजकुराच्या संदर्भात जो मी काढला आहे, आणि तुम्हाला स्पष्ट करायचे आहे आणि काय घडले ते तुम्हाला दाखवायचे आहे; मग तुम्ही त्याचे कारण पाहू शकता की जो काही मी विश्वास केला तो का विश्वास केला, पहा.

47 आता, तो मिश्रित होऊ शकत नाही, आणि तो अजून कोणत्याही गोष्टीशी संकरित होऊ शकणार नाही. तो संकरित होणार नाही. आज हा एक प्राण्यांचा, मक्याचा, गव्हाचा संकरण करण्याचा महान दिवस आहे - चांगले दिसणारे एक उत्पादन बनविण्याचा, परंतु ते चांगले नाही. ते सडलेले आहे, त्यामध्ये जीवन नाही - मरते, स्वतःला पुनरुत्पादित करु शकत नाही; ते मृत आहे कारण सर्वकाही जे आज आपल्याकडे पृथ्वीवर त्याच्या मूळ स्वरुपात आहे, ते देवाचा बोललेला एक शब्द आहे!

48 त्यामुळेच काय ते खेचर, एक अनौरस जन्मलेला प्राणी मिश्रजातीय प्रजननाद्वारे परत स्वतःला उत्पन्न करु शकत नाही. देवाने एक घोडा बनविला आणि त्याने एक खेचर, किंवा एक गाढव बनविले. तुम्ही त्या दोघांचे एकत्र प्रजनन करा, तुम्हाला एक खेचर मिळेल. ते संकरित आहे; त्यामुळे ते स्वतःला परत उत्पन्न करु शकत नाही. (आपण थोड्या वेळानंतर सर्प बीजाला प्रहार करणार आहोत आता.) ते स्वतःला परत उत्पन्न करु शकत नाही.

49 आता माझा विषय काय आहे? - "तो बोललेला शब्द हा मूळ बीज आहे." आता मला ते सिद्ध करायचे आहे. आता आपण मत्तय २४:३५ मध्ये फक्त एका क्षणासाठी वळूया आणि जसे या शास्त्रलेखांतून आपण थोड्या वेळाकरिता शोधतो (आणि मी पाहीन आपल्याकडे किती वेळ आहे), आणि मला येथे एक वचन वाचायचे आहे जे येशू म्हणाला. मत्तय २४ आणि ३५ पद - २४ अध्याय, ३५ पद - हा शब्द कसा अनंत आहे ते दाखविते (आपण ज्याबद्दल बोलत आहोत).

मी तुम्हाला खचित ... [३४] खचित सांगतो, हे सर्व पूर्ण होईपर्यंत, ही पिढी नाहीशी होणारच नाही.

आकाश व पृथ्वी नाहीशी होतील, परंतु माझी वचने नाहीशी होणार नाहीत.

50 आता, मग तुम्ही त्यामध्ये काही मिसळवू शकता का? आता, प्रकटीकरणाच्या पुस्तकात २२ अध्याय आणि १९ पद, मला हे वाचावयास आवडेल. प्रकटीकरण २२ अध्याय आणि १९ पद आणि पहा ते काय म्हणते. १८ व्या पदापासून सुरुवात करुया.

ह्या पुस्तकांतील संदेश वचने ऐकणाऱ्या प्रत्येकाला ... [आता लक्षात ठेवा उत्पत्तीपासून जेथे त्याने शब्द बोलला, पहा.] ह्या पुस्तकांतील संदेश वचने ऐकणाऱ्या प्रत्येकाला [तो याजक, पोप, बिशप, स्टेट प्रेसबायटर किंवा जो कोणी असेल] ... मी निश्चयपूर्वक सांगतो की, जो कोणी ह्यात भर घालील, त्यावर ह्या पुस्तकात लिहिलेल्या पीडा देव आणील:

तुमच्या मतप्रणाल्यांचे काय? तुमच्या अशास्त्रलेखीय पंथांबद्दल काय जे तुम्ही ऐकत आहात? - सर्व संप्रदायांचे, तेथे एकही सबब नाही!

.... आणि जो कोणी ह्या भविष्यवाणीच्या पुस्तकातील वचनांतून [म्हणतात की ते सारखे नाही, तुम्हाला माहित आहे, पहा] ... काही काढून टाकील, त्याचा वाटा ह्या जीवनाच्या पुस्तकातून, आणि पवित्र नगरीतून, व जीवनाच्या पुस्तकात वर्णिलेल्या गोष्टींतून देव काढून टाकील.

51 जरी तो प्रचारक असेल (पहा), जरी तो मंडळीचा सदस्य असेल त्याच्या संपूर्ण जीवनभर, जरी तो एक बिशप किंवा एक पोप असेल, जो कोणी यातून एक शब्द काढील - फक्त एक शब्द! तुम्हाला जाणीव होत आहे तो एक शब्द होता ज्यावर हव्वेने शंका घेतली होती जो सर्व त्रासाला कारणीभूत ठरला? - देवाचा एक बोललेला शब्द, हव्वेने सत्य असण्याबाबत शंका घेतली, आणि तो प्रत्येक आजाराला, प्रत्येक रोगाला, प्रत्येक पीडित बाळाला कारणीभूत ठरला, प्रत्येक दवाखाना बांधण्यासाठी, प्रत्येक शस्त्रक्रिया जी कधी केली गेली, प्रत्येक मृत्यू जो कधी मेला, यासाठी कारणीभूत ठरली - कारण एका व्यक्तीने एका ... एका शब्दाचा अविश्वास केला. तेथे तुम्ही आहात.

52 हव्वेने काय करण्याचा प्रयत्न केला? - त्याला संकरित करण्याचा, कशाबरोबर तरी त्याला मिसळण्याचा. तुम्हाला ते जसे देवाने बोलले आहे तसे घेण्याची गरज आहे! ते कशाबरोबर ही मिसळणार नाही. नाही, महाशय. येशू एक वेळेस बोलला, "जर तुमच्याकडे राईच्या दाण्याएवढा विश्वास असेल...." मला सांगितले गेले की राईचे बीज संकरित होऊ शकत नाही. तुम्ही त्याला कशाबरोबर ही मिसळवू शकत नाही. तुम्ही इतर धान्य मिश्रित करु शकता, परंतु तुम्ही राईचे बीज मिश्रित करु शकत नाही, पहा, कारण ते संकरित होणार नाही. आणि जर तुमच्याकडे त्या प्रकारचा विश्वास असेल, तोच एक ... देवाचा एक शब्द घेणे.... तेथेच जेथे कित्येक सुवार्तिक जोर देतात (आपण त्यामध्ये नंतर येणार आहोत), कसे ते म्हणतात, "ओह आम्ही याचा विश्वास करतो" आणि ते ते घेतील आणि ते त्या एक शब्दाचा विश्वास करतात, आणि तो कार्य करील असे ते करु शकतात, परंतु त्याच्या पुढच्या एका दुसऱ्याचे काय? "जो त्याच्या सर्व आज्ञा पाळतो तो धन्य, पहा. त्याला जीवनाच्या झाडामध्ये प्रवेश करण्याचा अधिकार असेल कारण कुत्रे, चेटकी, आणि जारकर्मी," आणि इत्यादींना असणार नाही.

आता, माझ्याकडे एक मिश्रित वर्ग आहे परंतु माझ्याकडे येथे खूप संदर्भ आहेत जे अगदी खरोखर स्पष्ट आहेत तेव्हा तुम्ही बहिणींनी ते समजून घ्यावे असे मला वाटते; पहा, ते समजण्यात निश्चित असा.

53 आता, त्यामुळे आपण हा विश्वास करतो - की तो देवाचा शब्द आहे; त्यामुळे देवाचा बोललेला शब्द हा मूळ आहे. आणि सर्वकाही जे देवाने निर्मिले आहे (बोलण्याद्वारे अस्तित्वात आणले आहे) ते मूळ आहे. आणि तुम्ही त्याची काही दुय्यम निर्मिती संकरित करु शकता. त्याच कारणामुळे हव्वा तिच्या स्वतःच्या बीजाबरोबर करु शकली जे तिने केले - कारण ती मूळ निर्मितीत नव्हती. ती एका पुरुषाचे एक दुय्यम उत्पादन होती - ती देवाच्या निर्मितीत नव्हती. देवाने अखंड गोष्ट निर्मिली, आणि मग त्याने त्याच्या निर्मितीमधील एक भाग घेतला आणि एक सहाय्यक बनविला.

त्याच कारणामुळे तुम्ही एका गाढवाला आणि एक घोड्याला संकरित करु शकता, परंतु ते टिकणार नाही! तो मृत्यू आहे! परंतु त्या मूळ गोष्टीमध्ये जीवन आहे. ते परत येते! मी आशा करतो तुम्ही आता ते पाहू शकता. त्या मूळ गोष्टीमध्ये जीवन आहे; तेव्हा त्याच कारणामुळे मी विचार करतो की पंथ आणि संप्रदाय आणि संस्था मरतात! इतिहास सिद्ध करते की त्या प्रत्येक एक मृत आहेत. त्या कधीही परत आणखीन उठल्या नाहीत; त्या कधीही येणार नाही. त्या स्वतःचे परत प्रजनन करु शकत नाहीत. प्रजनन करण्यासाठी काहीही नाही; त्या वांझ आहेत. त्यामुळेच हव्वेची मुले मरतात.

54 मी माझा वेळ घेत आहे, जेणेकरुन त्या ध्वनिमुद्रणपट्ट्या ... लोकांना अभ्यास करण्यासाठी वेळ देईल. मला कोणत्याही घाईत असायचे नाही. मला अगदी माझा वेळ घ्यायचा आहे. मला ठाऊक नाही येथून पुढे काय होईल, परंतु मला हे लोकांसाठी हवे आहे की अगदी जरी कधीतरी देव मला जगातून घेऊन जाईल, जर मी त्याचे आगमन पाहण्यासाठी जगलो नाही, तरीही संदेश जिवंत राहील. सत्य. वचनाबरोबर राहा.

55 आता लक्षात ठेवा, देवाचा प्रत्येक बोललेला शब्द हा मूळ बीज आहे. देवाने सर्वकाही त्याच्या शब्दाद्वारे पृथ्वीमध्ये पेरले, आणि जोपर्यंत तुम्ही त्या मूळ बीजाबरोबर राहता, ते सरळ परत स्वतःला उपजवील आणि परत स्वतःचे पुनरुत्पादन करील. त्याला संकरित करा; ते मरते! आणि हव्वा, ती स्त्री, पहिली संकरित वस्तू होती जी कधी होती.

आता, मी आशा करतो तुम्ही ध्वनिमुद्रणपट्टी बंद करणार नाही जोपर्यंत आपण खाली जात नाही आणि काही वेळानंतर ते सिद्ध करीत नाही, पहा - तुम्हाला दाखवितो फक्त का.

56 ती एक संकरण करणारी होती, एक वधू. लक्ष द्या, त्यामधून मृत्यू आणला - देवाचे वचन घेऊन, त्यामध्ये कोणते शहाणपण मिसळण्याचा प्रयत्न करण्याद्वारे, पहा. तुम्ही तसे करायला नको. जरी तुमच्याकडे ते स्पष्ट करण्याचे शहाणपण असेल, फक्त म्हणा, "देव तसे म्हणाला, आणि ते कायम झाले" - ते देव तसे म्हणाला, आणि तेथे त्यामध्ये तेवढेच सर्व आहे. जर तुम्ही स्पष्ट करु शकत नाही, ते सोडून द्या, परंतु फक्त म्हणा ते असे आहे कारण देव असे म्हणाला, पहा. फक्त म्हणा, "देव ते म्हणाला."

57 आता, लक्ष द्या. आता, ते मिश्रित होणार नाही. त्यामध्ये हस्तक्षेप करता कामा नये. देव त्याला शिक्षा करील जो ते करतो, आणि त्याचे कशाबरोबर ही संकरण होणार नाही. तो केवळ देवाचा शब्द आहे. देवाला त्याच्या शब्दाबरोबर तुमच्या शब्दाची गरज नाही. आपण आपले स्वतःचे शब्द बोलावयास नको; आपण त्याच्या शब्दाचा प्रचार करावयास हवा - देवाचा शब्द.

58 आता, त्यामुळे, त्याच्या मूळ प्रजनाने खरे जीवन केवळ येऊ शकते किंवा स्वतःला पुनरुत्पादित करु शकते. पहा, जीवन.... आता, त्याचा अभ्यास करा, आता, जेव्हा तुम्ही ध्वनिमुद्रणपट्ट्यांचा अभ्यास करता आणि आता त्याचा अभ्यास करा. जीवन, जी-व-न - केवळ त्याच्या मूळ प्रजननाद्वारे पुनरुत्पादित केले जाऊ शकते, त्याप्रकारे जसे ते प्रारंभी सुरु झाले; मग ते स्वतःला पुनरुत्पादित करते. जर ते करीत नाही ते

एक संकरण आहे; ते निघून जाते. त्यातील काही पहिल्या पिढीत निघून जातात, पहा - अगदी तेव्हाच ते निघून गेले. ते लवकर स्वतःला त्या ठिकाणीच पाहिल. ते योग्य जीवन आणू शकत नाही कारण ते संकरित आहे.

59 उत्पत्ती १:११ पवित्र शास्त्र म्हणते (देव बोलला), "प्रत्येक बीज आपापल्या परी उपजवो." आता जेव्हा देव तसे बोलला, ते कायम झाले. ते नेहमीसाठी कायम झाले. "प्रत्येक बीजाने आपापल्या परी उपजवावे." एक उत्तम पीक आणण्यासाठी त्याला मिश्रित करा. ते कसले उत्तम पीक आहे? आता ऐका. शक्तीचा वापर न करता विनासायास पुढे जाऊया. ते मिश्रित करणे ... (मी त्यांना धरुन ठेवण्याचा प्रयत्न करतो, अशा मजकुराला, मी त्यावर प्रचार करु शकलो असतो. परंतु तसे करण्यापासून राखण्याचा मी प्रयत्न करतो.) ते मिश्रित करणे सिद्ध झाल्यानंतर ते एक उत्तम पिकाला आणते. परंतु कोणत्या प्रकारच्या पिकाला? - एका खोटेपणाच्या पिकाला, मृत्यूच्या!

तुमच्या मक्याला संकरित करा; तो एक मोठ्या पिकाला, चांगल्या पिकाला, चांगल्या दिसणाऱ्या पिकाला आणील; परंतु ते मृत आहे. त्याला परत पेरा, ते स्वतःला परत पुनरुत्पादित करु शकत नाही. ते संपलेले आहे; ते झालेले आहे. हव्वेसारखे, पहा. तिने एक संकरित पीक आणले. आज आपल्याकडे पहा. तुम्ही सभोवती पाहू शकता आणि बघता ते सत्य आहे. निश्चित आणले. तो देवाचा हेतू नव्हता, नाही, महाशय. काहीतरी जो मी सरळ आता विचार करीत आहे त्यासाठी अगदी मागे धरुन ठेवणे आहे, पहा.

60 मिश्रित करण्याने संकरित पीक आणते; आणि एक संकरित पीक हे एक मृत पीक आहे - जोपर्यंत प्रजननासाठी. ते स्वतःची पैदास करु शकत नाही; ते करु शकत नाही कारण देव तसे बोलला. त्याला आपापल्या परी उपजविणे आहे, आणि तुम्ही ते मिश्रित केले आहे.

आता तुम्ही अगदी तेथे सरळ ती मंडळी पाहू शकता, कोठे तिची सांगता होईल. तेथेच ती मरते, कारण ती आपापल्या परी उपजवू शकत नाही. का? - ती मिश्रित आहे! तुम्ही त्याच्याबरोबर काहीही करु शकत नाही. ती मृत आहे; ती संपलेली आहे. ठीक आहे. त्याच कारणामुळे प्रत्येक पिढीचे तिचे स्वतःचे संजीवन आहे - वचनासाठी एक संधी. तेव्हा, सार्वभौम देव, न्यायनिवाड्या समयी ... जॉन वेस्लीचा जमाव उठेल, आणि हे आजचे "ताठर" मेथडिस्ट त्यासाठी उत्तर देतील? लुथर उठेल. कॅथोलिक उठेल. आणि इरेनस, मार्टिन, पॉलीकार्प आणि ते पाठीमागे असलेले आणि देवाच्या वचनाला मतप्रणाल्यांमध्ये संकरित केल्यामुळे त्यांना न्यायनिवाड्याला तोंड द्यावे लागेल. हा लूथरनचा जमाव ज्यांनी लूथरनचे संजीवन अनुसरले ते देखील त्या गोष्टीचे उत्तर देतील. बॅप्टिस्टचा जमाव ज्याने जॉन स्मिथचे संजीवन अनुसरले ते देखील तीच गोष्ट करतील. अलेक्सझांडर कॅम्पबेल तीच गोष्ट करील. आणि पेन्टिकॉस्टल देखील तीच गोष्ट करतील. ते मूळ संजीवन, जेव्हा पवित्र आत्म्याचा वर्षाव झाला, लोकांना बाहेर पाचारण केले आणि देव त्याचे वचन त्यांना देण्याचा प्रयत्न करीत होता, आणि त्यांनी त्याला संस्थागत केले, येथे बसले आणि सांप्रदायिक झाले आणि सरळ तेथेच मेले!

तुम्ही म्हणता, "परंतु पहा ते काय करीत आहेत."

आपण आज त्याकडे थोड्या वेळाने जाणार आहोत. आपण सरळ त्या सर्वांकडे खाली येत आहोत.... मी फक्त आता बीज मध्ये टाकीत आहे. मग आम्ही थोड्या वेळाने काय घडले ते तुम्हाला दाखविणार आहोत.

61 आता, त्यामुळेच प्रत्येक संजीवनाचे त्याचे स्वतःचे संजीवन आहे ... प्रत्येक पिढीचे त्याचे संजीवन आहे. देव एका मनुष्याला उभारतो, त्याच्या वचनाने त्याला बसवितो आणि त्या युगासाठी त्या संदेशाने त्याला बाहेर चालते करतो. आणि तो मनुष्य दृश्यावरुन काढून टाकला जाताच कोणीतरी दुसरे त्याला पकडते, आणि त्याला संकरित करते, आणि ते सर्व मागे पडते परिपूर्ण....

सर्वकाही कदाचित.... मी येथे एका मिनिटासाठी थांबू शकत होतो. आपण घाईत नाही आहोत. मागे जा; तेच काय ते तंतोतंत प्रारंभी उत्पत्तीमध्ये घडले. देवाने त्याचे मानवजातीचे पीक पुढे मांडले, आणि हव्वेने ते संकरित केले. पहा काय घडले? तेव्हा तेथे हव्वेसाठी न्यायनिवाडा आहे.

62 लूथरने पुढे मांडले - बाकीच्या सर्वांनी - ख्रिस्ताने पुढे मांडले. प्रेषितांनी पुढे मांडले. संदेष्ट्यांनी पुढे मांडले. येशू नाही का म्हणाला, "देवाने पाठविलेल्या कोणत्या संदेष्ट्याला तुमच्या पूर्वजांनी छळले नाही?

त्याने शिकविले नाही का एका राजाने एक वेळेस त्याच्या दासाला पाठविले, आणि मग दुसऱ्या दासाला पाठविले, आणि दुसऱ्या दासाला पाठविले, आणि इत्यादी, शेवटी मग त्याने त्याच्या पुत्राला पाठविले, पहा. प्रत्येक पिढी प्राप्त करते ... कारण त्याची परत सरळ मागे आदाम व हव्वेकडे पुनरावृत्ती होते - एदेनच्या बागेतील पहिले पीक. त्यातील अर्धे नाश पावले ... शहाण्या कुमारी, झोपलेल्या कुमारी. त्यांच्यातील अर्ध्या ... एकाने वचन राखले होते; दुसऱ्या एकाने ते संकरित केले होते. सरळ मागे पुढे अगदी जितक्या जलद गतीने ते जाऊ शकते, अगदी अशाप्रकारे, ते अगदी खाली युगातून चालले आहे. आपण ते देवाच्या वचनाद्वारे आणि येथील इतिहासाद्वारे सिद्ध करु. ते बरोबर आहे - संकरित करणे.

63 संकर प्रथम एदेनेत सुरु झाला, उत्पत्तीमध्ये सुरु झाला. ती सुरुवात आहे. तेथेच जेथे.... आणि त्याचा शेवट येथे प्रकटीकरणात होतो, ख्रिस्ताच्या दुसऱ्या आगमनात. आता बरोबर लक्षात ठेवा, त्याच कारणामुळे प्रत्येक पिढीकडे त्यांचे स्वतःचे संजीवन आहे; तिला वचनाची संधी मिळते. मग ते त्याला संकरित करतात - त्याला स्वीकारण्याऐवजी, ते दुसरे कोठेतरी जातात.

64 माझी कामगिरी, जे मी विश्वास करतो देवाने मला ज्यासाठी पाचारण केले आहे.... आज मला काही व्यक्तिगत गोष्टी सांगायच्या आहेत कारण तेच काय ते मी तुम्हाला सांगितले मी करीन (पहा), आणि जगाला सांगेन. माझी कामगिरी, मी विश्वास करतो, पृथ्वीवर काय आहे? - त्या येणाऱ्या वचनाची अगोदर सूचना देणे (पहा), तो येणारा शब्द जो ख्रिस्त आहे. आणि ख्रिस्त त्याच्यामध्ये सहस्त्राब्दी आहे आणि अगदी

तेथेच सर्वकाही आहे कारण तो वचन आहे, पहा.

65 ठीक आहे, येशू योहान ३:५ मध्ये म्हणाला - आता जर तुम्हाला ते खूण करुन घ्यायचे असेल, योहान ३:५. आपल्या सर्वांना ते माहित आहे, किंवा एकतर मी तेथे वळीन कदाचित, ध्वनिमुद्रणपट्टीवर कोणालातरी ... कदाचित वळू शकत नसेल अगदी त्या वेळेस, आणि मी येथे संत योहान ३ अध्याय आणि ५ वे पद वाचीन, आणि आपण पाहू येशू काय म्हणाला. आपण कदाचित त्यापेक्षा थोडीशी अगोदर सुरुवात करु ... ३.

येशू त्याला म्हणाला, मी तुम्हाला खचित, खचित सांगतो, नव्याने जन्मल्यावाचून, कोणालाही देवाचे राज्य पाहता येत नाही.

निकदेम त्याला म्हणाला, म्हातारा झालेला मनुष्य कसा जन्म घेऊ शकेल? त्याला मातेच्या उदरात दुसऱ्यांदा जाणे, व जन्म घेणे शक्य होईल काय?

येशूने उत्तर दिले, मी तुम्हाला, ... खचित सांगतो, पाण्यापासून व ... आत्म्यापासून जन्म घेतल्यावाचून, कोणीही देवाच्या राज्यात प्रवेश करु शकत नाही.

66 ते बीज आहे का? प्रत्येक बोललेला शब्द हा देवाचे एक बीज आहे. ते बरोबर आहे. मी ते फक्त एका मिनिटात सिद्ध करणार आहे - कुठे येशू तसे म्हणाला. देवाचा प्रत्येक बोललेला शब्द हा एक बीज आहे. मग एका मनुष्याला नव्याने जन्म पावल्याशिवाय - त्याने का नव्याने जन्म घेणेच आहे? तो ज्या शरीरात आहे त्या शरीरात मेलेला आहे. तो एक संकरित आहे. त्याला नव्याने जन्म घेणेच आहे. का? त्याचा जन्म पापात झालेला होता हव्वेच्या पापातून, दुष्कर्मामध्ये घडला गेला, खोटे बोलत जगात आला. तो सुरुवातीपासूनच खोटा आहे. काही फरक पडत नाही किती चलाख, शिकलेला, अधिक जे काही तो असेल, तो खोटारडा आहे - पवित्र शास्त्र म्हणते तो आहे - किती पवित्र त्याचे पालक होते किंवा त्याबद्दल काहीही, तो सुरुवातीपासूनच खोटा आहे. आणि केवळ एकाच मार्गाने तो सत्य सांगू शकतो ते म्हणजे सत्य काय आहे ते त्याच्या स्वःताच्या ओठांनी सांगणे. तोच केवळ तो मार्ग आहे जेथून सत्य येऊ शकते. कोणतीही गोष्ट त्या वचनाच्या विरोधात, तरीही तो एक खोटा आहे.

ते खूपच स्पष्ट आहे, परंतु तेच काय ते देव बोलला, "प्रत्येक मनुष्याचा शब्द खोटा ठरो आणि माझा शब्द खरा ठरो," पहा. काहीही जे त्याच्या ओठांमधून येते या वचनाला विरोध करण्यासाठी किंवा त्याला कोणत्या दुसऱ्या जातीत किंवा कोणत्या इतर पिढीत ठेवण्यासाठी किंवा जे काही ते असेल, तो खोटा आहे. ते तंतोतंत आहे. त्याला नव्याने जन्म घेणे आहे, आणि मग तो प्रत्येक वचन पाहतो. केवळ एकच मार्ग आहे की तो नव्याने जन्म घेऊ शकतो तो म्हणजे देवाचे जीवन त्याच्यामध्ये ते जीवन उत्पन्न करील.

67 एका बीजाला वाढण्यासाठी पाण्याची गरज आहे. आता, तुम्ही एका बीजाला जमिनीत टाकता, जर तेथे जमिनीत ओलावा नाही, ती धूळ आहे, आणि ते त्या धुळीत वाढणार नाही. ते वाढू शकत नाही. त्याला विशिष्ट टक्क्याच्या ओलाव्याची गरज आहे नाहीतर ते वाढणार नाही. ते बरोबर आहे? लेख जीवे मारितो; आत्मा त्याला जीवन देतो, पहा. आता, त्याला वाढण्यासाठी ओलाव्याची गरज आहे.

त्याचा शब्द एक बीज आहे. आता ते सिद्ध करण्यासाठी, लूक ८ अध्याय, ११ पदाकडे वळूया आणि पहा जर हे खरे आहे किंवा नाही - जर पवित्र शास्त्र म्हणते त्याचा शब्द हा एक बीज आहे. लूक ११ अध्याय ... किंवा ८ अध्याय खरंतर आणि ११ पद. आणि आपण पाहू देव याबद्दल काय म्हणाला आहे - ८ अध्याय, ११ पद. आता तो पुढे जातो आणि सांगण्यास सुरुवात करतो. तेथे खूप गोष्टींबद्दल सांगायचे आहे. ४ पासून सुरुवात करुया आणि फक्त वाचा.

आणि जेव्हा मोठा लोकसमुदाय एकत्र जमला असता, व गावोगावचे ही लोक त्याच्याकडे आले असता, तो दाखला देऊन ... म्हणाला:

एक पेरणारा आपले बी घेऊन पेरावयास निघाला: आणि तो पेरीत असता, काही बीज वाटेवर पडले; ते तुडविले गेले, व आकाशातील पाखरांनी खाऊन टाकले.

आणि काही खडकाळीवर ... पडले; ते ओलावा नसल्यामुळे, उगवताच, वाळून गेले.

68 ओलावा - बॅप्टिस्ट, प्रेसबायटेरियन, लूथरन पाण्याविना.

आणि जेव्हा तो प्रथम परिवर्तन झाला, त्याने सरळ थेट ख्रिस्ताकडे पाहिले; त्याने विश्वास केला. आणि पहिली गोष्ट तुम्हाला ठाऊक आहे, त्या संप्रदायाने त्याला त्या ठिकाणी बांधून टाकले, आणि आत्म्याचा ओलावा त्याच्यापासून निघून गेला; तो सांप्रदायिक होतो, आणि तो मरतो. फक्त बॅप्टिस्ट नाही परंतु पेन्टिकॉस्ट! त्याचा विश्वास करु नका. मला ठाऊक आहे तुम्हातील कित्येक नाही करीत, परंतु तुम्ही फक्त थोडा वेळ थांबा. आपण पाहू जर पवित्र शास्त्र तसे व्यक्त करते किंवा नाही.

69 ठीक आहे, ओलाव्या अभावी - ६व्या पदातील शेवटचा शब्द, ८व्या अध्यायातील. ओलावा नसल्यामुळे.

आणि काही काटेरी झाडांमध्ये पडले; आणि काटेरी झाडांनी त्याबरोबर वाढून, त्याची वाढ खुंटविली.

पहा, ते काय होते? तो पुढे जातो आणि सांगतो की काही जसे ते होऊ लागतात.... मी आज कोणतीही गोष्ट राखून ठेवणार नाही. अगदी मी काय विचार करतो ते ख्रिस्ती व्यावसायिक आणि त्यांच्यातील बाकीचे या पेन्टिकॉस्टल संस्थातील, आणि हे लोक जे ह्या सर्व भव्य दशलक्ष डॉलरच्या गोष्टी उभारीत आहेत - जगाच्या संपत्तीने देवाच्या आत्म्याला आणि गौरवाला गुदमरविले आहे. मरत आहे कारण ते गुदमरले आहे. ते

जग, जगाची चिंता, याने त्यांना गुदमरविले आहे.

70 स्त्रियांना सक्रिय व्हायचे आहे आणि त्यांचे केस कापायचे आहेत आणि वाटरहेड केशरचना हवी आहे, तोकड्या विजारी परिधान करायच्या आहेत, इतर जगातील बाकीच्या सारखे दिसायचे आहे. प्रचारक उपदेशमंचावर उभा राहतो, याबरोबर .... त्याच्या आमेनचा सराव करतो आणि देवाच्या वचनाला भितो कारण की एक अन्नाचे तिकीट. जर ते कॅडिलॅक गाडी चालवू शकत नसतील, त्यांना अगदी यापुढे आत्मिक ही मानले जात नाही. ते खरे आहे. जर ते सर्वात चांगली वस्त्रे परिधान करु शकत नसतील आणि अजून सर्वकाही करु शकत नसतील, त्यांना मानले जाते: "ते पतित आहेत. ते अमुक आणि अमुक नाहीत."

एक वृद्ध मनुष्य तेथे मागे, वृद्ध भाऊ कीड, या सकाळी मला सांगितले त्यांना यापुढे ते नकोत, कारण ते वृद्ध आहेत आणि ते सरळ वचनाबरोबर राहतात. काय बाब आहे? - ओलाव्याची कमतरता आहे. ते बरोबर आहे.

आणि इतर चांगल्या भूमीत पडले, आणि वर आले, आणि फळ आणले ... जेव्हा तो असे म्हणाला, तो ओरडला, ज्याला ऐकावयास कान आहेत तो ऐको.

ओह, काय दाखला आहे! कसा मला त्यावर एक विषय प्रचार करायला आवडेल आता ... एक उपदेश. "जेव्हा त्याने या गोष्टी सांगितल्या....", ८ अध्याय किंवा ८ पद आणि ८ अध्याय.

... काही चांगल्या जमिनीत पडले, ते उगवून, शंभर पट पीक आले. असे सांगून, तो मोठ्याने ओरडला [आरोळी मारली, काहीतरी कदाचित यासारखे जेव्हा तो म्हणाला, "शंभर पट पीक आले. ज्याला ऐकावयास कान आहेत तो ऐको." दुसऱ्या शब्दात, जर तुमचा कान देवाबरोबर सुसंवादात असेल, त्याला ऐकू दे, पहा.]

... तेव्हा त्याच्या शिष्यांनी त्याला विचारले, ह्या दाखल्याचा अर्थ काय?

आणि तो म्हणाला, देवाच्या राज्याची रहस्ये जाणण्याची देणगी तुम्हास दिलेली आहे ... [ती रहस्ये - पहा येथे तो कशाबद्दल बोलत आहे? आता पहा. राज्याची रहस्ये काय आहेत? फक्त एक मिनिट पहा.] ... देवाच्या राज्याची रहस्ये: परंतु इतरांना ती दाखल्याने सांगितली आहेत; अशासाठी की त्यांना दिसत असता त्यांनी पाहू नये, ते ऐकत असता त्यांना समजू नये. [पहा, परंतु देवाचे वचन सरळ खाली न्यायनिवाड्यात येते त्यांचा न्याय करण्यासाठी - कारण त्यांनी ते पाहिले आहे! ते त्यांचे होते!]

आता दाखला असा आहे: बीज हे देवाचे वचन आहे.

71 जीवनाचे बीज काय आहे? - देवाचे वचन! त्यामुळे, जीवनासाठी, तुम्ही एका पंथाद्वारे येऊ शकत नाही, तुम्ही एका संप्रदायाद्वारे येऊ शकत नाही, तुम्हाला परत मागे वचनाकडे येणे आहे! आता, ते जीवनाचे बीज.

ठीक आहे, त्याचे वचन हे त्याचे बीज आहे, आणि त्याचा आत्मा हा पाणी आहे. आता, परत एकदा योहान ३:१४ कडे तेथे, तुम्हाला ते परत मिळते, तुम्ही पहा. पहा? तो आत्मा हा पाणी आहे.

आता पहा, योहान ३:१४, आपण समजतो त्याचा अर्थ काय आहे जर तुम्हाला ते वाचायचे असेल.

... जसा मोशेने अरण्यात सर्प उंच केला होता, ... तसे मनुष्याच्या पुत्राला ही उंच केले पाहिजे:

पहा? आता जर मोशेने पितळी सर्प उंच केला, त्याच कारणास्तव ज्यासाठी ख्रिस्त उंच केला गेला, आता हे काय आहे? मोशेने पितळी सर्प उंच केला जेणेकरुन ते लोक जे नाश पावत होते त्यांना जीवनासाठी पाणी मिळावे. आणि पहा, येशू ... (ओह, देवा!) येशू हा देवाचा शब्द आहे. आता आपण या दुपारी ते खालपर्यंत ठोकणार आहोत, पहा, ते सिद्ध करणार आहोत.

72 येशू हा देवाचा शब्द आहे, आणि तो फुटून उघडला, ते जीवन, ते जीवन जे बीजामध्ये होते, ते हे जीवन, जे, आत्मा आहे, पाणी त्यावरुन वाहते ... देवाच्या बीजावर आत्मा हा त्या बीजाचे जीवन उपजवील. आणि जर त्याने अजून काहीतरी उपजवीले, तेथे मग अजून कोणत्यातरी प्रकारचे बीज आहे! आमेन! तुम्ही समजता?

जर देवाचा आत्मा बीजाला जलसिंचनासाठी येतो, जर ते बीज आहे ज्याला जलसिंचन होत आहे, ते बीजाचे जीवन उत्पन्न करील. ते स्पष्ट आहे? बीजाचे जीवन उत्पन्न करते, कारण त्याच कारणासाठी ते दिले गेले आहे.

73 मी विश्वास करतो पवित्र शास्त्र हे वचन आहे, अखंड सत्य आहे, आणि येशू हा वचन आहे जो प्रकट झाला; तो आणि त्याचा शब्द एकच आहे आणि सारखेच आहे. तो काय होता? आता पहा. तो ते बीज होता.

(आता, मला येथे काहीतरी मागे धरुन ठेवणे आहे या संध्याकाळी देण्यासाठी, तुम्ही पहा. ते कठीण आहे.)

तो ते बीज होता जी हव्वा उत्पन्न करु शकली असती. तुम्हाला ते कळते! तो ते बीज होता जे हव्वेला उत्पन्न करणे होते, परंतु देवाच्या वचनावर अविश्वास करण्याद्वारे तिने ते संकरित केले. तेव्हा तो ते बीज होता, आणि केवळ एकाच मार्गाने ते जीवन असू शकत होते, जीवनाच्या पुनरुत्पादनात, त्या बीजापासून जीवनाला येणे होते, आणि त्या बीजाला जीवन पसरविण्यासाठी मरणे होते! तुम्ही ते पाहू शकत नाही? त्यामुळेच बीजाला जलसिंचन करण्यासाठी - ते पाणी दिले गेले.

74 तो पवित्र आत्मा जो एदेनच्या बागेत होता बीजाला पाणी देण्यासाठी. मनुष्याला मरण्यासाठी बनविले नाही; त्याला जगण्यासाठी बनविले, परंतु संकरणाने जीवन ... किंवा खरंतर मरण आणले. ती संकरित आहे. आता तुम्ही सर्प बीजाला नाकारता. मग मी तुम्हाला विचारेन, "या दफन सेवा कशाबाबत आहेत?" ती संकरीत होती. मुळापासून आपण सर्व संकरीत आहोत. त्यामुळेच आपण नियमित मरत आहोत. परंतु (ओह, देवा!) तेथे त्या खऱ्या बीजातून जीवनाचा जंतू आला, ज्याला देवाने सिद्ध केले की तो त्याचे बीज होता, त्याने त्याला परत उठविले! पहा? की त्या जीवनातून जे मूळ बीजातून जात आहे जसे हव्वेला दिले गेले त्याच्या खऱ्या मंडळीवर, ते परत जन्मातून, गर्भाशयातून, त्याच्या वधूमध्ये, जीवन आणीत आहे , पहा.

ओह, ते संपन्न आणि गौरवी आहे. आता, त्याला थोडा वेळ द्या अभ्यास करण्यासाठी जेणेकरुन ते आतमध्ये रुतेल.

तो ते बीज आहे. तो ते बीज आहे जे देवाच्या वचनाद्वारे उत्पन्न केले गेले. "तुझ्या वचनाप्रमाणे मला होवो." तेथे ते बीज आहे, पहा. वचन घेणे, पहा.

75 आता, येशू प्रकट केलेले वचन आहे. तो आणि तो शब्द एक आणि सारखेच आहे, आणि त्याच कारणामुळे ते फार ... त्याच्यामध्ये इतके परिपूर्णरित्या प्रकट केले गेले. त्या कारणामुळे की देवाने स्वतःला इतके परिपूर्णरित्या येशूमध्ये प्रकट केले: कारण तो बीज वचन होता, तो जंतू वचन स्वतः (तो जंतू जो बीजाच्या आतमध्ये आहे, ते बीजामध्ये जीवन आहे). तुम्हाला ते समजले? पहा, ते होते.... तो देवाचा जंतू वचन होता. तो जंतू हा आत्मा आहे; तो जंतू हा पाणी आहे, आणि येशूला तेथे मोडून उघडे होणे होते त्या बीजासाठी त्यांना त्याचे जीवन देण्यासाठी जी इतर बीजे येणार होती त्यांना जलसिंचन करण्यासाठी. तुम्ही ते पाहता? अगदी तो म्हणाला, "इतर मेंढरे जी अगदी या कळपातील नाही, माझ्याकडे आहेत. ते ते पाहणार आहेत; ते तो शब्द घेणार आहेत आणि सरळ त्याबरोबर राहणार आहेत. आणि त्यांना जलसिंचन करण्यासाठी मी आत्मा पाठवीत आहे, आणि तो अगदी तंतोतंत उत्पन्न करील." ते चमत्कार उत्पन्न करतील, ते देवाचे सामर्थ्य उत्पन्न करतील, ते उत्पन्न करतील ... आणि ते काहीही नाकारणार नाहीत, कारण ते त्या बीजाबरोबर समान उगमस्थान असलेले बीज आहे. ते म्हणू शकत नाही, "मिस्टर धोतरा, तू ये माझ्याबरोबर राहा." नाही, नाही, महाशय; नाही, नाही. ते तसे करणार नाहीत. खचितच नाही. ते अगदी मिसळणार नाही. तुम्ही जीवन आणि मरणाला मिश्रित करु शकत नाही. तुम्ही एकाच समयी मेलेले आणि जिवंत असू शकत नाही.

76 तेव्हा, तुम्ही पाहता मला काय म्हणायचे आहे? तो जंतू जो त्या बीजातून येतो - तो आहे. तो देवाचा शब्द आहे जो परिपूर्णरित्या प्रकट झाला आहे. त्याच कारणामुळे की त्याच्यामध्ये काय होते? ती गोष्ट होती की तो योग्यरित्या ... पहिल्या आदामापासून तो पुत्र ज्याचे अभिवचन दिले गेले होते, आदामातून मानवजातीला निरंतर राखण्यासाठी, आणि हव्वेने ते सर्पामध्ये संकरित केले आणि एका अनौरस मुलांची पिढी आणली जी जीवनाशिवाय मरणासाठी जन्मली, आणि येशू आला आणि तो ते बीज होता. त्याने ते सिद्ध केले. सर्वकाही जे आदामाने गमावले, येशू होता. ते पाहता? तो ते योग्य ... हव्वेने शेवटी ते मूल जन्माला आणले असते, परंतु तिने ते संकरित केले, शहाणपण, समज, ज्ञान ऐकण्यासाठी, सर्पाला आत आणले.

77 आता आपण वधूमध्ये त्याबरोबर येईपर्यंत थांबा. तेच काय ते ... तेच कारण आहे मी जो काही विश्वास करतो तो मी विश्वास करतो. ते ह्या वचनावर परत येणे आहे. त्याच कारणामुळे मी म्हणतो जर कोणाला या वचनाबद्दल माझ्याशी चर्चा करायची असेल, माझ्याशी बोलायचे असेल, "या." ते बरोबर आहे. मी तो कोणत्याही समयी प्रस्ताव ठेवला आहे. जर तुम्ही विचार करता की येशू ख्रिस्ताचे नाव हा बाप्तिस्मा घेण्याचा योग्य मार्ग नाही, या आणि त्याबद्दल माझ्याशी बोला. जर तुम्ही विश्वास करीत नाही की तेथे सर्पबीज अशी कोणती गोष्ट आहे, तुम्ही या आणि माझी भेट घ्या. फक्त वचन घेऊया. जर तुम्ही विश्वास करीत नाही की स्त्रियांनी लांब केस राखणे आहे आणि ते त्यांचे आच्छादन आहे, याबद्दल वचनाबरोबर माझ्याशी बोला. जर तुम्ही विश्वास करीत नाही की समयाचा अंत हाताशी आहे आणि या गोष्टी ज्याबद्दल मी बोलत आहे ... या, माझ्याशी त्याबद्दल बोला, पहा. माझ्याबरोबर या. भाऊ बीज, फक्त ये. बरोबर.

78 तुम्ही एक बीज असू शकत नाही आणि वचनाबरोबर असहमत आहात कारण वचन हे बीज आहे. आणि जर तुम्ही ते वचन आहात, तुम्ही कसे काय त्याबरोबर असहमत होऊ शकता? तुम्ही स्वतःशीच असहमत असाल. तुम्ही तुमचा स्वतःचा हेतूच पराभूत कराल. जसे कोणीतरी म्हणाले, "का तुम्ही कधीही अशाप्रकारच्या लोकांबरोबर बाहेर जाता?" बरे, जर ते मी केले नाही, मी प्रत्यक्ष त्याच हेतूला पराभूत करीन ज्यासाठी मला येथे पाठविले गेले होते. तेथे प्रकाश असायला हवा.

आता जसे आपण पुढे खाली जातो, आपण त्या गोष्टी आत आणणार आहोत आणि कशा त्या स्वतः अनुक्रमाने - अगदी तंतोतंत परिपूर्णरित्या वचनाबरोबर बसतात, ते अगदी दाखविणार आहोत.

79 आता, होय, महाशय. तो आहे ... त्यामुळे देव त्याच्यातून कार्य करु शकत होता. आणि तो काय म्हणाला जेव्हा तो येथे पृथ्वीवर होता? - "पित्याने मला दाखविल्याशिवाय मी काहीही करीत नाही" - परिपूर्णरित्या. आणि काहीही त्याने केले ते नेहमी शास्त्रलेखाद्वारे साबित केले गेले. तो म्हणाला, "तुम्ही शास्त्रलेख शोधून पाहता कारण ते माझ्याविषयी साक्ष देतात, आणि जर मी त्या गोष्टी करीत नसेन जे ते म्हणते त्यांनी केली, मग मी ते मूळ बीज नाही. परंतु जर मी त्या गोष्टी करतो, मग तुम्ही माझा विश्वास का करीत नाही? (ते बरोबर आहे.) जर तुम्ही अगदी माझा विश्वास करु शकत नसाल, मी ज्याप्रकारे उभा राहतो, मग जे वचन मी सांगतो त्याचा विश्वास करा, त्या कार्यांचा विश्वास करा जे मी करतो, कारण माझे बीज जो काही मी आहे केवळ त्याचीच साक्ष देऊ शकते.

80 धोतरा एक धोतराच होऊ शकतो. तुम्ही त्याला कशाबरोबर ही संकरित करा परंतु तरीही तो एक धोतराच आहे. ते बरोबर आहे. तो तरीही त्याला व्यक्त करील.

त्याच कारणास्तव एक दुहेरी जे आहे ते ढोंगी आहे. ते एक संकरित आहे. एक मनुष्य जो देवाचा माणूस असल्याचा दावा करतो आणि वचन नाकारतो, तो एक ढोंगी आहे. एक खेचर जो घोडा असण्याचा दावा करतो, तो घोडा नाही. तो म्हणतो, "मी गाढव आहे." आणि तो दोहोंपैकी एकही नाही; तू एक ढोंगी आहे, अनौरस जन्मलेला, अगदी तंतोतंत. ते स्पष्ट आहे, परंतु तेच काय ते आहे. तसे करण्याचे त्याचे ध्येय नव्हते. मनुष्याने ते त्याच्या शहाणपणाने केले आहे. तेथेच जेथे तो येतो. तेथेच जेथे सर्व मनुष्यांच्या शहाणपणाची सांगता होते - अनौरस जन्मण्यासाठी. ठीक आहे.

81 आता, त्यामुळेच येशू इतक्या परिपूर्णरित्या प्रकट झाला - देव इतका परिपूर्णरित्या येशूमध्ये प्रकट झाला कारण तो देवाचा तो शब्द होता, तो देवाचा शब्द होता. त्या कारणामुळेच तो काहीही उत्पन्न करु शकला नाही - परंतु अगदी तंतोतंत देव. आणि जर देव तुम्हामध्ये आहे, तुम्ही काय अधिक असू शकता?

येशू संदेष्ट्यांबद्दल म्हणाला नाही का ज्यांच्याकडे देवाचे वचन आले.... देवाचे वचन कोणाकडे येते? - संदेष्टे. येशू त्यांना देव संबोधित नाही का? का? - देव त्यांच्यामध्ये प्रकट झाला होता. ते काय होते? - तो बोललेला शब्द प्रकट झाला, पहा. बस एवढेच. म्हणाला, "कसे तुम्ही नाकारु शकता ... म्हणता.... जर तुम्हाकडे काही शहाणपण असेल, तुम्ही समजाल." तो म्हणाला, "कसे तुम्ही म्हणता आम्ही त्यांना संबोधितो.... देव स्वतः त्यांना देव संबोधितो." आणि म्हणाला, "मग तुम्ही कसे म्हणू शकता की तुम्ही त्यांचा विश्वास करता आणि मला नाकारता जेव्हा मी म्हणतो मी देवाचा एक पुत्र आहे?" का ते हे पाहू शकले नाहीत मग?

82 तीच गोष्ट आज आहे: "मी तो बीज आहे जो येणार होता (स्त्रीचे बीज)." "मी तुम्हाला एक बीज देईन" - सर्पाला. सर्पाने तिला अगोदरच भ्रष्ट केले होते. तो म्हणाला, "परंतु तुझे बीज जे मी तुला देईन तो त्याचे डोके फोडेल." तो ती गोष्ट परत घेईल! आमेन! मी इच्छा करतो - मी अगदी इच्छा करतो सर्वजण ते पाहू शकतील. "जे काही त्याने केले ते जिंकण्यासाठी आणि बरोबर करण्यासाठी मी आलेलो आहे" आणि केवळ एका मार्ग मी ते करु शकतो ते एका स्त्रीद्वारे जिने त्या बीजावर विश्वास केला जेथे एका स्त्रीने त्या बीजावर विश्वास केला नाही. स्त्रीने वचनावर विश्वास केला जेथे एकीने विश्वास केला नाही. "मी तो जय प्राप्त करणारा आहे. मी तो एक आहे जो जीवन देण्यासाठी आलो आहे की माझ्या मृत्युद्वारे, तिने जे काही केले त्याचा दंड भरण्यासाठी, माझ्या जीवनाद्वारे तुम्हाला देण्यात येईल, तुमच्यावर वाहील, आणि तुम्ही देवाचे पुत्र आणि कन्या व्हाल," पहा, जोपर्यंत ते बीज तेथे आहे.

तुम्ही त्याला संकरित करता आणि तुमच्याकडे एक सांप्रदायिक अनौरस मूल सोडून काहीच नाही. तेच सर्व आहे. जे काही वचन नाकारते. मला क्षमा करा, बहिणींनो. मला हवे आहे की तुम्ही ... मला अगदी ते बोलणे आहे अगदी त्या प्रकारे जसे ते येथे बोलते, पहा. आणि त्याच प्रकारे ते आहे.

83 देवाचे सर्व पुत्र अगदी समानच असायला हवेत. होय, महाशय. वचनाने आणि आत्म्याने जन्म घेणे परत आपल्याला मागे बोललेल्या शब्दाकडे आणते जसे योहान ३ मध्ये, पहा. पाण्याने आणि आत्म्याने जन्म घेणे, ते काय करते? मग ते सरळ तुम्हाला मागे आणते त्या जागी जेथे तुम्ही सुरुवातीला असायला हवे होते, पहा. तेच तर ख्रिस्ताच्या मरणाचे कारण होते: परत आपल्याला सरळ मागे आणते कुठे? - देवाच्या पुत्रांमध्ये.

जर हव्वेने ते मूल जन्माला आणले असते.... तिने ते शेवटी केले असते. देवाने नव्हते का तिला सांगितले, "बहुगुणीत व्हा आणि पृथ्वी व्यापून टाका?" परंतु तिला येथे चालायचे होते आणि एका वेश्येचा भाग बजाविणे होते.

84 तुम्ही अगदी म्हणता, "ते स्पष्ट आहे, भाऊ ब्रॅन्हम," परंतु अगदी थोड्या वेळासाठी थांबा; आपण त्यामध्ये थोड्या वेळाने जाणार आहोत, पहा. तुम्ही म्हणता, "ते होऊ शकत नाही." बरे, आपण आताच शोधून काढू की वचन म्हणते ते आहे किंवा नाही, पहा. मग ते बरोबर आहे. ते लपलेले नाही. जर ते आहे, ते त्यांच्यापासून लपलेले आहे ज्यांचा नाश झाला आहे. पहा, ते बरोबर आहे.

85 आता, आता, तुम्हाला सरळ पाठी बोललेल्या शब्दाकडे आणतो. मग आपण देवाचा शब्द प्रकट झालेला आहोत, पहा. येशू हीच गोष्ट बोलला. "तो जो माझ्यावर विश्वास करतो, त्या गोष्टी ज्या ... मी कोण आहे, मी कशासाठी आलो आहे आणि मी करतो त्याचा हेतू - एका मनुष्याला देवाचा शब्द विश्वास करावा म्हणून मागे आणणे आणि त्याबरोबर काहीही न घेणे, जी कृत्ये मी करतो, तो देखील करील." तेथे तुम्ही आहात.

86 का ते आज केले जात नाही? - ते संकरित आहे, अनौरस मुले, मिश्रित. ते खेचर आहे; त्याला ठाऊक नाही ते कशामध्ये विश्वास करते. एका खेचराला माहित नाही त्याचा पिता कोण आहे, त्याची माता कोण आहे. त्याला नाही ... तो जातिवंत नाही; त्याला काही नाही. तो एक अनौरस उत्पत्ती आहे.

तेच काय ते अशा व्यक्तीचे आहे जो देवावर विश्वास करण्याचा दावा करतो आणि त्याच्या वचनावर विश्वास करीत नाही, तो सांप्रदायिक पंथ घेईल आणि त्याला वचनाबरोबर प्रजनन करील. पहा, तुम्ही पुरेसे देव नाहीत; तुम्ही मृत आहात. तुम्ही मृत असू शकत नाही आणि त्याच वेळेस जिवंत असू शकत नाही. तेव्हा अगदी देवाचे वचन वाढत नाही. तुम्ही अगदी ढोंग्याचे कार्य करीत आहात. तसेच ते बिशप, याजक, कार्डिनल किंवा जो कोणी असेल त्याचे असते. ते बरोबर आहे. ते वचन असणे आहे अथवा तुम्ही मृत आहात - अगदी एक अनौरस मूल. देवाचे वचन.... देवाचा भाग वाढणार नाही. तुम्ही त्याच शेतात कदाचित वाढाल जसे आपण थेट त्याकडे जात आहोत, परंतु निश्चित तुम्ही त्या कळपात नाही. ते वाढणार नाही.

87 ठीक आहे; ठीक आहे, आपण मग पाहतो, पहा, तो बोललेला शब्द; मग आपण देवाचा प्रकट केलेला शब्द आहोत. तसेच जसे देवाला

त्याची मंडळी हवी आहे - यासाठी की स्वतःला प्रकट करावे. त्याचे स्वतःचे बीज त्या व्यक्तीमध्ये असल्याखेरीज तो कसा काय स्वतःला प्रकट करु शकतो? कसे काय तुम्ही तुमचे स्वतःचे विचार वापरु शकता आणि देव स्वतःला तुमच्यामध्ये प्रकट करील? कशी काय तुम्ही तुमची स्वतःची धारणा घेऊ शकता आणि म्हणता, "बरे, माझा पाळक शिकवितो.... माझा पंथ असे म्हणतो हे ते ... चमत्काराचे दिवस...." कसे काय ते तुम्ही करण्यास जाणार आहात आणि मग देवाचा एक प्रकट पुत्र असणार आहात? तुम्ही ते कसे करणार आहात? येशूचा मृत्यू तुमच्यासाठी काही एक नव्हता. "ओह, मी त्याला माझा एक तारणारा स्वीकारतो." तुम्ही नाही! तुम्ही म्हणता तुम्ही स्वीकारता, परंतु तुम्ही स्वीकारीत नाही! तुमची कार्ये सिद्ध करतात की तुम्ही काय आहात. येशू हीच गोष्ट म्हणाला. "जर तुम्ही विचार करता मी अनौरस जन्मलो...."

ते म्हणाले, "आम्ही अब्राहामाचे पुत्र आहोत, आणि कोणीही आम्हाला शिकविण्याची गरज नाही."

म्हणाला, "जर तुम्ही अब्राहामाची मुले असता, तुम्हाला मी ठाऊक असतो." म्हणाला, "तुम्हातील कोण मला पापाबद्दल दोषी ठरवितो (अविश्वास)? मला एक गोष्ट दाखवा ज्याचे देवाने अभिवचन दिले होते जे मी पूर्ण केले नाही. पाप हा अविश्वास. मग मला तुम्ही उत्पन्न करताना पाहू द्या." त्याने त्यांना शिंगरहित केले, पहा. नक्कीच. म्हणाला, "कोण मला दोष लावितो? पापाने आणि अविश्वासाने कोण मला दोष लावितो?" पहा? "जर मी विश्वास करीत नाही, मग पिता माझ्यामधून हे का करितो जे तो करितो - प्रत्येक शब्द ज्याचे त्याने अभिवचन दिले होते? आता मला पाहू दे कुठे ते तुमच्यामध्ये आहे."

88 मग कोण अनौरस जन्मलेला आहे? - ते होते! अनौरस मुले देवाची मुले असे स्वतःला म्हणवीत होते. येशू म्हणाला, "तुम्ही तुमचा पिता, सैतानापासून आहात, आणि त्याची कार्ये तुम्ही करता." कोणत्या प्रकारची कार्ये सैतानाने केली? - हव्वेद्वारे देवाचे वचन संकरित करण्याचा प्रयत्न केला!

हे मोठे संप्रदाय आज तंतोतंत तीच गोष्ट करतात. त्यांचा पिता, सैतान, याची कार्ये ते करतात. ते एक पंथ घेऊन, देवाच्या वचनाबरोबर प्रजनन करण्याचा प्रयत्न करतात! तेच काय ते सैतानाने सुरुवातीला केले - तो पिता, तो सैतान.

बंधुजनांनो, देव तुम्हाला आशीर्वादित करो. त्यातून बाहेर या! येशू असे म्हणाला. जर तुमच्यामध्ये देवाचा लहानसा ओरखडा असेल, तुम्ही ते पाहायला हवे आणि ते बघाल. संकरण! ओह, माझ्या!

89 जी कार्ये येशूने केली - जर मनुष्यामध्ये देवाचे बीज आहे आणि देवाचा आत्मा त्या बीजाला पाणी देत आहे, तीच कार्ये जी येशूने ... येशूमध्ये प्रकट झाली, तो देवाचा मूळ बीज असल्याने. त्याचा मृत्यू तुम्हाला देवाच्या मूळ बीजाकडे नेतो. आणि जर तोच आत्मा जो त्याच्यामध्ये होता तो तुम्हामध्ये आहे, मग तीच कार्ये प्रकट होतील. तुम्ही त्यामध्ये विश्वास करीत नाही? ठीक आहे, संत योहान १४:१२ मध्ये वळूया.

तुम्ही म्हणता, "मी एक विश्वासू आहे, भाऊ ब्रॅन्हम. मी निश्चित आहे की मी एक विश्वासू आहे." ठीक आहे, मी पाहतो जर येशू तुम्हाला एक म्हणेल, पहा जर देवाचे वचन तुम्हाला एक म्हणतो.

खचित, खचित [निखालस, निखालस], मी तुम्हाला सांगतो, जो माझ्यावर विश्वास करतो, जी कार्ये मी करेन तसे तो देखील करील; व त्यापेक्षा मोठी करील; कारण मी पित्याकडे जातो.

90 ते काय आहे? - तेच बीज. राखू शकत नाही .... कसे काय तुम्ही येथे गहू आणि येथे गहू पेरु शकता आणि म्हणता, "मला येथे काकड्या मिळणार आहेत आणि येथे गहू?" तुम्ही ते करु शकत नाही. केवळ एकाच मार्गाने तुम्हाला काकड्या मिळू शकतात ते म्हणजे काकडीची पेरणी कराल आणि जर तुम्ही ती संकरीत केली, मग ती काकडी नसणार. ती एक ढोंगी असेल. ते बरोबर आहे? ती एक ढोंगी असेल, मित्रांनो. अगदी ते सांगणेच आहे, ती त्यातील एकही नाही. ती काकडी नाही किंवा त्याबरोबर तुम्ही तिचे प्रजनन केले ते ही नाही. ती एक मिश्र जातीय प्रजनन आहे, आणि ते एक वाईट उत्पादन आहे, आणि ते त्यामध्येच मृत आहे - मागे, अजून पुढे जाऊ शकत नाही. ते त्याला संपविते, बस एवढेच. परंतु जर तुम्हाला काकडी हवी आहे, काकडीने सुरुवात करा. जर तुम्हाला एक मंडळी हवी आहे, देवाच्या वचनाने सुरुवात करा. जर तुम्हाला देवाचे जीवन हवे आहे, देवाच्या वचनाने सुरुवात करा. देवाचे वचन त्याच्या पूर्णतेत स्वीकारा, त्याच्या प्रत्येक परिमाणात. आणि मग.... आणि जर तुम्हामध्ये ती देवाची पूर्णता असेल, मग पाऊस जो वर्षतो तो तंतोतंत जे काही तुमच्या बागेत असेल ते उत्पन्न करील. मग आता, तुमचा वळवाचा पाऊस कुठे येत आहे? तुम्ही थोड्या वेळाने पाहाल तो कुठे जात आहे, तुम्ही नाही का? त्या कडू इंद्रायणांबरोबर जात होते जी आलिशाने आणली आणि विचार केला ती इंद्रायणे नाहीत किंवा ती ... त्या संदेष्ट्यांच्या शिष्यांनी तेथे वर, त्यावर संप्रदायामध्ये जे त्यांचे होते. काही कडू इंद्रायणे जमा केली आणि विचार केला ते वाटणे होते. ओह, बरे.

91 मग ती कार्ये जी त्यामध्ये प्रकट होतील ती सारखीच असतील, कारण ते देवाच्या वचनाचे सारखेच बीज आहे. देवाचा पुत्र हे त्याचे आदर्श बीज होते. आणि त्याच्या बाप्तिस्म्यानंतर व पवित्र आत्मा त्याच्यावर आल्यानंतर, त्याचे जीवन काय होते, प्रत्यक्ष तेच जीवन जे त्याने उत्पन्न केले ते (त्या सारख्याच पवित्र आत्म्याच्या जलसिंचनाच्या) - त्या प्रकारचेच जीवन आणील, तीच कार्ये करील जी त्याने केली; जर ते समान बीज असेल. देवाच्या पुत्राचे बीज हे देवाच्या पुत्राच्या बीजालाच आणेल. आता केस कापलेल्या स्त्रियांनो, तुमच्यावर लज्जा असो. ते सत्य नाकारणाऱ्या प्रचारकांनो, तुमच्यावर लज्जा असो. म्हणतात, "ते ठीक आहे; केसाला त्याच्याशी काही कर्तव्य नाही." परंतु देव बोलला त्याला कर्तव्य आहे.

92 पहा ते कुठे आहे? पहा? त्यामुळे मी वचनाचा विश्वास करतो. ते बीज आहे. आणि जर पाऊस बीजावर पडतो, ते त्याच्या परी आणील. आता या संजीवनांबरोबर काय बाब आहे? आपण काय करीत आहोत? - '४४ मध्ये दशलक्ष अधिक करीत आहोत: बॅप्टिस्ट, प्रेसबायटेरियन, आणि जे काही अधिक, पेन्टिकॉस्टल. परंतु येशू ख्रिस्ताच्या कार्याचे प्रकटीकरण कुठे आहे! "पित्याने मला प्रथम दाखविल्याशिवाय मी काहीही करत नाही." त्या प्रकारचे बीज कुठून येत आहे?

पवित्र आत्मा पाणी देईल आणि ते बीज आणील. ते त्या बीजाचे पाणी आहे. जर बीज पेरले गेले आहे, त्याच करता काय ते पाणी आहे. आणि जर पाणी तुम्हावर पडते, म्हणा, "देव धन्यवादित असो, प्रचारका, मला तुला काहीतरी सांगू दे. मी अमुक-अमुक आहे आणि मी त्या गोष्टीवर विश्वास करीत नाही." तुम्ही सांप्रदायिक आहात. अगदी सुरुवातीपासूनच तुम्ही एक जुने ढोंगी आहात. त्याच प्रकारचे बीज पेरले गेले होते.

93 माझा गैरसमज करुन घेऊ नका. प्रिय, मी तुम्हाला प्रेम करतो. मी तुम्हाला हे समजावे असा प्रयत्न करतो, पहा. मी हे थांबवेन जेव्हा आज मी हे संपविन. मी ते जाऊ देईन, परंतु मला हवे आहे की तुम्हाला समजावे एक वेळेस काय बरोबर आहे आणि जे काही मी विश्वास करतो ते का विश्वास करतो त्याचे कारण कळावे. आणि मी विश्वास करतो त्या सैतानाने तुम्हाला भ्रष्ट केले आहे आहे. स्पष्टपणे, मला ठाऊक आहे तो होता. देवाच्या वचनानुसार, ते अपयशी होऊ शकत नाही. त्याने तुम्हाला फसविले आहे. होय, महाशय. त्यामुळे मी त्या गोष्टी प्रचार करतो ज्याप्रकारे मी करतो: कारण देवाचा शब्द ते बोलला आहे.

"ओह," म्हणता, "बरे, भाऊ ब्रॅन्हम, हा एक भिन्न दिवस आहे." तरीदेखील ते सारखेच वचन आहे. त्यांना मागून तेथून काही गहू कोठारातून मिळाला जो योसेफाच्या समयाचा होता आणि तो ठेवला आणि काही वर्षाअगोदर त्याची येथे पेरणी केली (तुम्ही ते नियतकालिकेत पाहिले का?), आणि त्याने गव्हाचे पीक उत्पन्न केले. तो अजूनही गहू होता; त्या कारणामुळेच. त्याला केवळ एक गोष्ट हवी होती ती म्हणजे काही पाणी.

94 देवाचे वचन अगदी तसेच आहे जसे ते होते जेव्हा तो हजारो वर्षांअगोदर बोलला. त्याला फक्त पाण्याची गरज आहे! आपल्याला पीक का मिळत नाही? - कारण आपल्याकडे चुकीचे बीज आहे.

"तुमच्यातील कित्येकांना तुमचे मुळाक्षर बदलायला आवडेल?" - जेव्हा तुम्ही सुरुवात केली त्यापेक्षा दुप्पट अधिक नरकाचे मूल आहात! "तुमच्यातील कित्येक मेथडिस्टना बॅप्टिस्ट व्हावेसे वाटेल?" "...तुम्हा बॅप्टिस्टना पेन्टिकॉस्टल व्हायला वाटेल? अगदी तुमची सदस्यता येथे आणा." ओह, मेहेरबानी करुन! निरर्थक गोष्ट! कचरा! सैतानाचा कचरा. त्यामध्ये बिलकुल जीवन नाही. ते संकरित, ढोंगी, दोनदा मृत, मुळापासून उपटलेले मृत आहे. येशू नाही का म्हणाला, "प्रत्येक झाड जे माझ्या स्वर्गीय पित्याने लावले नाही ते उपटले जाईल?" सांप्रदायिक किंवा जे काही, ते उपटले जाईल! फक्त देवाचे वचन केवळ उभे राहणार! बरोबर. तेच काय तो म्हणाला. प्रत्येक माणसाचा शब्द खोटा असो, परंतु माझा सत्य असो.

95 मग आपण कुठे जाणार आहोत? बरे होईल की तुम्ही तुमच्या शुद्धीत या. परंतु जोपर्यंत तुम्ही हे ऐकण्यासाठी पूर्वनिर्धारित नाहीत तुम्ही ते ऐकू शकत नाही. आपण त्याकडे जात आहोत. आश्चर्य नाही ते बदकाच्या पाठीवर पाण्याप्रमाणे पडत आहे. तो पाणी गाळण्यासाठी बनविला गेला आहे, शोषून घेण्यासाठी नाही.

गोफेर लाकडापासून आणि बाभळीच्या लाकडापासून तारु बनविले गेले. ते अगदी सर्वात.... ते काही नाही परंतु फक्त पोकळ होते; त्यामध्ये काही नाही परंतु पोकळ. त्यामधून सर्वकाही काढून घेण्यात आले. ते त्याप्रकारेच वाढले होते - सर्वात हलके लाकूड तेथे जे होते, तेरड्यापेक्षा हलके. त्यांनी ते का केले? - जेणेकरुन तो ते डांबराने शोषून घेईल. जर ते ओकाचे भक्कम लाकूड असते ... तुम्ही म्हणता, "ओक अगदी तसेच चांगले कार्य करणार नाही का ?" नाही, महाशय, ते काहीही शोषून घेणार नाही; ते त्याला दूर करील. ते विकर्षक आहे, आणि हे शोषक आहे. आणि देवाचे एक खरे बीज आत्म्यासाठी एक शोषक असते! सर्व संप्रदायिकता बाहेर काढली जाते. सर्व अविश्वासूपणा बाहेर काढला जातो, आणि जेव्हा पवित्र आत्मा त्या जीवनाच्या जंतूमध्ये येतो जो तेथे पडलेला असतो, ते दुसरे बीज उत्पन्न करते, अगदी तंतोतंत. देवाचा दुसरा पुत्र जन्मतो. आमेन. दुसरा अपरिपक्व देव, देवाचा पुत्र.

96 मी एक ब्रॅन्हम आहे कारण चार्ली आणि इला ब्रॅन्हमने मला जन्म दिला. ते मला ब्रॅन्हम बनविते कारण मी त्यांचे बीज आहे. त्यांच्या दोघांच्या सहमतीने त्यांच्या एकत्र जंतूने एक बीज बनविले, आणि त्याने मला बनविले.

जेव्हा देव आणि त्याचे वचन एक होते (हालेलूया!) ते ... जेव्हा देवाचा आत्मा देवाच्या बीजाला पाणी देतो, देवाचे वचन, ते देव बनविते; आणि तो एक वैयक्तिक नव्हता, तो देव आहे! कशासाठी? - तुम्ही मृत आहात; तुम्ही अजून स्वतःचे नाही. तुम्ही स्वतःला मृत ठरविता, पोकळ बनलेले, बीज जंतूसाठी वाट पाहत आहात. मग ते काय आहे? ते अजून तुम्ही नाही, तो मनुष्य नाही; तो त्या मनुष्यात देव आहे. ते बीज आहे जसा सुरुवातीला बोललेला शब्द होता. ते मनुष्यामध्ये देवाचे वचन प्रकट होते; मग तो मनुष्य नाही, तो मनुष्य आहे जो मेला. तो एकाच वेळेला संकरित आणि देवाचा पुत्र असू शकत नाही . तो एकतर मृत्यूचा पुत्र किंवा जीवनाचा पुत्र आहे. तेव्हा जर तो मृत्यूचा पुत्र आहे, त्याला सैतानाकडे द्या आणि त्याला त्याला मारु द्या. त्याला देवाकडे द्या आणि त्याला तुमच्यामधल्या सैतानाला मारु द्या - त्याला बाहेर घालवून द्या. तुम्हाला पोकळ करतो. मग देवाला तुमच्यामध्ये त्याचे जीवन पेरु द्या, मग यापुढे ते तुम्ही नाही; ते देवाचे जीवन आहे कारण ते देवाचे वचन आहे - पवित्र आत्म्याद्वारे जलसिंचन केलेला तीच गोष्ट निर्माण करील. तुम्ही ते पाहता? मला अगदी त्यावर काही मिनिटे प्रचार करायला आवडेल, परंतु शास्त्रलेखाची तीस किंवा चाळीस पाने येथे.... आणि माझी केवळ आतापर्यंत तीन झाली आहेत.

97 ठीक आहे - प्रकट झालेले. तीच कार्ये आपल्याद्वारे प्रकट झालेली, कारण तो तोच शब्द आहे. आता, जर तुम्हाला ख्रिस्ताची कार्ये करायची आहेत, तीच गोष्ट करा जी त्याने केली. "जो कोणी माझ्यावर विश्वास करतो तो माझी कार्ये करील." ते काय आहे? कशामध्ये विश्वास करता? - की तो मूळ बीज आहे जो आला. बीज कुठे आहे? येथे, मला हे हातरुमाल घेऊ द्या. येथे एक मनुष्य आहे जो असायला हवा होता, सरळ येथे. हा मनुष्य आहे जो असायला हवा होता. काय झाले? हव्वेने ते संकरित केले - त्याचे प्रजनन केले. त्याने काय केले ... मग त्याने काय केले? - मृत्यूकडे वळविले, अगदी मरत, मरत गेला.

आता हा एक जो बाहेर आला - आता येथे अगदी तसाच वचनाबरोबर राहतो. येथे वचन येथे अगदी तसेच राहिलेले आहे. आता काय झाले? येथे वचन आहे. आता वचन जे देव बोलला बहुगुणीत करण्यासाठी आणि पृथ्वी व्यापून टाकण्यासाठी, त्याला उतरण्यासाठी एक स्थळ आढळले नाही. शेवटी या वचनाने एका कुमारीचे गर्भाशय पकडले. (या दुपारी आपण दोन गर्भाशयांबद्दल बोलू.) आणि काय घडले? त्याच्याकडून जीवनाचे जंतू आले - ती गोष्ट जी देते, ते पाणी जे गाभ्याला स्वतःला पुनरुत्पादित करण्याची संधी देते. तो आत्मा त्याच्यामधून आला आणि वर गेला.

98 येथे आपण आहोत. आपण सोबत आलो. काय घडले? आपण त्याचा विश्वास केला; आपण त्याचा विश्वास केला. आता येशू काय म्हणाला? - "तो जो माझ्यावर विश्वास करतो [पहा] ... तो जो माझ्यावर विश्वास करतो, जी कार्ये मी करतो - ते प्रकटीकरण की पवित्र आत्मा कबुतराच्या स्वरुपात माझ्यावर आला आणि हे केले, संकरातून नाही, परंतु कुमारीपासून जन्मातून. जीवनाच्या ओघातून नाही, जसे मुलाचे प्रजनन, पतीकडून पत्नीकडे; नाही, ते नाही, एक संकर नाही, परंतु एका कुमारीद्वारे जन्म. "आता, यातून, मी हे जीवन देत आहे की जर तुम्ही विश्वासाद्वारे स्वीकाराल जे पिता, सर्व संदेष्टे, देवाची सर्व वचने, मी हे जीवन खाली तुमच्यावर ओतीन, आणि तुम्ही इतर काहीही करु शकणार नाही परंतु तीच गोष्ट उत्पन्न कराल जो मी आहे." तेथे तुम्ही आहात.

99 "जी कार्ये मी करतो तो देखील करील." आणि त्याने काय केले? - अगदी जसे पित्याने त्याला चालविले, जे त्याने पाहिले. संत योहान ५:१९ - अगदी ... "पित्याने दाखविल्याशिवाय मी काहीही करीत नाही." तो काय होता - स्वतःला एक मनुष्य बनविले. देव देह बनला आणि आम्हामध्ये वस्ती केली. वचन देहधारी झाले आणि त्याने आम्हामध्ये वस्ती केली. देवाचा बोललेला शब्द, एका कुमारीद्वारे, एक शरीर आणले, आणि त्या शरीरामध्ये पाणी, आत्मा आला, आणि वचनाच्या जलस्नानाने धुतला गेला आणि मग त्याच्यामध्ये गेला, त्याच्यामध्ये राहिला, आणि तेथे देवाचे जीवन स्वतःला ख्रिस्तामधून प्रकट करीत होते. देव ख्रिस्तामध्ये होता, तो अभिषिक्त एक.

100 ख्रिस्त म्हणजे "अभिषिक्त" - एक माणूस जो अभिषिक्त होता. आणि देव जो त्याच्यामध्ये वास करत होता. ते काय होते? देहात जंतू, अभिषिक्त असा, देह देवाच्या आत्म्याबरोबर अभिषिक्त असे ज्याने देवाचे वचन प्रकट केले. "आणि आपण त्याला न्याहाळले, पित्यापासून एकुलता एक जन्मलेला, कृपेने ओतप्रोत....," पहा. तेथे तो होता, पहा. तो देवाचा शब्द होता जो प्रकट झाला. आणि आता तो मेला जेणेकरुन तुमच्या संकरणाचे ऋण भरावे. आता! माझ्या! तेथे ते आहे. ते काय आहे? - जेणेकरुन तुम्ही स्वतःसाठी मरावे तेथपर्यंत की तुम्ही स्वतःचे यापुढे नाहीत आणि त्याच्या वचनाने भरावे, त्याचे वचन विश्वास करीत आणि मग पवित्र आत्मा जो त्याच्यामध्ये होता तो त्या वचनाला जलसिंचन करायला, त्याला वाढविण्यासाठी खाली येतो.

पहा? आणि मग ते काय आहे? देव प्रकट होत आहे, त्याच्या पहिल्या पुत्राचे कार्य पुढे सुरु ठेवीत आहे, त्याचा एकुलता एक, पहा, जो आपल्या संकरित जीवनासाठी मेला, की आपण पुन्हा देवाचे पुत्र आणि कन्या असण्यासाठी तो आपला परत समेट करीत आहे की त्याच्या मंडळीतून, तेच जीवन वाहावे वचनाद्वारे तीच कार्ये प्रकट झालेली सुरु असावीत जशी ती ख्रिस्तामध्ये होती. ख्रिस्त देवाचा वचन होता जो प्रकट झाला. आणि तो मेला, त्याचे जीवन दिले, जेणेकरुन तो आत्मा पाठविल - त्याचे शरीर वर घेईल आणि आत्मा परत जलसिंचनासाठी मागे पाठविल, उद्धाराची किंमत द्यावी, जर आपण त्याचा विश्वास करु. तेच ते सरळ तेथे आहे - जर तुम्ही त्याचा विश्वास केला. "जो माझ्यावर विश्वास करतो, जी कार्ये मी करतो...." मग पवित्र आत्मा त्याच देवाच्या वचनावर येतो....

101 "आता," तुम्ही म्हणता, "मग का तुम्ही ते पवित्र शास्त्रावर फेकता?" ते पवित्र शास्त्र तुमच्यामध्ये असायला हवे. तो शब्द एक बीज आहे, जोपर्यंत तो येथे पडलेला आहे तो काहीही करणार नाही. परंतु जेव्हा तो येथे आत येतो, जेव्हा तो हृदयात येतो, तेव्हा तो पवित्र आत्म्याद्वारे प्रकट होण्यास सुरुवात होते, ती देवाची कार्ये. मग दृष्टांत येतात, सामर्थ्य येते, नम्रता येते. सर्व तुमचे 'सर्वकाही माहित आहे' हे जाते. तुम्ही शून्य बनता; ख्रिस्त जिवंत होतो. तुम्ही मरता; तो जिवंत होतो. तेथे ते आहे. कारण तो मरतो, मी जगतो. जेव्हा मी मरतो, तो परत जिवंत होतो. आणि जेव्हा मी मरतो त्याने मला जीवनाचे अभिवचन दिले. आणि मी स्वतःला मरतो जेणेकरुन त्याचे जीवन मला मिळावे; आणि ते मी कसे करतो? - त्याचे वचन, त्याचे बीज घेण्याद्वारे, विश्वासाद्वारे त्याचे बीज येथे ठेवतो आणि त्याचा विश्वास करतो, आणि मग ते तंतोतंत ते उत्पन्न करते जे पवित्र शास्त्र म्हणाले आहे.

102 आता, माझ्या बंधूजनांनो, देशभर शोधून काढा. आपल्याला खूपसे अनुकरण आढळते. थोडेसे अगदी पुढे जाऊया.

ठीक आहे, जी कार्ये ख्रिस्तामध्ये प्रकट झाली, तीच कार्ये त्याच्या मंडळीत प्रकट व्हायला हवी जी असेल. तो म्हणाला तसे - संत योहान १४:१२ - "पृथ्वी आणि आकाश नाहीसे होईल परंतु माझे वचन नाही." ते बरोबर आहे का? ठीक आहे, पूर्वनिर्धारित जसा तो होता, शब्द बीजाला देह बनविते.... तेथे मी आता थांबलेले बरे. कदाचित तुम्ही नाही परंतु कोणीतरी तेथे बाहेर ध्वनिमुद्रणपट्टीच्या भूमीवर कदाचित ते समजणार नाही.

103 पूर्वनिर्धारित: सर्व देवाचे पुत्र आणि कन्या पूर्वनिर्धारित आहेत. आपण त्या शास्त्रलेखांमध्ये थोड्या वेळाने जाणार आहोत जेव्हा मी फक्त तुम्हाला त्याचा उल्लेख करतो - इफिसकरांस १ अध्यायाचे, ५ पद. ठीक आहे, आपण पूर्वनिर्धारित आहोत. का? - ख्रिस्त हा ते मूळ बीज आहे आणि हे मूळ बीज देवाच्या पूर्वज्ञानाद्वारे पूर्वनिर्धारित केले होते, माहिती असून की पतन येणार होते, आणि आपले स्थान घेण्यासाठी त्याला पूर्वनिर्धारित केले. तुम्हाला ते कळले? देवाचे सर्व पुत्र आणि कन्या पूर्वनिर्धारित आहेत. "परंतु," तुम्ही म्हणता मग, "तो कशालातरी दोषी ठरविल?" नाही, महाशय. तुम्ही येथे मुक्त नैतिक प्रतिनिधी आहात, परंतु कारण की तो, देव असल्याने, अमर्याद असा (जसे मी तुम्हाला त्याबद्दल बोललो), त्याला सर्वकाही पूर्वज्ञान होते जे घडेल. त्याला ठाऊक होते ते कोण होते.

104 आता, त्याने हव्वेला ते करायला लावले नाही. त्याने तिला ते करण्यास लावले नाही, परंतु त्याला माहित होते ती ते करील.

आता, आश्चर्य नाही मी संत लुकच्या बाराव्या अध्यायात विश्वास करतो (मी विश्वास करतो तो आहे). तो म्हणाला मी ... (ते लिहून घेतले नाही; मी ते थोड्या पुढे ते लिहून ठेवले आहे) की तो म्हणाला, "त्यांना डोळे आहेत परंतु ते पाहत नाही. त्यांना कान आहेत परंतु ते ऐकत नाही. यशया तुमच्याबद्दल खरेच बोलला. यशयाने तुम्हाला अगोदरच पाहिले." आणि तेथे ते डोळ्यांनी, कानांनी, आणि इतर सर्वकाही बरोबर बसलेले आहेत, परंतु तरीही ते पाहू शकत नाही. का? - ते देवाच्या वचनासाठी विकर्षक आहेत. मग येशू म्हणाला, "ओह, तुम्ही ढोंगी. तुम्ही सैतानाची मुले आहात आणि त्याची कृत्ये तुम्ही करता. मग मला दोषी ठरवा," तो म्हणाला - "माझी सेवा नाकारा." तेव्हा मला दाखवा तुमची सेवा कुठे देवाचे पूर्ण वचन उत्पन्न करते, जशी त्याची करायची, पहा. पहा?

105 आता, पूर्वनिर्धारित जसा तो होता - आता तुम्ही म्हणता, "कसा तो पूर्वनिर्धारितपणा येतो?" देव, बाह्य ... आता सर्वजण हे समजत नाहीत, आता मला हवे आहे की तुम्ही तुमचे हात उंच करावे जेव्हा मी संपवीन, पहा.

106 देवाने, प्रारंभी, आदामाला आणि हव्वेला कामगिरी सोपविली की पृथ्वीला बहुगुणीत करा आणि व्यापून टाका. त्याचसाठी काय तो समागम देण्यात आला होता, त्याचसाठी तो होता. परंतु संकरणाला काय कारणीभूत ठरले? - मृत्यू आणला. आता त्या दोन गर्भाशयामध्ये या दुपारी आपण ते समजू, पहा.

आता लक्ष द्या. आता यामध्ये देवाने अगोदरच पुत्रांचे आणि कन्यांचे पूर्वनिर्धारित जग पाहिले. त्याने त्यांना तेथे असण्यासाठी पूर्वनिर्धारित केले. आणि संकरणामुळे - देवाचा शब्द अविश्वास केल्याने, संकरण कारणीभूत झाले - देवाने ते परत सरळ मागे टाकले की तुम्हाला यापुढे अजून संकरित व्हायला नको; तुम्ही सरळ परत मूळ वचनाकडे पाठी येऊ शकता आणि देवाचे पुत्र बनू शकता अगदी जसा प्रारंभी तू असणार होतास, पहा.

107 ख्रिस्त तो जे काही होता त्यासाठी काही करु शकत नव्हता. तो देवाचा पुत्र होता. तेच काय ते आहे. पहा मला काय म्हणायचे आहे आता? पहा जर तुम्ही संकल्पित होता, तुम्ही देवाचे वचन पाहाल, तुम्ही त्याचा विश्वास करता; कारण का? - तेथे काहीतरी नवीन आहे. का? तुम्ही कधी कुटुंबात नैसर्गिक प्रवृत्ती ऐकली आहे का? एक पुत्र त्याच्या पित्याची, किंवा आई, किंवा आजोबा, किंवा आजीची एक प्रकारे नक्कल करील. ती एका कुटुंबाची नैसर्गिक प्रवृत्ती आहे. तुम्ही त्याबद्दल ऐकले आहे, तुम्ही नाही का? बरे, तीच गोष्ट पूर्वनिर्धारितपणात आहे. प्रारंभीपासून तुम्ही येथे योग्य मार्गाने असावयास हवे होतात, परंतु तुम्ही ज्याप्रकारे आलात जसे तुम्ही आलात, तुम्ही पतनाला बांधले गेलात. परंतु तुम्ही पूर्वनिर्धारित असल्याने तुम्ही वचन ऐकले आणि ते तुम्हाला सरळ परत पाठी आणते जेथे तुम्ही पूर्वनिर्धारित होता! आमेन. ते कधीही अगोदर पाहिले नव्हते. तुम्हाला सरळ आणते.... काय तुम्हाला देवाचे वचन विश्वास करायला लावते आणि या इतर गोष्टी नाकारावयास लावते? ते कारण तुम्ही होते ... तेथे तुमच्यामध्ये काहीतरी आहे. मागे तेथे पलीकडे तुम्ही असावयास हवे होतात ... का, की तुम्ही येथे सदासर्वकाळ जगण्यासाठी बनविले गेले आहात.

108 "आता ... त्यासाठी शास्त्रलेख, प्रचारका."

येथे तो येतो: "ज्यांना त्याने आगाऊ नेमून ठेवले त्यांना त्याने पाचारण ही केले, ज्यांना त्याने पाचारण केले त्यांना त्याने नीतिमान ही ठरविले, आणि ज्यांना त्याने नीतिमान ठरविले, त्यांचे त्याने अगोदरच गौरव ही केले!"

"भाऊ ब्रॅन्हम, प्रचार करण्याचा काय उपयोग?"

तेथे बाहेर पीक आहे; केवळ गोष्ट मी करीत आहे ती मासेमारी. मी फक्त ते बाहेर फेकीत आहे तेथे आणि पाहतो ते कोठे जाते. जर ते विकर्षण, जगाच्या दलदलीचे संप्रदायाचे वंगण, त्याला बाजूला फेकते, मी त्याला काही साहाय्य करु शकत नाही; परंतु जर तेथे बाहेर एक असेल जो ते शोषून घेईल, तो देवाचा एक पुत्र आणि कन्या म्हणून वळेल अगदी तितकेच निश्चित जसे जग आहे. आमेन! कारण ते पूर्वनिर्धारित आहे.

109 त्याच कारणामुळे देव त्याची कार्ये येशूमधून करु शकला; तो एक पूर्वनिर्धारित पुत्र होता. तो पृथ्वीच्या पायारंभापूर्वी वधलेला कोकरा होता! शेकडो, दशलक्ष, अरब, खरब वर्षांअगोदर जे आपण म्हणालो उत्पत्ती १:१ काही वेळापूर्वी बोललो, तो अगदी तेव्हा त्याची जागा घेण्यासाठी पूर्वनिर्धारित होता. आमेन! त्याच कारणामुळे त्याने पित्याची इच्छा केली. तो प्रकट झालेला शब्द होता. आणि इतर पुत्रांतील प्रत्येक जणांकडे तेच प्रकटीकरण असेल, आणि तेच एक आहेत जे पूर्वनिर्धारित होते.

110 तो लहानसा गट प्रत्येक पिढीमध्ये पुनरुत्थानात जगाच्या प्रारंभापासून शेवटपर्यंत वर येईल. आणि त्यांनी ह्याला धरुन ठेवले आहे कारण.... अगदी पौल देखील हे प्रकटीकरणात म्हणाला ... इब्री ११ अध्यायामध्ये म्हणाला, ते मेंढरांची व शेरड्यांची कातडी पांघरुन फिरत असत आणि ते लाचार आणि पीडित आणि त्रासलेले असे होते; त्यांना जग योग्य नव्हते! आमेन! खायला काही नव्हते आणि धावत होते आणि गुहांतून आणि छळलेले आणि करवतीने चिरले जसे यशयाला आणि इतर कित्येकांना - पौल त्या लोकांबद्दल बोलत आहे. तो कोणाबद्दल बोलला, करवतीने चिरले? - यशया - तो संदेष्टा अगदी जगाची सुरुवात होण्याअगोदर पूर्वनिर्धारित केला गेला. तो हव्वेच्या गर्भाशयातून यावयास हवा होता. परंतु मग तो एका स्त्रीच्या गर्भाशयातून आला; एक साक्ष म्हणून त्याच्या आत्म्याला येथे येणे होते.

तसाच येशू देखील मृत्यू, दफन, आणि पुनरुत्थानाची एक साक्षी म्हणून आला की मनुष्य मरेल, परंतु त्याच्याद्वारे परत जिवंत होईल! कारण तो ते बीज आहे ज्याला येणेच आहे. आमेन. आशा करतो तुम्ही ते पाहता.

111 ठीक आहे, पूर्वनिर्धारित जसा तो होता, ते शब्द बीज तुमच्यामध्ये देह बनविते, त्याची मंडळी. देवाचा शब्द ... तुम्ही म्हणता, "निश्चित

भाऊ ब्रॅन्हम, प्रत्येक शब्द, मी त्याचा विश्वास करतो." मग जेव्हा तुमची रुढीपरंपरा येते त्याला पाठिंबा देऊ नका, पहा? सरळ त्या वचनाबरोबर राहा आणि त्याबरोबर राहा; पहा काय घडते म्हणा, "हे, प्रभू, मी त्याचा विश्वास करतो. पवित्र आत्मा पाठीव." मग पहा. मग जर तो त्याची साक्ष देणार आहे, मग तुम्हाला ठाऊक आहे तुम्हाला तो मिळालेला आहे - कोणत्या संवेदनेने नाही, सैतान ते करतो; कोणत्या चमत्काराद्वारे नाही, सैतान ते करतो; परंतु तुमच्या नियमित देवाच्या वचनावरील विश्वासाद्वारे आणि ते जीवन जे तुम्ही जगता - कधीही काहीही नाकारीत नाहीत. ठीक आहे, ते वचनाला देह बनविते, पहा, देह आणि तेच पाणी - आत्मा.

112 आता एक मिनिट थांबा. मी हे चुकवू शकत नाही. पहा, येशू हे अब्राहामाचे बीज होता, दैहिकरित्या बोलतो. ते बरोबर आहे? - एक अब्राहामाचे बीज पूर्वनिर्धारित बीज. आणि जेव्हा आत्म्याचा त्याच्यावर वर्षाव झाला, त्याने कोणत्या प्रकारचे जीवन आणले? - त्याने एक विश्वासाचे जीवन आणले. कोणत्या प्रकारचे एक जीवन?

"तुम्हाला म्हणायचे आहे तो अब्राहामासारखा वास्तव्य करणारा असेल?"

तेथेच जेथे लोक आज इतके भेसळलेले होतात. ते विचार करण्याचा प्रयत्न करतात की देवाच्या माणसाने हे करावयास हवे आणि हे आणि ते अनुसरावयास हवे. ओह दया, नाही! काय होते...? ख्रिस्त कसा काय अब्राहामाचे बीज होता? त्याच्यामध्ये नाही ... इतका काही त्याच्या देहामध्ये नाही, कारण इसहाक, ते इसहाकाचे बीज, शेवटी पतन पावले आणि मेले. ते पतितावस्थेत गेले आणि संकरित देखील झाले. आपण त्यामध्ये थेट जाणार आहोत. पहा, परंतु अब्राहामाचे विश्वासाचे बीज जो त्याने कोणत्या परिस्थितीची पर्वा न करता देवाच्या वचनाचा विश्वास केला. तेथे तुम्ही आहात! व्हिव! तुम्हाला माहित आहे, मला आरोळी मारावीशी वाटते! पहा, बघा, अब्राहामाचे विश्वासाचे बीज. ते काय होते? - अब्राहामाचा देह नाही, परंतु अब्राहामाचा विश्वास. अब्राहामाचा विश्वास कशामध्ये? - देवाच्या वचनामध्ये. काही फरक पडला नाही काय आले, त्याने त्याच्याविरुद्ध असलेल्या कशालाही जसे काही ते अगदी तेथे नव्हते असे लेखले. ओह, मनुष्या, या संप्रदायांना हे तुकड्यांमध्ये फाडणार नाही का? हम्म, हम्म, हम्म, हम्म! ते निश्चित फाडिल.

113 जर अगदी विवाह आणि घटस्फोटाचे सत्य केवळ या प्रकाशात जसे ते येथे पवित्र शास्त्रात आहे तसे बाहेर आणले, ते या शहरातील प्रत्येक मंडळी तोडून टाकील - कोणत्याही इतर शहरातील - त्याकडे परत येण्याचा प्रयत्न करता. ते दोन्ही बाजूने चुकीचे आहेत. मी ते वचनाद्वारे सिद्ध करु शकतो. ते दोघेही चुकीचे आहेत. ठीक आहे. त्या मनुष्याने हे करावयास हवे की ते, किंवा स्त्रीने हे किंवा ते, मी ते बोलणार नाही, कारण आता त्यांच्यामध्ये मला पुरेसा गोंधळ मिळाला आहे, पहा. येशू म्हणाला, "त्यांना एकटे सोडा. आंधळा आंधळ्यांना वाट दाखवितो." का, ते त्याबद्दल फक्त भांडतात; ते त्याचा विश्वास करणार नाही. जर ते अनंत जीवनासाठी जन्मले आहेत, ते वचनावर विश्वास करतील. ते बरोबर आहे. जर ते नाहीत, देव स्वतःहून त्यांना प्रकट होईल. जर ते त्याचा विश्वास करीत नाहीत, का, ते विश्वास करणार नाही; बस एवढेच.

114 प्रथम याकडे जाऊया. आपण त्याकडे कधीतरी नंतर जाऊ, परंतु प्रथम याची काळजी घेऊया आणि पाहू का आपण या गोष्टींचा विश्वास केलाच पाहिजे - कशा आपण त्या विश्वास करायला हव्यात. तुम्ही त्या विश्वास करायलाच हव्यात. जर तुम्ही करीत नाही, तुम्ही नाश पावलेले आहात; तुम्ही आहात.

"भाऊ ब्रॅन्हम, कसला विश्वास करायचा? - तुमचा?"

नाही, महाशय, माझा नाही. तुम्ही माझा विश्वास करा ... मी वचन सांगत आहे. मी येथे काहीतरी ठेवीत नाही. मी फक्त तुम्हाला पवित्र शास्त्र या वचनावर विश्वास ठेवण्यासंबंधी काय म्हणत आहे ते सांगत आहे. आणि तेच काय ते मी केले आहे ते म्हणजे विश्वास करण्याचा मी प्रयत्न केला आहे त्या वचनाचा अगदी जसे ते लिहिले गेले आहे. मी काही भर घालीत नाही, काही काढून टाकीत नाही; अगदी ज्याप्रकारे ते आहे तसेच अगदी ते मी वाचतो आणि त्याच प्रकारे अगदी विश्वास करतो. आणि सर्वसमर्थ देवाच्या कृपेद्वारे आणि साहाय्याने, त्याने ते दृढ केले आहे आणि मी कोणालाही ते खंडण करण्यास विचारले आहे. आता, तुम्ही जे ध्वनिमुद्रणपट्ट्यांवर आहात ते करण्यासाठी या. मला सांगा एक वेळेस मी कधी तुम्हाला काही चुकीचे सांगितले ... जे प्रत्ययास आले नाही. मला सांगा काहीही, कोणत्याही समयी जे देवाने कधी कायम केले नाही आणि जसे ते सांगितले त्यानुसार अगदी तंतोतंत कार्य केले नाही.

115 ठीक आहे. पूर्वनिर्धारित जसा तो होता, तेच पाणी कशाला शब्द बीज बनविते? ती मंडळी आज ती पूर्वनिर्धारित वधू आहे? देवाने सांगितले आहे का त्याची वधू विना डाग विना सुरकुती असेल? मग ती पूर्वनिर्धारित आहे, ती नाही का, पहा. बरे, ख्रिस्त पूर्वनिर्धारित होता. तो अब्राहामाचा एक शाही बीज होता, आणि त्याने काय केले? जेव्हा आत्मा ख्रिस्तावर आला, त्याने देवाच्या वचनाची साक्ष दिली, आणि जेव्हा ते पाणी, आत्मा, शब्द बीजावर पडले, ते शाही बीज अब्राहामाच्या विश्वासाचे ज्याचा देवाच्या वचनावर विश्वास होता ते त्याच प्रकारचे पीक उत्पन्न करील.

म्हणता, "मी ते विश्वास करीत नाही." ठीक आहे, ते शोधूया. जाऊया आता, आणि पाहू; आपण अब्राहामाचे बीज आहोत? उत्पत्ती १७. मागे उत्पत्तीमध्ये जा आणि १७ अध्याय काढा. मी येथे पुष्कळ सोडत आहे, परंतु त्यापैकी काहींना येथे मला प्रहार करणे आहे कारण काही टीकाकार पुढे येतील आणि म्हणतील, "मी ते विश्वास करीत नाही," तेव्हा आपण थोडेसे येथे ठेऊया जेणेकरुन त्याला तसे सांगण्यापासून आपण थोडे थांबवू शकतो, पहा. ठीक आहे, १७:७. ६ पदापासून सुरुवात करुया.

मी तुला अतिफलसंपन्न करीन [अब्राहामाचे बीज] तुजपासून मी राष्ट्रे निर्माण करीन [परराष्ट्रीय आणि सर्व] तुजपासून राजे उत्पन्न होतील.

आणि मी माझा करार स्थापीन [आता पहा], मी तुझा व तुझ्या मागे तुझ्या संतानांचा, देव राहीन असा, निरंतरचा करार, मी तुझ्याशी

आणि तुझ्या पश्चात तुझ्या संतानाशी, पिढ्यानपिढ्या करतो.

116 अब्राहामाचे बीज आता काय आहे? आता त्याचा देह. पौल म्हणाला की बाह्यात्कारी यहुदी तो यहुदी नव्हे; जो अंतरी यहुदी तो यहुदी आहे, पहा. अब्राहामाचे बीज काय आहे? - ते जे देवाचे अखंड वचन विश्वास करतात पर्वा न करता की संप्रदाय किंवा वडील किंवा आई किंवा इतर कोणीही काय सांगतात; ते देवाच्या अखंड वचनावर विश्वास करतात. देव म्हणाला, "सरळ आता मी माझा करार स्थापितो (पूर्वनिर्धारित) हा करार तुझ्याबरोबर आणि प्रत्येक पिढीमधल्या प्रत्येक संतानाशी तुझ्या नंतर जे ह्याचा विश्वास करतील." तेथे तुम्ही आहात - अब्राहामाचे बीज. आता तुम्ही म्हणता ... आता पहा, देव म्हणाला, "मी ते संतानाबरोबर स्थापित करीन."

117 "बरे," तुम्ही म्हणता, "भाऊ ब्रॅन्हम, ते सर्वांना देते...." आता फक्त एक मिनिट थांबा. आता इफिसकरांसमध्ये जाऊया, इफिसकरांस पुस्तकामध्ये, आणि आपण इफिसकरांस १ अध्यायात सुरुवात करणार आहोत. आणि मग आपण थोडेसे येथे वाचणार आहोत आणि अगदी पाहूया या विषयाबद्दल देवाला काय सांगायचे आहे. आता, ऐका. पौल ... आता, पहा ज्याप्रकारे तो याचा उल्लेख करीत आहे आता. आता सर्वांनी आपल्या पायावर आता. आपल्याकडे अगदी ... तुमच्या दिसण्यावरुन. आता आपल्याकडे अगदी काही मिनिटे आहेत, मग आपण ... सुमारे पंचेचाळीस मिनिटे, काहीतरी, मग आपण दुपारच्या भोजनासाठी विसर्जित करु. आत पहा:

पौल, एक प्रेषित....

प्रेषित काय आहे? - एक पाठविलेला. "पौल, येशू ख्रिस्ताचा एक पाठविलेला." ते बरोबर आहे का? "न्यायसभेच्या इच्छेने?" मी ते चुकीचे वाचले, मी नाही का वाचले? "....च्या इच्छेने" बरे कसेही करुन....

पौल, येशू ख्रिस्ताचा एक पाठविलेला देवाच्या इच्छेद्वारे, संतांना [ते कोण आहेत? सर्वांना? नाही, महाशय. सर्वजण ते घेऊ शकत नाही. ते बरोबर आहे.] ... संतांना जे इफिसमध्ये आहेत, आणि ख्रिस्त येशूमध्ये विश्वास ठेवणारे:

118 ते जे अगोदरच तेथे आहेत. तेच काय ते या सकाळी मी आशा करतो मी या सभेमध्ये बोलत आहे - ते जे अगोदरच ख्रिस्त येशूमध्ये आहेत. आता तेथेच जेथे हे आहे ... पहा, तुम्ही तेथे बाहेर असलेल्या बालकांना याबद्दल सांगू शकत नाही. ते मांस खाऊ शकत नाही; त्यांना दूध प्यावे लागते. त्यांची वाढ खुंटली आहे, पहा. तेव्हा लक्षात ठेवा, ते जड अन्न खाऊ शकत नाही. आता:

... ख्रिस्त येशूच्या ठायी विश्वास ठेवणारे:

देव आपला पिता, आणि प्रभू येशू ख्रिस्त ह्यांच्यापासून, तुम्हाला कृपा, व शांती असो. [ठीक आहे.]

आपल्या प्रभू येशू ख्रिस्ताचा देव व पिता धन्यवादित असो, त्याने स्वर्गातील सर्व अध्यात्मिक आशीर्वाद देऊन [आता तो मंडळीशी बोलत आहे आता. हे बाहेरील नाही; ही मंडळी आहे] आपल्याला ख्रिस्तामध्ये आशीर्वादित केले आहे [या सकाळसारखे - ते जे ह्यावर प्रेम करतात; ते अगदी ते खात आहेत] ... ख्रिस्तामध्ये स्वर्गीय स्थानात:

119 जसे त्याने आपल्याला निवडले आहे त्यानुसार....

आपण त्याला निवडले का? हू? "ओह, भाऊ ब्रॅन्हम, मी तुमची क्षमा मागतो, मी निवडले." नाही, वचनानुसार, तू नाही." येशू म्हणाला, "तुम्ही मला कधीही निवडले नाही; मी तुम्हाला निवडले." ओह, होय. केव्हा त्याने निवडले? येशू केव्हा म्हणाला त्याने त्याची मंडळी निवडली? - जगाच्या स्थापनेपूर्वी.

आपल्याला त्याच्यामध्ये निवडून घेतले ... [डॉक्टर अमुक आणि अमुकच्या शेवटच्या संजीवनामध्ये. नाही, नाही. तुम्ही ते कदाचित त्या पंथामध्ये, एका पुस्तकात वाचाल, परंतु या एकामध्ये नाही.]

त्याने आपल्याला ख्रिस्ताच्या ठायी जगाच्या स्थापनेपूर्वी निवडून घेतले ...

आपली निवड कधी झाली? शेवटच्या संजीवनात? त्या रात्री जेव्हा आपण तारले गेलो? का, जेव्हा तेथे जग नव्हते, तारे नव्हते, तेथे अणू नव्हते, रेणू नव्हते - तेव्हा जेव्हा आपण निवडले गेलो. आमेन. ओह, त्यावर मला प्रचार करु देऊ नका. मी फक्त येथे काहीतरी स्पष्ट करण्याचा प्रयत्न करीत आहे. ठीक आहे....

... जगाच्या स्थापनेपूर्वी, की आपण त्यामध्ये [काय? - सदस्य. "नाही आपण ... ओह, आपण वाचले गेल्यानंतर आपण अगदी जसे तुम्हाला हवे तसे करु शकतो" - नाही.] ... आपण त्याच्या [सदस्यतेत?] पवित्र व निर्दोष असावे [ओह, नाही. ते प्रेम आहे नाही का? ते बरोबर आहे. ठीक आहे. प्रेमामध्ये! मला क्षमा करा, मी अगदी कमी करीत आहे मी आता अंदाज करतो. मी तसे करावयास नको. ठीक आहे.] ... प्रेमामध्ये.

त्याने आपल्या मनाच्या सत्संकल्पाप्रमाणे, आपल्याला येशू ख्रिस्ताच्याद्वारे स्वतःचे ... दत्तक होण्याकरिता यापूर्वीच [काय? पू-र्व-नि-र्धा-रि-त] पूर्वनिर्धारित केले आहे [प्रारंभापासूनच बीज, पहा],

120 कोणी ते केले? - देवाने! त्याने ते केव्हा केले? - जगाच्या स्थापनेपूर्वी. मग जर आपण अनौरस जन्म असे हव्वेच्या भ्रष्टाचारातून आलो, आपल्या सर्वांना तिचे मुले बनवीत आणि मरणास बाध्य, मग त्या सार्वभौम देवाला त्याच्या मुलांना उद्धारण्यासाठी मार्ग बनवावयास हवा. "आणि सर्व जे पित्याने मला दिले आहे ते माझ्याकडे येतील. आणि पित्याने आकर्षिल्याशिवाय कोणीही मनुष्य माझ्याकडे येऊ शकत नाही." ओह,

माझ्या! आता कुठे तुमच्या महान मोठ्या गोष्टी आहेत ज्या तुम्ही केल्या? तुम्ही कधीही काहीही केले नाही. तुम्हाला लाज वाटावयास हवी. तो देव आहे, ज्याने सर्व गोष्टी केल्या. ते चाक अगदी बरोबर कार्य करीत आहे.

त्या दिवशी कोणीतरी आले आणि म्हणाले कोणीतरी माझ्याबद्दल काहीतरी वाईट बोलले आणि कशाबद्दलतरी मला दोषारोप केला जे चुकीचे होते. मी म्हणालो, "ओह ते विसरुन जा."

म्हणाला, "तू कसे काय अशाप्रकारे घेऊ शकतो? त्यामध्ये तुझे कुटुंब सहभागी आहे."

मी म्हणालो, "ओह, माझ्या." मी म्हणालो, "ते जगाच्या स्थापनेपूर्वी माझी परीक्षा घेण्यासाठी पूर्वनिर्धारित होते. मी म्हणालो, "माझ्या, माझ्या, माझ्या. निश्चित, तेव्हा ते सर्व ठीक आहे."

म्हणालो, "तू ते सर्व कसे काय करतोस?"

मी म्हणालो, "जर मी या बाजूने खाली पाहत राहिलो, मी सर्वदा पडत राहीन."

121 आज लोकांबरोबर तसेच आहे: "जर मी देवाच्या वचनाचे सत्य स्वीकारले, भाऊ ब्रॅन्हम, ते मला लाथ मारुन बाहेर काढतील." बरे, तू येथे कशाकडे पाहत आहेस? तेथे रस्त्याच्या शेवटास पहा. पहा, एक मनुष्य जो अशाप्रकारे पाहतो, त्याला ठाऊक नाही तो कुठे जात आहे. तो या मार्गाने पाहत आहे. परंतु जर तू पलीकडे बाहेर पाहिले, तू पर्वा करीत नाहीस आता काय चालले आहे, तुला ठाऊक आहे तू कोठे जात आहे, पहा. बस एवढेच. पहा तू कोठे जात आहे. वचनाच्या सहमतीत राहा.

122 ठीक आहे, दत्तकपणासाठी आता आपल्याला पूर्वनिर्धारित केले आहे. आता तुम्ही विश्वास करता का आपण पूर्वनिर्धारित आहोत? आता, येशू पूर्वनिर्धारित होता का? तो देवाचा कोकरा होता जो अगोदरच वधला गेला होता तेथे एक प्रकाश असण्यापूर्वी, तेथे उल्का असण्याअगोदर, तेथे रेणू असण्याअगोदर, अणू किंवा काहीही असण्याअगोदर. तो वधलेला देवाचा पुत्र होता. ओह, देवाची महानता. मग हे लहानसे शेंगदाण्याएवढे मेंदू कुठल्यातरी लहान अलौकिक उबवण पात्रात येथे उत्पादन केलेले त्याबद्दल वादविवाद करण्याचा प्रयत्न करतात आणि म्हणतात ते बरोबर नाही. ते लज्जास्पद आहे.

तुम्ही कोण आहात? अगदी त्यांच्यातील काही सांगतात तेथे नरक नाही, आणि तुम्ही दररोज त्याच्या भांड्यावर बसत आहात - आठ हजार मैल जाड तुमच्याखाली, ज्वालामुखी, आणि मग वर पाहता आणि देवाला आणि त्याच्या वचनाला नाकारता. जेव्हा तुम्ही त्या वचनाला विरोध करता, तुम्ही देवाला विरोध करता. ते बरोबर आहे. ओह, माझ्या! किती तू महान आहेस, प्रभू. आम्ही किती आभारी असायला हवे.

123 ठीक आहे, तेव्हा वचनाचे आणि आत्म्याचे विश्वासू एकच असायला हवेत. तुम्हाला ते कळले? विश्वासू, ते वचन, आणि तो आत्मा हे पूर्णपणे एक आहेत. तुम्ही तुमचे स्वतःचे विचार करीत नाहीत; तुम्ही तुमचे स्वतःचे मन वापरीत नाहीत. ते अद्भुत नाही का? जे मन ख्रिस्तामध्ये होते ते तुमच्यामध्ये आहे, पहा. ते मन ख्रिस्तामध्ये होते आणि तुम्ही वचन घ्याल अगदी जसे त्याने केले कारण तो वचन होता. आणि जर ख्रिस्ताचे मन तुमच्यामध्ये आहे, तुम्ही वचन आहात. तुम्ही देवाचे जिवंत वचन आहात, येथे पृथ्वीवर त्याचे प्रतिनिधी आहात - ते बरोबर आहे - कार्य पुढे नेत आहात. मंडळी त्याप्रकारे असायला हवी.

आणि जेव्हा असे असते, पवित्र शास्त्र शिष्यांच्या प्रारंभीच्या दिवसासारखे परत प्रकट होते, अगदी शिष्यांसारखे. पवित्र शास्त्र परत तुम्हांमध्ये जगत आहे.

124 आता पाहूया, मला येथे किमान सुमारे पंधरा पाने त्वरित घ्यावयाची आहेत, आणि तसे करण्याचा मला अगदी वीट आहे, परंतु मला अगदी त्यावर धावावे लागणार आहे कारण जर मी धावलो नाही, मग या दुपारी मी असेल आणि उद्या माझ्याकडे सभा आहे, आणि आता मला अगदी घाई करावी लागणार आहे. ठीक आहे, आता आपण हे थोडेसे त्वरित करण्याचा प्रयत्न करणार आहोत जर आपण करु शकलो; त्यामध्ये संक्षिप्त जाणार आहोत. तुम्ही विश्वास करता? ठीक आहे.

125 आणि जेव्हा तेव्हा, पवित्र शास्त्र परत प्रारंभीच्या ख्रिस्ताच्या दिवसासारखे प्रकट झाले आहे. पहा, कारण तुम्ही जसे ख्रिस्त होता तसे पूर्वनिर्धारित बीज आहात; आणि जेव्हा बीजावर पाऊस पडतो, ते जीवन स्वतःला उत्पन्न करते. जेव्हा पवित्र आत्म्याचा - वर्षाव होतो ... जेव्हा त्याचा त्या बीजावर वर्षाव झाला ज्यांना येशू म्हणाला त्याने निवडले आहे केव्हा? - जगाच्या स्थापनेपूर्वी. मग ते एक पूर्वनिर्धारित बीज होते. ते बरोबर आहे का? मग येथे ते वरच्या माडीवर स्वतःला खेचत होते, ही बीजे, तो शब्द, आणि तोच शब्द तेथे त्याच्यामध्ये जीवनाशिवाय पडलेला होता. अचानक तेथे स्वर्गातील वाणी आली जसे पाणी खळखळाट करते. आणि त्याने प्रत्यक्षात संपूर्ण घर भरले जेथे ते बसलेले होते. आणि ती बीजे वाढू लागली. ते स्वतःला प्रकट करु लागले - देवाचा शब्द प्रकट होऊ लागला.

126 ठीक आहे, का मग संजीवनाच्या अग्नीची तीव्रता कमी झाली आहे? आता, माझ्याकडे सुमारे दहा शास्त्रलेख येथे आहेत (जर तुम्ही फक्त पाहू शकला असता येथे) जे मी ते सांगायलाच हवे, परंतु त्यामधील बरेचसे मला गाळावे लागणार आहे, मी फक्त ... जेणेकरुन तुम्हाला त्याची रुपरेषा मिळेल.

ठीक आहे, का मग संजीवनाच्या अग्नीची तीव्रता कमी झाली आहे? आता, मला नावे घ्यावी लागणार आहेत. देवाने मला ते सांगितल्याशिवाय, मी ती घेणार नाही. परंतु मला नावे घ्यावी लागणार आहेत. मला गोष्टी सांगाव्या लागणार आहेत ज्या मला सांगावयाच्या नाहीत, परंतु हे स्पष्ट करण्याकरिता.... तुम्ही आता पाहू शकता कोठे मी नेत आहे, ते कारण जे मी केले ते मी केले. मी विश्वास करतो हा तो

शब्द आहे. आणि मी विश्वास करतो की ख्रिस्ताची एक मंडळी आहे, आणि ती मंडळी ते शेत आहे (थोड्या वेळाने आपण त्यामध्ये येऊ) आणि आत्म्याने काहीही करण्यापूर्वी आपल्याला शेतात शब्द घेणे आहे, पहा.

127 का मग संजीवनाच्या अग्नीची तीव्रता कमी झाली आहे? तुम्ही खूप काही अधिक बिली ग्रॅहमबद्दल ऐकत नाही, जसा महान सुवार्तिक. ओरल रॉबर्ट्स हा जसा देश ज्वलंत करीत असे तसा करीत नाही. माझ्या सभांबद्दल देखील ऐकण्यात येत नाही. तेथे केवळ तीन आहेत. काय बाब आहे? आता आपल्याला काही खरे खोल शिक्षण मिळणार आहे. आता ते मी केवळ वापरणार आहे आणि जर ही ध्वनिमुद्रणपट्टी बिली ग्रॅहम, ओरल रॉबर्ट्सच्या हाती पडली, माझ्या भावांनो, मला हवे आहे की तुम्हाला कळावे, की मी तुमची उपेक्षा करीत नाही; मी स्वतःला घेत आहे, जर तुम्ही लक्षात घेतले, तेथे तुमचा एक सुवार्तेतील सहकारी भाऊ म्हणून. आणि मी विचार करतो, भावांनो, यानंतर तुम्हाला एक चांगली समज असेल, त्याची जे काही मी केले ते मी का केले. आणि मी आशा करतो की मला देवाच्या नजरेत कृपा प्राप्त होईल, आणि तुमच्यासमोर, इमानदार आणि विश्वासयोग्य असण्यात की तुम्हाला ते कारण सांगण्यात की का.

128 बिली ग्रॅहम - येथे अलीकडेच जग बिली ग्रॅहमद्वारे ज्वलंत झाले होते. तुम्ही क्वचितच आता त्याबद्दल ऐकत आहात. तो अजूनही जात आहे, परंतु काय बाब आहे? ओरल रॉबर्ट्स - का, अगदी पृथ्वी पेटवीत होता; मरत आहे. टॉमी ओसबॉर्न - ती सर्व चांगली पापभिरु माणसे आहेत. काय घडले? विश्वास करतात की देवाने मला सेवेसाठी पाचारण केले आहे, माझ्याबाबत काय घडले? आता येथे काही प्रश्नांची उत्तरे देणार आहे. काय घडले?

तुम्ही म्हणता, “भाऊ ब्रॅन्हम, या सर्वांमधील मरणप्राय सेवा ही तुमची आहे.” ते खरे आहे. ते बरोबर आहे. माझ्यापेक्षा जास्त बिली ग्रॅहमबाबत ऐकले जाते, आणि ओरलपेक्षा जास्त बिलीबाबत ऐकले जाते. एका दिवसात ओरलबद्दल जास्त ऐकले जाते त्यापेक्षा की माझे सहा महिन्यात. टॉमी ओसबॉर्न, टॉमी हिक्स, त्या पापभिरु मनुष्यांतील कोणीही, त्यांच्याबाबत अधिक ऐकले जाते. तेव्हा जोपर्यंत तो क्रमांक येतो, त्या सर्वांपेक्षा मी अजून अधिक दूर आहे. काय घडले आहे? “भाऊ ब्रॅन्हम, तुम्ही ते म्हणता ... की येथे तुम्ही आम्हाला सांगत आहात आता की तुम्ही प्रत्यक्षात वचनाचा विश्वास करता आणि सर्वकाही, बरे मग तुम्हाला काय झाले आहे? काय घडले आहे?” तेच काय ते आपल्याला समजून घ्यायचे आहे. तेच काय ते आपल्याला समजून घ्यायचे आहे.

129 आता तिला तुमच्या मनाखाली ठेवा. छत्री खाली ओढा, आणि पावसाला झटकून टाका, आणि तुमचे हृदय एका क्षणासाठी उघडा आणि ऐका. लक्षात ठेवा उत्पत्तीमध्ये पवित्र शास्त्र म्हणते पहिल्या अध्यायात, आपल्या दिवसाच्या विचाराला आधार देण्यासाठी आपण वाचले, की प्रत्येक बीज आपापल्या परी सबीज उपजवो. त्याला त्याच्यापरी उपजवणे आहे. ते बरोबर आहे. प्रत्येक बीजाला उपजवणे आहे.... लक्षात ठेवा, पृथ्वी सर्व बीजांनी भरलेली आहे आणि पाऊस त्यांना आपापल्यापरी सबीज उपजवयास लावितो.

मी विश्वास करतो हे हंगामाच्या समयाच्या निकट जाणे आहे. तुम्ही ते विश्वास करीत नाही का? तुम्ही सर्व त्याच्याशी सहमत आहात. आपण हंगामाच्या समयाच्या निकट आहोत. आता, बीजांची पेरणी झाली आहे. तीच काय ती आपल्याबाबतीत बाब आहे. ती बीजे पेरली गेली आहेत. ओह, देवा, मी इच्छा करतो तुम्ही पाहू शकला असता मग माझ्यापुढून काय गेले. ती बीजे पेरली गेली आहेत. लक्षात ठेवा तेथे पेरणीचा समय आहे, मग कापणीचा समय आहे. त्यांना माहित आहे ते असे म्हणाले.

130 ठीक आता. आता, तेथे तीन भिन्न प्रकारची बीजे पेरली गेली आहेत. एक सांप्रदायिक - बिली ग्रॅहम; तो मुख्य पेरणारा होता. ओरल रॉबर्ट्स पेन्टिकॉस्टलसाठी. ती पेन्टिकॉस्टल बीजे पेरली गेली. (आता मी संस्थेबद्दल बोलत आहे.) आणि मग वचन पेरले गेले. आता तुम्हाला समजावे लागेल, लोकांनो. मी हे देवाने मला सांगितल्याशिवाय सांगत नाही. मला हवे आहे तुम्हाला हे चांगले व स्पष्ट समजावे. तीन बीजे पेरली गेली आहेत. त्याच कारणामुळे पेरणी अगदी जवळ जवळ संपलेली आहे, पहा. संपूर्ण संपलेली. पाऊस पडण्याअगोदर बीजांची पेरणी व्हावयास हवी (ते बरोबर आहे?) किंवा नाहीतर आत्मा. आता तुम्ही तेथे असहमत असाल, परंतु अगदी एक मिनिट थांबा. बीजे पेरली गेली पाहिजेत आणि मग बीजाच्या जलसिंचनासाठी पाऊस पडतो. ते बरोबर आहे? आता, मला हवे.... येथे कोणी आहे का ज्याला इब्री भाषा समजते? इब्री शब्द ठाऊक आहेत? ठीक आहे, तुम्हाला हवे असेल तर तुम्ही पहा.

131 आता आपण खूप काही ऐकत आहोत आणि कित्येक संस्था व इतर सर्वकाही आपण “वळवाच्या पावसात” आहोत याबद्दल बोलत आहेत. निरर्थक. अशी कोणती गोष्ट नाही. आता, ओह, मी ... काहीतरी घडत आहे. मी अगदी ते माझ्यापुढून जाताना पाहत आहे. त्याने आत्म्याला पकडले आहे, पहा. आमेन. मला ठाऊक आहे ते सत्य आहे; हे “परमेश्वर असे म्हणतो” आहे. दृष्टांतांसारखे, पहा, अगदी जात आहे आणि येत आहे. महत्प्रयासाने अगदी खाली येथे पाहू देखील शकत नाही. प्रत्येक वेळी मी पाहतो, मी त्याला अगदी माझ्यासमोर अशाप्रकारे वर जाताना पाहतो आणि तुटते आणि या बाजूने जाते आणि या बाजूने दिसते. मी काही लोकांना सभोवती बसलेले येथे खाली पाहण्याचा प्रयत्न करतो. दूर पाहतो आणि जेथेकोठे मी पाहतो, असे दिसते की तेथे ते आहे, पहा.

ठीक आहे, मागे जाऊया आणि परत त्याचा आता प्रयत्न करुया, निश्चित असा मला ते तेथे दिसले. मला ठाऊक नाही त्या रेषेत नक्की काय घडले.

132 पहा. मी विश्वास करतो की हे हंगामाच्या समयाच्या नजीक आहे. बीजांची पेरणी झाली आहे. मंडळ्यांची सांप्रदायिक बीजे जशी सुवार्तिकतेची, जशी बॅप्टिस्ट आणि प्रेसबायटेरियन, लूथरन, आणि पेन्टिकॉस्टल बीजे पेन्टिकॉस्टल संस्थांमध्ये पेरली गेली आहेत, महान मनुष्यांद्वारे जसे ओरल रॉबर्ट्स, टॉमी हिक्स, आणि टॉमी ऑसबोर्न, देवाची महान मनुष्ये, पहा. आणि मी विश्वास करतो की देवाचे वचन निर्भेळ या कोणत्याही संस्थांपासून दूर असे पेरले गेले आहे. तीच काय ती बाब आहे, पहा.

त्या बीजाला हवे आहे.... ते वाढण्याआगोदर बीज रोपाला बीज पाणी हवे आहे. ते बीज जे पेरले गेले आहे ते वाढण्यापूर्वी त्याला पाण्याचा वर्षाव हवा आहे.

आता, "बरे," तुम्ही म्हणता, "भाऊ ब्रॅन्हम, तेथे...." मला ठाऊक आहे, ते बरोबर आहे. आता तुमचे विचार पकडीत आहे, तुम्ही पहा; तुम्ही अगदी आता ते लपवू शकत नाही. ठीक आहे, तेव्हा तुम्ही काय विचार करता त्याबाद्दल काळजीपूर्वक राहा.

133 आता, बीज हे पेरलेच गेले पाहिजे आणि मग त्याला वाढण्यासाठी पाण्याची गरज आहे. आता, तुम्ही म्हणता, 'बरे, भाऊ ब्रॅन्हम (मी तुमचे विचार येथे व्यक्त करणार आहे), आमच्याकडे पाणी होते." तसेच असो. ते बरोबर आहे. तुमच्याकडे पाणी होते. कधी तुम्ही कोबी किंवा काहीतरी किंवा बीजे किंवा काहीही किंवा इतर त्याप्रमाणे पेरले आहे का, तुम्ही सहसा ... त्यांच्याकडे तेथे पाणी नाही, तुम्ही फक्त त्यावर थोडेसे ओतता.

ठीक आहे, परंतु आता थांबा, त्या रोपणीच्या समयी आपल्याकडे काय होते? - आगोटीचा पाऊस. "ओह," तुम्ही म्हणता, भाऊ ब्रॅन्हम, निरर्थक." आता फक्त एक मिनिट थांबा. तुम्ही तो शब्द "आगोटीचा" घ्या योएल २ मध्ये आणि त्याकडे पहा आणि बघा जर इब्री शब्द ... तुम्ही इब्रीमध्ये जा आणि पहा जर तो नाही.... जर तो तुम्हाला लिहून घ्यायचा असेल, मौ-र्य, मौर्य, आणि इब्री शब्द घ्या आणि अनुवाद करा आणि बघा काय मौर्य म्हणजे - शिकविणे. शिकविण्याचा पाऊस पुढे गेला. सांप्रदायिक शिकविण्याचा पाऊस पुढे गेला. "एक दशलक्ष अधिक '४४ मध्ये" - बॅप्टिस्ट. अमुक आणि अमुक, अमुक आणि अमुक - सदस्य मंडळीमध्ये. ओरल रॉबर्ट्स, आणि ते भाऊ त्या पेन्टिकॉस्टल चळवळीबरोबर ती अर्थशास्त्र ... किंवा ती महान पेन्टिकॉस्टल चळवळ आणि दशलक्षांमध्ये पसरली, पहा, ते बरोबर आहे. आणि बीज पुढे गेले, ते वचन, अल्पसंख्यांकांसाठी - त्या गटासाठी.

134 आता लक्ष द्या. आता तो शब्द लक्षात ठेवा, मौ-र्य, मौर्य, म्हणजे शिकवणे, आगोटीचा पाऊस. ते म्हणते तो मौर्य पाऊस, तो शिकविण्याचा पाऊस. शिकविण्याचा पाऊस पुढे गेला.

बिली ग्रॅहमने जगाला प्रहार केला. पेन्टिकॉस्टलने जगाला प्रहार केला, आणि वचनाने जगाला प्रहार केला. आता, काय बाब आहे आता? ते आता वळवाच्या पावसासाठी थांबलेले आहेत. तेव्हाच जेव्हा ती तिची फळे उत्पन्न करते. ओह, मी आशा करतो तुम्हाला ते समजले आहे.

135 मग ज्या प्रकारचे बीज तुम्ही तुमच्या शेतात पेरले आहे, त्या प्रकारच्या पिकाची तुम्ही कापणी कराल. जर संप्रदायाला अधिक सदस्यांची गरज आहे, तेच काय ते त्यांना मिळणार आहे. तेच काय ते त्यांना मिळाले आहे. पेन्टिकॉस्टलना अधिक पेन्टिकॉस्टल हवे आहेत, तेच काय ते त्यांना मिळणार आहे. बरोबर. परंतु वचन देवाच्या कन्या आणि पुत्र उत्पन्न करणार आहे. ते देखील येत आहे. पहा, तो महान वळवाचा पाऊस काय करणार आहे ते पहा - कसे ती भिंतीवरुन धावतील, उडी मारतील आणि कसे ते सैन्य येईल. फक्त एक मिनिट थांबा. ज्या प्रकारचे बीज तुम्ही तुमच्या शेतात पेराल त्या प्रकारचे पीक तुम्हाला मिळेल.

136 ठीक आहे, ते दोन सांप्रदायिक प्रकार ... तुम्ही समजता? सदोमात जाण्यासाठी ते दोन सांप्रदायिक प्रकार एकत्र जुळतील. परंतु ते वचन निवडलेल्यांबरोबर राहील, ते शाही बीज. आमेन. येशू म्हणाला, "जसे सदोमाच्या दिवसात होते, तसेच मनुष्याच्या पुत्राच्या आगमनासमयी असेल." दोन दूत खाली गेले, दोन अभिषिक्त सेवक, सदोमात खाली गेले त्या मनुष्याला बाहेर आणण्यासाठी जो पतित झाला होता (ज्यामध्ये थोडासा देवाचा अंश होता) आणि त्याची पत्नी, त्याची वधू - तुम्हाला ठाऊक आहे तिचे काय झाले; तिची अपकीर्ती झाली. आणि त्याच्या मुलींकडे पहा आणि पहा तो बाहेर निघाल्यानंतर त्यातून काय उबविले गेले. तेथे नेहमी "बिस्किटात केस" असते. तुम्हाला माहित आहे ते बरोबर आहे. त्या अभिव्यतीबद्दल क्षमा करा, परंतु तुम्हाला माहित आहे, एक गलिच्छ गोष्ट, तेव्हा ते ... ते नेहमीच होते; आपल्याला ते ठाऊक आहे. आता तुम्ही देवाचे वचन नाकारु शकत नाही!

137 परंतु तेथे एक होता जो अब्राहामाबरोबर राहिला ज्याने एक चिन्ह दिले. ते बरोबर आहे?

ठीक आहे, ठीक आहे, एक मागे राहिला.... अब्राहाम आणि त्याच्या गटाला काय संबोधित केले? - ते नियुक्त बीज जे कधीही खाली गेले नाही. ते यात्रेकरु होते. त्यांनी येथे प्रवास केला; त्यांनी तेथे प्रवास केला. त्यांनी येथे प्रवास केला, त्यांनी तेथे प्रवास केला - आंतरसंप्रदायिक. परंतु संप्रदाय खाली गेले आणि स्वतःसाठी एक शहर बनविले, आणि लोट याजक झाला, किंवा बिशप, किंवा ... तुम्हाला माहित आहे, जे काही ते तेथे होते, तो मोठा मनुष्य, शहरात बसला आणि न्याय केला, जो म्हणतो (तो बिशप तो राज्य प्रेसबायटर), "नाही, आम्ही त्या माणसाला आमच्यामध्ये घेणार नाही; नाही, महाशय! तो आमच्या धर्मशास्त्राबरोबर असहमत आहे. आम्ही त्याला घेऊ शकत नाही." तेथे जुना लोट आहे. तेथे तो बसतो. "जर तो आमच्या गटातील अधिकारपत्रे घेत नाही, आम्ही त्याला मुळीच घेणार नाही." तुम्हाला देवाच्या घरावर न्यायाधीश कोणी नेमले, तुम्ही संकरित? देवाचे वचन कसेही करुन प्रचार केले जाईल!

138 संत मार्टिन अशा प्रकारच्या एका गटाकडे गेला, आणि तो माणूस अगदी त्याला मान देण्यासाठी उभा राहण्यास देखील तयार नव्हता त्याने फाटक तोडल्यानंतर. देवाने अगदी त्याच्या अंगावरील झगा जाळला, त्याच्या पाठीमागून; त्याला उठण्यास भाग पाडले आणि त्या देवाच्या संदेष्ट्याला सलाम करावयास लाविले जो शहरात आला होता. ते बरोबर आहे. त्याच्या आसनाने आग पकडली जेथे तो बसला होता, त्या सिंहासनावर ज्यावर तो होता. ते बरोबर आहे. तुम्ही मंडळीचा इतिहास वाचला आहे. होय, महाशय. तो तेथे खाली सत्य वचन घेऊन गेला, चमत्कार आणि चिन्हे सादर केली आणि त्या वचनाला सिद्ध केले ज्यावर तो होता. त्यांच्याकडे त्यांचे स्वतःचे धर्मोपदेशकाचे अधिकार क्षेत्र होते आणि जे काही त्यांना हवे होते ते त्यांच्याकडे होते, आणि तेच अगदी त्यांना हवे होते; परंतु देव ते पाहावयास जाणार आहे ... कदाचित काही निवडलेली मुले तेथे असतील, त्याला त्यांना घेणे होते. ते बरोबर आहे. ठीक आहे.

139 तेव्हा लक्षात ठेवा, ते काय होते? आता येथे फक्त एका मिनिटाकरिता थांबूया. लोटाकडे एक वेळेस स्वतःला आंतर संप्रदायिक असण्यासाठी निवड होती. ते बरोबर आहे? एक वेळेस त्याच्याकडे अब्राहामाबरोबर प्रवास करण्याची निवड होती, परंतु जगाच्या प्रेमाने त्याला गुदमरविले. तेच काय ते आज झाले आहे. आणि लक्षात ठेवा, जे खाली सदोमात होते त्यांनी कधीही त्यातील एकही अलौकिक चमत्कार पाहिले नव्हते. त्यांना आंधळे करण्यात आले होते; आणि वचनाचा प्रचार अविश्वासू लोकांचे डोळे आंधळे करते. तेच काय ते बिली ग्रॅहम आणि त्यांनी केले - तेथे बाहेर अविश्वासणाऱ्यांचे डोळे आंधळे केले. ते बरोबर आहे. आता तुम्ही नाकारु शकत नाही की येशू म्हणाला, "जसे सदोमाच्या दिवसात होते, तसेच .... येण्याच्या दिवसात असेल." आणि येथे ते पवित्र शास्त्रात आहे. मनुष्याच्या पुत्राच्या आगमनासमयी ती सारखीच गोष्ट असेल.

140 आता लक्ष द्या, परंतु तेथे एक होता जो वचन होता. तो वचन होता, आणि तो कुठे राहिला? - अभिवचन मिळालेल्याबरोबर, निवडलेल्या एका बरोबर. वचन निवडलेल्या बरोबर राहिला. आणि आज देवाचे वचन निवडलेल्या बरोबर राहील; अभिवचनाद्वारे अब्राहामाच्या शाही बीजाबरोबर.

कोणत्या प्रकारची कार्ये त्याने केली? जेव्हा तो सुमारे आठशे वर्षानंतर येशू ख्रिस्ताच्या स्वरुपात प्रकट झाल्यानंतर, त्याने तेच कार्य केले जे त्याने तेथे केले, वचनाने केले, अब्राहामाच्या तंबूच्या दाराजवळ, त्याची पाठ तंबूला मागे करुन बसलेला होता, अब्राहामाला सांगितले त्याचे नाव अब्राहाम आहे अब्राम नाही, जे नेहमी असायचे (काय त्याचे नाव...), परंतु त्याचे नाव अब्राहाम होते कारण काही दिवसांअगोदर देव त्याला भेटला होता व त्याला सांगितले त्याचे नाव अब्राहाम होते. म्हणाला, "तुझी पत्नी कुठे आहे...." सा-रा-य नाही, सा-रा. "तुझी पत्नी सारा कुठे आहे?" जसे काही त्याला ठाऊक नव्हते.

म्हणाला, "ती तुझ्यापाठी तंबूत आहे."

तो म्हणाला, "मी तुझी भेट घेणार आहे...." मी, व्यतिगत नाम. "जीवनाच्या समयानुसार मी तुझी भेट घेणार आहे (ओह!), आणि तुला ते बाळ होणार आहे ज्यासाठी तू थांबलेला आहे. वळवाचा पाऊस पडणार आहे. तू ते बीज फार काळापासून तेथे धरुन ठेवले आहे, विश्वास करुन, आणि तू येणाऱ्या पुत्राची वाट पाहत आहेस, आणि तो येत आहे!" ती आजची खरी मंडळी आहे, पहा, ते निवडलेले बीज आहे. "तू त्याची वाट पाहत आहे आणि मी त्याला तुझ्याकडे पाठवीत आहे." आमेन. ते कोण म्हणाले? - वचन.

141 "ओह," तुम्ही म्हणता, "ते वचन नव्हते." मी तुमची क्षमा मागतो. अब्राहामाने त्याला "एलोहीम" म्हटले - तो जो सर्व सामर्थी अस्तित्व असा. तो वचन होता - एलोहीम. तो कोठे आला? - अब्राहामाचे बीज.

आता, लक्षात ठेवा, त्याला त्या संप्रदायांशी काही कर्तव्य नव्हते. तो सरळ निवडलेल्यांबरोबर राहिला आणि प्रचार केला (ते बरोबर आहे), आणि चिन्ह दाखविले. आणि येशू म्हणाला.... आता अगदी थोडा वेळ थांबा.

142 मग सारा, स्वतःशीच ... ते प्रदूषण पहा, पहा. आता, प्रत्यक्षात ते अविश्वास करणे, देवाने अगदी तेथेच तिला ठार केले असते. तुम्हाला ते ठाऊक आहे? आणि ती बाहेर आली आणि अब्राहामाला नाकारले. ती स्वतःशीच हसली, दुसऱ्या शब्दात, मनात. आता कदाचित अगदी ते हास्य देखील नसेल परंतु खाली तिच्या हृदयामध्ये ती एक प्रकारे थोडीशी हसली. "मी, एक वृद्ध स्त्री, एक शंभर वर्षे वयाची, रजोनिवृत्ती होऊन पन्नास वर्षे झाली, जीवनाचा समय, सर्व वर्षे त्याच्याबरोबर राहिली. का, आम्ही पती पत्नीप्रमाणे पंचवीस वर्षांकरिता राहिलेलो नाहीत, कदाचित तीस वर्षे, पहा, आणि म्हणायचे आहे मला माझ्या धन्याकडून सुख मिळणार आहे!" - अब्राहाम, तिचा पती. त्या प्रकारच्या पत्नी तुम्ही सर्व असावयासच हव्यात, असायला हव्यात. पौलाने तीच गोष्ट सांगितली आहे. तुमच्या पतीला तेवढे प्रेम करा. काहीतरी तेथे बाहेर संकरण नाही, तुम्ही पहा. तुमचे विचार लक्षात ठेवा. आपण त्यामध्ये या दुपारी गर्भाशयाच्या या विचारामध्ये जाणार आहोत.

143 तेव्हा आता, परंतु त्यामध्ये, ती अब्राहामाला इतके प्रेम करीत होती की तिने त्याला तिचा धनी म्हटले. "माझा धनी ही, वृद्ध झाला आहे, आणि मी वृद्ध, आणि मला आता परत त्याच्यापासून सुख मिळेल का?" आणि ती ... [भाऊ ब्रॅन्हम साराच्या मनातल्या मनातील हसण्याचे अनुकरण करतात.] आणि दूताने अब्राहामाला दाखविले तो कोण होता, की तो वचन होता! तो म्हणाला, "सारा का हसली?" तेव्हा त्याने तिला बोलाविले, आणि ती म्हणाली, "मी कधीही नाही."

तो म्हणाला, "परंतु तू हसलीसच!" काय? ती कृपा आहे. पहा, अगदी तेथेच देवाने तिला ठार केले असते, अगदी तेथेच, परंतु तो करु शकत नव्हता! पहा आपला मूर्खपणा? त्याने आपल्यातील प्रत्येकाला ठार केले असते, परंतु तो करु शकत नाही. साराला ठार करण्यासाठी, त्याला अब्राहामाला घ्यावे लागले असते कारण सारा ही अब्राहामाचा भाग होती. ते विवाहामध्ये एक होते! आणि मंडळीला घेऊन, तिला नाश करणे, ते तो करु शकत नाही, कारण ती त्याचा स्वतःचा भाग आहे! ख्रिस्त, स्वतःचा भाग, तो शब्द देही झाला. "अद्भुत कृपा, किती मधुर वाणी आहे." ते करु शकत नव्हता. तुम्हाला ते समजले? तो तिला ठार करु शकत नव्हता. तो तिचे जीवन घेऊ शकत नव्हता, कारण ती अब्राहामाचा भाग होती. पहा, ती त्याच्या मांसातील मांस आणि हाडातील हाड होती.

144 आपल्या चुकांमध्ये.... म्हणू नका, "बरे, मी अपयशी झालो." नाही, ते बनवीत नाही.... अब्राहाम देखील अपयशी झाला, पहा. परंतु तो मंडळीला घेऊ शकत नव्हता. तो निवडलेल्यांस ठार करु शकत नाही. तो तुमचे जीवन घेऊ शकत नाही, कारण तुम्ही त्याचा स्वतःचा भाग आहात. तुम्ही वचन आहात. ते वचन तुमच्यामध्ये आहे. ते स्वतः प्रकट झाले आहे, स्वतःला सिद्ध केले आहे - प्रीति, आनंद, शांती, सहनशीलता. देवाची सर्व वचने, तुम्ही त्यातील प्रत्येक एक विश्वास करिता - कार्य करते, देव तुम्हाद्वारे कार्य करतो. पहा, तुम्ही वचनाचा भाग आहात जो ख्रिस्त आहे. आणि आपल्याला शिकविले गेले की तो वचन आहे, आणि आपण त्याच्या मांसातील मांस आणि त्याच्या हाडातील हाड

आहोत. तेथे तुम्ही आहात. आता आपण कशाकडे तरी येत आहोत.

145 मौर्य, मौर्य - तो पाऊस, आगोटीचा पाऊस, दाव्याचा पाऊस, पुढे गेला आहे. आता, काय घडले होते? तो आगोटीचा पाऊस पेरला गेला होता. वळवाचा पाऊस पडला. काय घडले? - सदोम आणि त्याचे सदोमी भस्म झाले! अब्राहामाला अभिवचनाचा पुत्र प्राप्त झाला.

येशू म्हणाला, "त्या दोघांना एकत्र वाढू दे. निंदणाला एकत्र केले जाईल, बांधले जाईल, आणि भस्म केले जाईल. तो गहू कोठारात जाईल," पहा. तो वळवाचा पाऊस अगदी हाताशीच आहे. आपल्याला मिळणार आहे.... मला त्यावर खूप वेळ रेंगाळायचे नाही कारण माझ्याकडे खरोखर काहीतरी चांगले मागे येथे त्यावर आहे, मला ठाऊक आहे, पहा.

146 दोन संप्रदाय एक होतील. पेन्टिकॉस्टल आणि हे इतर एकत्र होतील, परंतु ते वचन अब्राहामाच्या अभिवचनाच्या बीजाबरोबर राहील जसे त्याने तेव्हा केले. येशू म्हणाला, "जसे ते तेव्हा होते...." तुमच्याकडे ऐकण्यासाठी कान आहेत का? पाहण्यासाठी डोळे? समजण्यासाठी समज? येशू म्हणाला, "जसे ते होते. असे लिहिलेले नाही," तो असे म्हणेल जर तो येथे या सकाळी उभा असता? तो हे म्हणणार नाही: "असे लिहिलेले नाही की जसे सदोमाच्या दिवसात होते, तसेच मनुष्याच्या पुत्राच्या आगमनासमयी होईल." तुम्ही पाहत नाही येथे दोन पिके वर येत आहेत? त्यांचा शेवटचा वर्षाव प्राप्त करीत आहे. ते त्या शेवटच्या वर्षावापर्यंत आलेले आहेत, पहा. मग काय घडले? ते दूत आणि परमेश्वर अदृश्य झाले. मग पाऊस पडला.

147 ठीक आहे, आता अगदी बारकाईने पहा. आता, मी विश्वास करतो मी या विषयावर येथे होतो; होय, पावसावर, वळवाच्या पावसाकरिता. सर्व चिन्हे आता अंताला दर्शवित आहेत. सर्वजण जे देवाच्या वचनावर विश्वास करतात त्यांना ठाऊक आहे. अगदी....

मला येथे दुसऱ्या एकावर सरळ थांबू द्या. मला नावे घ्यावी लागणार आहेत. मला उद्धट असावयाचे नाही परंतु माझ्याकडे आहे ... मी देवाला सांगितले मी काहीही राखून ठेवणार नाही. मी सरळ येथे येईन आणि सरळ तंतोतंत जे काही माझ्या जीवनभर मला ठाऊक होते ते स्पष्ट करीन, आणि मग तेथे काही गोष्टी आहेत शेवटी जे मला धरुन ठेवावे लागणार आहे, मला माहित आहे, परंतु मी तेथपर्यंत तुम्हाला व्यक्त करणार आहे जेवढे तो मला करु देईल. मिसेस वुडला ते ठाऊक आहे की मी हे घेतल्यानंतर, या व्यतिरिक्त कित्येक पाने, पवित्र आत्मा म्हणाला, "ते करु नको." मी तुला बोलाविले का, मिसेस वुड, आणि म्हणालो त्याने मला सांगितले ते करु नको? तेव्हा मी मागे गेलो आणि प्रार्थना केली आणि त्या रात्री तो माझ्याकडे दृष्टांतात आला आणि म्हणाला, "जा हे कर. हे घे आणि तेथे ठेव कारण त्यांना ते समजणार नाही. आता अजूनही यासाठी तो समय नाही, येथे हे ठेव," आणि मी केले. ते बरोबर आहे. "यज्ञापेक्षा आज्ञापालन चांगले आहे," पहा.

ठीक आहे - आज्ञापालन करणे.

148 आता, आता पहा, तुम्हाला दाखवितो आपण अंत समयावर आहोत, अगदी शहाण्या कुमारींचा आणि मूर्ख कुमारींचा दाखला आपल्याबरोबर आहे. आता पहा, मूर्ख आवृत्ती - कुमारी, (मला क्षमा करा), मूर्ख कुमारी संकरित होण्यास जात आहे. पहा, तिच्याकडे तेलाशिवाय बीज होते, तो ओलावा त्याला वाढविण्यासाठी. आता, आणि ती काय करीत आहे? दोन गट, पेन्टिकॉस्टल गट आणि जगातील संप्रदाय, तो सुवार्तिक गट एकत्र उदयोन्मुख होत आहेत, पहा. कशासाठी? - सदोमामध्ये (आता लक्ष द्या) या पिकाच्या कापणीसाठी जात आहे.

149 लक्ष द्या, त्या मूर्ख कुमारी. तुम्ही त्याकडे लक्ष दिले का ... अगदी माझ्या मोठ्या मित्रांपैकी एक, एक खरा पंडित, एक मनुष्य जो चलाख, बौद्धिक, हुशार पेन्टिकॉस्टल माणूस आहे. आणि मी पाहिले माझे भाऊ ख्रिस्ती व्यवसायिकांतील, ते देवाच्या स्तुतीची आरोळी मारीत आहेत कारण तेथे त्यांच्याकडे एपिस्कोपॅलियन प्रचारक, कॅथोलिक याजक आहेत. मी विचार करतो जर ती माणसे गाढ झोपलेली आहेत. तुम्हाला जाणीव होते.... ते म्हणतात, "ओह, ती एक सर्वात महान गोष्ट आहे जी तुम्ही कधी ऐकली असेल, भाऊ ब्रॅन्हम. का हे एपिस्कोपॅलियन लोक, येथे आले आणि ते म्हणतात त्यांच्याकडे पवित्र आत्मा आहे. ते अन्य भाषेत बोलतात; त्यांनी ह्या गोष्टी केल्या आहेत. देवाचा गौरव असो! मी तुम्हाला सांगतो, ते फक्त ... का, त्यांच्या मंडळीत क्रांतिकारक बदल झाला आहे." ओह माझ्या, भावांनो, तुम्हाला ठाऊक नाही ते काय आहे? ते एक चिन्ह आहे.

150 जेव्हा त्या शहाण्या कुमारींना तेल हवे होते ... किंवा त्या मूर्ख कुमारींना, खरंतर, तेल हवे होते, आणि ती ते खरीदी करीत असताना, तोच तो समय होता जेव्हा वर आला! ओह, तुम्ही पेन्टिकॉस्टल, काय बाब आहे? बरे, देवाने तुम्हाला दाखविल्याशिवाय तुम्ही ते पाहू शकत नाही; ही एक गोष्ट निश्चित आहे. जर तुम्ही मागे तेथे पलीकडे जन्मलेले नाहीत, यासाठी पूर्वनिर्धारित नाहीत, तुम्ही त्यासाठी चुकणार आहात. धन्य ते कान जे ऐकू शकतात; धन्य ते हृदय जे समजू शकतात, कारण वेळ हाताशी आहे. प्रत्येक चिन्ह त्याला सूचित करीत आहे, पहा.

151 पहा त्यांच्याकडे कोणत्या प्रकारचे संजीवन आहे. महान संजीवने, होती. चांगली दिसतात, ती नाही का? तुम्ही म्हणता, "बरे, भाऊ ब्रॅन्हम, आता तुम्ही आम्हाला एका डहाळीवर आणले आहे." तेथेच जेथे तुम्ही मला हवे होतात. कसे तुम्हाला कळणार आहे काय बरोबर आणि चूक आहे? त्याला वचनाची चाचणी द्या. तोच तो मार्ग आहे ज्याद्वारे सांगू शकता की ते बरोबर वा चुकीचे आहे. बस एवढेच; अगदी त्याला वचनाची चाचणी द्या. पहा ते वचनाबद्दल काय म्हणते. कोणताही आत्मा, पहा तो वचनाबद्दल काय म्हणतो. जर तो वचन नाकारतो, तो देवाचा नाही, पहा. काही फरक पडत नाही ते काय आहे, जर तो वचन नाकारतो तो देवाचा नाही. पहा, त्याला वचनाची चाचणी द्या आणि बघा काय घडते. येशूने आपल्याला या गोष्टींची चेतावणी दिली - मत्तय २४ अध्याय आणि ३५ वे पद. मला अगदी त्याचा संदर्भ द्यायचा आहे कारण ... ध्वनिमुद्रणपट्ट्यांखातर.

152 अगदी एक क्षणभर. आता, आपल्याला विसर्जित करण्यापर्यंत आपल्याकडे फक्त सुमारे वीस मिनिटांपेक्षा जास्त नाहीत, आणि मी निश्चित

आहे आपल्याला अगदी एक त्रितीयांश देखील मिळणार नाही, परंतु कसेहीकरुन मला हे वाचावे लागेल, पहा. मत्तय २४:३५.

आता अगदी लक्षपूर्वक ऐका येशू काय म्हणाला. आता, कसे त्याने आपल्याला सांगितले की ते दोन आत्मे इतके निकट असतील, ते प्रत्यक्ष निवडलेल्यांस देखील फसवितील. तुम्हाला ते ठाऊक आहे, तुम्हाला नाही का? आता, ते सत्य असणार आहे का? होय, महाशय. मत्तय २४:३५ म्हणते:

पृथ्वी आणि आकाश नाहीसे होईल, परंतु माझी वचने नाहीशी होणार नाहीत.

आता ते दोन आत्मे इतके निकट आहेत.... आता ते तशाप्रकारे असणे आहे. ते तशाप्रकारे असणे आहे. त्या पेन्टिकॉस्टल संप्रदायाला इतके खऱ्या सारखे वास्तविक वर्तन करणे आहे की शेवटी येशू म्हणाला की केवळ निवडलेले फसविले जाणार नाहीत. ते जवळ जवळ मला ठार करते. परंतु माझ्या सांप्रदायिक भावांनो, तुम्ही पाहू शकत नाही का का मी ते केले जे मी केले? इतके निकट की ते साधेल तर निवडलेल्यांस देखील फसवितील. परंतु ते निवडलेले जे अनंत जीवनासाठी निवडलेले आहेत.... आता तुम्ही याला प्रहार करण्याबद्दल बोलता, थोड्या वेळाने आपण याला प्रहार करणार आहोत, खरोखर फटका मारणार आहोत, पहा. पहा, लक्षात ठेवा ते निवडलेले आहेत जे केवळ आहेत जे त्याला पकडतील.

153 "बरे," तुम्ही म्हणता, "तुम्हाला कसे ठाऊक की तुम्ही बरोबर नाहीत?" मग वचनाद्वारे माझी चाचणी करा. या, तुमच्या संप्रदायाची वचनाद्वारे चाचणी करा. पाहूया कोण बरोबर आहे. "सर्व गोष्टींची पारख करा," पवित्र शास्त्र म्हणते. तुम्ही म्हणता, "त्याने काही फरक पडत नाही; या प्रकारे व त्या प्रकारे बाप्तिस्मा घेणे...." त्याने फरक पडतोच! तेच काय ते सैतानाने हव्वेला सांगितले.

प्रेषित कृत्य १९ मध्ये कोणीतरी अगोदरच बाप्तिस्मा घेतला होता. एका चांगल्या ख्रिस्ती माणसानेच त्यांना देखील, बाप्तिस्मा दिला होता, योहान बाप्तिस्मा करणारा. पौल म्हणाला, "तुम्ही विश्वास केल्यानंतर तुम्हाला पवित्र आत्मा प्राप्त झाला काय?"

तो म्हणाला, "आम्हाला माहित देखील नाही तेथे कोणता पवित्र आत्मा आहे."

म्हणाला, "मग तुमचा बाप्तिस्मा कसा झाला? जर तुम्ही ते पकडले असते तुम्हाला ते कळले असते," पहा. म्हणाला, "तुम्ही कसे काय ... तुमचा कसा काय बाप्तिस्मा झाला?"

तो म्हणाला, "योहानामध्ये - तो महान मनुष्य ज्याने येशूचा बाप्तिस्मा केला."

पौल म्हणाला, "ते आता कार्य करणार नाही." कारण योहानाने, केवळ पश्चातापाचा बाप्तिस्मा दिला, पापांच्या क्षमेसाठी नाही; बलिदान अर्पण केले गेले नव्हते. आणि जेव्हा त्यांनी हे ऐकले, त्यांचा येशू ख्रिस्ताच्या नावात पुन्हा बाप्तिस्मा झाला.

154 काय जर मोशे म्हणाला ... देव म्हणाला, "मोशे, तुझ्या पायातील जोडे काढ"?

तो म्हणाला, "तुला माहित आहे या सकाळी मी ते थोडेसे घट्ट बांधले आहेत, परमेश्वरा. मी जास्त आदर दाखवीन; मी माझी टोपी काढीन." त्याने कार्य झाले नसते. तो कधीही टोपी म्हणाला नाही; तो म्हणाला जोडे! आणि तो सैतान आहे जो त्याला सारवासारव करु इच्छितो जसे त्याने माता हव्वेबरोबर केले. तो प्रत्येक शब्द सत्य आहे अगदी ज्याप्रकारे देवाने तेथे तो लिहिला आहे. त्याच प्रकारे मी तो विश्वास करतो.

आता, तुम्ही पुढे जाऊ शकता जर तुम्ही म्हणता, "बरे, आमच्याकडे सत्य आहे." बरे मग तुम्ही पुढे जा. ते ठीक आहे. जर तुम्ही इतके आंधळे आहेत, तुम्ही अंधकारात चाचपडत सरळ पुढे जा. हे वचन आहे जे तुमचा न्याय करणार आहे, भावा, तुमचा पंथ नाही. ओह, तो चांगला दिसतो. होय, महाशय, चांगला दिसतो.

155 आणि तुम्ही म्हणता, "बरे, भाऊ ब्रॅन्हम, एक मिनिट थांबा. देव धन्य असो, मी त्यांना बाहेर जाऊन, आजाऱ्यांना बरे करताना पाहिले आहे." ओह निश्चित; तसेच मी देखील पाहिले आहे. "ओह, मी त्यांना अन्य भाषेत बोलताना पाहिले आहे." होय, महाशय. तसेच मी देखील पाहिले आहे. आणि मी कधीही विश्वास केला नाही, आणि तेथे कोणीही ते देवाच्या वचनाद्वारे सिद्ध करु शकत नाही, की अन्यभाषा हा पवित्र आत्म्याचा प्रार्थमिक पुरावा आहे. मला मनुष्य हवा आहे जो येऊन ते एक करील. मी त्याचे नेहमी आवाहन दिले आहे. मी अन्यभाषेत बोलण्यावर विश्वास करतो. होय, महाशय; परंतु मी सैतानांना अन्य भाषेत बोलताना पाहिले आहे, चेटकिणी आणि जादूगार अन्यभाषेत बोलतात आणि त्याचा अनुवाद करतात, आणि तेथे येशू ख्रिस्त अशी कोणती गोष्ट आहे याला नाकारतात. मी मनुष्यांना अन्यभाषेत बोलून, दुसऱ्या माणसाच्या पत्नीबरोबर राहताना पाहिले आहे. उभे राहून, दृष्टांतात मी सरळ त्याच्या तोंडावर पाहिले आहे - त्याला एका बाजूला बाहेर बोलावले आणि त्याला त्यासाठी एक साक्षीदार केले. आणि तुम्ही त्याला पवित्र आत्मा म्हणता?

156 "ओह, होय." तुम्ही म्हणता, "बरे, भाऊ ब्रॅन्हम, तुम्ही विश्वास करीत नाही पवित्र आत्मा अन्यभाषेत बोलतो?" होय, महाशय, परंतु त्याला वचनाची चाचणी द्या! पहा, यान्नेस व यांब्रेसने चमत्कार केले. ते बरोबर आहे, त्याने केले नाही का? होय, महाशय - यान्नेस व यांब्रेस. जेव्हा मोशे खाली मिसरात गेला, सर्वकाही जे मोशेने केले एका चिन्हाच्या मार्गाने, यान्नेस व यांब्रेस, ते दोन जादूगार, तीच गोष्ट उत्पन्न करु शकत होते - दोन सैतान. मोशे म्हणे, "माश्या!"

ते म्हणाले, "माश्या!"

मोशे म्हणाला, "जमिनीवर काठी!"

ते म्हणाले, "जमिनीवर काठी!"

"सर्प!"

"सर्प!"

ते बरोबर आहे! ते चमत्कार करु शकत होते. पवित्र शास्त्र म्हणते की शेवटच्या दिवसांत तो सैतान उठेल आणि चमत्कार करील आणि लोकांना फसविल. भयंकर कठीण आहे, भावा, परंतु तुम्हाला सत्य माहित असायलाच हवे.

157 येशू म्हणाला, "त्या दिवसात कित्येक माझ्याकडे येतील आणि म्हणतील, 'प्रभू, प्रभू, मी असे केले नाही आणि तसे केले नाही आणि तसे केले नाही, आणि इत्यादी, तुझ्या नावात?'"

तो म्हणेल, "दुष्कर्म करणाऱ्यांनो, माझ्यापासून निघून जा." दुष्कर्म काय आहे? - काहीतरी जे तुम्हाला ठाऊक आहे जे चुकीचे आहे, आणि तरीदेखील तुम्ही ते करता; आणि तुम्हाला ठाऊक आहे देवाचे वचन हे बरोबर आहे! का तुम्ही ढोंग्यांचे वर्तन करता? - तुमच्या संस्थेमुळे आणि येथे थोडेसे उचलता आणि बाकीचे उरलेले ते घेत नाही. "तुम्ही दुष्कर्म करणाऱ्यांनो," तो म्हणाला, "माझ्यापासून निघून जा; मला तुमची अगदी कधी ओळख ही नव्हती." आता, ते ... तुम्ही एकतर येथे नरकातून जा किंवा यापुढे तेव्हा....

158 आता, लक्षात ठेवा, ते खरे आहे; तेच काय ते येशू म्हणाला, यान्नेस व यांब्रेसने मोशेला अडविले; लक्षात ठेवा आणि पवित्र शास्त्र म्हणते, "जसे त्यांनी मोशेला अडविले, शेवटल्या दिवसांत ते परत [ते आत्मे] दृश्यात येतील." काय? - अगदी लोकांच्या मुक्तीच्या अगोदर. हालेलूया! मुक्तीचा समय येथे आहे! मत्तय २४ मध्ये येशू म्हणाला तेथे की साधेल तर निवडलेल्यांस देखील फसवितील. अगदी ते निवडलेले, ते अगदी एक येथे आणि एक तेथे असे पकडतील. प्रत्यक्ष निवडलेले साधेल तर. "जसे यान्नेस व यांब्रेस ह्यांनी मोशेला अडविले, तसे हे लोक विश्वासासंबंधाने भ्रष्टबुद्धी बनलेले असतील" - सत्यासंबंधाने, आणि वचन ते सत्य आहे. ते बरोबर आहे का? आता, हे मलईरहित दूध नाही, मित्रांनो.

159 पहा, पवित्र शास्त्र म्हणते, येशू म्हणाला की ते इतके निकट असतील की ते प्रत्यक्ष निवडलेल्यांस फसवितील, जर साधेल तर; परंतु ते साधणार नाही. ते बीज तेथे पडणार आहे कारण ते तेथे पडण्यासाठी पूर्वनिर्धारित होते. बीजे पुढे गेली आहेत. संप्रदाय पेरले गेले आहेत; वचन पेरले गेले आहे, पहा. आणि यान्नेस व यांब्रेस, ते लोक.... पवित्र शास्त्र म्हणते हे सैतान शेवटच्या दिवसांत उठतील आणि या चमत्कारांनी आणि चिन्हांनी जी ते सादर करु शकतात, त्याद्वारे लोकांना फसवितील. तुम्हाला कसा काय फरक कळणार आहे? - ते वचन!

160 अगदी जुना करार म्हणतो, "जर ते नियमानुसार आणि संदेष्ट्यांनुसार बोलत नाही, त्यांच्यामध्ये जीवन नाही" - जर ते एक गोष्ट नाकारतात. मग मला दाखवा एक व्यक्ती ज्याचा कधी पिता, पुत्र, आणि पवित्र आत्माच्या नावात, ही शीर्षके वापरुन बाप्तिस्मा झाला आहे. मग का तुम्ही ते करता? - एक पंथ, संकरित, मृत मुले, अनौरस मुले, दोनदा मेलेले, समूळ उपटलेले. "आणि प्रत्येक मूळ जे माझ्या ... प्रत्येक झाड जे माझ्या स्वर्गीय पित्याने लावले नाही ते उपटले जाईल." "दोन्ही पृथ्वी आणि आकाश नाहीसे होईल, परंतु माझे वचन नाहीसे होणार नाही" येशू म्हणाला. आता तुम्ही पहा मी का उभा राहिलो जसा मी उभा राहिलो.

161 मला एक जागा दाखवा, जर स्त्रीला तिचे केस कापणे हा श्राप नाही काय. तेथे तुम्ही आहात. मग तुम्ही माझ्याशी भांडता. मग लोक म्हणतात, "भाऊ ब्रॅन्हम हा एक संदेष्टा आहे. ओह जोपर्यंत तो लोकांशी बोलतो, त्यांची पापे आणि अशाप्रकारे गोष्टी सांगतो त्याचा विश्वास करा, परंतु जेव्हा तो शिकविण्यास जातो, तुम्ही त्याचा विश्वास करु नका." बरे, तुम्ही गरीब बिचारे ढोंगी. तुम्हाला काही माहित नाही! पवित्र शास्त्र म्हणत नाही का परमेश्वराचे वचन संदेष्ट्यांकडे येते? मी स्वतःला संदेष्टा म्हणवीत नाही, मी संदेष्टा नाही. परंतु तुम्ही तसे म्हणता; तुम्ही जे म्हणालात मी ते म्हणतो. आणि मग सभोवती वळता आणि एक अशी गोष्ट म्हणता. सांगू नका तुम्ही तसे केले नाही. माझ्याकडे अगदी त्याचे ध्वनिमुद्रण केलेले आहे तुम्ही ते कोठे बोललात. तुम्हाला ते ठाऊक नव्हते, तुम्हाला ठाऊक होते का? फक्त एकदा तुम्ही सांगा तुम्ही ते बोलला नाहीत; तेवढेच सर्व मला हवे की तुम्ही म्हणावे. मी तुमचा स्वतःचा आवाज तुम्हाला परत ऐकविन.

162 जसे यान्नेस व यांब्रेसने मोशेला अडविले - चमत्कार करणारे, परंतु वचन कुठे होते, सत्य वचन? तेथे माणसे चमत्कार करीत होती. तेथे चमत्काराच्या रांगेत माणसे सर्वकाही करु शकत होती जे ... परंतु तेथे दोन अभिषिक्त संदेष्टे उभे होते, किंवा एक संदेष्टा आणि त्याचा सहाय्यक. तेथे मोशे म्हटलेला अभिषिक्त संदेष्टा, तेथे उभा होता ज्याकडे, "परमेश्वर असे म्हणतो" होते. आणि शेवटी, सुटकेच्या अगोदर - ते सर्व प्रकट झाले. ते बरोबर आहे? ते तथाकथित चमत्कार करणारे सरळ तेथे मरण पावले.

163 आता, ते काय करण्याचा प्रयत्न करत आहेत, ते वळवाचा पाऊस उत्पन्न करण्याचा प्रयत्न करत आहेत. मूर्खपणा! का, तो वळवाचा पाऊस जगाला वाहून नेईल, भावा. तेथे बीज पेरण्याचा आगोटीचा पाऊस होता. ते बरोबर आहे. आता तुम्ही पाहाल वळवाचा पाऊस काय उत्पन्न करतो. तुम्ही शोधून काढाल तेथे संलग्नीकरण असेल. ते पेन्टिकॉस्टल आणि सर्व गट एकत्र येतील, आणि ते त्यांच्यासाठी दरवाजा बंद करतील जे त्यांचे ऐकणार नाही, आणि तुम्हाला अगदी तुमचे तोंड उघडण्याची परवानगी दिली जाणार नाही. बरोबर! तेव्हाच जेव्हा तो येईल. तेव्हाच जेव्हा तो दाखवेल. तेव्हाच जेव्हा तुम्ही पाऊस पाहाल. ओह, माझ्या, स्तब्ध राहा; शांत बसा; त्याला जाऊ द्या.

164 ओह, परंतु त्या अभिषिक्त संदेष्ट्याबरोबर वचन होते कारण परमेश्वराचे वचन संदेष्ट्याकडे आले. आता, देव त्याची प्रणाली बदलत नाही. नाही, नाही. त्याने कधीही त्याची प्रणाली बदलली नाही. आता, ते काय होते? तेथे परत तीघे होते. तेथे यान्नेस व यांब्रेस चमत्कार सादर करीत होते, जसे तेथे सदोमात खाली गेले, एक लहानसा चमत्कार केला - लोकांना आंधळे केले, पहा. तेथे अब्राहाम उभा होता, अभिषिक्त एक

असा, देवाबरोबर आणि त्याची सहाय्यक, साराबरोबर. ते बरोबर आहे? येथे यान्नेस व यांब्रेस चमत्कार सादर करीत उभे होते - काहीही जे मोशे करु शकत होता चमत्काराच्या चिन्हामध्ये, चिन्हे - आणि तेथे अभिषिक्त वचन, तो संदेष्टा, त्याच्या सहाय्यकाबरोबर - त्याच्या मदतनीसाबरोबर उभा होता. ओह, मी इच्छा करतो आता मी त्याच्यावर प्रचार करु शकलो असतो, अगदी सुमारे एका चांगल्या दोन तासांसाठी.

165 ठीक आहे. उत्पत्ती पहिल्या मध्ये, लक्षात आहे, प्रत्येक बीज आपापल्या परी सबीज आणेल. ते सर्वकाळासाठी त्या प्रकारे होते. तेथे ती सर्व प्रतीके आहेत. एक मनुष्य जो म्हणेल, विश्वास करील, की ती मंडळी महासंकटाच्या काळातून जाईल, मी विचार करतो तुला कोठून कधी त्यासाठी ते बीज मिळाले? जेव्हा अगदी ... "बरे," तुम्ही म्हणता, "मी विश्वास करतो ते म्हणते असे की ते करतील...." ते बरोबर आहे. तुम्ही लक्षात घेतले मागे पलीकडील कुठे दुसऱ्या समयी पाऊस पडला? कुठे तो पडला? न्यायाचा प्रहार होण्यापूर्वी नोहा तारवात होता. सदोम - ते कधी घडण्यापूर्वी लोट सदोमाच्या बाहेर होता. निश्चित, आपण महासंकटाच्या काळातून जाणार नाही; यातील एक दिवस तुम्ही रुपांतरात जात आहात. निश्चितच. का आपण ... का तुमचा न्याय करण्यात येईल? तो माझ्या महासंकटासाठी उभा राहिला - येशू ख्रिस्त. तेथेच जेथे माझे महासंकट घडले अगदी तेथे, होय. मी त्याला स्वीकारले, आणि मुक्त - "जेव्हा मी रक्त पाहीन मी तुला ओलांडून जाईन." ते बरोबर आहे. मोशे इस्राएलांबरोबर सुखरुप सुरक्षित होता जेव्हा महासंकटाचा वर्षाव झाला. ते बरोबर आहे.

166 ठीक आहे प्रत्येक बीजाला त्याच्या परी बीजाप्रमाणे येणे आहे. देवाने त्याच्या स्वरुपात त्याच्याप्रमाणे त्याचा शब्द असण्यासाठी पृथ्वीवर मनुष्याला बनविले. त्याने ते येशू ख्रिस्तामध्ये व्यक्त केले. काय होते? - देव ख्रिस्तामध्ये होता. तो एक मनुष्य त्याच्याप्रमाणे होता, पहा. जेव्हा देव, जो शब्द आहे.... कितीजणांना ठाऊक आहे तो शब्द आहे? जेव्हा तो शब्द ख्रिस्तामध्ये, एका मनुष्यात, मानवपुरुषात होता, स्वतःला त्याच्यामधून व्यक्त करीत होता; तो देव होता, ते वचन, ख्रिस्तामध्ये स्वतःला व्यक्त करीत होते; आणि प्रारंभी देवाने त्याच्या सदृश्य मनुष्य बनविला, आणि त्याच प्रकारचा मनुष्य जो देव आज बनवितो. रोमन कॅथोलिक विद्यालय आणि उबवण यंत्रे संकरणाच्या जमावाला काढीत आहेत. पहा, त्या शाळा. परंतु जेव्हा देव एका मनुष्याला पाचारण करतो, तो त्याच्या सदृश्य असतो - ते वचन त्याच्यामध्ये जीवनात होते. ते बरोबर आहे. तेथे तो आहे; तो देवाचा माणूस आहे. मनुष्य त्याच्या स्वतःच्या प्रतिमेत, त्याच्या प्रत्यक्ष सदृश्यात. आणि येशू म्हणाला, की तो ती कार्ये करील जी मी करतो. तेव्हा देवाने मनुष्याला त्याच्यासारखे त्याच्या सदृश्यतेत बनविले.

167 त्याच्या प्रतिरुपाचा - त्याचे प्रतिरुप काय आहे? - तो शब्द. तो तो शब्द आहे. मग जर एक मनुष्य देवाचे वचन नाकारतो, तो कसा काय देवाच्या प्रतिमेत असू शकतो? फक्त प्रश्न विचारा. स्वतःला विचारा. कसा काय तो देवाच्या प्रतिमेत असून, देवाचे वचन नाकारु शकतो, जेव्हा वचन त्याची स्वतःची प्रतिमा आहे? "ओह," तो म्हणतो, "त्याचा अर्थ तो नाही." देवाचे प्रतिरुप, म्हणतो, "ओह, मी ते म्हणालो, परंतु मला खरोखर तसे म्हणायचे नव्हते. मी तेथे चुकीचा होतो. मी माघार घेतो. ते कोणत्यातरी इतर समयासाठी होते. मला तसे म्हणायचे नव्हते." ओह, दया, हा तो कचरा, सैतानाची दलदल जी त्याने हव्वेला खाऊ घातली. निवडलेल्या गळ्याखाली तरी त्याला ते ढोसण्याचा प्रयत्न करु देऊ नका. नाही, महाशय. ते त्याचा विश्वास करणार नाहीत. "फक्त या आमच्या टोळीबरोबर सामील व्हा." कशातही सामील होऊ नका, तुम्हाला जन्म घेणे आहे; सामील होणे नाही! एक नवी उत्पत्ती.

168 होय, त्याच्या स्वतःच्या प्रतिमेत त्याच्या प्रतिरुपात पृथ्वीवर त्याचे वचन व्यक्त होण्यासाठी. आता येशू हा देवाचा व्यक्त झालेला शब्द होता. तुम्ही ते विश्वास करता? मग आपण काय असायला हवे? - देवाचे पुत्रच, मंडळीमध्ये व्यक्त झालेल्या शब्दाबरोबर, पुढे नेत (तो ख्रिस्ताचा गूढ देह आहे), तीच कृत्ये जी येशूने केली ती पुढे नेत आहोत जेव्हा तो येथे पृथ्वीवर होता, पहा. तेच प्रतिरुप त्याच्या प्रतिरुपात.

आता तुम्ही लूथरनचे प्रतिरुप लुथरनांप्रमाणे घेऊ शकता; मेथडिस्टांचे प्रतिरुप मेथडिस्टप्रमाणे; कॅथोलिक प्रतिरुप कॅथोलिकांप्रमाणे; ते पेन्टिकॉस्टल प्रतिरुप त्याच्या प्रमाणे; एकत्वावाद त्याच्याप्रमाणे; त्रैक्यता त्याच्याप्रमाणे, परंतु जर तुम्ही देवाच्या प्रतिरुपात आहात, ते भिन्न आहे. पहा, तुम्ही वचनाची व्यक्त केलेली प्रतिमा आहात जी स्वतःला प्रकट करते. ओह, माझ्या! का, तिला करणेच आहे. जर त्यावर पाण्याचा वर्षाव होतो, त्याला ते करणेच आहे.

169 मग त्याला जन्म दिला, एक प्रतीक आणि नंतर.... देवाने मनुष्याला त्याच्या स्वतःच्या प्रतिमेत घडवले. मी अगदी विचार करीत नाही माझ्याकडे या पुढच्या अभिव्यक्तीसाठी वेळ आहे; ते ऐटबाज आहे, परंतु मला करायचे नाही.... देवाचे सर्व शब्द ऐटबाज आहेत, पहा. आणि येथे पहा, जेथे मी जेवणाच्या समयावर असावयास हवे होते, मी अगदी जवळ जवळ त्यापासून तेवढाच दूर आहे, पहा. त्याचा सुमारे एक षष्ठांश. ठीक आहे, मी शकतो.... अगदी तेथेच हे सोडूया. तुम्ही काय म्हणता? मग आपण.... किती जण या दुपारी परत येऊ शकतात? तुमचे हात उंच करा. चांगले. मला तुम्हाला खूप वेळ ठेवायचे नाही. आता मी फक्त ... मला तुम्हाला थकवायचे नाही. आता, तुम्ही ध्वनिमुद्रणपट्टी मुलांनो, फक्त एक मिनिट ध्वनिमुद्रण सुरु ठेवा, आणि मी अगदी एका मिनिटात स्वतः हे बंद करीन. ठीक आहे, महाशय.

170 आता, आपला शेवटचा विचार येथे हा होता की देवाने मानवाला त्याच्या प्रतिरुपात त्याच्या स्वतःच्या प्रतिमेत बनविले. देवाने मानवाला त्याच्या प्रतिरुपात घडले. तुम्हाला ते समजले? एक मानव त्याच्या प्रतिरुपात. बरे, तो कोणत्या प्रकारचा मनुष्य होता? जर तुम्ही मागे पाहिले आणि तो काय होता ते पाहिले जेव्हा तो देह बनला, त्याच प्रकारचा मनुष्य तो बनवितो. ते बरोबर आहे का? एक मनुष्य त्याच्या प्रतिरुपाचा. आमेन. ते बरोबर आहे, ते नाही का? तो त्याच्या प्रतिरुपाचा मनुष्य आहे.

तो दुसऱ्या वेळेस बोलला, एक वेळेस एका मनुष्याला: "तू माझ्या मनासारखा आहे." एक मनुष्य जो त्याच्या स्वतःच्या हृदयासारखा होता - दाविद. ते लक्षात आहे? दाविदामध्ये देवाचा आत्मा होता. दाविद, एक नाकारलेला राजा. तो अभिषिक्त नेहमी नाकारला जातो. दाविद, तो नाकारलेला राजा, टेकडीवर गेला जेव्हा त्याच्या स्वतःच्या लोकांनी ... मी हे पुढच्या तीन मिनिटांसाठी प्रचार करीन. जेव्हा दाविदाच्या स्वतःच्या लोकांनी असायला हवे होते, त्याच्या स्वतःच्या नातलगांनी त्याला राज्य भ्रष्ट केले, त्याच्या स्वतःचा पुत्र, आणि त्याला सिंहासनापासून हद्दपार केले.

दावीद तेथे खाली गेला, आणि त्यांच्यातील एक अगदी तेथे त्याच्यावर थुंकत बाहेर आला - त्या अभिषिक्त राजावर. तो लहानसा म्हातारा मनुष्य तेथे आला, त्याच्या पंगू असलेल्या शिकवणीसह (पवित्र शास्त्र म्हणते तो अपंग होता, तुम्हाला ठाऊक आहे), आणि तो त्या राजावर थुंकत गेला. ख्रिस्ताला पहा. त्यावर थुंकत आहे! त्याच्याबरोबर असलेल्या त्या दूताने, एक दूत त्याला दर्शवितो, तलवार खेचली म्हणाला, "या कुत्र्याचे डोके राहावे ... राजावर थुंकत आहे?" तो दूत म्हणाला, "मी त्याला मृत्यूचा प्रहार करतो!"

171 दावीद म्हणाला, "तुझी तलवार म्यानात घाल. मला हे करणेच आहे." यरुशलेमेच्या टेकडीच्या माथ्यावर गेला, खाली मागे पाहिले (एक नाकारलेला राजा) आणि तो रडला. त्यानंतर आठशे वर्षांनी तेथे दाविदाचा पुत्र, तो आत्मा जो दाविदामध्ये होता एका भागात, त्याच टेकडीवर उभा राहिला, एक नाकारलेला राजा, थुंकला गेलेला आणि थट्टा केली गेलेला. ते बरोबर आहे? मी कल्पना करु शकतो देव म्हणाला, तो दूत त्याच्याबरोबर तेथे चालत होता जेव्हा तो वर कलवरीवर अशाप्रकारे गेला: "त्या कुत्र्याचे डोके त्यावर राहावे काय?"

"त्याला एकटे सोडा." ओह, माझ्या, तेथे एक वेळ येत आहे.

परंतु दाविदाबद्दल काय जेव्हा तो परत आला? गोष्ट बदलली. दाविद विजयात स्वार होऊन आला. हा मनुष्य दयेसाठी ओरडत आला. निश्चित, त्याला एकटे सोडा. तो कधीतरी सामर्थ्यात येईल. मग ते हास्य दुसऱ्या मार्गाला वळेल. ते बरोबर आहे, फक्त त्यांना एकटे सोडा.

172 परंतु देव म्हणाला, "दाविदा, तू माझ्या हृदयासारखा मनुष्य आहेस." जेव्हा देव एक मनुष्य निर्मीतो, तो त्याच्या प्रतिरुपाचा असतो. दावीद म्हणाला, "मी तुझे वचन माझ्या हृदयात ठेवले आहे की परमेश्वरा तुझ्या विरुद्ध मी पाप करु नये." केवळ त्याला ज्या गोष्टीची गरज होती तो पाऊस होता. दावीद ठीक असता जर त्याला केवळ पाऊस मिळाला असता, परंतु अजूनही पवित्र आत्मा दिला गेला नव्हता. त्याच्याकडे वचन होते आणि वचन त्याच्यामध्ये होते, आणि त्याला ते कळू शकत होते; तो म्हणाला, "ते मी माझ्या हृदयात लपवून ठेवले आहे, परमेश्वरा. ते बहरणार नाही आणि ते तसे वर्तन करणार नाही जसे करावयास हवे परंतु मी ते तेथे लपविले आहे परमेश्वरा. मी ते तेथे लपविले आहे." परंतु जेव्हा येशू आला, जो प्रकट झालेले वचन होता, त्यातून जीवनाचा अंकुर घेतला आणि वचनाकडे परत आणला, आता. आणि जर दाविदाचा पेला भरुन वाहिला, आपला काय व्हावयास हवा? बरोबर. आत्म्यावाचून. आमेन. तो अद्भुत नाही का? तुम्ही त्याला प्रेम करता?

तो अद्भुत नाही का, अद्भुत, अद्भुत?
येशू माझा परमेश्वर अद्भुत नाही का?
डोळ्याने पाहिले आहे, कानांनी ऐकले आहे,
जे देवाच्या वचनात नमूद केले आहे;
येशू माझा परमेश्वर अद्भुत नाही का?

तो नाही का? कितीजण त्याला प्रेम करतात? कितीजण त्याला प्रेम करतात? ओह, अद्भुत.

173 आता, ते कठोर आहे, मित्रांनो. ते फार कठोर आहे. मला स्वतःला, तसे असायचे नाही. मी आशा करतो तुम्ही ते समजता, पहा. परंतु आज मी ज्या काही गोष्टी केल्या ज्या मी केल्या होत्या त्या का केल्या याची अभिव्यक्ती देत आहे.

आता, आपण भोजनाला जाण्यासाठी विसर्जित करण्यापूर्वी अगदी लहानसे विश्लेषण देत आहे ते हे: मला हवे आहे की तुम्हाला कळावे की मी ... हे माझे ध्येय, आणि माझा उद्धेश आहे, ते म्हणजे देवाचे वचन. माझा हेतू हा त्याला संतुष्ट करणे आहे. आणि मी सर्वांचे ऐकून, देवाचे वचन विश्वास करु शकत नाही; तसेच मी सर्वकाही ऐकून, देवाला संतुष्ट करु शकत नाही. माझा उद्देश हा त्याचे वचन समजणे आणि त्याच्या वचनाद्वारे त्याची सेवा करुन देवाला संतुष्ट करणे आहे. असे नाही की मला कोणाविरुद्ध काही आहे.... आता येथील प्रत्येक व्यक्ती जो देवाच्या आत्म्याद्वारे जन्मला आहे जो निवडलेल्या गटात आहे तो कदाचित एकदा एक मेथडिस्ट, बॅप्टिस्ट, प्रेसबायटेरियन, पेन्टिकॉस्टल, किंवा काहीतरी किंवा इतर कुठेतरी होता. आता, तुम्हाला ते ठाऊक आहे. तुम्हाला ते ठाऊक आहे. तेव्हा मग तुम्ही पहा जेव्हा तुम्ही म्हणता, "त्यांच्याकडे बाहेर जा," तेच काय ते तुम्हाला करणे आहे. तेथे कोणीतरी आहे जर तुम्ही बी पेरले; तेथे कधीतरी कापणी होईल. ते पडेल.... त्यांच्यातील काही जातील आणि म्हणतील, "आह, तो काही नाही परंतु एक.... तो एक फसविणारा आहे." ते तीच गोष्ट आपल्या परमेश्वराबद्दल म्हणाले नाही का? "तेथे त्यामध्ये काही नाही." बरे मग, का तुम्ही मला तपासत नाही? "तो काही नाही परंतु एक फसविणारा आहे." मग वचनाबरोबर तपासा. पहा, जर ते वचन नसेल, मग ते फसवे आहे, पहा. आता जर तुमचे धर्मशास्त्र हे वचनापासून भिन्न आहे, मग ते बरोबर नाही.

174 आता, इतर बाजूने जातील आणि म्हणतील, "बरे तुम्हाला माहिती आहे काय, मी विश्वास करतो थोडा वेळ मी त्याची पारख करीन." तो गुदमरेल. ते बरोबर आहे. परंतु जेव्हा तुम्ही खरोखर रिक्त होता; म्हणता, "प्रभू येशू, माझे अधिक काही नाही, परंतु यापुढे तू." मग ते शंभर पट उपज आणणार आहे. तुम्ही ते विश्वास करता? मी देखील, विश्वास करतो. सर्वांसाठी स्वातंत्र्य आणि न्याय. ते बरोबर आहे. होय, महाशय. मी माझ्या निष्ठेची माझ्या परमेश्वराला प्रतिज्ञा करतो, पहा, त्याचे वचन प्रचार करण्याची आणि त्याच्या सत्यासाठी उभे राहण्याची जर त्यासाठी मला माझ्या प्राणाची किंमत द्यावी लागली. तरीही मी पुढे जाईन अगदी त्याच प्रमाणे.

कारण मी ... ती माझ्यासाठी एक महान गोष्ट असेल, मला ते करायचे नाही, परंतु जर मला ते करावे लागले, माझे रक्त मी या जमिनीवर मिसळवीन जसे त्यांनी त्यांचे रक्त याच गोष्टीसाठी मिसळविले - त्यांच्यासारखे जे सिंहांच्या पिंजऱ्यात मेले; त्यांच्यासारखे जे वधस्तंभावर मेले; ज्यांना करवतीने चिरले गेले - जे त्यांच्या संस्थेतून लाथेने प्रहार करुन काढले गेले आणि मेंढरांची व शेरडांची कातडी पांघरुन भटकले, आणि निराधार होते. ते माझ्यासाठी एक महान सौभाग्य असेल ख्रिस्ताचा शिष्य म्हणून, मागे जाऊन, तो सर्वकाही आनंदच गणणे कारण ते त्याच्या नावावर आणलेली ती निर्भत्सना सहन करण्यास समर्थ ठरले. ते ती त्याच्यासाठी सहन करु शकले, त्यांची लहानशी पीडा. मला पीडा सहन

करायची नाही; कोणालाही सहन करायची नाही. मला सर्व संप्रदायांबरोबर माझे हात मिळवून म्हणायला आवडेल, "भावांनो, जाऊया." मला ते करायला आवडेल. जर मी करतो, मी त्याच्या हातातून माझा हात काढतो. ते करणे माझ्यापासून कधीही दूर असो. जर मी एकटा उभा राहिलो, मी त्याच्याबरोबर आणि त्याच्या वचनाबरोबर उभा राहीन.

175 जसे एडी पेरोनेट म्हणाली, "ख्रिस्त या मजबूत खडकावर मी उभी आहे; इतर सर्व भूमी घसरणारी वाळू आहे." आणि ख्रिस्त हा वचन आहे. "प्रारंभी...." आणि ते काय आहे? प्रत्येक शब्द उपजवतो ... प्रत्येक बीज आपापल्यापरी उपजविते. सांप्रदायिक बीज त्याच्यापरी उपजवील. पेन्टिकॉस्टल संस्था त्याच्या परी उपजवील. बॅप्टिस्ट त्याच्या परी उपजवील. ते काय आहे? - संस्था, नियमित, नियमित.

देवाची इच्छा असल्यास, या दुपारी, त्यांची कशी काय सुरुवात झाली, आणि त्याला काय कारणीभूत ठरले, आणि ते कुठे असतील असे पवित्र शास्त्र म्हणते, आणि त्यांचा अंत कसा होईल - तंतोतंत अंत कसा असेल, हे आपण दाखविणार आहोत.

176 सर्व जे गाड्यांमध्ये आहेत, देव तुम्हाला आशीर्वादित करो. कित्येक सर्व जे गाड्यांमध्ये आहेत, जे आत येऊ शकले नाहीत, जे या ध्वनीविस्तारक यंत्राद्वारे ऐकत आहेत. आणि तुम्ही जे या भिंती सभोवती उभे आहात आणि तुम्ही जे येथे या सकाळी बसलेले आहात, देव तुम्हाला आशीर्वादित करो. आणि मी भरवसा करतो देवाच्या कृपेद्वारे, की मी कोणाची मने दुखावली नाहीत. परंतु मी स्वतःला स्पष्ट करीत आहे.

आता, जर तुम्ही त्याच गोष्टीवर विश्वास करता जी मी या सकाळी सांगितली आहे, तुम्ही त्याच प्रकारे उभे राहणार नाही का? निश्चित तुम्ही राहाल. आपली मस्तके अगदी एका क्षणासाठी झुकवुया.

177 कृपाळू स्वर्गीय पित्या, आम्ही सभा बंद करण्याचा प्रयत्न करीत नाही परंतु फक्त काही क्षणांसाठी थोड्याशा आरामासाठी फक्त थांबतो. आणि आता जी बीजे या सकाळी पेरली गेली आहेत, ती चांगल्या सुपीक भूमीवर पडू दे. त्यांनी भरपूर उपजवू दे, प्रभू, भरपूर अनंत जीवन. आता आम्ही प्रार्थना करतो, पित्या, की ही बीजे जी पेरली गेली आहेत ती वळवाच्या पावसाची वाट पाहत पडून राहतील. विसंबून - ते जे परमेश्वराची वाट पाहतील, ते नवी शक्ती संपादन करतील. देवा, आम्ही वचनाच्या पुढे धावू नये; वचनाबरोबर राहावे. प्रभू, हे मान्य कर.

आता आम्हाला आशीर्वादित कर आणि जे जेवण्यासाठी गेले आहेत, मी प्रार्थना करतो की तू त्यांना त्यांचे जेवण देशील आणि त्यांचे अन्न आशीर्वादित कर आणि त्यांना शक्ती दे आणि या दुपारी त्यांना खूप लवकर परत आण. प्रभू त्यांना येथे मंदिरात वाट पाहत बसू दे. आणि तू मला साहाय्य कर जेव्हा मी प्रार्थना करण्यास जातो आणि परत येतो. मी प्रार्थना करतो की तू मला या दुपारी ताजेपणाने अभिषेक करशील. प्रभू, हे मान्य कर, की मी जो काही विश्वास करतो की तुझे वचन आहे ते लोकांकरिता आणावे. पित्या, हे मान्य कर.

178 मी प्रार्थना करतो की तू आमच्या प्रिय जिवलग पाळकाला, भाऊ नेविलला, आशीर्वादित करशील, आमचा मौल्यवान भाऊ - काही मिनिटांनी येथे लोकांच्या जमावाबरोबर बाप्तिस्म्यासाठी पाण्यात जाण्यास तयार आहे. आणि, पित्या, जर तेथे कोणी या सकाळी येथे असेल ज्याने ख्रिस्ती बाप्तिस्म्या खेरीज अजून कोणता बाप्तिस्मा घेतला असेल, जो तुझा महान सेवक, पौल - आणि तो म्हणाला की देवाचे वचन त्याच्यामध्ये होते - आणि तो म्हणाला, "जर एक मनुष्य किंवा स्वर्गदूत (अगदी जरी स्वर्गातून दूत खाली आला, जसा सैतान दूताच्या स्वरुपात होता) खाली आला आणि त्याने जे काही सांगितले आहे त्यापेक्षा काही वेगळे सांगितले, तो शापित असो." पित्या, आम्हाला ठाऊक आहे की ते शास्त्रलेखात लिहिलेले आहे, आणि मी प्रार्थना करतो, पित्या, की ते त्यांच्या हृदयात रुतेल की पौल प्रत्यक्ष तोच होता ज्या लोकांनी त्यांच्या पापांच्या क्षमेसाठी येशू ख्रिस्ताच्या नावात बाप्तिस्मा घेतला नव्हता, त्यांना परत बाप्तिस्मा घ्यावयास लावले. ते लोकांपर्यंत जावो, पित्या. त्यांना जाणीव होवो की ही बाप्तिस्मा सेवा वर जात आहे - त्यांना जाणीव होवो की ते सत्य आहे, माहित असून की ते त्यांच्या त्रैक्यवादाच्या तीन देव कल्पनेला आधार देण्यासाठी ते शास्त्रलेखात एकही वचन उत्पन्न करु शकत नाही. पित्या, अर्थात आम्ही विश्वास करतो की तू - पिता, पुत्र, आणि पवित्र आत्मा, या त्रैक्याच्या कार्यालयात आहेस. अगदी निश्चितपणे आम्ही तो विश्वास करतो, प्रभू, परंतु तुला तीन देव बनवीत नाही; तुला एक देव बनवितो ज्याने तीन कार्यालयात - दोन्ही पिता, पुत्र, आणि पवित्र आत्मा यात सेवा केली, आणि त्या देवाचे नाव येशू ख्रिस्त म्हटले गेले. आता ते पिता, पुत्र, आणि पवित्र आत्म्याचे नाव आहे.

179 पित्या, लोकांना ते पाहू दे आणि त्यांच्या पापांच्या क्षमेसाठी त्यांनी पाण्याच्या बाप्तिस्म्यासाठी आज्ञानाधारक असू दे. आणि बाप्तिस्म्यासाठी हे थोडे शब्द प्रत्येकाच्या हृदयामध्ये आता खोलवर पडू दे, कारण आम्हाला ठाऊक नाही आमच्याकडे किती काळ अधिक आहे, पित्या. ते फारच निकट येत आहे. तो शत्रू, जसे आम्ही या दुपारी बोलण्याची अपेक्षा करतो, तो खोल, अधिक धीट सर्वदा होत चालला आहे. त्यांनी सिंहासन घेतल्यापासून; ते सरळ आतमध्ये जात आहेत. प्रभू, आम्ही ते प्रत्येक हातावर पाहात आहोत. साम्यवाद नाही, प्रभू. लोक समजण्यास समर्थ असावे की तो रोमनवाद आहे, ती म्हातारी कलावंतीण माता आणि तिच्या वेश्या; आणि आम्ही त्यांना पाहतो, प्रभू, श्वापदासाठी मूर्ती येत आहे आणि येथे आम्ही आहोत.

देव पित्या, आता दयाळू अस, आणि आम्हा सर्वांना सुरक्षिततेत येऊ दे, तारवामध्ये आणि वळवाच्या पावसासाठी तयार होऊ दे. आम्ही हे येशूच्या नावात मागत आहोत. आमेन.

180 आता तुम्ही जे येथे या इमारतीत आहात, आता जर तुम्हाला बाहेर राहायचे असेल आणि खाण्यासाठी काहीतरी घ्यायचे असेल, ठीक आहे. आणि जर तुम्हाला हवे असेल - मग परत या, येथे सेवेनंतर जितक्या लवकर तुम्ही येऊ शकता तेवढे या. आता, अगदी क्षणभर आपण उभे राहूया. आपण एकत्र उभे राहूया. किती जण परमेश्वराचे वचन विश्वास करतात, तुमचे हात वर करा. आमेन. ओह, प्रभूला धन्यवाद. ओह कसा मी येशूला प्रेम करतो.

ओह, कसे मी येशूला प्रेम करतो;
ओह, कसे मी येशूला प्रेम करतो;

[भाऊ ब्रॅन्हम हातरुमालांवर प्रार्थना करतात.]

प्रभू येशू, हे हातरुमाल आशीर्वादित कर. त्यांना दे, प्रभू, आत्म्याचा अभिषेक त्यांच्यावर दे. प्रभू, आम्ही येशूच्या नावात त्याचा विश्वास करतो...?...

ओह, कसे मी येशूला प्रेम करतो
कारण त्याने मला प्रथम प्रेम केले.

181 [दुपारची सेवा येथे अंदाजे दीड तासाच्या लहानशा खंडानंतर सुरु झाली] ओह, ते ठीक आहे, भावा...?... त्याला त्याचे आरोग्य मिळाल्याबद्दल एक शब्द बोलायचा आहे. [एक भाऊ साक्ष देतो] तेच ते आहे. भाऊ एड, तेच काय ते आहे. ओह, ते अद्‌भुत नाही का. मला ती जुनी साक्ष आवडते...?...

आता, गाडीचा रेडिओ यंत्रणेवर आहे, येथील ही गोष्ट येथे - कशासाठी आहे. [ध्वनिमुद्रणपट्टीवर रिक्त स्थान]

सर्वांना आता चांगले वाटत आहे? बरे आता, आपण सरळ आता मध्यरात्रीपर्यंत सुरु ठेवणार आहोत, आणि मग आपण.... आपण सर्व इतके आनंदित आहोत की प्रभूने आपल्याला साहाय्य केले आहे, आणि आपल्याला आशीर्वादित केले आहे.

आता, परत आपण सुरुवात करण्याअगोदर, अगदी थोड्या शब्दांची लहानशी प्रार्थना करुया त्या एकाला ज्याबरोबर आपण बोलत आहोत.

182 कृपाळू स्वर्गीय पित्या, या पापभिरु, संतासारख्या, वृद्ध मनुष्याची साक्ष तू ऐकलीस. युगापासून, तो आणि त्याची लहानशी पत्नी, एकत्र कार्य करीत आहेत, आणि कसे की तिने तिच्या पतीमधून तू एक प्रचारक बनवावा यासाठी तिने तुला याचना केली होती आणि तुझ्यावर विसंबून राहिली होती, आणि येथे तो आहे. आणि मग जेव्हा तो तेथे मरणासन्न पडलेला होता, देशातील चांगले वैद्य म्हणत होते की तो संपलेला आहे, "तो काही तासांपेक्षा अधिक जगू शकत नाही. तो संपलेला आहे; त्याचे शरीर कर्करोगाने खाल्लेले आहे; तो कधीही पुढचे एक पाऊल चालू शकणार नव्हता - त्याच्या घोट्यामध्ये संसर्ग आहे आणि इत्यादींनी त्याला दूर नेले आहे." आणि येथे तो आहे, वर्षांनंतर, अजूनही जात आहे. आम्ही अगदी इतके आभारी आहोत, पित्या. ते हे सिद्ध करते की जेव्हा वचन पेरले जाते, मग जलसिंचन होते, ते पीक आणील.

आता आम्ही प्रार्थना करतो, पित्या, की या दुपारी तुझ्या वचनातून तू आम्हाला शब्द टाकू देशील. हा तुझा शब्द आहे, आणि जसा तो आहे तसाच आम्हाला तो पुढे मांडायचा आहे, आणि मग तू त्यावर, आत्म्याने जलसिंचन कर, प्रभू. आम्ही मागतो, जसे आम्ही संदेशाबरोबर स्वतःला तुला देतो, की तू आमचा वापर करशील येशूच्या नावात. आमेन.

183 आता सरळ त्वरा करुया. माझी पत्नी या सकाळी मला सांगत होती किती कठीण लोकांना आहे याबद्दल ... तुम्हाला ठाऊक आहे, आणि त्यांच्या पायांना पेटके येतात आणि गोष्टी - त्या स्त्रिया, आणि माझ्यासारखे अधिक लोक जे थोडेसे वृद्ध होत चालले आहेत आणि अशाप्रकारे सभोवती उभे राहावे लागते. मी त्याची प्रशंसा करतो - तुमची निष्ठा. आणि आता, आपण सरळ संदेशामध्ये परत जाऊ आणि पुढे जाऊ. मला खूप त्वरा करायची नाही, आणि तरीही मला पुरेशी घाई करायची आहे की या दुपारी जर शक्यतो मी करु शकलो तर ते पूर्ण करायचे आहे. मग जसे आपण पूर्ण करतो, सरळ आम्ही थेट टिफ्ट्न, जॉर्जियाला जाणार आहोत, नियमित सभेसाठी नाही; आम्ही तेथे फक्त एका रात्रीसाठी हायस्कुलच्या सभागृहात आहोत. ती उद्याची रात्र आहे, आणि ... फक्त एक प्रचार सभा; आणि मी काही सामान्य मजकूर किंवा काहीतरी मी जो सरळ येथे प्रचार केला आहे, ते घेईन कारण ते केवळ तेथील लोकांना भेट देण्यासाठी आहे. त्यांच्याकडे एक नियमित राहणारी सभा किंवा काही नाही.

184 तेव्हा आपण ... आणि आता आपण या सकाळी उत्पत्ती १ अध्याय, ११ वे पद, विशेषकरुन: "तो बोललेला शब्द हा मूळ बीज आहे" या मजकुरावर बोलताना मध्ये सोडलेले आढळते. आणि आता माझा हेतू या सकाळी आणि आज ह्या लोकांना स्पष्ट करण्याचा प्रयत्न करणे आहे - लोकांना स्पष्ट करण्याचा प्रयत्न करणे आहे माझ्या क्रिया आता, का त्या गोष्टी मी केल्या ज्या मी केल्या. आणि जाणीव आहे की हे ध्वनिमुद्रण केले जात आहे आणि बाहेर पाठविले जाईल; कित्येक लोक कदाचित ते ऐकतील मी येथून निघाल्यावर, जर येशूच्या येण्याला उशीर आहे; परंतु मला सांगायचे आहे की मी देवाच्या वचनावर विश्वास करतो, की ते ... की ते सत्य आहे.

185 आता आपण जेथे की शेवटच्या दिवसांकडे ... सोडले. सुवार्तिकांच्या सेवेला काय झाले जी काही वर्षांअगोदर अगदी देशाला प्रज्वलित करीत होती आणि असे भासते की ते सर्व अगदी थांबले आहेत. आता, मला असे म्हणायचे नाही की ते कार्यक्षेत्रातून बाहेर आहेत. ते अजूनही जात आहेत, परंतु तेथे असे दिसते की, परिणाम नाहीत. त्यांना काहीही मिळत नाही, पहा. काय बाब आहे? - शेत पेरले गेले आहे, पहा. आता लक्षात ठेवा, विसरु नका....

186 कोणीतरी मला तो इब्री शब्द परत उच्चरण्यास सांगितले. योएलमध्ये २ रा अध्याय (योएल २:२८) जेथे तो आगोटीच्या आणि वळवाच्या पावसाची वृष्टी होण्यासंबंधाने बोलत आहे, "आगोटीचा" शब्द हा इब्री शब्द मौ-र्य, मौर्य आहे, ज्याचा अर्थ शिकविणे आहे. दुसऱ्या शब्दात, तो शिकवण्याचा पाऊस आणि हंगामाच्या कापणीच्या पाऊस असेल. आता आपल्याकडे शिकविण्याचा पाऊस आला, आणि आता आपण कापणीच्या पावसात आहोत. तुम्हाला ठाऊक आहे पहिला पाऊस जेव्हा तुम्ही बीज पेरता तेव्हा असतो. ते तुमचे पीक वाढवते. मग अगदी ते परिपक्व होण्याआधी, तेथे दुसरे पीक येते. त्यालाच ज्याला ते कापणीचा पाऊस म्हणतात. आपल्याला ठाऊक आहे तो केव्हा असतो -

वसंतातील पाऊस, आणि मग सुमारे जूनमध्ये पाऊस पडतो, तो तुमचे पीक तयार करतो.

187 आता, आपण शोधून काढले की तो पाऊस आत्मा होता. आणि आता आपण तेथे सोडले जेथे मी ती अखंड गोष्ट काय असेल या विषयी माझा विचार दिला. ते हे, मी विश्वास करतो की पाऊस आणला गेला - तो पाऊस. तेच कारण आहे की आपण स्तब्ध झालेले आहोत, कारण भूमी अगोदरच पेरली गेली आहे. तुम्हाला पेरलेल्याशिवाय अजून काही मिळू शकत नाही. आणि ते रेडिओ, दूरदर्शन, ध्वनिमुद्रणपट्ट्या, शब्दांद्वारे, सर्वकाहीद्वारे गेलेले आहे; त्याने देशभर पेरणी केली आहे. त्याने बीजाची पेरणी केली आहे. आता कोणती बीजे पेरली गेली होती, त्यातून तुम्हाला काहीही मिळू शकत नाही परंतु जे काही बीज पेरले गेले होते. आता तुम्ही समजू शकता? ते ते बीज असेल जे पेरलेले होते. आता, आत्म्याचा वर्षाव होईल, परंतु तो बीजाची कापणी करील ज्यावर तो पडेल. आता, लक्षात ठेवा.

188 ठीक आहे, मी भाकीत करतो की दोन सांप्रदायिक गट पेन्टिकॉस्टल आणि सुवार्तिकांचा गट, एका संप्रदायामध्ये एकत्र कार्य करतील, ते स्वतःला एकत्र संलग्न करतील, आणि संघ राज्याच्या मंडळ्यांच्या परिषदेचे किंवा मंडळ्यांच्या परिषदेचे सदस्य (ते सर्व) बनतील. ते अगोदरच त्याच्या मालकीचे आहेत - त्यांच्यातील सर्व. आणि त्यांच्यातून एक सक्ती किंवा बहिष्कार येईल, जे सर्वकाही थांबविल, परंतु जे काही त्या मंडळाच्या संघाचे आहे ते सोडून. तेच काय ते.... पवित्र शास्त्र म्हणते की तेथे एक बहिष्कार असेल, अगदी अशाप्रकारे की ते लोकांना विकण्यास व खरेदी करण्यास प्रतिबंध करील जोपर्यंत ते ही, श्वापदाची खूण स्वीकारीत नाही, जो रोमनवाद आहे, आणि श्वापदाची प्रतिमा, जो प्रोटेस्टंटवाद आहे, की ती प्रतिमा ... त्या श्वापदाला सामर्थ्य होते, त्या मूर्तीला बोलण्यासाठी जीवन देण्याचा अधिकार, आणि तिने केले. आणि ते मंडळ्यांचे संघटन आहे, जेव्हा ते स्वतःला एकत्र संघटित करतील.

189 आता येथे खूप तरुण लोक आहेत. मला माहित नाही, येशू आज दुपारी कदाचित येऊ शकतो; तो कदाचित पुढच्या वर्षी येऊ शकतो. मला माहित नाही तो कधी येईल. परंतु लक्षात ठेवा, जर मी त्याच्या आगमनाचा दिवस पाहण्यास जगलो नाही - जो मी आशा करतो की मी राहीन, आणि कसेही करुन विश्वास करतो मी असेन - आता जर मी तो पाहिला नाही, ह्या वचनाला कधी तुमच्या कानांपासून आणि हृदयांपासून निघून जाऊ देऊ नका. फक्त लक्षात ठेवा, मी परमेश्वराच्या नावात बोलत आहे. आता, मी माझ्या संपूर्ण हृदयापासून विश्वास करतो, त्याच प्रकारे हे गुंडाळले जाईल. तेथे एक प्रकारचे ऐक्य असेल, एक बहिष्कार. सर्व अशा जागा जशी ही येथे आहे त्या बंद केल्या जातील. आणि जोपर्यंत तुमच्याकडे या मंडळ्यांच्या संघटनेचा एक सेवा घेण्यासाठी परवाना किंवा परवानगी नाही तोपर्यंत तुम्ही बोलू शकणार नाही.

190 ते जवळ जवळ ... ते दाखविते ते आता देखील संप्रदायात करते. ते दाखविते ते कोठे आहे. होय, महाशय, तुमच्याकडे ते असणेच आहे. आणि तेथेच जेथे ते गुंडाळले जाईल. ते माझे भाकीत आहे, एक ख्रिस्ताचा दास म्हणून मला वचनातून जी समज आहे आणि ती प्रेरणा; तेथेच जेथे ते येईल. सर्व चिन्हे अंताला दर्शवितात. मी अगदी आताच त्यावर बोलून झाले आहे.

आणि ते अगदी मूर्ख कुमारीसाठी आहे ... त्यांनी तेलासाठी ओरडायला सुरुवात केली. आता लक्षात ठेवा, ती कुमारी होती, आणि जर ती कुमारी होती, ती एक मंडळी आहे. पहा, आपण त्यामध्ये या दुपारी जाणार आहोत प्रकटीकरण १७. जर ती कुमारी आहे, ती एक मंडळी आहे, कारण मंडळी ही एक कुमारी आहे. पौल म्हणाला, "मी ख्रिस्ताबरोबर तुमचे एक शुद्ध कुमारी असे वाग्दान केले आहे." प्रकटीकरण १७ ची वेश्या ही एक मंडळी होती. योहानाने तिच्या सौंदर्यामुळे तिचे कौतुक केले, ती काय होती ;ती एक सुंदर गोष्ट होती, परंतु तरीही तिच्यामध्ये येशू ख्रिस्ताच्या प्रत्येक संताचे रक्त आढळले - तिच्यामध्ये ठार केला गेला होता. ते बरोबर आहे.

191 हिप्पोच्या संत ऑगस्टिनपासून मी विश्वास करतो शाहिदशास्त्रामध्ये अडुसष्ट दशलक्ष आहे ज्यांना रोमन कॅथोलिक मंडळीने ठार केले आहेत. अडुसष्ट दशलक्ष प्रोटेस्टंटना ठार केले गेले आणि शाहिदशास्त्राच्या नोंदीवर नमूद केले गेले कॅथोलिक मंडळीद्वारे कारण तिच्या शिकवणीबरोबर असहमत होते. आश्चर्य नाही पवित्र शास्त्र म्हणते, "तिच्यामध्ये प्रत्येक शहिदांचे रक्त आढळले."

आता, येशू नाही का म्हणाला तेथे एक वेळ येईल ते तुम्हाला ठार करतील, हा विचार करीत की ते देवाला सेवा सादर करीत आहेत; आणि ते त्याबाबत प्रामाणिक आहेत. ते ढोंगी नाहीत. ते त्याचा विश्वास करतात; त्यांना ते शिकविले गेले आहे. आणि जेव्हा ते वचन तेथे पेरले गेले, त्याला पीक आणणेच आहे. निश्चित आणणे आहे. लक्षात ठेवा, आपण बीजाबरोबर राहत आहोत. तो आपला विषय आहे - आपले बीज. तो देवाचा बोललेला शब्द एक बीज आहे, पहा. त्याला या वचनावर परत येणे आहे, आणि ते वचन ते काय म्हणते ते उत्पन्न करील.

192 त्याच कारणामुळे मी दैवी आरोग्यावर विश्वास करतो; त्याच कारणामुळे मी दृष्टांतावर विश्वास करतो; त्याच कारणामुळे मी दूतांवर विश्वास करतो; त्याच कारणास्तव मी या संदेशामध्ये विश्वास करतो, कारण हा देवाच्या वचनापासून येतो. आणि काहीही देवाच्या वचनाबाहेर आहे, त्यावर मी विश्वास करीत नाही. ते तसे असू शकत होते, परंतु तरीही मी फक्त देव काय म्हणाला त्याबरोबर राहीन आणि मग निश्चित असेन की मी बरोबर आहे. आता देव त्याला जे हवे ते करु शकतो; तो देव आहे. परंतु जोपर्यंत मी त्याच्या वचनामध्ये राहतो, मग मला ठाऊक आहे ते सर्व ठीक आहे. मी त्याचा विश्वास करतो.

193 आता, ही मूर्ख कुमारी एक स्त्री आहे, ती एक मंडळी आहे, परंतु ती मूर्ख आहे, पहा. ती दीर्घसूत्री आहे. आणि तरीही ती स्वतःला वधू म्हणविते. आणि लक्षात ठेवा सर्वकाही परिपूर्णतेच्या तीनमध्ये जाते. तीन हा परिपूर्णतेचा क्रमांक आहे. देवाची कार्यालये - पिता, पुत्र, पवित्र आत्मा. देव, पिता, तो देव होता जो अग्निस्तंभात राहिला. तो इस्त्राएलाला त्याच्याकडे ओढण्याचा प्रयत्न करीत होता. ते आले नाहीत. देव, तो पिता, पुत्रामध्ये राहिला, ज्याने त्याला पुत्र देव बनविले - तोच देव, देवाची अभिव्यक्त झालेली प्रतिमा, देवाचे बीज प्रकट झाले, लोकांना त्यांच्याकडे ओढण्याचा प्रयत्न करीत होता - त्याने त्याला वधस्तंभावर खिळले. पवित्र आत्मा हा तोच देव आहे जो प्रारंभी देवाच्या पुत्रात होता आणि आता येथे शेवटच्या दिवसांत देवाचे दुसरे कार्यालय, मंडळीत राहत आहे, वचन आणण्याचा प्रयत्न करीत आहे (बोललेला शब्द जसा त्या

इतर दोन कार्यालयांनी केले) लोकांसाठी, आणि ते त्याला नाकारतात. ती सारखीच गोष्ट आहे. ही तीन कार्यालये किंवा एकाच देवाची कार्यरत प्रकटीकरणे आहेत. आणि आज देव त्याच्या लोकांत कार्यरत, हा देव कार्यरत आहे, पहा. तो लोकांमध्ये देव आहे.

194 प्रभूची इच्छा असल्यास, मला उद्या रात्री त्यावर बोलायचे आहे - देव त्याच्या विश्वात, देव त्याच्या पुत्रात, देव त्याच्या लोकांत, आणि इत्यादी. आता त्यावर मी येथे पूर्वी बोललो आहे, मी विश्वास करतो.

195 आता मग, ही मूर्ख कुमारी, जेव्हा ती तेल विकत घेण्यासाठी गेली - तिला तेल विकत घेण्यासाठी पाठविण्यात आले. जेव्हा ती गेली, तिला आढळले की तिला फार उशीर झाला होता. का? का, मित्रांनो? - ती बीजे पेरली गेली आहेत. सदोमाच्या वेळेस तेथे तीन वर आले. तेथे नेहमी तीन क्रमांक सर्वदा असतो. तेथे ख्रिस्ताची तीन आगमने आहेत. तो एकदा त्याच्या वधूला उद्धारण्यासाठी आला. तो पुढच्या वेळी त्याच्या वधूला रुपांतरात घेऊन जाण्यास येतो. तो परत सहस्त्राब्दीमध्ये त्याच्या वधू बरोबर येतो. सर्वकाही तीनात आहे. तीन हा परिपूर्ण क्रमांक आहे. पाच हा कृपेचा क्रमांक आहे. सात - पूर्णतेचा; बारा - उपासना; चोवीस किंवा चाळीस - परीक्षेचा; आणि पन्नास योबेल वर्ष आहे. प्रत्यक्ष "पेन्टिकॉस्ट" हा शब्द म्हणजे योबेल आहे - पन्नास, पहा.

196 आता, आणि आता देव त्याच्या अंकात आहे, तो त्याच्या अंकात परिपूर्ण आहे; तो त्याच्या शब्दात परिपूर्ण आहे; तो त्याच्या क्रियेत परिपूर्ण आहे; तो सर्व गोष्टीत परिपूर्ण आहे कारण तो एक परिपूर्ण देव आहे. आणि आम्ही पाहतो या कुमारींमध्ये - आता पहा, पवित्र शास्त्रात एक वेश्या आहे. (आता, मला हवे आहे की माझ्या बहिणींनी मला क्षमा करावी. तेच काय ते पवित्र शास्त्र म्हणते. आज मी अगदी सरळ बोलत आहे.) तिला कलावंतीण म्हणते आणि वेश्यांची माता, जी सारखीच गोष्ट आहे.

आता, जर तुम्ही लक्ष दिले, पवित्र शास्त्रात एका कलावंतिणीबद्दल बोलले गेले, जी एक मंडळी आहे, पवित्र शास्त्रात वेश्या बोलले गेले, ती मंडळी आहे, आणि पवित्र शास्त्रात एक वधू बोलले गेले आहे आणि ती मंडळी आहे. तेथे तीन आहेत. थोड्या वेळाने मी त्यामध्ये जाणार आहे हे दाखवीत की त्या कोणाच्या वधू आहेत आणि कशा त्या नाकारल्या गेल्या आहेत आणि त्याबद्दल सर्वकाही जर परमेश्वराची इच्छा असली.

197 आता, पहिली गोष्ट ... मला ती मी विसरण्यापूर्वी सांगायची आहे. कधीही साम्यवादाला घाबरु नका. साम्यवाद केवळ देवाच्या हातात कार्य करीत आहे. ते एक अधार्मिक प्रकरण आहे अगदी जसा राजा नबुखद्नेस्सर होता, परंतु त्याला तेथे पाठविण्यात आले आणि इस्राएलाच्या अवज्ञेमुळे त्यांना ठार करण्यात आले. जेव्हा संदेष्ट्याने त्यांना सांगितले काय येत होते आणि त्याने त्यांना त्यांच्या भूमीमध्ये राहण्यास सांगितले आणि देवाची आठवण ठेवा, त्यांनी ते केले नाही; ते कसेहीकरुन पुढे गेले, आणि तो राजा सरळ बाहेर आला आणि कसेहीकरुन त्यांना घेतले, कारण तो म्हणाला होता तो करील. साम्यवाद ही एक गोष्ट आहे जी.... परदेशातील कॅथोलिक मंडळीच्या अनैतिकतेमुळे रशियात साम्यवाद उदयास आला. त्यांनी सर्व पैसा घेतला आणि सर्वकाही साठवून ठेवले, आणि तेच सर्वकाही तेथे होते. त्यानेच तंतोतंत काय तो साम्यवाद बनविला.

198 जेव्हा फिनलँडमध्ये तो लहान मुलगा मरणातून उठला, ते मोठे साम्यवादी सैनिक, जेव्हा मी त्याच्या बाजूने गेलो, तेथे उभे राहून सलाम करीत होते, आणि त्यांच्या गालांवरुन अश्रू वाहत होते, म्हणाले, "आम्ही त्या प्रकारच्या देवाला स्वीकारु" - निश्चित, एक देव जो मृताला उठवितो आणि त्याचा शब्द राखतो, निश्चित, पहा. परंतु जेव्हा ते केवळ मंडळीत जाणे आणि सैतानासारखे आणि सर्वकाही, इतर जगासारखे राहणे, काहीही करीत नाही, अशी वेळ येते, मग ते त्याचा विश्वास करीत नाही. आणि इमानदारीने म्हणतो, मी देखील विश्वास करीत नाही. ते बरोबर आहे. ते बरोबर आहे. तेथे कोणताही शास्त्रलेख नाही जो म्हणतो साम्यवाद जगावर राज्य करील, परंतु तेथे शास्त्रलेख आहे आणि सर्व शास्त्रलेख म्हणतात रोमनवाद ते करील. तेव्हा तुमची नजर त्यावर ठेवा.

199 आज रात्री पहा; अगदी फक्त गेल्या रात्री काय घडले ते पहा - हा कंटकीचा सभासद म्हणाला रिपब्लिकन तेथे पदावर आता घेण्याबद्दल ते कंटकी राज्याला दर्शविते आणि म्हणाला, "तो प्रोटेस्टंट आहे आणि त्याला त्याचे काही वाटत ही नाही" - तो एक कॅथोलिक आहे. ते इतके धीट होत आहेत जेवढे होऊ शकतात. आणि लक्षात ठेवा, तेथे दुसरी गोष्ट त्याबरोबर जात आहे. मूर्ख कुमारीची वेळ - आपण ते पाहतो. गोष्टी ज्या कधीही घडल्या नाहीत - की कोणतेही लोक, शिक्षक युगांपासून अशा गोष्टी सांगू शकत नव्हते जशा आपण आता सांगू शकतो, कारण ते येथे आहे.

200 आता, त्या मूर्ख कुमारी आणि ते संकरित पेन्टिकॉस्टल (ती सारखीच गोष्ट आहे - जगाच्या गोष्टींनी संकरित झाले आहेत) ... आता लक्षात ठेवा, मी पेन्टिकॉस्टल आहे, परंतु संप्रदायाद्वारे पेन्टिकॉस्टल नाही. मला त्याची चीड आहे. मी अनुभवाद्वारे पेन्टिकॉस्टल आहे. आपल्याकडे असायला हवे ... ते मेथडिस्ट पेन्टिकॉस्टल आहेत; ते बॅप्टिस्ट पेन्टिकॉस्टल आहेत; ते कॅथोलिक पेन्टिकॉस्टल आहेत जर त्यांना पेन्टिकॉस्टल अनुभव मिळाला आहे. तुम्ही पेन्टिकॉस्टला संस्थागत करु शकत नाही, कारण तो एक अनुभव आहे, आणि तो देव आहे, आणि देवाला संस्थागत केले जाऊ शकत नाही.

201 आता. आता, येशूने आपल्याला सांगितले आहे की या गोष्टी येतील, आता ... आपल्याला सांगितले काय घडेल त्याबद्दल - ती मूर्ख कुमारी उदयास येईल आणि त्या गोष्टी ज्या ती करील, आणि कसे की लोक त्यांच्या दिवसात बोलावतील आणि तेल हवे असेल, परंतु त्यांना फार उशीर झालेला असेल, पहा. आता त्या तीन मंडळ्यांना पहा. तेथे ती वेश्या आहे; ती कशासाठी ही आलेली नाही. आता ती तिच्यामध्ये स्वार्थी आहे. तेथे मूर्ख कुमारी होती, जी प्रोटेस्टंट मंडळी आहे. आणि तेथे एक वधू होती, पहा? आता, तेथे शेवटच्या दिवसात मंडळीचे तीन टप्पे आहेत. आता पहा, आपण त्यांना सरळ थेट बाहेर आणणार आहोत आणि परमेश्वराची इच्छा असल्यास, उत्पत्तीपासून आणि त्यांना येथे बाहेर आणून, प्रकटीकरणामध्ये रुपांतरात मांडणार आहोत.

202 या सर्व गोष्टी वास्तविक दिसतात. पेन्टिकॉस्ट वास्तविक दिसते. विचार करा, "का मी पेन्टिकॉस्टल संस्थेचा आहे." त्याचा अर्थ यापेक्षा अधिक नाही की जर तुम्ही डुक्करांच्या वाड्यात राहत आहात! त्याने कणभरही फरक पडणार नव्हता. ती केवळ वाजणारी थाळी आणि झणझणणारी झांज आहे. काही फरक पडत नाही तुम्ही कोणाच्या मालकीचे आहात, जर तुम्ही देवाच्या आत्म्याने जन्मलेले नाहीत आणि पवित्र आत्मा मिळालेला नाही - आणि तेच कारण आहे - जर तुम्ही नाही - देवाची सर्व वचने विश्वास करीत नाही, अजूनही तुम्हाला पवित्र आत्मा प्राप्त झालेला नाही. बरोबर. ते तंतोतंत बरोबर आहे तो पवित्र आत्मा.... जेव्हा तुम्ही सत्य ऐकता, आणि तो पवित्र आत्मा त्याकडे तुमचे नेतृत्व करीत नाही, मग तेथे दुसरा आत्मा आहे जो तुम्हाला त्यापासून दूर ठेवीत आहे. तेव्हा जो आत्मा तुमच्यामध्ये आहे तो पवित्र आत्मा नाही.

203 ठीक आहे, आता आपण असे शोधून काढले जेव्हा ... पुढे गेलो, म्हणते, जसे यान्नेस व यांब्रेसने मोशेला अडविले (आपण त्याबद्दल बोललो), कशा की या गोष्टी शेवटच्या दिवसांत असतील. आता, आणि शेवटचा उतारा आपण घेतला होता की देवाने सर्व बीजे आपापल्या परी बनविली; ते त्याचे ... पहा. मग जेव्हा त्याने त्याचा मनुष्य त्याच्या प्रतिमेत बनविला - तो त्याच्या शब्दाचे बीज होता. आणि जेव्हा येशू देह बनला, तो देवाच्या शब्दाचा देह होता. आणि जेव्हा आपण देवाचा शब्द स्वीकारतो, मग आपण आपल्या देहात देवाचा शब्द बनतो, पहा? मंडळी त्या स्थितीत असायला हवी.

204 आता, मग त्याने मनुष्याला त्याच्या स्वतःच्या प्रतिमेत बनविल्यानंतर ... "देवाची प्रतिमा असा तो निर्माण केला...." आता त्याने हे केल्यानंतर (आता हे चुकवू नका), देवाने त्याच्या मनुष्याला त्याच्या स्वतःच्या बोललेल्या शब्दाद्वारे त्याच्या स्वतःच्या प्रतिमेत निर्माण केल्यानंतर - आता तो परिपूर्ण मनुष्य होता, परंतु पतन कुठे आले, तेव्हा जेव्हा त्याने त्याच्यामधून दुय्यम उत्पादन घेतले आणि त्याच्यासाठी एक वधू बनविली. तेथेच जेथे आता त्रास आहे. जर तुम्ही आत्मिक असाल, तुम्ही अगोदरच हे ताडले असेल पहा, पहा. तो आदाम नव्हता जो अडचणीत पडला. तो आदाम नव्हता ज्याने वचनावर संशय केला; ती त्याची वधू होती जिने वचनावर संशय केला. आणि तो येशू नाही ज्याने वचनावर संशय केला, कारण तो वचन होता; ती त्याची वधू आहे.

205 तेथेच जेथे संकरण आत आले - ते आदामाद्वारे आले नाही. जे तुम्ही ते पाहत नाही तुम्हावर लज्जा असो! तो आदामाचा दोष नव्हता. त्याला त्याच्याशी काही कर्तव्य नव्हते. जर मृत्यू आदामाद्वारे आला, मग तो देवाद्वारे आला. मृत्यू मिश्रपैदासद्वारे आला. देवाच्या वचनाद्वारे मृत्यू येऊ शकत नाही. वचनाला संप्रदाय व पंथ यांची मिश्र पैदास करण्याद्वारे मृत्यू येतो. ख्रिस्ताऐवजी, मतप्रणाली - वचनाऐवजी. तो वचनाद्वारे येत नाही. वचन हे जीवन आहे. येशू म्हणाला, "माझी वचने जीवन आहे," आणि तो आत्मा त्या वचनाला प्रज्वलित करतो आणि त्याला जीवन बनवितो. त्याला मिश्र पैदास करा, तेथेच जेथून मृत्यू येतो. आणि जर आदाम, देवाचा शब्द होता, त्याचा बोलला गेलेला शब्द, त्याचे मूळ बीज (कारण निर्मितीद्वारे, तो प्रथम होता), मग त्याचा दुसरा आदाम देखील निर्मितीद्वारे (बोललेला शब्द) होता. तुम्हाला कळेल? आता आदाम फसविला गेला नाही, परंतु त्याची वधू फसविली गेली. आज ख्रिस्त फसविला गेला नाही. ते वचन फसवित नाही. ती वधू आहे जी वचनाद्वारे फसवित आहे. तुम्ही ते पाहता?

206 आता, त्याने त्याला एक वधू दिली - दुसऱ्या आदामाचे एक प्रतीक. त्याने पहिल्या आदामाला एक वधू दिली; ती पडली. त्याने दुसऱ्या आदामाला, ख्रिस्ताला, एक वधू दिली; ती पडली. ते तंतोतंत आहे. का? - ती मूळ निर्मितीत नाही; ती एक दुय्यम उत्पादन आहे. आज एक वधू एक दुय्यम उत्पादन आहे. पहा, ती स्वतःला वधू म्हणविते. परंतु ती काय आहे, ती संस्थेच्या साहित्यातून बनविली गेली आहे, वचनापासून नाही - त्यामध्ये इतके वचन आहे तिला एक प्रकारचे दुय्यम उत्पादन बनविण्यासाठी ते ढोंगी बनविण्यासाठी. हव्वेने जवळ जवळ वचनावर विश्वास केला, परंतु तिने त्याच्या एका भागाचा संशय घेतला. आज ती अगदी प्रेषित कृत्ये २८ घेऊ शकत नाही ... किंवा मत्तय २८:१९ सरळ प्रेषित कृत्य २:३८ बरोबर घेऊ शकत नाही, पहा. ते तिला गोंधळविते. इतर शेकडो पैकी ते केवळ एक लहानसे स्थळ आहे.

207 आता, आदामाची वधू ही दुसऱ्या आदामाच्या वधूचे प्रतीक आहे. आता, आदामाची वधू - आदामाची वधू थांबू शकत नव्हती. देवाने आदाम व हव्वेला सांगितले होते: "बहुगुणीत व्हा आणि पृथ्वी व्यापून टाका." ती एक येणारी गोष्ट होती - एक अभिवचन. ती अजूनही त्याची पत्नी नव्हती कारण तो तिच्याबरोबर कधीच राहिला नव्हता. ख्रिस्ताची वधू अजूनही त्याची पत्नी नाही; लग्नाची मेजवानी घडणे आहे. ते कळले? लक्ष द्या, ओह हे संपन्न आहे! ती उतावळीत गेली, आणि तिने काय केले? - तिने तिचे बीज मिश्रित केले. तिने ते सर्पाच्या बीजाबरोबर मिसळले; आणि जेव्हा तिने केले, तिने आणले.... तिने काय आणले? तिने मृत्यूच्या बालकाला आणले, एक बालक जे ... तिने त्यानंतर प्रत्येक बालकाला विकृत केले. आणि जेव्हा येशू ख्रिस्ताची मंडळी रोमच्या समयी विकृत झाली, तिच्या कुमारी जन्मानंतर, आणि तिला पेन्टिकॉस्टला ख्रिस्ताला देण्यात आले. तिने काय केले? तिने रोमन मतप्रणालीबरोबर स्वतःला मिश्र प्रजनन केले. आणि त्या प्रोटेस्टंट मंडळीने प्रत्यक्ष तीच गोष्ट केली आहे. ती थांबू शकत नाही.

208 एक स्त्री एका चांगल्या, तरुण, शुद्ध मनुष्याची वाग्दान झाली आहे, आणि ते एकत्र येण्याअगोदर, तिने काय केले? ती अजून कोणापासून तरी गर्भवती झाल्याचे आढळले. मग तिचे स्वतःचे बीज जे वाग्दान झालेले आहे, तिचे स्वतःचे शरीर जे तिच्या प्रियकराला वाग्दत्त झाले आहे, तिच्या वाग्दत्त पतीला, ते दुसऱ्या पुरुषाच्या बीजाने भरलेले आढळले आहे. काय एक कलंक! तेच तंतोतंत काय ते आदामाला आढळले.

तेच काय ते ख्रिस्ताला आढळले. थांबू शकली नाही. आज लोकांबरोबर तीच काय ती बाब आहे. ते त्या खऱ्या पवित्र आत्म्याला मंडळीला दर्जावर घेऊन जाण्यासाठी थांबू शकत नाही. त्यांना काहीतरी उत्पादित करायचे आहे, काहीतरी भावनावश करायचे आहे - प्राथमिक पुरावा, अन्यभाषेत बोलणे - मंडळीमध्ये अधिक सदस्य मिळविणे, ख्रिस्ताच्या पुनरुत्थानाचे वास्तविक प्रकटीकरण जो स्वतःला लोकांमध्ये ज्ञात करुन देतो या प्रकारच्या सर्व निरर्थक गोष्टी यासाठी परमेश्वराची वाट पाहण्याऐवजी. ती वाट पाहू शकत नाही.

209 तिने काय केले? ती बाहेर गेली आणि संप्रदायवादाने गर्भवती झाली. प्रथम असेम्ब्ली ऑफ गॉड होते; मग एकत्व आले, मग त्यानंतर

कितीतरी अधिक आले. आता तथाकथित वधू ही सर्व प्रकारच्या निरर्थक गोष्टींनी, कलंकाने गर्भवती आहे. जगामध्ये कशासाठी ही स्त्रिया देवाचे वचन काय म्हणते त्याकडे थोडेसे अधिक लक्ष देणार नाहीत, पुरुष देखील देणार नाहीत, किंवा अगदी ते प्रचारक ही नाही. मग त्याला एक वधू म्हणतात!

ते काय आहे? ती गर्भवती आहे. ख्रिस्ताची वधू जगाने गर्भवती झाली आहे - जगाप्रमाणे पेहराव करते, जगासारखे वर्तन करते, मोठ्या मंडळ्या, चांगले.... ते दाखविते ती काय आहे. ती सैतानाची आहे! तेच काय ते पहिल्या जागी सैतानाने केले, स्वर्गात एक मोठे सुंदर राज्य उभारण्याचा प्रयत्न केला आणि त्यातून लाथ मारुन बाहेर काढण्यात आले - स्वर्गातून बहिष्कृत करण्यास आले. आणि तशीच जशी ख्रिस्ताची आधुनिक वधू आहे, तिला लाथ मारण्यात आली, कारण ती देवाकडून बहिष्कृत करण्यात आली आहे, कारण ती एक कलावंतीण आहे आणि एक कुमारी नाही. ते गहन आहे, परंतु मी आशा करतो तुम्हाला ते कळले आहे.

210 आदामाची वधू वाट पाहू शकत नव्हती, परंतु तिने अनैतिकरित्या तिचे बीज मिसळले, अनैतिकरित्या. आपण देवाचे वचन आणि केवळ त्याच्यावरच विश्वास करायला हवा!

आता बंधुजनांनो, येथे आणि ध्वनिमुद्रणपट्टीवर, तुम्ही पाहता का मी या वचनासाठी, वचन ते वचन झटत आहे. मी तुम्हाला सांगितले आहे मी विश्वास करतो की ते देवाचे सत्य आहे. देवाने ते पवित्र शास्त्र जतन केले आहे. त्याला कशानेतरी जगाचा न्यायनिवाडा करणे आहे ... येशू ख्रिस्ताद्वारे जो वचन आहे. आणि येशू ख्रिस्त होण्यासाठी हा शब्द देह बनला. मी फक्त ते शोषू देत आहे. लक्षात ठेवा, ते वचन. आणि आता तो तिला पूर्णपणे बिघडलेली पाहतो. तुम्ही विचार करता तो अशा प्रकारच्या गोष्टीशी लग्न करील? कधीही नाही. तो पवित्र आहे.

ती वाट पाहू शकत नव्हती. अनैतिक, तेच काय ते आदामाला आढळले.

211 आता भावांनो, बहिणींनो, मागे पहा. जर तुम्ही कोणत्याही गोष्टीच्या सावलीकडे पाहता, ती प्रत्यक्ष अभिव्यक्ती आहे त्या वास्तविक प्रतिमेची जी येत आहे. तेव्हा तुम्ही पाहता आदामाला आढळले की पत्नी गर्भवती होती. आणि ती म्हणाली, "सर्पाने मला भुरळ घातली."

आता, ते मी दोन्ही बाजूने घेणार आहे अगदी काही क्षणातच, परमेश्वराची इच्छा असल्यास, पहा, तुम्हाला दाखवितो की त्यासाठी हे दुसरे काही असणे अशक्य आहे.

212 आता, आदामाची वधू वाट पाहू शकली नाही, परंतु ती प्रथम पुढे गेली. त्याच प्रकारे आज आहे, आजची वधू. तिला काहीतरी उत्पन्न करायचे आहे. "देवाचा गौरव असो!" - तिला काहीतरी व्यासपीठावर भावनिक करायचे आहे. तिला सर्वकाही हवे आहे, पहा. ती काय करीत आहे - काहीतरी उत्पादित करीत आहे.

पहा ते कोठे जात आहे. तुम्ही पाहू शकता त्यामध्ये तेथे काही नाही; ते बनावट आहे. तंतोतंत बरोबर. जर ते नव्हते, हे जग देवाच्या सामर्थ्याने ज्वलंत झाले असते; मंडळी ज्वलंत असती; ओह, मृतांना उठविले गेले असते आणि सर्व प्रकारच्या गोष्टी घडल्या असत्या. परंतु ख्रिस्त तिच्याकडे जाण्यापूर्वी ती कशाद्वारे पेरली गेली, तो त्याचे स्वतःचे बीज तिच्यामध्ये पेरण्यापूर्वी? तिच्याकडे काय होते? - निंदणाची बीजे, जग, सांप्रदायिक बीजे. त्यामुळेच तर ती आता तिच्या पिकाची कापणी करीत आहे. मी आशा करतो हे तुम्हाला नाराज करत नाही, परंतु मी आशा करतो ते अगदी सरळ त्या जागी जाईल जेथे मी भरवसा करतो की देवाने ते तुम्हाला दिलेले आहे, पहा.

213 आता, तिने तिचे बीज अनैतिकरित्या मिसळविले, वचनासाठी अनैतिक. ती काय शोधण्याचा प्रयत्न करीत होती? (आता लक्षपूर्वक ऐका.) ती कशाच्या पाठी होती? - शहाणपण! शहाणपण! आणि तेच काय ते आज तिने केले आहे. तिने तिचे प्रचारक शाळेत पाठविले आहेत, त्यांना यंत्रावर उबविण्यासाठी, मानसशास्त्र, सर्व प्रकारच्या गोष्टी ज्या अगदी पवित्र शास्त्रात देखील नाहीत. आणि ती तिची अंडी उबवीत आहे. आणि जेव्हा तिने केले, तिने अशा लोकांचा जमाव उत्पन्न केला जे काहीही तडजोड करतील आणि प्रत्यक्ष देवाचा संदेश नाकारतील, ती काय करीत आहे हे न कळता.

ती त्याबाबत अज्ञानी आहे. ती विश्वास करीत नाही - ती चुकीची आहे असा ती विचार करीत नाही. तसाच हव्वेने देखील विचार केला नाही की ती चुकीची होती. हव्वेने विचार केला ती बरोबर होती. आणि जर ते एक प्रतीक होते, आणि हे पूर्वदर्शीत चिन्ह आहे, याला त्याच प्रकारे कार्य करणे आहे जसे प्रतिकाने केले. आता ते फक्त ... माझ्यासाठी ते फक्त दोन वेळेस दोन बरोबर चार आहे.

214 आता लक्ष द्या, हव्वेच्या मुलांचे काय झाले? तो पहिला एक जो जन्मला - आता जर देव म्हणाला, "बहुगुणीत व्हा [त्याच्या वधूला, आदामाच्या वधूला] आणि व्यापून टाका - बहुगुणीत व्हा आणि पृथ्वी व्यापून टाका," ती देवाची सोपविलेली कामगिरी होती; आणि तिने ते केले असते, आणि त्याने ते केले असते, त्या दोघांनी एकत्र मिश्रित होऊन. परंतु काय घडले? जेव्हा आदाम तिच्याकडे येण्यासाठी तयार झाला, ती अगोदरच माता होती. पहा मला काय म्हणायचे आहे?

आता तीच गोष्ट ख्रिस्ताच्या मंडळीत घडली आहे, ख्रिस्ताची वधू. आता आपण त्याहून ही मागे जात आहोत एका मिनिटात. लक्ष द्या, या वधूमध्ये, मग तिने काय केले? तिचे पहिले मूल जन्मले, ते एक अनौरस मूल होते, आणि तो मृत्यूने भरलेला होता आणि मृत्यूला कारणीभूत झाला. आणि त्यानंतर प्रत्येकावर मृत्यू आला! आता तुम्ही पाहता तो लैंगिक समागम असायलाच हवा होता. जर तो लैंगिक समागम नव्हता मग तुम्ही का मरत आहात? जेव्हा देव कामगिरी देतो जिचा नाश होऊ शकत नाही! देवाचे वचन अनंत आहे! ते अपयशी होऊ शकत नाही! जेव्हा तो म्हणाला, "बहुगुणीत व्हा आणि पृथ्वी व्यापून टाका" - तो देवाचा अनंत हेतू होता. तो अमलात आणण्यात तुम्ही मरु शकत नाही, कारण तो त्याचा शब्द आहे. तुम्हाला जगणेच आहे. आणि जर ते मूल योग्यरितीने जन्माला आणले असते, तेथे मृत्यू नसता; परंतु ती वाट पाहू शकत

नव्हती.

215 आज तीच काय ती बाब आहे. तुम्हाला कोणत्या तरी प्रकारची बनावट रचना हवी आहे, किंचाळणे, उड्या मारणे, अन्यभाषेत बोलणे, किंवा काहीतरी याबरोबर, देवाचे वास्तविक वचन वधूद्वारे प्रकट होण्याची वाट पाहण्याऐवजी. ते जे वचन घेतात ती देवाची खरी वधू आहे, मुले जन्माला आणते. ती मरु शकत नाही. एक मूल, वधू वचनावर जन्माला आणते, ते मरु शकत नाही कारण ते वचन आहे. आमेन. तुम्हाला ते कळले? ती मरु शकत नाही कारण ती.... ते मूल मरु शकत नाही कारण ते एक वचन मूल आहे; ते एक बीज मूल आहे; ते एक अनंत मूल आहे. हालेलूया!

तेच तंतोतंत काय तो येशू ख्रिस्त होता - एक बोललेले अनंत मूल. त्याला मरावे लागले नसते, परंतु ऋण फेडण्यासाठी त्याने ते केले. तोच केवळ एक मार्ग होता ज्याद्वारे ते फेडले गेले असते. कोणी इतर ते करु शकत नव्हते; ते सर्व लैंगिक समागमातून जन्मलेले होते सैतानानुसार, त्याची योजना. तुम्हाला आता ते कळले? पहा?

216 परंतु प्रत्येक मनुष्य, काही फरक पडत नाही तो पोप आहे, याजक, बिशप, तो जे काही असेल, तो मरतो कारण तो एक संकरित आहे. ते अगदी तंतोतंत आहे! तो सैतान आणि हव्वेमध्ये जन्मला होता. तुम्हाला जे काही म्हणायचे असेल ते म्हणा, तो सैतान आणि हव्वा होती. त्या मूळ शब्दाला त्याबरोबर काही कर्तव्य नव्हते. तो मूळ शब्द जीवन होता. त्याने तो संकरित केला आणि त्याने तो मृत्यू आणला! आणि जेव्हा आज मंडळी जी स्वतःला पेन्टिकॉस्टल म्हणविते, स्वतःला बॅप्टिस्ट म्हणवितात, जे काय त्यांना म्हणायचे असेल, जेव्हा ते हे वचन मतप्रणालीबरोबर संकरित करतात, ते एका मृत मुलाला उत्पन्न करतात. आणि तिच्यामध्ये जीवन असू शकत नाही! ती मृत आहे आणि तिची मुले मृत आहेत!

देव म्हणाला, "मी तिला जगाच्या बिछान्यावर टाकीन आणि तिच्या मुलांना ठार करीन." देव असे प्रकटीकरणात म्हणाला. किती जणांना ठाऊक आहे ते सत्य आहे? तिला जगिक अंथरुणावर टाकेन (तेथेच जेथे ती आहे), आणि तिच्या मुलांना ठार करीन, अगदी अग्नीबरोबर. आपण पाहतो कुठे.... त्या गव्हामध्ये असलेल्या निंदणाचे काय होते? - जाळले जाईल. ओह, तुम्ही वचनाला खोटे ठरवू शकत नाही. ते सत्य आहे. काही वेळेस तुमच्या मनात शंका येते आणि आपण त्याला चुकीचे करु शकतो, परंतु जर तुम्ही त्याला सरळ राखाल, ते एक-दोन, एक-दोन, एक-दोन, एक-दोन मध्ये, सरळ धावेल. तिला जगिक अंथरुणावर टाकले. ती मृत मुले सोडून अजून काहीही आणू शकत नाही.

217 मग जर संप्रदाय केवळ संकरित मूल आणू शकते, तुम्हाला कशासाठी त्याच्या मालकीचे असायला हवे? आता भावांनो, त्याच कारणास्तव मी त्यांच्या विरुद्ध आहे. ती सुरुवातीपासूनच कलावंतीण आहे. पवित्र शास्त्र म्हणते ती एक - वेश्या होती. ते स्पष्ट शब्द आहेत, परंतु मी तुम्हाला सांगितले होते आज मी स्पष्ट बोलणार होतो. तेच काय ते ती आहे. देवाचे वचन घेण्याऐवजी ती मतप्रणाली आणि पंथ घेऊन आत्मिक व्यभिचार करते, तिच्या मुलांना त्याच गोष्टी करण्यास शिकविते.

आता, तिची मुले गर्भाशयातून, मेलेली आली. तिला देखील मरणे आहे. ते तंतोतंत बरोबर आहे. अगदी तसेच जसा प्रत्येक मनुष्य.... ऐका, अगदी तेवढेच निश्चित जसा प्रत्येक मर्त्य व्यक्ती जो स्त्रीच्या गर्भाशयातून येतो तो मरणार, तसाच प्रत्येक व्यक्ती जो त्यांच्याद्वारे जन्मेल तो मरेल, कारण ती एक संकरित आहे, अनैतिक, आणि तिची मुले अनैतिक आहेत. ते बरोबर आहे. मी आशा करतो ते तुमच्या डोक्यावरुन जात नाही.

218 आता, एकदा यहोवाची एक वधू होती. आदामाची एक वधू होती, येशूची एक वधू होती, यहोवाची एक वधू होती. तुम्हाला ते ठाऊक आहे? त्याला तिला सोडून द्यावे लागले. ती एक कलावंतीण झाली, म्हणून त्याने तिला सोडून दिले. तेच काय ते तंतोतंत त्याने केले. ती एक कलावंतीण, वेश्या झाली. तिने ते करण्यासाठी काय कारणीभूत ठरले? (मी इच्छा करतो आपल्याकडे ते वाचण्यासाठी वेळ असता. थोड्या वेळाने मी त्यातील काही घेईन.) आता सरळ, ते शमुवेलाच्या समयी होते जेव्हा इस्राएलाकडे एक राजा होता, एक देव, आणि ती एक कुमारी होती. ती काहीतरी उत्पन्न करणार होती. आणि काय घडले? ती सभोवती पाहू लागली आणि पाहिले की इतर राष्ट्रांकडे राजा होता, तेव्हा तिला त्या सर्वांसारखे व्हायचे होते.

219 तुम्ही पेन्टिकॉस्टच्या दुष्परिणामाबद्दल बोलता, तेच काय ते तंतोतंत तुम्ही केले आहे. जेव्हा हा वृद्ध प्रचारक येथे बसलेला, आज जवळ जवळ एक शंभर वर्षाचा आहे, जेव्हा पेन्टिकॉस्टची तेथे मागे सुरुवात झाली, तुम्ही त्यांना संस्थेबद्दल काही सांगू शकत नव्हते. त्यांनी ते ऐकले नसते. त्यांनी त्या गोष्टींना सैतानाचे म्हटले, आणि ते लोक बरोबर होते! परंतु तुम्ही काय केले? तुम्हाला बाकी मंडळ्यांसारखे वर्तन करायचे होते. तुम्हाला ती संस्थागत करायची होती. मग, जसा तो म्हणाला, तुम्ही तुमच्यामध्ये कुंपण आखले. शिकवण्यास गेलात, "हे शिकवायचे नाहीच. देवाचा गौरव असो! हालेलूया! अशाप्रकारे," आणि वर खाली उडी मारा आणि अन्य भाषेत बोला, म्हणतात, "त्याला सदस्य म्हणून आत घ्या; त्याला ती मिळाली आहे." त्याचा योग्य बाप्तिस्मा झाला नाही - पाण्याने ही नाही आणि आत्म्याने ही नाही. तो चुकीचा आहे आणि त्याची फळे ते सिद्ध करते. त्याच्याकडे चुकीच्या प्रकारचे बीज आहे वाढण्यासाठी. "देव धन्यवादित असो, भावा, आम्ही तुझ्यावर येथे हात ठेवतो आणि तुला वडील बनवितो! मी तुम्हाला सांगतो काय, आपण येथे संस्था उभारणार आहोत इतकी की ती असेम्ब्लीपेक्षा मोठी असणार आहे!" अगदी अशाप्रकारे ते गेले. पेन्टिकॉस्टलचा, किंवा कोणत्याही मंडळीचा इतिहास वाचा आणि बघा जर ते तसे नाही.

220 बॅप्टिस्टला मेथडिस्टपेक्षा वरचढ व्हायचे आहे. मेथडिस्टला लूथरनपेक्षा वरचढ व्हायचे आहे. लूथरनला कॅथोलिकपेक्षा वरचढ व्हायचे आहे. प्रत्येकाला वरचढ व्हायचे आहे, कोणापेक्षातरी वरचढ व्हायचे आहे. पहा, तो संस्थेचा आत्मा आहे. येशू म्हणाला, "परंतु तेथे थोडे असतील जे वाचविले जातील. संकोचित दरवाजा आहे आणि मार्ग अरुंद आहे परंतु थोडे आहेत ज्यांना तो सापडेल." फक्त थोडे. जर तो म्हणाला थोडे (तो देवाचा शब्द आहे, ते बीज आहे), तेथे थोडे असतील. तेथे दहा दशलक्ष आणि दशलक्ष नसतील. ते अगदी थोडे असतील ज्यांना तो सापडेल.

ते जे त्यासाठी पूर्वनिर्धारित असतील, ते ते ऐकतील. आता आगोटीचा पाऊस पुढे गेला आहे.

221 आता, यहोवाकडे एक वधू होती जिला तो प्रेम करीत होता, परंतु ती वेश्यावर्तन करीत गेली. तिने काय केले? - या जगाच्या इतर सामर्थ्यांपाठी गेली. आणि त्याने या पापभिरु, वृद्ध, अभिषिक्त संदेष्ट्याबरोबर काय केले? जे देवाचे वचन संदेष्ट्याकडे येते. त्याने त्या वृद्ध संदेष्ट्याला नेले, शमुवेलाला, त्याच्याकडे चालत आला; तो म्हणाला, "मुलांनो, माझ्याभोवती एक मिनिटासाठी एकत्र गोळा व्हा, मला तुमच्याबरोबर बोलायचे आहे, तुम्हा सर्वांबरोबर. तुम्हाला कशासाठी राजा हवा आहे? यहोवा तुमचा राजा आहे. तुम्हाला पंथ कशासाठी पाहिजे? पवित्र शास्त्र तुमचा पंथ आहे. पवित्र शास्त्र सत्य आहे. पंथ हे खोटे आहेत. ते मृत आहेत, मानवनिर्मित." प्रेषितांचे पंथ, मला तो पवित्र शास्त्रात दाखवा. कोणीतरी अशी एक गोष्ट ऐकली आहे का? "मी संतांच्या सहभागितेत विश्वास करतो." जो कोणी संतांच्या सहभागितेत विश्वास करतो तो एक परलोकविद्यावादी आहे. मृतांबरोबर सहभागिता. तेथे मनुष्य आणि देवादरम्यान केवळ एक मध्यस्थ आहे, जो ख्रिस्त आहे, आणि तो मेलेला नाही, परंतु तो सदासर्वदा जिवंत आहे, मेलेल्यांतून उठलेला आहे. प्रोटेस्टंट वाळलेल्या कॉलरने ते खाली गिळतात आणि मला अजून काही ठाऊक नाही, मंडळ्यांच्या सर्व प्रश्नोत्तरांद्वारे दिलेल्या शिक्षणाने, ते सरळ खाली गिळतात अगदी त्याच प्रमाणे. अगदी बाकीच्या जगासारखे, त्यांना ते आवडते.

222 "ओह, तुम्हाला माहित आहे, आम्ही पेन्टिकॉस्टल असत असू. आम्ही कोपऱ्यावर आमच्या हाती डफ घेऊन उभे राहिलो आणि प्रार्थना केली; आणि त्या स्त्रिया तेथे उभे असलेले आणि त्यांचे लांब केस खाली लोंबकळत असलेले आणि देवाची स्तुती करीत आणि अशा प्रकारच्या गोष्टी." ओह माझ्या देवा, ते करण्यापेक्षा तुम्हाला चांगले ठाऊक आहे. ते सरळ तुमच्या तोंडावर हसतील, एक खरा ख्रिस्ती हसेल. तेथे बाहेर उभे असलेले कापलेल्या केसांचा टोप अशाप्रकारे आणि अशा प्रकारे मोठा रंगविलेला चेहरा आणि एक पेहराव कातडी काढलेल्या माणसासारखा दिसतो, आणि अशाप्रकारे बाहेर जात, आणि स्वतःला तेथे देवाचा संत म्हणवीत? तुम्हाला ह्यापेक्षा चांगले ठाऊक आहे! तसेच जगाला देखील त्यापेक्षा चांगले ठाऊक आहे. तुमच्यावर लज्जा असो. बरे होईल तुम्ही कोपऱ्यापासून दूर राहाल, जर तुम्ही त्यापेक्षा अधिक काही उत्पन्न करु शकत नाही. मी टीकाकार नाही, माझा माझ्यावरील ताबा सुटला नाही. मी तुम्हाला सत्य सांगत आहे, आणि येणाऱ्या दिवसात तुम्हाला ते आढळेल.... परंतु ते अगदी तसेच आहे जसे ते नेहमी होते, आणि ते नेहमी वरुन जाईल आणि मग ते पाहणार नाहीत जोपर्यंत ते खूप दूर असेल. त्यांनी तसे प्रत्येक समयी केले आहे. त्यांनी ते केले आहे, ते केले आहे.

223 इतर लोकांसारखे यहोवाच्या वधूला वैश्यवर्तन करायचे होते, त्या इतरांसारखे. तेच काय ते येशूच्या वधूला करायचे होते. वृद्ध शमुवेल, ज्याच्याकडे वचन आले ... वचन कोणाकडे आले? - त्या संदेष्ट्याकडे. तो वृद्ध संदेष्टा चालत आला आणि काय म्हणाला, "आता फक्त एक मिनिट, मुलांनो. तुम्हाला बाहेर त्यापाठी का जायचे आहे?" म्हणाला, "मी कधी तुम्हाला परमेश्वराच्या नावात सांगितले आहे का जे प्रत्ययास आले नाही?" ते लक्षात आहे? किती जणांनी ते वाचले आहे? निश्चित तुम्ही वाचले आहे. "मी कधी तुम्हाला परमेश्वराच्या नावात काहीही सांगितले आहे का जे प्रत्ययास आले नाही. आणि दुसरी गोष्ट, कधी मी मोठ्या मोहिमा, किंवा इत्यादी घेण्यास गेलो, आणि तुमचे सर्व पैसे तुम्हापासून हिरावून घेतले? मी केले आहे," म्हणाला, "मी कधी भीक मागितली आहे कोणती...." मी आता शमुवेलाबद्दल बोलत आहे. कोणीतरी ज्याच्याकडे देवाचे वचन येते. तो म्हणाला, "मी कधी तुम्हाला विचारले आहे घेण्यासाठी ... इतके टाकण्यासाठी आणि अमुक अमुक गोष्ट करण्यासाठी?"

"नाही," ते म्हणाले, "नाही, तू कधीही ते केले नाही. तू आम्हाला योग्य सोडून अजून काही ही कधीही सांगितले नाही."

तो म्हणाला, "मग का तुम्हाला त्यापाठी जायचे आहे?"

ते म्हणाले, "शमुवेला, तू अगदी योग्य आहेस, परंतु कसेही करुन आम्हाला तो हवा आहे."

224 तेच तंतोतंत काय ते पेन्टिकॉस्टल मंडळीने केले. त्या कारणामुळे मी त्यांना सामील होत नाही. निश्चित, मला देवासमोर त्याच्या वचनाबरोबर एक कुमारी राहायचे आहे. ते.... माझ्याकडे महान मोठी प्रदर्शने आणि अशा प्रकरच्या गोष्टी असण्याची गरज नाही. मी ते नाकारले आहे. मला स्वतःला बांधून घ्यायचे नव्हते. ते माझे शहाणपण नव्हते; ते देवाचे शहाणपण होते. जर मला बाहेर जायचे असेल जेणेकरुन मी ... लोकांच्या सभोवती आणि सैतानाबरोबर राहून आणि त्यांना सांगेन, "होय, मला प्रसारणासाठी इतके आणि इतके पैसे हवे आहेत, आणि यासाठी मला इतके आणि इतके हवे आहेत; तुम्हाला त्यासाठी देणेच आहे," मला देखील, त्याप्रमाणे दोऱ्या खेचाव्या लागल्या असत्या. परंतु मी तुम्हाला कधीही परमेश्वराच्या नावात काही सांगितले नाही जे प्रत्ययास आले नाही. मी वचन सोडून अजून काही तुम्हाला सांगितले नाही. तुम्हीच न्यायनिवाडा करा. मी कधी तुमच्याकडे काही मागितले आहे? नाही, महाशय. नाही, देवाने त्या सर्वांची काळजी घेतली आहे. मला पाठिंबा देण्यासाठी माझ्याकडे मोठे कार्यक्रम नाहीत. माझ्याकडे कधी एक असणार नाही. प्रत्येकजण जो देवाच्या मालकीचा आहे तो देवाचे ऐकेल! फक्त आत्म्याच्या नेतृत्वाची जाणीव ठेवा कुठे जायचे आणि काय करायचे आणि ते करा. बस एवढेच गरजेचे आहे. ते राखा, एक महान मोठा लक्षावधी डॉलर कमवण्याचा कार्यक्रम नाही - लक्षावधी आणि लक्षावधी आणि लक्षावधी, आणि त्यांच्यातील काही आता त्यामध्ये लक्षावधी आणि अब्जावधी उभारीत आहेत.

225 मला टीका करण्याबद्दल वाईट वाटत नाही. ती अपेक्षित टीका आहे. मला कोणाच्याही भावना दुखवायच्या नाहीत, परंतु देवाच्या भावना दुखविण्यापेक्षा मनुष्याच्या भावना दुखविणे मी पसंत करीन. जर त्याने तुम्हाला कामगिरी सोपवून दिली आहे आणि तुम्हाला येथे बाहेर पाठविले आहे या गोष्टी करण्यासाठी आणि लोकांमध्ये ते सिद्ध केले आहे, मग तुम्ही ते ऐकायलाच हवे. मी तुम्हाला सत्य सांगत आहे. ते सत्य आहे हे देव सिद्ध करीत आहे. केवळ.... केवळ चिन्हांद्वारे नाही, परंतु तो त्याच्या वचनाद्वारे ते सत्य आहे असे सिद्ध करीत आहे. ते तंतोतंत बरोबर आहे.

226 तेव्हा यहोवाच्या वधूने वेश्या वर्तन केले, आणि तिने काय केले? - तिने परत अनैतिकांचा जमाव आणला. ते बरोबर आहे का? आपल्याला

ठाऊक आहे ते सत्य आहे. अगदी राजा नबुखद्नेस्सरद्वारे आणि इत्यादी द्वारे घेऊन जावे लागले. ख्रिस्ताच्या वधूने तीच गोष्ट केली आहे. काय बाब आहे? - वाट पाहू शकत नाही. ओह, नाही. उह्ह-उह्ह-अगदी वाट पाहू शकत नाही.

त्यांना काहीतरी उत्पादित करायचे आहे. ते पवित्र आत्मा येऊन, मंडळीमध्ये जावा यासाठी वाट पाहू शकत नाही. पहा, त्यांना त्यांच्या संप्रदायामध्ये जास्त लोक हवे आहेत. जर ते मागे पलीकडे शंभर वर्षाअगोदर जसे होते, किंवा पन्नास वर्षाअगोदर, जेव्हा पेन्टिकॉस्ट प्रथम यानंतरच्या दिवसात सुरु झाले, जेव्हा वचन प्रचार केले जाऊ लागले, जर ते तसेच राहिले असते, तिच्यामध्ये कदाचित आज पन्नास सदस्य देखील नसते. ते बरोबर आहे. परंतु ते रक्ताने धुतलेले असते! त्यांच्यामध्ये देवाचे सामर्थ्य असते! तिच्या वचन देहातून वचन ते वचन बोलण्याच्या प्रचंड प्रभावाने जग हादरले असते. परंतु आज, का, ती एक झणझणणारी झांज आणि वाजणारी थाळी आहे. ते बरोबर आहे. फक्त एक अर्थहीन, एक थट्टेचा विषय, जगासाठी कलंक, देवासाठी कलंक झाली आहे.

227 मी एका ठिकाणी गेलो, तीन भाऊ.... दोन भाऊ आणि मी एका ठिकाणी स्प्रिंगफील्ड, मिसूरी पलीकडे गेलो, त्या सकाळी न्याहारीसाठी, ॲरिझोना वरुन येताना. आणि एक लहान महिला तेथे जिच्याकडे भाऊ वुडने माझे लक्ष वेधले जी आपली बहीण कॉलिन्सप्रमाणे दिसत होती - पिंगट रंगांच्या केसांची, मोठा केसांचा जुडा मागे होता. आणि तो म्हणाला, "ती भाऊ विलार्ड कॉलिन्सच्या पत्नीसारखी दिसत नाही का?"

मी म्हणालो, "ती दिसते." तेथे एक वृद्ध महिला बाहेर आली, आणि मी म्हणालो, "मी कल्पना करतो ती तिची आई आहे. त्या केसांच्या मोठ्या जुड्याकडे पहा." मी म्हणालो, "ते सरळ येथे असेम्ब्ली ऑफ गॉड मंडळीच्या बाजूला आहे, त्या असेम्ब्ली ऑफ गॉड मुख्यालयात; तेथेच जेथे ... त्या कारणामुळे त्या अशाप्रकारे आहेत." आणि खूपशा लहान बहिणी तेथे वॉटरहेड पद्धतीने केस कापलेल्या तेथे बाहेर होत्या; त्या विद्यार्थिनी होत्या. लहान रिकी आणि त्या सर्व बाहेर तेथे, तुम्हाला माहित आहे, असभ्य वर्तन; त्या सर्व त्यांच्या खाकेखाली पवित्र शास्त्र ठेवून होत्या.

228 तेव्हा, त्या सर्व जोपर्यंत हसत, खिदळत, अगदी आधुनिकांप्रमाणे असभ्य वर्तन करीत - त्या सर्व गेल्या नाही तोपर्यंत आम्ही त्यांना न्याहाळले.... ते उद्यासाठी येणारे पेन्टिकॉस्टचे पीक आहे - जर तेथे उद्या असेल. का! का! का! - कारण तेच बीज आहे जे पेरले गेले आहे. तंतोतंत बरोबर.

जेव्हा ती बाहेर गेली, त्या सर्व बाहेर गेल्या, ती लहान महिला बाहेर आली आणि म्हणाली, "मी तुम्हा सर्वांसाठी काही करु शकते का?"

मी म्हणालो, "मला तुला एक प्रश्न विचारायचा आहे."

"होय, महाशय?"

मी म्हणालो (एका अनोळख्यासारख्या, मी विचार केला तिला कदाचित आम्ही माहिती असू) - आणि मी म्हणालो, "तेथे ते पलीकडे पवित्र शास्त्राचे विद्यालय नाही का?"

ती म्हणाली, "होय, महाशय, ते आहे."

मी म्हणालो, "मी अंदाज करतो तुला तेथून फार मोठ्या प्रमाणात व्यवसाय मिळत आहे." (आता की भाऊ फ्रेड सॉथमन तेथे बाहेर बसलेले आहेत आणि भाऊ बॅंक्स वुड, मंडळीचे दोन विश्वस्त.) आणि मी म्हणालो....

ती म्हणाली, "होय, ते आहे."

मी म्हणालो, "मी अंदाज करतो तू तेथून आहेस?"

ती म्हणाली, "नाही," म्हणाली, "मला क्षमा करा, मी नाही."

आणि मी म्हणालो, "कारण की मी तसा विचार केला कारण ते सुंदर लांब केस जे तुझे आहेत. आणि मी समजतो ती तुझी आई आहे?"

ती म्हणाली, "नाही, महाशय"; म्हणाली, "ती फक्त येथे काम करते." ती म्हणाली, "नाही, मी नाही...." म्हणाली, "मला लांब केस आवडतात. मला एक लहान मुलगी आहे, आणि तिचे देखील, मी लांब केस राखले आहेत," आणि म्हणाली, "माझ्या पतीला लांब केस आवडतात."

मी म्हणालो, "देव त्याला आशीर्वादित करो."

229 आणि तेव्हा ती म्हणाली, "बरे," ती म्हणाली.... मी म्हणालो, "बरे, हे विचित्र आहे. त्या येथे विद्यार्थिनी होत्या का, त्या मुली त्या प्रकारच्या केस कापलेल्या, पहिल्या महिलेसारख्या?"

"होय."

मी म्हणालो, "धन्यवाद"; बाहेर पडलो. मी म्हणालो, "देवाने त्या स्त्रीला तेथे त्या अनौरस जन्मलेल्या मुलांच्या जमावाखातर तेथे रस्त्याच्या पलीकडे निषेधासाठी ठेवले आहे!"

ते बरोबर आहे, अनैतिक, जगाच्या गोष्टींच्या पाठी. किती स्त्रिया ईजबेलीपाठी, भूमीतील पहिली महिला, त्यापैकी किती जणी तुम्ही विचार

करता आज रात्री स्वर्गात आहेत, आज? पहा? जगाच्या गोष्टी.... जर तुम्ही जगावर किंवा जगातील गोष्टीवर प्रेम करता, अगदी तुमच्यामध्ये देवाची प्रीति ही नाही. ते काय आहे? - पेन्टिकॉस्टच्या उद्याच्या पिकावरील मलई - सर्वात मोठी देशातील चळवळ. तेथे तुम्ही आहात. ती वधू आहे. मला ते कळत नाही.

230 ठीक आहे, ती काय करण्याचा प्रयत्न करत आहे? ओह, ती व्यासपीठावर थोड्याशा उड्या मारण्याचे उत्पादित करते - त्यांची थट्टा करीत नाही; ते ठीक आहे. ती अजून काहीतरी उत्पादित करते. का? - मंडळीमध्ये सदस्य मिळविण्यासाठी. काय बाब आहे? ती फक्त वाट पाहू शकत नाही, पहा. ती देवाने ते करावे यासाठी वाट पाहू शकत नाही. त्यांना कोठूनतरी तेथे सदस्य आणणे आहे. तेव्हा ते त्यांना सांगतात, "तुम्हाला ते करणे आहे," आणि ते निघून जातात. पहा, तेथे ते बीज सरळ वर येत आहे. तुम्हाला ते करणे आहे.

231 मी एक धर्मप्रचारक आहे. मी आफ्रिकेतील लोकांना प्राण्यांचे रक्त घेऊन, स्वतःवर अशाप्रकारे ओतताना पाहिले आहे (पूर्ण नग्न, पुरुष आणि स्त्रिया), त्यांच्या चेहऱ्यावर रंग लावतात - तेथूनच जेथून ते आले आहे; रंगरंगोटी ही अधार्मिक लक्षणातून आली आहे, ती मनुष्यप्राण्यांसाठी नाही, ख्रिस्तीजन, विश्वासूंसाठी; कधीच नव्हती. सर्व पवित्र शास्त्रात कधी केवळ एकाच स्त्रीने स्वतःची रंगरंगोटी केली नव्हती का, जी ईजबेल होती, एक सैतान.

तेव्हा ते त्यांच्या चेहऱ्यावर रंग लावतात, मोठे लांब असे काही लाकडाच्या ओंडक्यासारखे त्यांच्या कानात असते (झुलू) - तो एक लाकडाचा ओंडका आहे, ज्याने कानाचे मांस खाली लोंबकळते. काही वेळेस त्यांचे ओठ दुभंगतात आणि त्यांना वेगळे ठेवतात (विचार करतात ते सुंदर दिसते), रक्त, त्यांच्या छातीवर आणि खाली त्यांच्या पायांसभोवती आणि गोष्टींवर लावतात, आणि मग झेब्र्यासारखे पट्टे बनवितात, आणि आत्म्यात आरोळ्या मारतात, नृत्य करतात आणि अन्यभाषेत बोलतात, आणि सैतानाची उपासना करतात: पवित्र आत्म्याचा पुरावा!

232 मी अगदी तेथे भारतात होतो जेव्हा त्यांच्याकडे तेथे आगीवर चालणारे आणि इतर सर्वकाही होते आणि माहिती आहे हे सत्य आहे. एक भली मोठी मूर्ती तेथे होती जिच्या कानात माणिके कानातले म्हणून घातली होती आणि अशाप्रकारे गोष्टी आणि त्यांनी त्यांच्या शरीरामध्ये मांसात काही गोष्टी चिटकविल्या होत्या, यातनेसाठी आणि स्वतःला मारीत होते आणि त्यांचे ओठ शिवलेले होते ज्यांनी ते खोटे बोलले आहेत, आणि प्रायश्चित करीत होते आणि येथून त्यांच्या ओठांतून तलवार घातली होती किंवा त्यांच्या हनुवटीवरुन वर त्यांच्या नाकामधून आणि अशाप्रकारे ती बाहेर काढली होती; मोठा मासळीचा आकडा घेतात, नाताळच्या झाडाच्या चेंडूसारखा, जातात आणि तो पाण्याने भारतात आणि असे हजारो त्यांच्या शरीरावर, सरळ मांसांतून अडकवितात, आणि तेथे जातात आणि अशाप्रकारे या मुर्तीसभोवती नृत्य करतात, आणि बकरीचा वध करतात आणि अशाप्रकारे उपासना करतात, आणि न पोळता सरळ लाल तप्त अग्निवरुन चालतात. तुमच्यातील काही पेन्टिकॉस्टल लोकांनी तसा प्रयत्न करा!

233 परंतु तसे केले गेले - ती इब्री मुले. परंतु त्यांनी कधीही तुझ्या परमेश्वर देवाची परीक्षा घेतली नाही; त्यांना अगदी त्यामध्ये फेकण्यात आले. त्यांनी काहीतरी उत्पादन करण्याचा प्रयत्न केला नाही. तीच काय ती बाब आज पेन्टिकॉस्टल लोकांची आहे. ते काहीतरी उत्पादन करीत आहेत! ते वाट पाहू शकत नाही! ओह, देवा, ते अगदी वाट पाहू शकत नाही, तेव्हा ते व्यभिचार करतात. आमेन. काहीतरी उत्पन्न करण्याचा प्रयत्न करतात, आणि ते काय उपजविते? - जसे त्याने पहिल्या वेळेस केले, पहिली वधू जी वाट पाहू शकत नव्हती.

तिने एका अनौरस जन्मलेल्या मुलाद्वारे मृत्यू आणला ज्याची आपण सर्व मुले आहोत. परंतु देव आपल्याला दुसरा जन्म देण्यासाठी देवाचा मूळ पुत्र आणि कन्या म्हणून परत आणण्यासाठी देहात आला, पहा. तेथे तुम्ही आहात. हव्वेचा जीवनाचा जंतू कधीही झाला नाही. तो कधीही आला नाही. का? तिने तो मिश्रित केला, त्याला दूर ठेवले. एक वधू म्हणून नेमलेल्या समयी आदामाने तिच्याकडे येण्याऐवजी - अगदी जसा ख्रिस्त त्याच्या गटाकडे आला असता, ख्रिस्त त्याच्या मंडळीमध्ये आला असता; त्याने ते करण्याचे अभिवचन दिले. देवाने बहुगुणीत करण्याचे अभिवचन दिले, परंतु त्यांना देवाच्या समयापर्यंत वाट पाहणे होते.

234 आज तीच काय ती बाब आहे. त्यांना देवाच्या समयापर्यंत थांबायचे नाही. त्यांना अजून काहीतरी हवे आहे, आणि म्हणून अगदी तेथे त्यांना देण्यासाठी सैतानाकडे शहाणपण आहे. संस्था बनवा; इतरांसारखे मोठे व्हा.

आता तुम्ही पाहता का मी त्याच्याविरुद्ध आहे? निश्चित, मी माझ्यामध्ये जे काही आहे त्याने मी त्याच्याविरुद्ध आहे. जोपर्यंत तेथे वचन आहे, ते नेहमी त्याच्याविरुद्ध असेल. देव त्याच्या विरुद्ध आहे. देव म्हणाला तो होता. ते बरोबर आहे. अगदी वाट पाहू शकत नव्हते.

235 तेव्हा हव्वेचा जंतू कधी घडलाच नाही. सैतानाच्या लबाडीला संकरित झाला, त्याची सुंदर वधू प्रदूषित झाली. आणि तशीच ख्रिस्ताची वधू देखील. ती वधू - तिला कशाने प्रदूषित केले? (आदामाची वधू आता) - कारण ती कधीही देवाच्या वचनाबरोबर राहिली नाही. ते बरोबर आहे? मी विचारतो - आता, जर ते तसे नाही, तसे म्हणू नका; परंतु जर ते तसे आहे, तसे म्हणा. कारण की देवाची.... कारण की आदामाची वधू.... तेथे त्या तीन आहेत: आदाम, ख्रिस्त, देव. आदामाच्या वधूने कधीही योग्य जीवनाच्या मुलाला उपजवीले नाही कारण तिने देवाच्या वचनाचा अविश्वास केला. जर ते बरोबर आहे, "आमेन" म्हणा. कारण की यहोवाच्या पत्नीला दूर सारण्यात आले किंवा त्याच्या वधूला, कारण तिने देवाचे वचन नाकारले, तो संदेष्टा. ते बरोबर आहे? कारण की ख्रिस्ताच्या वधूला घटस्फोटामध्ये दूर सारण्यात आले कारण की तिने देवाचे वचन नाकारले आहे, जसे हव्वेने केले, जसे इतर सर्वांनी केले; तंतोतंत, सर्व कलावंतिणी, सर्व प्रदूषित. त्यांचे पती त्यांच्याकडे जाऊ शकले नाहीत. त्यांचे पती त्यांच्याकडे जाण्याअगोदर त्या अगोदरच गर्भवती होत्या.

ओह, देवा, जर ते दयनीय दृश्य नाही! एका तरुण पुरुषाचा विचार करा जो स्त्रीकडे येतो आणि त्याला आढळते तिच्यामध्ये कोणत्यातरी दुसऱ्या पुरुषाचे बीज आहे. काय एक गोष्ट! तेच काय ते देवाने केले आहे. तेच काय ते आदामाने केले. तेच काय ते ख्रिस्ताने केले आहे. ओह!

236 होय, कधीही वचनाबरोबर राहिल्या नाहीत आणि एका संकरित स्थितीला कारणीभूत झाल्या. तेच काय ते इस्राएलाने केले. पहा ती कोठे आहे? तेच काय ते ख्रिस्ताच्या वधूने केले. पहा ती कोठे आहे? - सरळ त्या इतर सर्वांबरोबर पाठी. ख्रिस्ताच्या पेन्टिकॉस्टल वधूने तीच गोष्ट केली.

ती आत्मिक वचन मुले आणू शकत नाही, कारण ती स्वतः संकरित आहे. कशी काय ती ते करु शकते जेव्हा ती स्वतः संप्रदायाबरोबर संकरित झाली आहे? त्यांच्याबरोबर सामील झाली आहे आणि सर्वकाही अगदी जसे ते आहे तसेच आहे. मंडळ्यांच्या परिषेदेमध्ये आहे आणि इतर सर्वकाही, अगदी बाकीचे सर्व जसे आहेत तशीच संकरित आहे. कशी काय ती करु शकते? ती करु शकत नाही.

237 आता, मला अगदी इतके काही बोलायचे आहे, आणि यावर मला अगदी त्वरा देखील करायची आहे. त्यातील प्रत्येक एकावर मला प्रचार करायचा आहे, पहा.

238 आता पहा, ती खरी वधू. हालेलूया! तेथे एक असणार आहे! का? ती पूर्वनिर्धारित आहे. ते संप्रदायात जाणार नाही, कारण ती पूर्वनिर्धारित आहे. तिला कोणत्या संप्रदायाबद्दल चिंता करण्याचे कारण नाही, ती अगोदरच ती जागा घेण्यासाठी पूर्वनिर्धारित आहे.

पहा, मरीयेप्रमाणे.... मला हवे आहे हे तुम्हाला आता समजावे आणि चुकवू नका. तुम्ही तयार आहात? म्हणा, "आमेन." जेव्हा ख्रिस्त त्याच्या वधूकडे येईल, ती त्या मरीयेसारखी कुमारी असेल, कारण देव ख्रिस्ताला एका कलावंतिणीच्या गर्भाशयाद्वारे आणणार नाही, आणि तसेच तो त्याच्या वधूला देखील आणणार नाही. त्याच्या वचनाच्या कलावंतिणीद्वारे तो त्याचे वचन आणू शकत नाही. ते भयंकर शब्द आहेत, परंतु तेच काय ते पवित्र शास्त्र म्हणते. ते जे काही म्हणते ते मी म्हणतो कारण हे समजणेच आहे.

239 खरी वधू, मरीयेसारखी, वचनाच्या वधूसाठी तिचे एक कुमारी गर्भाशय असेल, जो ख्रिस्त आहे. जेव्हा ख्रिस्त, ते वचन, वधूकडे येईल, ती अगदी जसा तो आहे तशीच असेल - वचनाद्वारे एक कुमारी. मी आशा करतो ते वरुन जात आहे, भाऊ नेविल, पहा. मी आशा करतो तुम्ही समजता. तो काय होता? - वचन! - देवाचे वचन. "त्याच्या वस्त्रावर त्याचे नाव लिहिलेले होते, 'देवाचा शब्द.'" "प्रारंभी शब्द होता, आणि शब्द देवासह होता, आणि शब्द देव होता ... आणि तो शब्द ... देही झाला, आणि आम्हामध्ये वस्ती केली." तो देव आहे, आणि देव हा शब्द आहे. आणि जेव्हा त्याची वधू येते, ती देखील तेच उत्पादन असेल जो तो आहे - कुमारी!

240 ख्रिस्त संप्रदायाच्या मालकीचा होता का? यहोवा होता का? तसेच त्याची वधूही नसणार! ती त्याचा भाग आहे. तिला मतप्रणालीची गरज नाही; तिच्याकडे कोणती असणार नाही. ती पूर्णपणे कुमारी असेल. कशी? - वचनाद्वारे. आमेन. देवाने बोललेल्या प्रत्येक शब्दाला ती "आमेन" द्वारे जोर देईल. आमेन. ओह, 'तुझ्या वचनाप्रमाणे मला प्राप्त होवो.' आमेन." ओह, माझ्या! तेथे तुम्ही आहात. देवाच्या वचनावर जोर द्या.

एक कुमारी गर्भाशय असू द्या. ती कशातून बाहेर येईल? - एका कुमारी गर्भाशयातून, तो शब्द. येशू कशातून बाहेर आला? - एका कुमारी गर्भाशयातून, पहा.

241 जेव्हा आदाम त्याच्या पत्नीकडे आला ती गर्भवती होती. तिने काहीतरी केले होते. ती मिश्रित झाली होती. तिने ... मुलाला संकरित केले, आणि ते मेले. परंतु जेव्हा योसेफ त्याच्या वधूजवळ आला, ती गर्भवती होती, परंतु जीवनाने. आदामाची पत्नी, किंवा आदामाची वधू, जेव्हा आदाम - ते एकत्र येण्याअगोदर - अगदी योसेफ व मरीयाप्रमाणे, अगदी ख्रिस्त आणि मंडळीसारखे आता (तुम्ही ते पाहत नाही? पहा) - आणि ते एकत्र येण्याअगोदर (आदाम व हव्वा), ती सर्पाच्या भ्रष्ट बीजाद्वारे गर्भवती होती; आणि जेव्हा आदाम त्याच्या पत्नीकडे आला ती त्याला मृत्यूमध्ये गर्भवती असलेली आढळली, पहा. मृत्यू! कशी? - आत्मिकरित्या, शारीरिकरित्या मृत; परंतु जेव्हा योसेफ, तो मानव, त्याच्या पत्नीकडे आला (गौरव! तिला महत्प्रयासाने धरुही शकला नाही!), ती जीवनाने गर्भवती होती, देवाचे वचन तुमच्यामध्ये देही झाले होते!

242 त्या बोललेल्या शब्दाला परत आणा! त्या देवाच्या शब्दाला परत आणा जो येथे शब्द होता - एका मानवी गर्भाशयातून आला. आमेन! कसेहीकरुन देव ते करील. तो ते बोलला, आणि ते तसेच होणे आहे. आमेन! तो आपला देव आहे. ओह, ते संपन्न आहे, भावांनो, जर तुम्ही ते विरघळवू शकता - तुम्ही त्यावर प्रहार करु शकता. तेथेच जेथे त्याला ती आढळली.

243 जेव्हा आदाम त्याच्या पत्नीकडे आला, ती चुकीच्या बीजाने गर्भवती होती. ते बीज मेले! जेव्हा योसेफ त्याच्या पत्नीकडे आला, ती गर्भवती होती. आता भिन्न गर्भरपणाला काय कारणीभूत ठरले? कारण की आदामाच्या पत्नीने वचनावर संशय घेतला. ते बरोबर आहे? योसेफाच्या वधूने वचनाचा विश्वास केला. तोच तो फरक आहे. तेव्हा मग ते काय आहे? ते वचन आहे! ओह, ते मौल्यवान वचन! देवाच्या वचनाद्वारे जग घडले गेले! हालेलूया! तेथेच अगदी माझी स्थिरता आहे. सर्व संप्रदाय आणि इतर सर्वकाही पडू दे, जे काही ते करणार आहेत ते करा. त्या वचनावर मी उभा आहे.

त्यामुळेच काय ते मी केले जे काही मी केले. त्यामुळेच मी संप्रदायांना खाली आणले. म्हणतात, "बरे तो अगदी एक ... मंडळ्या तोडतो." त्यांनी तीच गोष्ट आपल्या प्रभूबद्दल सांगितली. अगदी प्रत्येक समयी म्हणतात, पहा.

244 आता, आता त्याला ती आढळली. ख्रिस्त त्याच्या वधूकडे आला. त्याला ती कुठे आढळली? - तीच गोष्ट. का? जेव्हा तिने प्रथम सुरुवात केली ... (आता ऐका, मला वाटते तुम्ही हे चुकवू नये.) जेव्हा तिने सुरुवात केली, ती एक कुमारी होती. ती ठीक असणार होती. ती त्या प्रारंभीच्या मंडळीत सरळ पुढे गेली. ते अद्भुत असत असे. देवाने त्याला एक वधू दिली, आणि तिने काय केले? जर तुम्हाला इतिहास ठाऊक असेल, ६०६ मध्येच ती सरळ तेथे खाली जाते आणि रोमन मतप्रणालीने स्वतःला गर्भवती करते, किंवा संस्थेने. आणि तेव्हापासून, त्या म्हाताऱ्या

कलावंतीण मातेने पवित्र शास्त्रातील मंडळ्यांना जन्म दिला, आणि त्या वेश्या होत्या, जी एक कलावंतीण आहे - ते प्रोटेस्टंट आहेत - कारण त्या प्रत्येक एक सरळ तिच्यामधून जन्मल्या होत्या आणि प्रत्येक एकीने त्यांची स्वतःची गोष्ट - संस्था घेतली. आता तुम्ही पाहता का मी त्यांच्याविरुद्ध आहे? ठीक आहे.

245 आता, कारण वचनाचा जन्म हा ख्रिस्त आहे. संप्रदायाने प्रदूषित झालेला नाही. ती प्रारंभीची मंडळी - संप्रदाय नव्हती, अगदी फक्त वचन आणि आत्म्याने जलसिंचन झालेली. भावा, देवाने अशाप्रकारे तेथे वचन खाली ठेवले आणि त्या पवित्र आत्म्याने त्याला जलसिंचन केले, आणि तेथे ती गेली. तिने मुले जन्माला आणली, नक्कीच, परंतु ही मंडळी ते करु शकत नाही. ती इतकी सांप्रदायिक बनली आहे. पहा, ती ते करु शकत नाही. त्याबरोबर तिच्याकडे जग मिश्रित झालेले आहे. पहा त्यांनी काय केले.

246 आता, आता पहा, देवाने त्याच्या देहाद्वारे वचन कायम केले. ते बरोबर आहे? मग ती आदामाच्या पत्नीसारखी वेश्या वर्तन करायला लागली, जे तिने एदेनेत केले आणि यहोवाच्या पत्नीने शमुवेलाच्या दिवसांत केले, की एक राजा घेतला, देवाला घटस्फोट दिला (तिचा होणारा पती) आणि त्याचे वचन आणि त्याचा संदेष्टा (त्याचे वचन बाहेर जाण्याचा मार्ग), आणि इतर राष्ट्रांसारखे वेश्या वर्तन केले; आणि देवाने तिला घटस्फोट दिला! तीच गोष्ट आज त्याने केली आहे. तेच कृत्य.

247 त्या वधूचे पुत्र, व्यभिचार करतात (पहा) वधूबरोबर, देवाचे पुत्र - त्याची वधू पेन्टिकॉस्टपासून, वचनाबरोबर कुमारी, वेश्या वर्तन केले आणि व्यभिचार केला अगदी जसा आदामाच्या पत्नीने केला, अगदी जसा यहोवाच्या पत्नीने केला; आणि येथे पुत्राची पत्नी आहे - ती वेश्यावर्तन करीत आहे, रोमन देवांबरोबर (अनेक वचन) व्यभिचार करीत आहे, देव, आणि तिच्या प्रियकरांसाठी, त्या रोमन देवांसाठी, तिच्या स्वतःच्या पतीला घेऊन, त्याला तिनांमध्ये विभागण्याचा प्रयत्न केला - तिच्या प्रियकरांना संतुष्ट करण्यासाठी! देव यावर दया करो! निश्चित, त्यांच्याकडे शेकडो देव आहेत, ओह निश्चित - अष्टारोथ, तो सूर्य देव, आणि बालाम, सूर्य देव, आणि आकाश राणी आणि तो सर्व खटला तेथे. तेव्हा ती वधू, तिच्या अपकीर्ती झालेल्या प्रियकरांना संतुष्ट करण्यासाठी - देव तेथे शलमोनाच्या गीतरत्नात बोलला नाही का आणि कशी त्याची पत्नी काही नाही परंतु एक वेश्या आहे त्याबद्दल सांगितले आणि स्वतःला सर्वदा उघडे ठेवते आणि प्रत्येक प्रियकराला जो येतो त्याला घेते. मी स्पष्ट बोलत आहे, परंतु तेच काय ते पवित्र शास्त्र म्हणते. प्रत्येक पुरुष ज्याला तिच्याबरोबर जायचे होते, तो तिच्याबरोबर जाऊ शकत होता. तीच गोष्ट तर ख्रिस्ताच्या वधूने केली आहे - स्वतःला प्रत्येक संस्थेच्या प्रत्येक जुन्या घाणेरड्या, अश्लील सवयी ज्या कधी त्यांच्या होत्या, त्यासाठी उघडे ठेवले आहे. तीच गोष्ट करीत आहे.

248 याकरिता माझ्यावर टीका होणार आहे. ते ठीक आहे, याबद्दल मी आशीर्वादित देखील होणार आहे, कारण हे सत्य असणार आहे, हे देवाचे सत्य आहे कारण त्याला ते सांगायचे आहे, आणि येथे - ते सांगण्यासाठी मी माझा उत्तम प्रयत्न करीत आहे, पहा.

249 तिने तिच्या कित्येक प्रियकरांना संतुष्ट करण्याचा प्रयत्न केला. असे करताना तिने संकरित केले, तिने तिच्या प्रियंकरांबरोबर, देवाचे वचन संकरित करण्याचा प्रयत्न केला; जेणेकरुन त्याने कार्य केले नाही, तेव्हा ती म्हणाली, “त्याला रद्द करा” आणि तिचे स्वतःचे वचन बनविले. आता ती स्वतः वचन असल्याचा दावा करते. परंतु कॅथोलिकांना - किंवा प्रोटेस्टंटना कॅथोलिकांना तसे म्हणू देऊ नका, कारण ते त्यांच्या स्वतःच्या मंडळ्यांच्या परिषदेत तीच गोष्ट करतात - वेश्या वर्तन. आश्चर्य नाही त्यांना वेश्या म्हटले गेले आहे! ते कठोर आहे, ते नाही का? त्याने तुमच्या पाठीवरील कातडी हादरविली, परंतु काही वेळेस तुम्हाला जागविण्यासाठी त्याच गोष्टीची गरज असते.

250 तेच तंतोतंत काय ते तिने केले. तिने येशूला सोडले, तो वचन पती. आणि शमुवेलासारखे - त्यांनी शमुवेलाला सोडले आणि शौलाला घेतले, वचनाने अभिषिक्त असलेल्या संदेष्ट्याला सोडले आणि राजदंड असलेल्या राजाला घेतले; जेव्हा शेवटी सहस्राब्दीमध्ये, ती राजाकडे, राजदंडाकडे आली असती, परंतु आता ती नाकारली गेली आहे. तो वधूसाठी परराष्ट्रीयांकडे गेला. ते बरोबर आहे? ते वचन आहे.

आता, तिने येशू त्या वचनाला सोडले, येशू ते वचन, आणि पोप म्हटलेल्या त्या मतप्रणालीच्या दुसऱ्या पुरुषाबरोबर लग्न केले. आता तिच्याकडे येशू नाही; तिच्याकडे पोप आहे. आता आपल्याकडे नाही.... त्या प्रोटेस्टंटांकडे येशू नाही; त्यांच्याकडे संप्रदाय आहे, तीच गोष्ट - श्वापदासाठी मूर्ती.

251 तेव्हा ती तिच्या मुलांना वचनाने जन्म देऊ शकत नाही, त्यापैकी कोणीही नाही. ती स्वतः एक वेश्या आहे. पवित्र शास्त्र म्हणते ती होती. तिच्या हातामध्ये एक पेला होता आणि तिची शिकवण लोकांना देत होती जी तिच्या अमंगळ पदार्थांनी आणि तिच्या जारकर्माच्या मळाने भरलेली आहे. जारकर्म काय आहे? - ते अशुद्ध राहणे आहे. आणि तिची शिकवण जी ती लोकांना देत आहे, ती तिच्या जारकर्माचे अमंगळपण आहे. आणि पृथ्वीवरील सर्व राजे आणि सर्व तिच्या जारकर्माच्या द्राक्षारसाने मस्त झाले. तंतोतंत बरोबर, त्यांच्याकडे पहा. मुला, त्यासाठी ते एका मिनिटात तुमचा गळा कापतील. फक्त कॅथोलिक नाही, परंतु प्रोटेस्टंट.

252 ऐका, तुम्ही मेथडिस्ट. जोसेफ स्मिथला कोणी ठार केले? आता काव काव करा. जरी मी त्याच्या शिकवणीवर विश्वास करीत नाही, तसेच मी तुमच्या शिकवणीवर देखील विश्वास करीत नाही. ते तेथे बाहेर नाही, ते येथे आहे. त्याच कारणामुळे. जोसेफ स्मिथला तेवढाच अधिकार होता या देशामध्ये त्याचा धर्म प्रचार करण्याचा जेवढा तुम्हाला आहे, परंतु तुम्ही त्याला येथे इलिनॉईसमध्ये ठार केले; कारणाशिवाय त्याला गोळी घातली, कारण त्याच्याकडे काहीतरी भिन्न होते. मग तुम्ही कॅथोलिक मंडळीबद्दल ओरडता. तुम्ही जे मेथडिस्ट अनंत जीवनासाठी नियुक्त झालेले आहात त्या निरर्थक जमावामधून बाहेर या! अशाप्रकारे वर्तन करता, जॉन वेस्ली त्याच्या कबरेमध्ये वळला असेल. निश्चित, त्याने केले असेल. जॉन वेस्लीने कधीही अशा प्रकारची मंडळी स्थापन केली नाही. जॉनच्या मरणानंतर रिकींच्या आणि एल्विसच्या जमावाने ते केले. ते बरोबर आहे. जॉन वेस्लीने नाही. ते वृद्ध प्रारंभीचे पेन्टिकॉस्टल नाही ज्यांनी कधी अशा प्रकारची निष्पत्ती बनविली. तो तोच जमाव आहे त्याच्या मृत्यूनंतर. ते बरोबर आहे. येशू ख्रिस्ताने कधीही अशाप्रकारचे जे आज आपल्याकडे आहे ज्याला आपण पेन्टिकॉस्ट म्हणतो, त्याला स्थापन केले

नसते; तसेच पवित्र आत्म्याने देखील नाही, परंतु हे काहीतरी त्याऐवजी त्यांच्याकडे येथे आहे; परंतु पवित्र आत्मा हा काहीतरी आहे ज्याला आता ते ठार करु शकत नाही. कसेही करुन तो एक वधू घेणार आहे. तो कसेही करुन ती एक घेणार आहे. तो म्हणाला तो तिला पूर्वनिर्धारित करील.

253 तिने तिच्या वचन पतीला, येशूला सोडले, एका पोपबरोबर लग्न करण्यासाठी, म्हणून ती जन्म देऊ शकत नाही, आत्मिक जन्म. ती आता सांप्रदायिक जन्म देऊ शकते; तिच्याकडे त्याची पुष्कळ बीजे आहेत. ती आत्मिक जन्म देऊ शकत नाही कारण ती एक वेश्या होती. केवळ गोष्ट ती देऊ शकते ती सांप्रदायिक जीवन आणि खूप व्यर्थ धुमधाम. कॅथोलिक मंडळी स्वतः ही काही ख्रिस्तीपणाच्या अंधश्रद्धेवर बनविलेली आहे आणि रोमनवादाच्या जमावावर, आणि ती पेन्टिकॉस्टल मंडळी ही तेवढीच वाईट आहे - उड्या मारणे आणि ओरडणे आणि अन्यभाषेत बोलणे आणि अशाप्रकारच्या गोष्टी. जेव्हा ते खाली येतात - वर्तुळाकार करवतीशी लढण्याइतका पुरेसा संताप आणि तुम्हाला त्यांच्या मंडळीतून बाहेर काढून टाकतील. जर देव तेथे आला आणि मेलेल्याला उठविले, जर तुम्ही त्यांच्याबरोबर सहमत झाला नाही, ते तुम्हाला बाहेर घालवून देतील, जर तुम्ही त्यांच्या संस्थेच्या मालकीचे नसाल.

254 आता, ही म्हातारी वेश्या माता (मी एका मिनिटात तिच्याकडे पाठी जात आहे), ती पापांच्या क्षमेचे सामर्थ्य असल्याचा दावा करते, परंतु तुमच्या दाव्याद्वारे तुमची पारख होत नाही; तुम्ही तुमच्या दाव्याद्वारे ओळखले जात नाही. तुम्ही तुमच्या कृत्यांद्वारे ओळखले जाता. कशी काय ती पापांची क्षमा करु शकते? तिच्याकडे पहा. जेव्हा येशूने तीच गोष्ट केली, ते ... म्हणाला, "मला दोषी ठरवा; मला दाखवा कुठे मी वचनाचा अविश्वास केला." ती पापांची क्षमा करण्याच्या सामर्थ्याचा दावा करते, परंतु ते केवळ वचनाद्वारे येते. ते बरोबर आहे. केवळ देव पापांची क्षमा करु शकतो. ते बरोबर आहे? ते परुशी तसे म्हणाले नाही का? या आंधळ्या ढोंग्यांच्या जमावाबाबत काय बाब होती. का? - कारण त्यांनी पाहिले नाही की त्यांच्याबरोबर ते वचन तेथे उभे होते! तो वचन आहे! देवाचा गौरव! त्याच कारणास्तव तो पापे क्षमा करु शकत होता. तो देव होता! तो प्रकट झालेले वचन होता.

255 आता कॅथोलिक मंडळी म्हणते येशूने त्यांना अधिकार दिला. त्याने दिला. त्याने मंडळीला अधिकार दिला. हे बरोबर आहे. आपण त्याचा विश्वास करतो. तिच्या सर्व मुली वेश्या आहेत. तिच्या सर्व मुली, तिच्या सांप्रदायिक मुली, वेश्या आहेत. "भाऊ ब्रॅन्हम, तो एक मोठा शब्द आहे." तो माझा शब्द नाही; तो त्याचा शब्द आहे. ते तंतोतंत आहे. तो माझा नाही, तो त्याचा आहे.

ठीक आहे, कशा? तुम्ही म्हणता, "त्या कशा आहेत? त्या कशा काय वेश्या झाल्या? का, ते चांगले लोक आहेत. तेव्हा...." मी त्याबद्दल एकही गोष्ट सांगत नाही. ते काय आहेत ते मी सांगत नाही. मी असे म्हणत नाही की कॅथोलिक चांगले लोक नाहीत ... कोणासारखे ही चांगले आहेत. ते आपल्यासारखे मनुष्य प्राणी आहेत. परंतु जेव्हा त्या जुन्या मंडळीची गोष्ट येते, ती चुकीची आहे. ते प्रोटेस्टंट त्याच प्रकारे चांगले आहेत - मेथडिस्ट, बॅप्टिस्ट किंवा पेन्टिकॉस्टल, किंवा इतर कोणाएवढेच चांगले आहेत. ते सर्व सारखेच आहेत.

256 परंतु त्याची गोष्ट अशी आहे, ती मग कशी काय एक वेश्या असू शकते? का? तिची वचन चाचणी घ्या. तसेच जसे तुम्हाला ते कळते. एकदा तिची वचनावर पारख करा आणि पहा ती काय म्हणते. "ओह, अर्थात, आम्हाला विद्यालयात शिकवले गेले आहे की ते दिवस.... ते असे असत असे, परंतु (हा-हा) ते फार मागे प्रेषितांच्या दिवसात होते. ते केवळ प्रेषितांसाठी होते." फक्त तुम्ही तथाकथित चर्च ऑफ क्राईस्ट - "जेथे पवित्र शास्त्र बोलते तेथे बोलता आणि स्तब्ध राहता जेथे...." आता तुम्ही काहीतरी बोललेले ऐकावे असे मला वाटते. नाही, तुम्ही स्तब्ध राहा. भावा, देवाचे वचन सर्वकाही बंद करते. कोणी मनुष्य बढाई मारु शकत नाही. ते बरोबर आहे.

257 तिच्या सर्व मुली वेश्या आहेत. कशा? - त्यांच्या मातेसारख्याच - वचनाविरुद्ध अगदी आत्मिक व्यभिचार करीत आहेत. तशीच जशी कॅथोलिक मंडळी वेश्या बनली. तशाच जशा तिच्या मुली वेश्या बनल्या. तीच गोष्ट, वचनाविरुद्ध आत्मिक व्यभिचार. ती आणि तिच्या मुलींकडे एक व्यभिचारी गर्भाशय आहे. त्यांच्यामधून केवळ मृत्यू येऊ शकतो. देव मरणामधून जीवन आणू शकत नाही, आणि काहीही जे मृत जन्मलेले आहे ते जिवंत नाही. आणि जसे ईयोब म्हणाला, "तुम्ही अशुद्धतेतून काही शुद्ध आणू शकता काय ... नाही एकही नाही." बरोबर. बरे, कशी काय ती स्वतःहून जन्म देऊ शकते जेव्हा ती स्वतः मृत आहे? ती कशी काय कुमारी असू शकते जेव्हा ती एक कलावंतीण आहे? पहा, तेथे तुम्ही आहात. तीच तर अखंड गोष्ट आहे.

258 ओह, माझ्या, आता आपण उत्पत्ती ते प्रकटीकरणातून जीवन सत्वांनी भरलेले, काहीतरी वास्तविक संपन्न गोष्टीला प्रहार करणार आहोत. लक्ष द्या, आणि ती आणि तिच्या मुलींचे एक वेश्यामय गर्भाशय आहे. त्यांच्यातून केवळ मृत्यू येऊ शकतो. जर तुम्हाला संस्थेत सामील व्हायचे आहे, विचार करता तुम्ही ठीक आहात, तुम्ही पहा तुम्ही कोठे उतरत आहात. तुम्ही सरळ मृत्यूमध्ये उतरत आहात. अगदी तंतोतंत. जर तुम्ही ते आता पाहू शकत नाही, तुम्ही आत्मिकरित्या आंधळे आहात, पहा.

259 आता, आता मागे जाऊया आणि परत उचलुया आणि कशासाठीतरी खाली येऊया. तुम्हाला गेल्या रविवारची सेवा काय होती लक्षात आहे? - "प्राणाचे प्रवेशद्वार." तुम्हाला लक्षात आहे? आता, तेथे शरीराचे गर्भाशय आहे; तेथे आत्म्याचे एक गर्भाशय आहे. तुम्ही तो विश्वास करता? तेथे एक आत्मिक गर्भाशय आहे आणि एक शारीरिक गर्भाशय आहे. आणि मन हे आत्म्याचे गर्भाशय आहे. का? आता लक्षात ठेवा, मी गेल्या रविवारी तुम्हाला सांगितले आणि तुमच्यासाठी येथे ते रेखाटले, बाहेरुन बीजामध्ये तेथे पाच इंद्रिय आहेत जी प्रवेश करतात: पाहणे, चव, संवेदना, वास, आणि ऐकणे; पाच आतमध्ये: विवेक, आणि इत्यादी, आतमधून - पाच. आता जीवनाच्या बाजूने तेथे केवळ एक आहे. ते तुम्ही मुक्त नैतिक प्रतिनिधीच्या आधारावर आहात ते स्वीकारुन, आत घेणे, किंवा बाहेर सोडणे, पहा.

260 तसाच जसा आत्मिक व्यभिचार घडतो. जेव्हा तुम्ही, देवाच्या वचनाद्वारे चांगले ठाऊक असते, मनाच्या समागमाद्वारे, सैतानाचे एक खोटे आत घेता देवाच्या वचनाच्या विरुद्ध. तेच तंतोतंत काय ते हव्वेने केले. प्रथम आत्मिक समागमाद्वारे जो सैतानाच्या खोट्यावर विश्वास करण्याने

तिच्या मनाच्या गर्भाशयात आला, ज्याने तिचा प्राण प्रदूषित केला, प्राणामध्ये मृत्यू वसला गेला; मग ते नैसर्गिक कृत्य घडले. आणि तोच एक केवळ मार्ग आहे ज्याद्वारे एक स्त्री कधी तिच्या पतीविरुद्ध व्यभिचार करु शकते, ते म्हणजे प्रथम कोणत्या पुरुषाला तिच्याशी बोलू देते आणि मग त्या पुरुषाला स्वीकारते जो तिचा पती नाही. मग तिने व्यभिचार केला. आणि जेव्हा ती येशू ख्रिस्ताची वधू देवाच्या वचनाची जागा मानव निर्मित पंथ आणि मतप्रणाल्यांना घेऊ देते, ती व्यभिचार करते.

261 येशू नाही का म्हणाला, "जो कोणी स्त्रीकडे पाहतो त्याने त्याच्या हृदयात अगोदरच तिच्याबरोबर व्यभिचार केला आहे ... जो स्त्रीकडे कामेच्छेने पाहतो त्याने अगोदरच तिच्याबरोबर व्यभिचार केला आहे"? का? त्याने ते त्याच्या मनात येऊ दिले. ते गर्भाशय आहे; ते गोष्टी घडवायला सुरुवात करते. सैतान आत येतो - आपण वचनाने पेरले गेले आहोत.

"कधीतरी मी पृथ्वीवर जीवन आणीन आणि पृथ्वी व्यापून टाकीन." जे हव्वा करण्यास अपयशी ठरली, मरीयेने केले. तिने वचन घेतले. हव्वेने सैतानाचे खोटे घेतले. मरीयेने देवाचा शब्द घेतला. आणि मरीयेच्या बीजाद्वारे परत त्याच्या वधूद्वारे, त्याच्या वचनाद्वारे, पृथ्वी व्यापित आहे, आणि सहस्त्राब्दी आणील. त्याद्वारे वचन जात आहे, आणि ते वचन प्रत्येक पूर्वनिर्धारित हृदयामध्ये पेरले गेले आहे, आणि आत्मा खाली येतो आणि त्याला जलसिंचन करतो, आणि ते मरु शकत नाही. "मी त्याला परत शेवटल्या दिवशी उठविन." ओह, भावा, बहिणी, ते वास्तविक आहे.

262 ते काय आहे? - आत्म्यासाठी ते मन हे गर्भाशय आहे. काय? - आत घेणे किंवा बाहेर काढणे. तसेच काय ते व्यभिचार करतात, ते म्हणजे घेऊन ... देवाच्या वचनाविरुद्ध त्या सैतानाच्या सैतानी आत्म्याला काहीतरी त्यांच्यामध्ये टाकू द्या; मग तिने व्यभिचार केला आहे. हव्वेने (हे ऐका) चुकीचे बीज वचन, सैतानाचे खोटे, यहोवाच्या वचनाविरुद्द, स्वीकारले. परिणाम मृत्यू होता.

263 आता, आपण या विषयावरुन काही मिनिटांत निघून जाऊ, परंतु मला ते चांगल्या प्रकारे कुटले जायला हवे असे वाटते ते त्या जागेवर जाण्यापूर्वी जेथे मला थांबावे लागणार आहे. मी येथे सुमारे एक पान वगळणार आहे आता - एका मिनिटात.

264 आता, पहा. हव्वा काय? तिने काय केले? तिने चुकीचे बीज स्वीकारले. तिने ते कसे केले? - सैतानाच्या खोट्याचा विश्वास करुन. कितीजण म्हणतात ते बरोबर आहे? का, निश्चित हे बरोबर आहे, निश्चित. तिने सैतानाचे खोटे स्वीकारले. ते करण्याद्वारे तिने काय उपजवीले? सैतान म्हणाला, "तुला ठाऊक आहे हे गौरवी आहे. ही एक अद्भुत गोष्ट आहे. का तुला ठाऊक आहे तुला त्यासाठीच बनविले गेले आहे? का, तुला वास्तविक या हेतुखातर बनविले गेले आहे."

"ओह, मला बनविले गेले आहे?"

"ओह, ते दिसण्यात मनोहर आहे. ते चांगले आहे. तू हे करुन पाहायला हवे."

"परंतु परमेश्वर देव म्हणाला, 'नाही - नाही - नाही - नाही आताच.' आम्ही करायला नको! नाही, नाही!"

"परंतु, तुला ठाऊक आहे...."

"ओह, जर आम्ही करु...."

"ओह, तुम्ही निश्चित मरणार नाही." तो गुळगुळीत-जिभेचा सैतान आहे. त्याला खूर आणि काट्यांची शेपटी नाही, नाही, जसा ते तुम्हाला विश्वास करावयास लावण्याचा प्रयत्न करतात. तो उपदेशमंचा मागे असलेला एक धोकेबाज आहे. ते बरोबर आहे. किंवा कोणी लहानसा रिकी त्याचे केस मागे बदकासारखे विंचरलेले, त्याच्या पाठीवर तेथे मागे बसलेला कोणत्या आईच्या मुलीला इजा पोहचविण्यासाठी. तो तो मनुष्य आहे - सभोवती एका लहान सुंदर लहान सारख्या.... ओह, मी ते जाऊ देईन.

265 आता, ते गर्भाशय - हव्वेने, चुकीचे वचन बीज स्वीकारले. आता, अगदी लक्षपूर्वक ऐका आता. आपण हे सरळ खाली नेणार आहोत, जर परमेश्वराची इच्छा असल्यास. तिने चुकीचे वचन स्वीकारले. त्याने काय केले? - ते सैतानाचे खोटे होते, म्हणाला ती शहाणी होईल; का, ती मोठ्या मंडळीच्या मालकीची असेल, शहरात तिच्याबद्दल चांगला विचार केला जाईल; का, ती इतर सर्व लोकांसारखी होईल. निश्चित, तोच तंतोतंत काय तो यहोवाच्या वधूने विश्वास केला. ते तंतोतंत आहे. जेव्हा वचन मरीयेकडे आले, तेव्हा सैतानाने तेच काय ते तंतोतंत तिला सांगण्याचा प्रयत्न केला असेल, परंतु तिने त्याला हाकलून दिले.

म्हणाली, "हे कसे होऊ शकते?"

म्हणाला, "पवित्र आत्मा तुझ्यावर छाया करील. तो देवाचा शब्द आहे."

म्हणाली, "मला तुझ्या शब्दाप्रमाणे प्राप्त हो." त्याने जीवन आणले. तेथे तुम्ही आहात.

बरे, तुम्हाला माहित आहे सैतान म्हणाला, "ते सर्व तुझ्यावर हसतील."

त्या लहानशा गुलाबी गालाच्या मुलीने त्याच्याकडे काही लक्ष दिले नाही. ती सरळ यहूदीयामध्ये गेली ... "तुम्हाला माहित आहे, मला एक बाळ होणार आहे"; तिला कसलीही संवेदना होण्यापूर्वी, कारण वचन अगोदरच तेथे स्थित झाले होते. तेच सर्व होते. तिला परत दुसऱ्या वेळेस प्रार्थना रांगेत जाण्याची गरज नव्हती. नाही. होय, महाशय; तिने त्याचा विश्वास केला. तिच्याकडे जीवनाचे कोणते चिन्ह नव्हते; तिच्याकडे अजिबात गर्भधारणेचे कोणतेही चिन्ह नव्हते; तिला काहीही संवेदना झाली नाही; सर्वकाही अगदी जसे होते तसेच होते, परंतु ती सर्वांना सांगत

गेली, "मला एक बाळ होणार आहे." का? - देव असे म्हणाला. ते काय आहे? - अब्राहामाचे शाही बीज.

266 "अब्राहामाला त्या स्त्रीद्वारे, बाळ होणार आहे?" "देव तसे म्हणाला."

"बरे, ते तुम्ही मला पंचवीस वर्षाअगोदर सांगितले."

"मला माहित आहे, परंतु देव तसे म्हणाला." बस एवढेच. तेथे तुम्ही आहात. ती तीच गोष्ट आहे.

आज तुम्ही काय म्हणता? "बरे, तुम्हाला माहित आहे तो संप्रदाय बाहेर काढून टाकेल."

"परंतु देव असे म्हणाला; देव असे म्हणाला."

"बरे, तुम्हाला माहित आहे, जर तुम्ही अशाप्रकारे बाप्तिस्मा घेतला...."

"देव असे म्हणाला. बस एवढेच. बस एवढेच."

तेथे तुमची कुमारी आहे; तेथे ती आहे. फक्त बाप्तिस्म्याकरिता नाही, परंतु इतर कोणत्याही गोष्टीसाठी - त्या बाकीच्या वचनासाठी, पहा. तेव्हा, पहा.

267 हे हव्वेकरीता आत्मिक आणि शारीरिक दोन्ही होते. प्रथम आणि कोणत्याही समयी.... आता, या सकाळी मी तुम्हा बहिणींना, सांगितले आहे आणि विचारले आहे, की मला क्षमा करा तेव्हा मी त्याचा उल्लेख करु शकतो - कोणत्याही समयी एक स्त्री चुकीचे पाऊल उचलते - मी आता ख्रिस्ताबद्दल आणि वधूबद्दल बोलत आहे - परंतु कोणत्याही समयी एक स्त्री चुकीचे पाऊल उचलते, तिला ते प्रथम तिच्या मनात स्वीकारायचे असते. ते बरोबर आहे. कोणत्यातरी धोकेबाजाने तिचे मन वळवायचे असते, आणि तिच्या स्वतःच्या चांगल्या पारखीविरुद्ध ती ते ऐकते. मग ते कृत्य घडते. तेव्हा प्रथम, सैतान त्याचा प्रहार करतो - हव्वेच्या मनावर प्रहार करतो, आणि तिच्या मनाच्या गर्भाशयात तिने देवाच्या वचनाचा संशय घेतला मग वास्तविक कृत्य आले.

268 आणि केवळ मार्गाने की आपण कधी नव्याने जन्म घेऊ शकतो तो प्रथम मनाच्या गर्भाशयात वचन स्वीकारणे, आणि मग त्यावर आत्मा येतो आणि त्याला आणतो. तेथे तुम्ही आहात. तेच काय ते ते करते. भावा, तीच खरी सुवार्ता शिकवण आहे. मी विश्वास करतो जर संत पौल आज उभा असता त्याने या घडीला तीच गोष्ट शिकविली असती. ठीक आहे.

तिच्यावर परिणाम काय झाला? - आत्मिक व शारीरिक मृत्यू. जे तो दुसरा मार्ग स्वीकारतात त्यांचा परिणाम काय होतो, जे आजच्या या मौजमजेत जातात जी त्यांच्याकडे आहे? - दोन्ही शारीरिक आणि आत्मिक मृत्यू. दोन्ही शरीर आणि आत्म्याचा संपूर्ण नाश केला जाईल, पुढे असणार नाही. ते अगदी तंतोतंत बरोबर आहे.

269 नोंद घ्या, मरीयेचे गर्भाशिय - मरीयेचे गर्भाशिय, शारीरिक मन, पहा, ते कुमारी गर्भाशिय होते. का? तिने देवाच्या वचनाचा विश्वास केला होता. काही फरक पडला नाही किती कोणी टीका केली, किती गोष्टी कोणीतरी इतरांना बोलल्या, त्याचे काही एक त्याच्याशी कर्तव्य नव्हते; तिने पर्वा न करता देवाच्या वचनाचा विश्वास केला.

ओह, मी इच्छा करतो मी अगदी हे पोहोचवावे. तुम्हाला हे कळत आहे? पहा, प्रथम, तिचे मन होते. तिच्या शब्दशः गर्भाशियात ते कृत्य कधी घडण्यापूर्वी, ते कृत्य प्रथम येथे घडणे होते तो आत्मा आत येण्यासाठी, ते उरलेले कार्य करण्यासाठी. ओह, गौरव! वास्तविक आत्मिक जन्म होण्याअगोदर, ते वचन स्वतः तुमच्या मनात आढळावयास हवे; त्याचा विश्वास करा. "तो जो माझी वचने ऐकतो, आणि ज्याने मला पाठविले त्याच्यावर विश्वास करतो, त्याला अनंत जीवन मिळेल, आणि तो कधीही न्यायात (किंवा महासंकटाच्या काळातून) येणार नाही, परंतु मरणातून जीवनात पार गेला आहे." बस एवढेच.

270 ओह, माझ्या! आता लक्ष द्या: कुमारी गर्भाशिय, तिचे मन, कुमारी मन देवाचे वचन विश्वास करण्यासाठी. तुम्ही म्हणता, "आता येथे पहा. ओह," म्हणता, "भाऊ ब्रॅन्हम, ते असे असू शकत नव्हते; ते अशक्य आहे. जॉन वेस्लीने ते पाहिले असते; अमुक आणि अमुकाने ते पाहिले असते."

निश्चित, तो सैतान तीच गोष्ट मरीयेला म्हणाला असेल: "तू कोण आहेस? का, तू शहरातील सर्वात गरीब आहेस. तू काही नाही, परंतु एक सोळा वर्षे वयाची, तरुणी आहेस - अठरा - या पंपातून पाणी नेत आहेस; तुझा पिता मेलेला आहे आणि तुझी आई एक वृद्ध आंधळी स्त्री तेथे खाली आहे. आता, कसे काय तू जगामध्ये कधी ... [आम्हाला सांगितले गेले, हन्ना तिची आई होती] जगामध्ये तू कसे काय ते करणार आहेस?"

"ऐक, माझी वृद्ध आई एक आंधळी स्त्री आहे, परंतु ती एक पापभिरु स्त्री आहे. तिच्याओठांद्वारे तिने माझ्या हृदयात बीज पेरले आहे. मी ते देवाच्या वचनातून वाचले आहे की यशया ९:६ मध्ये देव म्हणाला: 'एक कुमारी गर्भवती होईल.'"

271 हालेलूया! तुम्ही पाहू शकता, वचनाने देह घेतला. तेथे तुम्ही आहात. देवाची एक मंडळी असणार आहे. ती देवाच्या वचनाने जन्म पावणार आहे कारण तो देवाचा जिवंत शब्द आहे. तुम्ही ते पाहता?

"तुम्हाला ते कसे ठाऊक?"

"का, ते असणार आहे...."

"तुम्हाला माहिती आहे यानंतर तुला काय म्हटले जाणार आहे? तुला म्हटले जाणार आहे...."

"मी पर्वा करीत नाही मला काय म्हटले जाते, त्याबद्दल काही नाही. परमेश्वराच्या वचनानुसार मला प्राप्त होवो."

ओह, सर्व आज ते म्हणू शकतील? ओह, जर लोक खरोखर तुमच्या हृदयापासून, आपण सर्वजण, असे म्हणू शकू, पहा: "परमेश्वरा, तुझ्या वचनानुसार मला होवो." माझ्या! खरोखर त्याबद्दल गंभीर असा. एक किंवा दोन किंवा कुठेतरी तेथे बाहेर कोणी पूर्वनिर्धारित हे उचलणार आहे जो खरोखर त्याबद्दल गंभीर असेल, आणि, भावा, तुला अगदी तेथेच, ठिणगी उडताना दिसणार आहे. ते बरोबर आहे. जेव्हा तुम्हाकडे खरोखर ते असते तेथे त्याला भेटण्यासाठी, जे येत असते, जेव्हा त्या वचनावर जलसिंचन होण्यास सुरुवात होते. होय, महाशय.

272 आता ते काय होते? - ते कुमारी मन, गर्भाशय, बाळासाठी कुमारी गर्भाशय. परिणाम? - अनंत जीवन. हव्वा, एक चांगली स्त्री जशी ती होती; कुमारी जशी ती होती, परंतु प्रथम तिने शब्दाद्वारे आतमध्ये संशय येऊ दिला, सैतानाचे एक खोटे. त्याने काय केले? - तिला चुकीच्या मार्गाने सहवासात आणले. तिचे मूल काय होते? - मृत्यू.

मरीया: कुमारी मन, कुमारी गर्भाशय. जेव्हा सैतानाने तिला मोहात पाडण्याचा प्रयत्न केला, आणि तो आला - आणि तो दूत तिच्याकडे आला मग आणि म्हणाला, "तुला एक बाळ होणार आहे." सैतान म्हणाला, "आता, बरे होईल तू त्याबद्दल चौकशी कर." तो दूत म्हणाला, "ते देवाचे कृत्य आहे." मग शंका नाही तिने यशयाच्या ९:६ चा विचार केला; ती म्हणाली, "पहा परमेश्वराची दासी." परिणाम काय होता? - कुमारी जन्म; तिच्यामध्ये अनंत वचन, आणि तिने अनंत जीवन उपजवीले.

273 ठीक आहे, यहोवाची वधू, मिश्रित ... यहोवाची वधू, मिश्रित बीज. "आता कसे काय तुम्ही सांगता, भाऊ ब्रॅन्हम? या सकाळी तुम्ही म्हणालात यहोवाच्या वधूने व्यभिचार केला."

मी ते सोडणार नाही. आता अगदी ते बारकाईने पाहूया आता. आता, आपल्याकडे अगदी दुसरा एक तास आहे, मी अंदाज करतो. मग माझ्याकडे येथे काही आहे, मला काही अगदी वगळावे लागणार आहे, मग अगदी काही मिनिटांत वाचायला सुरुवात करु, पहा. अगदी जितक्या त्वरेने मला वाचता येईल ते समजण्यासाठी तेवढे वाचू. आता दुसऱ्या तासाभरात मी विश्वास करतो आपण बाहेर निघू जर तुम्ही अगदी माझ्याबरोबर सहन कराल आणि माझ्याबरोबर प्रार्थना कराल, पहा.

274 आता, यहोवाच्या वधूने कधी कुठे चुकीचे केले? ठीक आहे. यहोवाने खाली मिसरामध्ये त्याच्या वधूसाठी काय पाठविले? त्याने अब्राहामाला अभिवचन दिले होते की त्याची वधू, ते बीज, मिसरात चारशे वर्षे वास्तव्य करील. ते बरोबर आहे? वचन पूर्ण होण्याचा समय आला. आपला वचन पूर्ण होण्याचा समय आला आहे का? - सुटकेसाठी, बाहेर काढण्यासाठी. ठीक आहे, त्यांना वचन कसे मिळाले? त्यांनी संस्था बनविली, लोकांचा एक जमाव एकत्र झाला आणि याजक आणि म्हणाले, "आता, बंधूंनो, आपण येथे मतदान करणार आहोत, आणि एक मताने हे नक्की झाले आहे की आपली 'परुशी' नावाची संस्था असणार आहे आणि त्यामधून देव कार्य करणार आहे"? देवाने कधीही त्यासारखी एक गोष्ट केली नाही, कधीही केली नाही.

275 त्याने त्यांच्यासाठी काय पाठविले? - संदेष्टा. आणि परमेश्वराचे वचन संदेष्ट्याकडे आले, त्यांच्यामधून सरळ त्याला उभारले, एक संदेष्टा, आणि त्याला अभिषेक केला आणि त्याला सरळ सर्व सैतानी कार्ये चालली असताना त्यांच्यामध्ये, चमत्कारांनी आणि इतर सर्व गोष्टींनी, प्रमाणित केले - कारण मोशे सरळ वचनाबरोबर राहिला.

त्या लोकांच्या जमावाला वर उचलले; त्याच्याबरोबर मिश्र समुदाय निघाला. जेव्हा ते वचनदत्त देशाकडे निघाले पलीकडे, तेथे ते जाण्यापूर्वी, त्याच्या मौल्यवान वधूने मवाबाबरोबर व्यभिचार केला. मला सांगा तिने केला नाही, आता. तिने तो कसा केला? देवाच्या वचनाविरुद्ध एक खोटे बोलणारा संदेष्टा, अद्यापि त्याच्याकडे सर्व चिन्हे आणि सर्व होते ... विधीवादी. तो मोशेसारखाच अगदी आत्मिक होता किंवा अगदी तसाच.

276 पहा! ऐका! लक्षपूर्वक ऐका आता. येथे इस्राएल एका छावणीत बसले होते, एक आंतरसांप्रदायिक. ते बरोबर आहे. ते काय होते? त्यांच्याकडे एक अभिषिक्त संदेष्टा होता. त्याच्याकडे अग्निस्तंभ होता, एक खडक ज्यामधून त्यांना पिण्यासाठी पाणी बाहेर आले. त्यांचे ठीक चालले होते. आणि पहा, त्यांच्याकडे सात वेद्या होत्या; ते परिपूर्ण आहे. त्या वेद्यांवर सात शुद्ध प्राणी गेले - एडका, आणि एडका येणाऱ्या ख्रिस्ताला दर्शविते.

277 मवाब.... काय घडले? जेव्हा बालाम तेथे खाली गेला, त्याने अगदी तंतोतंत त्यांच्याकडे असलेल्या वेद्यांसारख्या वेद्या बनविल्या. त्यांच्याबरोबर मूलभूतरित्या बोलू नका कारण तुम्हाला चांगले ठाऊक असायला हवे तुम्ही कशाबद्दल बोलत आहात. येशू म्हणाला, "ते प्रत्यक्ष निवडलेल्यांस फसविल." ते आत्मिकरित्या प्रकट होईल. तुम्ही ते ताडता, मग तो शब्द आहे, आणि तुम्ही शब्दाला प्रकट होताना पाहता.

पहा, तेथे ते वर येथे होते; येथे मवाब होता. शंका नाही परंतु तो एक बिशप होता, निश्चित, महान व्यक्ती, आणि त्याने सात वेद्या उभारल्या. त्याने त्यावर सात एडके ठेवले - असे म्हणत की तो विश्वास करत होता की तेथे मसीहा येत होता. भावा, जर ते मूलभूत वादावर आले, देवाला त्या दोघांना ओळख देणे होते.

जेव्हा काईनाने परमेश्वरासाठी वेदी उभारली (सैतानाचा पुत्र, परमेश्वरासाठी वेदी उभारली), त्याने हाबेलासारखीच वेदी उभारली. त्या दोघांनी उपासना केली; ते दोघेही प्रार्थना मंदिरात गेले; त्या दोघांनी त्यांचे देणे दिले. ते दोघेही उपकृत होते; ते खाली आले आणि समान देवाची

उपासना केली - आणि एक स्वीकारला गेला आणि दुसरा एक नाश पावला. तो कसा आला?

278 येशू म्हणाला, "या खडकावर मी आपली मंडळी उभारीन." ती कॅथोलिक मंडळी म्हणते, "तेथे एक खडक आहे, ती मंडळी त्यावर रचली गेली आहे; किंवा ... आणि पेत्र तो खडक होता." आणि ती कॅथोलिक मंडळी म्हणते की पेत्र तेथे दफन केला गेला आहे. ते एक खोटे आहे, परंतु.... जेवढे कधी मी पाहू शकतो त्या वेळेस ते म्हणतात पेत्र तेथे दफन केला गेला, पवित्र शास्त्र म्हणते तो येथे यरुशलेमेत होता. तो कधीही ... तेथे नव्हता. परंतु कसेही करुन, ते म्हणतात तो तेथे होता. तेथे वास्तविक इतिहासामध्ये पौलाची कधी तेथे असण्याची नोंद नव्हती. परंतु ते म्हणतात पेत्र ... त्याला तेथे दफन करु द्या, जर तो होता, त्याने काय फरक पडतो? ते नव्हते ज्याबद्दल येशू बोलत होता. पहा, कशा काय त्यांनी साहित्यिक गोष्टी मिसळल्या आहेत.

279 बरे, प्रोटेस्टंट म्हणतात, "नाही! येशू म्हणाला तो तो खडक होता."

आता, तो तसे कधीही म्हणाला नाही. तो म्हणाला, "शिमोना, तू धन्य आहेस, योनाच्या पुत्रा; रक्त आणि मांस याने तुला प्रकट केले नाही...." "तू ख्रिस्त, जिवंत देवाचा पुत्र आहेस." "रक्त आणि मांस...." तो कधीही ते धर्म विद्यालयात शिकला नाही. "कोणत्या संप्रदायाने तुला हे शिकविले नाही, परंतु माझा पिता जो स्वर्गात आहे त्याने हे तुला प्रकट केले आहे, आणि या खडकावर (देवाच्या वचनाचे आत्मिक प्रकट झालेले सत्य) मी माझी मंडळी उभारीन, आणि अधोलोकाच्या द्वाराचे तिच्यावर काही चालणार नाही."

280 मवाबाने तीच गोष्ट केली. तो तेथे खाली आला, आणि त्याने इस्राएलाच्या संतांनांना शिकविले; म्हणाला, "आता, येथे पहा, मित्रांनो [आता तीच गोष्ट त्यांनी पेन्टिकॉस्टमध्ये केली, आता, पहा], आता येथे पहा, आपण सर्व समान नाही का? आपण एका समान देवाचा विश्वास करीत नाही का? आपण सर्व सारखेच आहोत." मवाबाची मुले लोटाच्या मुलीची होती. पहा तो जुना जमाव जो तेथे खाली निसटला होता? अजूनही "बिस्किटात एक केस असा आहे," पहा. तेथे ते, वांतीची घाण आहेत. पहा, तेथे ते वर होते, आणि त्यांच्याकडे.... "का," ती म्हणाली, "आता, येथे पहा, तुम्हाला माहित आहे आपण सर्व सारखे आहोत." (किती जणांना माहित आहे की ती लोटाची मुले होती? निश्चित, त्यांच्या स्वतःच्या पित्याकडून - व्यभिचार.) आणि म्हणाले, "आता, आपण सर्व समान आहोत. तुम्हाला माहित आहे, तुम्ही मेथडिस्ट, आणि तुम्ही बॅप्टिस्ट, आम्ही प्रेसबायटेरियन आणि सर्व; का निश्चित, आम्हाला तुमच्यातील काही तेल हवे. आपण सर्व समान आहोत." आणि त्यांनी काय केले? त्यांनी त्यांच्यामध्ये लग्न केले! आणि तेच काय ते पेन्टिकॉस्टने प्रोटेस्टंटांशी केले. तिने मंडळ्यांच्या संघटनेशी विवाह केला; तिने स्वतःला सांप्रदायिक केले, आणि ती कोठे आहे? अगदी तंतोतत जसा इस्राएल होता: दोन्ही आत्मिक व्यभिचारासाठी व शब्दशः व्यभिचारासाठी टाकून देण्यात आले. त्यानंतर पुढे देवाने तिला नाकारले. अगदी ती मुले जी शमरोनी झाली ती शापित होती. ते बरोबर आहे? निश्चित ती होती. यहोवाने तिला सोडून दिले.

281 ख्रिस्ताच्या वधूने अगदी तसेच केले - तिचे सांप्रदायिक बीज मिसळले आणि तिचा होणारा पती, ख्रिस्त, त्याला सोडून दिले. तुम्ही कोरडे धुतलेला पेन्टिकॉस्टल जमाव; तुमच्याबरोबर काय बाब आहे? प्रकटीकरण ३रा अध्याय आणि २०वे पद, आपल्याला भविष्यवाणीत आढळते, येशू ख्रिस्त या लावदिकिया युगात त्याच्या स्वतःच्या मंडळीच्या बाहेर, दरवाज्यावर ठोकीत आहे परत आत येण्यासाठी - पवित्र शास्त्रातील सर्वात दयनीय चित्र. तिने काय केले? तिने वेश्यावर्तन केले. जेव्हा येशू आला, तो कशासाठी ठोकीत आहे? येशू त्याच्या वधूला प्राप्त करण्यासाठी परत आला; आणि जेव्हा तो दरवाज्यावर ठोकण्यासाठी आला, त्याला बाहेर ठेवले गेले.

282 "का, तू येथे येऊ शकत नाही; तू संजीवन सभा घेऊ शकत नाही. मला तुझ्या नियुक्तीची कागदपत्रे पाहू दे" - एक मनुष्य देवाच्या आत्म्याने भरलेला, तो खरा वास्तविक ... देवाचे वचन त्याच्या सेवेमध्ये प्रकट होते. त्याच्याविरुद्ध तुम्ही एक ही गोष्ट बोलू शकत नाही, अश्लीलता किंवा काहीही. कोण त्याला त्याबद्दल दोष लावू शकतो? संप्रदायामध्ये आला: "का तो एक देव वादी नाही; तो असेम्ब्ली नाही; तो त्रैक्यवादी आहे. तो त्रैक्यवादी नाही, तो असेम्ब्ली आहे."

तुम्ही शूद्र अनौरसांचा जमाव; तुमच्यावर लज्जा असो! देव बाहेर आहे; परंतु योहान काय म्हणाला (तो शेवटचा संदेश जो तेथे खाली त्याच्या येण्याअगोदर)? "तो या दगडापासून अब्राहामासाठी मुले उत्पन्न करण्यास समर्थ आहे. तुम्ही असे म्हणत येऊ नका, 'आम्ही याच्या मालकीचे आहोत आणि आम्ही त्याच्या मालकीचे आहोत.' देव करु शकतो ... या दगडापासून अब्राहामासाठी मुले उत्पन्न करण्यास समर्थ आहे."

283 ठीक आहे, जसे आपण पुढे जातो आता. ओह, कसे मी ह्याला प्रेम करतो! ख्रिस्ताची वधू, आदामाच्या वधूसारखीच आणि सर्व बाकीच्यांसारखी, बीजाला मिश्रित केले आणि तिच्या संप्रदायासाठी ख्रिस्ताला बाहेर ठेवले. निश्चित तिने ते केले. तिने नक्कीच ते केले. तिने देवाला नाकारले (तिचा होणारा पती) जसे हव्वेने केले, सैतानाचे खोटे निंदण स्वीकारले त्याचा परिणाम: एक मृत, बाह्य स्वरुपाची मंडळी तिच्यापासून जन्मली आहे. आता तुम्ही म्हणाल ते खोटे आहे!

तुमचे पेन्टिकॉस्टल कोठे आहेत? - बॅप्टिस्ट जेवढे आहेत त्यापेक्षा अधिक बाह्य स्वरुपाचे आहेत. निश्चित, तुम्हाला ते ठाऊक आहे? आता ते सरळ एक वाईट चित्र दिसते, नाही का? परंतु योएल काय म्हणाला योएल २:२८ मध्ये? "परंतु मी पुनःस्थापना करीन, परमेश्वर म्हणतो."

284 जशी आदामाला त्याची पत्नी सैतानाचे खोटे जे मृत्यूचे बीज होते जे तिने स्वीकारले होते, त्याने गर्भवती झालेली आढळली, योसेफाला त्याची पत्नी देवाच्या बीजाने, जे वचन तिने स्वीकारले होते, त्याने गर्भवती झालेली आढळली.

हे सर्व कशाबद्दल आहे? मी काय सांगण्याचा प्रयत्न करीत आहे? आता, तुम्ही लोक जे ध्वनीप्रसारणावर आहात, तुम्ही लोक जे बाहेर गाडीमध्ये आहात, तुम्ही लोक जे प्रार्थना मंदिरात आहात, तुम्ही पाहता मी का अशाप्रकारे राहिलो ज्याप्रकारे मी सरळ येथे राहण्याचा प्रयत्न

केला आणि ते जाहीरपणे रद्द केले? असे नाही की मला त्या मनुष्यांविरुद्ध काहीतरी आहे, त्या स्त्रियांविरुद्ध; मला त्यांच्याविरुद्ध एक ही गोष्ट नाही, परंतु मी फक्त त्यांच्या पातळीवर जाऊ शकत नाही. मी अगदी ते करु शकत नाही, कारण ते चुकीचे आहे.

285 कसे.... येथे माझ्याकडे एक शास्त्रलेख आहे मला तो येशूवर घ्यायला आवडेल, त्याच्या परीक्षांवर; जेव्हा त्याने त्याला घेण्याचा प्रयत्न केला, म्हणाला, "मी ही जगातील सर्व राज्य तुला देईन. ती माझी आहेत," पहा. त्याच गोष्टीद्वारे तो हव्वेकडे आला (पहा) प्रथम, भाकरी बनविण्याद्वारे ... खाण्यासंबंधी, इत्यादी, पहा. "मी हे सर्व करीन जर तू मला नमन करशील." "जर तुम्ही फक्त येऊन आमच्या गटात सामील झालात."

येशू म्हणाला, "असे लिहिले आहे, 'मनुष्य केवळ भाकरीने नव्हे, परंतु देवाच्या मुखातून निघणाऱ्या प्रत्येक वचनाने जगेल.'"

286 हे काय आहे? तुमच्यातील काही प्रचारक आता, जे तुमची भूमिका घेण्यासाठी खूप घाबरता; घाबरता की ते तुम्हाला अगदी संस्थेमध्ये देखील येऊ देणार नाहीत: "मग तुम्ही अजून काय करणार आहात? - ते तुम्हाला बाहेर काढून टाकतील!" मला तुमची दया येते. पहिली गोष्ट, तुमच्या दुर्बलतेविषयी. ते बरोबर आहे. देवामध्ये तुमचा विश्वास कोठे आहे? त्यांनी मला तीच गोष्ट सांगितली. निश्चित. मी सतरा वर्षे कार्य केले, येथपर्यंत की देवाने मला बाहेर काढले आणि याभोवती मला उभारले, आणि मग मी विचार केला, "आता, सैताना आता तू ये." पहा तो कुठे आहे. जेव्हा तुम्हाला खरोखर जाणीव होते की देवाने तुम्हाला या गोष्टीचे सत्य प्रकट केले आहे, तेथे जगामध्ये काहीही नाही जे तुम्हाला यामध्ये हरवू शकते. बस एवढेच. तुम्ही पूर्णपणे अपराजित आहात; तुम्ही नाही, परंतु देव जो तुम्हामध्ये आहे. ख्रिस्त नाही, परंतु ... देह नाही, परंतु ते वचन जे त्याच्यामध्ये होते. मरीया नाही, परंतु ते वचन जे तिच्यापासून जन्मले.

287 आता, तेव्हा मनुष्य कशाद्वारे जगेल? - त्याच्या जेवण्याच्या तिकिटाद्वारे नाही, परंतु देवाच्या वचनाद्वारे; तुमच्या संस्थेद्वारे नाही जी तुम्हाला जागा पुरविते. "बरे, मला तुझी कागदपत्रे पाहू दे. तुझे पद चांगले आहे का? ते तपासायला हवे. बरे, होय, तू शंभर टक्के चांगल्या प्रतिष्ठेत आहेस. बरे, आम्ही तुला काही दिवसांसाठी एका संजीवनासाठी स्वीकारु शकतो, तुझी पारख करु आणि पाहू तू काय करशील." ओ-ओ-ओ-ओ-ओ माझ्या! कसा काय देव कधी अशा प्रकारच्या जमावामध्ये कार्य करु शकतो? - दोनदा मृत, मुळापासून उपटलेले, मुळावलेले, सडलेले आणि इतर सर्वकाही. ओह, माझ्या. तेथे दुसरा एक आहे.

288 ओह, लोकांनो, देव तुम्हाला आशीर्वादित करो. माझे ऐका! मी देवाचे वचन सोडून अजून काही विश्वास करु शकत नाही आणि मला ते माझे जीवन असे हवे आहे, जे काही मी आहे. तुम्ही तेच करावे असे मला वाटते. तुमचे चालणे, तुमचे बोलणे, तुमची हालचाल, सर्वकाही जे तुम्ही करता, ते देवाच्या वचनात असावे. ख्रिस्ताचे मन तुमच्यामध्ये येऊ द्या, आणि ते तुम्हाला वचनाने गर्भधारणा करील. जर तुम्ही नाही.... जर तुम्ही संप्रदायाचे मन तुमच्यामध्ये येऊ दिले, तुम्ही सांप्रदायिक गर्भधारणा कराल. जर तुम्ही ख्रिस्ताचे मन तुम्हामध्ये येऊ दिले, तो त्याचे स्वतःचे वचन नाकारु शकत नाही कारण तो देव आहे. तुम्ही वचनाने गर्भधारणा कराल आणि त्याचा विश्वास कराल. मी पर्वा करीत नाही जर ते तुम्हाला बाहेर घालवून देतील, तुम्हाला लाथ मारुन बाहेर काढतील, तुम्हाला बाहेर हाकलून देतील, आणि प्रत्येक दार बंद होईल, तुम्ही अगदी तसेच जाल! आमेन! (व्हिव!) मला त्वरा करायला हवी.

289 माझ्या! ख्रिस्त आता स्वतःसाठी एक वधू घेत आहे जी त्याच्या स्वतःच्या शब्द बीजाने तिच्या गर्भाशयात (आत्मिक गर्भाशय) तिच्या मनात गर्भवती होईल, आणि ती कोणत्या सांप्रदायिक कचऱ्याने ते मिश्रित करणार नाही. ती त्याला एक कुमारी आहे.

ओह, मी लक्षात करतो तेथे खोलीमध्ये उभा होतो, तीन दिवस तेथे प्रार्थना करीत आणि उपवासात, परमेश्वरावर विसंबून होतो. जेव्हा त्याचा मला प्रहार झाला मी विचार केला, "ओह, देवा हे काय आहे? येथे मी या दृश्यात आहे, येथे मी आहे! जर मी इतके सर्व मंडळीत आणले, मी कुठे असेन? मी त्यांना एका डहाळीवर आणीन, मी काय करु शकतो? मी मंडळीला प्रत्येक प्रतीक म्हणून आणि छायेत आणि इतर सर्वकाही मध्ये पाहिले आहे - दिसत आहे की ती संपलेली आहे. तू काय करणार आहेस?"

आणि तेव्हा, मी विचार केला त्या वचनाचा, "परमेश्वर म्हणतो, मी पुनःस्थापना करीन; मी पुनःस्थापना करीन." लक्षात आहे, ते जुने देवदार झाड; जेव्हा अग्नी त्याला प्रहार करते आणि त्याला भस्म करुन टाकते, जरी तिने एक बीज टाकले असेल. ते बीज एका नव्याला उत्पन्न करते. ते बरोबर आहे. ती जुनी झाडे संस्था आणि इतर काहींनी जाळली आहेत, परंतु तेथे अजूनही वचनाचे एक बीज त्यामध्ये राहते. जर ते देवाचे वचन असेल, ते सरळ परत येईल, अगदी जसे जग आहे तसे स्वतःला पुनरुत्पादन करील. होय, आता, आता, ती ते चुकविणार नाही.

290 लक्ष द्या, परंतु ख्रिस्त.... आपण विश्वास करतो आपण अंत समयात आहोत, आपण आहोत का? तुम्ही विश्वास करता का की आता तुम्हाला पीक मिळण्यागोदर, एक बीज पेरावे लागते? तुम्ही पाहता का मी मंडळ्यांना मला बाहेर घालवू दिले आहे, सर्वकाही मला सांगू दिले आहे; सर्व प्रकारच्या नावांनी आणि इतर सर्वकाही मला म्हणू दिले आहे आणि सरळ त्या वचनाबरोबर राहिलो आहे? पहा? तेथ एक रोप आहे - बीज पेरले गेले आहे; ते अगोदरच पेरले गेले आहे, मित्रांनो. ते अगोदरच झालेले आहे. मी आता ते सांगू शकतो: ते संपलेले आहे. ते बरोबर आहे. ती पेरली गेली आहे (ओह, होय); तसेच सांप्रदायिक बीज, बाकीचे ते सर्व देखील.

291 जसा आपला महान, मौल्यवान भाऊ, बिली ग्रॅहम, येथे सरळ लुईसवीलेमध्ये म्हणाला, म्हणाला, "पौल पवित्र शास्त्र घेऊ शकत होता...." पवित्र शास्त्र घेतले आणि म्हणाला, "आता पौल एका शहरात जाऊ शकत होता आणि एक संजीवन घेऊ शकत होता. त्याच्याकडे एक परिवर्तन केलेला होता; पुढच्या वर्षी परत गेला त्याच्याकडे त्या एकापासून साठ होते." म्हणाला, "मी जाऊ शकतो आणि सहा आठवड्यांचे संजीवन घेतो आणि वीस हजार परिवर्तन झालेले असतात आणि सहा महिन्यात परत येतो, आणि वीस ही आढळत नाहीत!"

ते काय आहे? ते परिवर्तन झालेले नाहीत! ते सांप्रदायिक वादाला परिवर्तन झालेले आहेत, बस एवढेच. नक्कीच. तुम्हाला पेरणे आहे,

पहा, तुम्ही संप्रदायाचे बीज पेराल, तेच काय ते तुम्हाला मिळेल. "आता भावा, ये, मंडळीत सामील हो आणि तुझे नाव पुस्तकात टाक." तेवढेच सर्वकाही त्यांना ठाऊक आहे. ते बरोबर आहे.

292 पेन्टिकॉस्टने तीच गोष्ट केली आहे. "अन्यभाषेत बोलणे आणि इत्यादी, तेवढेच काय ते तुम्हाला करणे आहे, ज्यांना ते मिळालेले आहे. या, मंडळीत सामील व्हा." ठीक आहे, तुमचा खोटा बाप्तिस्मा घ्या आणि इत्यादी आणि पुढे जा, आणि तेवढेच जेवढे तुम्हाला करणे आहे, पहा.

परंतु जेव्हा ख्रिस्त येतो, तो एका कुमारीसाठी येतो, एक मंडळी अगदी संप्रदायाच्या किंवा इतर कोणत्याही गोष्टीच्या, मतप्रणाल्याच्या, डागाविना किंवा एका सुरकुतीविना, त्याबरोबर मिश्रित झाल्याविना. ते केवळ वचन असणार आहे आणि केवळ वचन.

293 आता! ओह, माणसा. आपण येथे आहोत! परमेश्वर धन्य असो! आता, ख्रिस्ताची वधू असल्याने आपण देहाकडे येतो. आपण त्याच्या मांसातील मांस, आणि त्याच्या हाडांतील हाड असण्यासाठी. आता, आपण त्वरा करुया आता. त्याच्या मांसातील मांस आणि त्याच्या हाडांतील हाड. का नाही ... (तुम्हाला एक प्रश्न विचारतो.) का नाही पलीकडील तुमच्या सर्व पावसाने ख्रिस्तासाठी वधू आणली? तुम्ही त्याचे मला उत्तर द्यावे असे मला वाटते!

जर त्याच्या आगमनाला उशीर झालेला आहे; आम्ही त्याचा विश्वास करतो. जसे नोहाच्या दिवसात होते, सहनशीलता. तो त्याच्या वधूला तयार करीत आहे. का नाही या पावसाने.... का तुम्ही पेन्टिकॉस्टलांनी मागे काही वर्षाअगोदर पलीकडे (जेव्हा तुम्ही चाळीस किंवा पन्नास वर्षाअगोदर सुरुवात केली) - का नाही तुम्ही ख्रिस्ताला, तो वर, त्याला वधूकडे आणले? आपण ते एका मिनिटाकरिता शोषू देऊ. का? कारण तुम्ही तिला स्वतःला तुमच्या संप्रदायाने गर्भवती होऊ दिले; तेच तंतोतंत जे काही तुम्ही केले. तो एका कलावंतिणीशी विवाह करणार नाही. तो एका कुमारीशी विवाह करील. ते स्पष्ट आहे, परंतु ते एक सत्य आहे. तुम्हाला ते स्पष्टपणे कळत आहे. तुम्हाला विचार करण्याची गरज नाही. मी त्या सभोवती अडखळत नाही; मी तुम्हाला सत्य सांगतो.

294 का त्याने तिला आणले नाही? त्याने ख्रिस्ताला का आणले नाही, ख्रिस्ताला तिच्याकडे का आणले नाही? कारण ती योग्य नाही. त्याला ती व्यभिचारात आढळली - तंतोतंत तेच कारण आहे मुले सर्वदा जगत नाही जेव्हा ती जन्मतात. आदामाला त्याची पत्नी गर्भवती आढळली. तेच तर कारण आहे यहोवाला एक परराष्ट्रीय वधू घ्यावी लागली - त्याला ती गर्भवती आढळली. अगदी तंतोतंत त्याच मार्गाने ख्रिस्ताला आता त्याच्यासाठी एक वधू घेणे आहे. त्याला हा तथाकथित गट गर्भधारण झालेला आढळला आहे. तो त्याचे बीज पेरणार आहे; कोणालातरी ते मिळणार आहे, कारण मार्गाच्या शेवटाला ते एक मंडळी असण्यासाठी पूर्वनिर्धारित आहेत.

295 आदाम आणि यहोवासारखे, त्याला ते मानव-निर्मित संप्रदायाच्या शिकवणींनी गर्भधारणा झालेले आढळले. जसे उत्पत्ती १ मध्ये देवाचे सत्य आहे, प्रत्येक बीजाने आपापल्यापरी सबीज उपजवीले आहे. तेव्हा जेव्हा आत्म्याचा तिच्यावर वर्षाव झाला, तिच्या गर्भाशयाकडे मनुष्य होता आणि त्याच्या स्वतःच्या विचारांच्या सांप्रदायिक बीजाने ते भरले होते; तेव्हा त्यामुळेच ती ज्याप्रकारे आहे तशी असणे आहे, आणि ख्रिस्त तिच्याकडे येऊ शकला नाही. उम्म्म, ते कठीण आहे, ते नाही का?

296 एक दिवस, मी वर ग्रीन मिलमध्ये होतो, मी काही दिवसांपासून प्रार्थना करीत होतो; खूप खूप वर्षांपूर्वी. मी येथे मिशवाकाला गेलो होतो. (मी कधी हे अगोदर ध्वनिमुद्रणपट्टीवर सांगितले नाही.) मी मिशवाकाला गेलो. तुम्हाला त्या निग्रो मुलाबद्दल लक्षात आहे? मला आताच पेन्टिकॉस्टल लोक आढळले होते; मला कधीच ठाऊक नव्हते तेथे अशा प्रकारची काही गोष्ट होती. आणि मी तेथे वर गेलो आणि ते आढळले, आणि मी विचार केला माझ्याकडे दूतांचा जमाव होता. मी त्यांना अन्य भाषा बोलताना आणि गोष्टींमध्ये पाहिले. मी अगोदर कधी त्याबद्दल ऐकले नव्हते, परंतु तेथे ते होते, जमिनीवर वर आणि खाली धावत होते, अन्यभाषेत बोलत होते. मी विचार केला, "माझ्या, ते अद्भुत आहे!" ते जुने यु.पि.सी. आणि पि.ए. ऑफ डब्यू. आणि ते सर्व प्रकारचे विलीन झाले होते. तेव्हा तेथे गोऱ्या आणि काळ्या लोकांमध्ये विभक्तीकरण होते; त्यांना त्यांच्या सभा उत्तरेला वर घ्याव्या लागत. आणि त्या मिशवाका, इंडियानामध्ये होत्या.

297 माझ्या! माझ्याकडे १.७५ डॉलर होते - अगदी मला घरी येण्यापुरता पुरेसे. मी त्यातील एक निकेल कोणत्यातरी शिळा डोनट किंवा रोलमध्ये (सुमारे दोन किंवा तीन दिवसाचा शिळा) खर्च केले, खाली गेलो आणि रस्त्यावरील नळातून माझ्यासाठी एक पाण्याचा चंबू घेतला, आणि मक्याच्या शेतात गेलो आणि माझ्या जुन्या फोर्ड गाडीतील आसन बाहेर काढले आणि ते खाली अंथरले; माझी विजार त्या रात्रीसाठी (जी विजार मी घातली होती) आणि एक लहानसे जुने टी-शर्ट आसनाखाली लावले. आणि दुसऱ्या सकाळी मी परत खाली गेलो. मला त्यांच्याबरोबर जेवायचे नव्हते. मला जाण्यासाठी स्वागत होते, परंतु मला त्यांच्याबरोबर जेवायचे नव्हते कारण माझ्याकडे त्यांच्या अर्पणात टाकण्यासाठी काही नव्हते.

आणि तेव्हा मी त्या दिवशी पाहण्यासाठी गेलो की ते नृत्य करतील; आणि ते उड्या मारतील, आणि ते आत्म्यामध्ये गातील. आणि मी विचार केला, "ओह, माझ्या, ते चांगले वाटत आहे! उम्म!" एक मनुष्य उठून उभा राहिला आणि अन्य भाषेत बोलला, आणि एक त्याचा अनुवाद करी. आणि, भावा, ते तसेच असे. त्यांनी तेथे मागील श्रोत्यांमधील लोकांना बोलाविले. मी विचार केला, "ओह, भावा, ते अद्भुत आहे!"

298 "मिस जोन्सला किंवा अमुक आणि अमुकाला सांग, आता सरळ ये; परमेश्वर तिला बोलावीत आहे." येथे ती आली. ते बरोबर आहे.

मग, हा एक अन्य भाषेत बोलत असे, आणि दुसरा एक अनुवाद करीत असे. मी विचार केला, "ओह, माझ्या! माझ्या! सहस्त्राब्दी ही सुरु होण्याच्या मार्गावर आहे. ते हे आहे." आणि तेव्हा ... "जर मी फक्त त्या पापभिरु मनुष्यांशी हात मिळवू शकलो असतो," मी विचार केला. आणि जेव्हा मी बाहेर सभोवती चालत होतो त्यातील एकाकडे मी गेलो. त्यांना मी ठाऊक नव्हतो, तेथे मी एक लहानसा बिचारा मनुष्य

होतो. आणि तेव्हा मी प्रार्थना मंदिरासभोवती चालत गेलो आणि थोड्या वेळाने जेव्हा त्यांनी लहानशी मधली सुट्टी दिली, आणि मी एका माणसाला तेथे बाहेर भेटलो आणि मी ... (त्यातील एक) आणि मी त्याच्याशी हात मिळविला, मी म्हणालो, "तू कसा आहेस, भावा?"

299 आता, तुम्हाला माहित आहे देवाने मला एक लहानशी देणगी दिली आहे येथे गोष्टी शोधून काढण्यासाठी जेव्हा त्याला हवे असेल की मला ते कळावे, पहा. मी विचार केला, "जर मी कधी त्याच्याबरोबर बोलेन आणि त्याला काहीतरी बोलावयास लावीन, मी शोधून काढीन की ते खरोखर सत्य होते किंवा नाही." तेव्हा मी पाहिले की त्या सर्वांचा तो नेता असा दिसत होता, आणि मी त्याच्याशी हात मिळविला. "भावा, तू कसा काय आहेस?" म्हणाला, "तू कसा काय आहेस?" आणि मी त्याच्याशी थोडेसे बोललो, तो एक खरा ख्रिस्ती होता; तो होता, आणि मी विचार केला, "देवाची स्तुती असो!"

थोड्या वेळाने मी कोपऱ्यावर आलो, आणि या दुसऱ्या मनुष्याला भेटलो, मी म्हणालो, "भावा, तू कसा काय आहेस?" आणि मी त्याच्याशी बोलू लागलो. जर कधी मी कोणत्या ढोंग्याशी बोललो असेल, तेथे त्यापैकी तो एक होता. तो एक काळ्या केसांचा मनुष्य होता, आणि त्याला एका गोऱ्या स्त्रीकडून मूल होते ... त्या गोऱ्या स्त्रीपासून दोन मुले होती. मी ते दृष्टांतात पाहिले, अगदी सरळ माझ्यासमोर.

300 आणि मी विचार केला, "आता, मी खरोखर गोंधळलो आहे. आता, कसा काय तोच आत्मा - एका मनुष्यावर, एका पापभिरु मनुष्यावर असू शकतो, आणि तो दुसरा एका सैतानावर, ढोंग्यावर?" मी विचार केला, "देवा, बरे होईल मी ती अखंड गोष्ट सोडून देईन, मला ठाऊक नाही." मी केवळ सुमारे एकोणीस, वीस वर्षे वयाचा होतो, आणि मी विचार केला, "बरे होईल मी अगदी ती गोष्ट सोडून द्यावी. बरे, मला ठाऊक नाही. कसे काय जगामध्ये असे होऊ शकत होते? त्याबद्दल मी काहीही सांगू शकत नाही, मी त्याविरुद्ध काहीही सांगू शकत नाही, परंतु मला ठाऊक आहे तो मनुष्य चुकीचा आहे." आणि तो तोच आत्मा, मी त्याला पाहिले होते, त्याचा तेथे वर्षाव झाला आणि सारखाच परिणाम झाला. मी विचार केला, "तेथे काहीतरी येथे कुठेतरी चुकीचे आहे. तेवढेच जेवढे तेथे होते.:"

301 मी या मनुष्याला म्हणालो.... तो म्हणाला, "तुला कधी पवित्र आत्मा प्राप्त झाला का?"

मी म्हणालो, "मी विश्वास करीत नाही जे तुम्हाकडे आहे ते मला मिळाले आहे."

म्हणाला, "देवाचा गौरव असो! तू कधी अन्य भाषेत बोलला आहेस?"

मी म्हणालो, "नाही, महाशय."

तो म्हणाला, "तुला तो मिळाला नाही."

मी म्हणालो, "बरे, मी अंदाज करीत नाही मला तो मिळाला आहे," पहा. मी म्हणालो, "हे काहीतरी नवीन आहे. मी याबद्दल कधी ऐकले किंवा पाहिले नाही."

तो म्हणाला, "बरे, तेथे जा आणि तो घे. निश्चितच, तो तुझ्यासाठी आहे."

मी म्हणालो, "धन्यवाद, महाशय." मी विचार केला, "भावा, तुझ्याकडे जे आहे ते मला नको आहे!" तेव्हा मग मी त्याकडे थोडेसे पाहिले, आणि थोड्या वेळाकरिता मी सभोवती गेलो, आणि सभोवती गेलो, आणि त्या रात्री मी बाहेर जंगलात गेलो, आणि मी विचार केला, "देवा दया कर, मी घरी जात आहे." आणि मी घरी गेलो. मी त्याबद्दल किंवा त्याच्याविरुद्ध काही बोलू शकत नव्हतो.

302 एक वेळेस, मी येथे वर ग्रीन मिलमध्ये होतो (माझी जुनी लहानशी गुहा जेथे मी नेहमी जातो ज्याबद्दल तुम्हाला ठाऊक आहे). मी तेथे अजून कशासाठीतरी गेलेलो होतो. तीन किंवा चार दिवास तेथे वर मी उपास व प्रार्थना करीत होतो. गुहेमध्ये कुबट वास येत होता, आणि एके दुपारी मी बाहेर आलो, ती चांगली दुपार होती आणि सूर्य तळपत होता ... पाने. तेथे एक जुने झाड अशाप्रकारे खाली वाकले होते अगदी (तळ्याच्या दिशेने) खाली, आणि मी माझे डोळे चोळीत तेथे खाली बसलो (तेथे त्या गडद गुहेमध्ये मागे काही काळासाठी होतो). मी अशाप्रकारे माझे पवित्र शास्त्र खाली ठेवले, आणि मी विचार केला, "बरे, मी विश्वास करतो मी पवित्र शास्त्रातून काही वाचेन." आणि मी येथे या डहाळीच्या आधारे मागे वाकलो आणि फक्त स्वतःला आरामात ठेवीत, मागे वळलो; मी संपूर्णपणे धुळीने माखलो होतो.

303 आणि मी वाचण्यास सुरुवात केली, आणि जेव्हा मी पवित्र शास्त्र उचलले, तो इब्रीचा ६ अध्याय होता, पहा. "कारण ज्यांना एकदा प्रकाश मिळाला; जे पवित्र आत्म्याचे वाटेकरी झाले, ते जर पतित झाले, तर त्यांना पश्चाताप होईल असे त्यांचे पुनः नविनीकरण होणे अशक्य आहे. कारण जी भूमी आपणावर वारंवार पडलेला पाऊस पिऊन, आपली लागवड करणाऱ्यांना.... परंतु जी भूमी काटे कुसळे उपजविते, ती नापसंत व शापित होण्याच्या बेतात आली आहे, तिचा शेवट जाळण्यात आहे."

मी विचार केला, "बरे, ते काय आहे?" थांबलो, आणि मी विचार केला, "ते काय होते? ओह," मी म्हणालो, "मी अंदाज करतो ते फक्त काहीतरी आहे." ... दूर गेले. मी तेथे वर इतर कशाबद्दल तरी प्रार्थना करीत होतो. आणि मी माझे पवित्रशास्त्र परत खाली ठेवले. मी म्हणालो, "बरे, मी अंदाज करतो मी परत वळीन आणि माझ्यासाठी वाचण्यास काहीतरी काढीन," अशाप्रकारे, आणि वारा आला आणि सरळ त्याला मागे केले. मी जुन्या करारात होतो; परत पाने उडून इब्री ६ व्या अध्यायात आली. मी परत खाली पाहिले, आणि तेथे ते होते. मी पाहिले; मी ते उचलले, मी ते परत वाचले - तीच गोष्ट. "बरे," मी विचार केला, "माझ्या! बिल, तू अंधश्रद्धाळू होत आहेस का?"

304 तेव्हा, मी विचार केला, "बरे, मी येथे वाचीन," आणि मी वाचावयास सुरुवात केली, आणि कशामध्येच मला रस वाटला नाही. मी विचार केला, "बरे, मी विश्वास करतो मी फक्त माझे हात उंच करुन, परमेश्वराची स्तुती करीन." मी अशाप्रकारे पवित्र शास्त्र खाली ठेवले;

परमेश्वराची स्तुती करण्यासाठी माझे हात उंच केले. जेव्हा मी माझे हात उंच केले, वारा गेला, "व्हुश," परत वाहिला, आणि जेव्हा ती उडाली, मी खाली पाहिले तेथे: इब्री ६. मी ते परत वाचले. मी विचार केला, "त्याचा काय अर्थ आहे? मी समजू शकत नाही." मी पेन्टिकॉस्टल कल्पनेबद्दल विसरुन गेलो होतो. मग मी विचार केला, "त्याचा काय अर्थ आहे?"

305 आणि मी तेथे बसलेलो होतो आणि मी विचार केला, "तेथे त्यामध्ये काहीतरी आहे का, परमेश्वरा?" मी विचार केला, "आता, मी निवडीमध्ये विश्वास करतो. होय. 'ते ज्यांना एकदा प्रकाश मिळाला; पवित्र आत्म्याचे वाटेकरी झाले [पहा], आणि देवाच्या सुवचनाची रुची घेतली....'" मी म्हणालो, "ते सीमारेषेवरील विश्वासू आहेत जे जवळ जवळ सरळ वास्तविक गोष्टीपर्यंत येतील आणि मग मागे फिरतील; अगदी जसे ते यहोशवाच्या समयातील होते." यहोशवा आणि कालेब पार गेले, परंतु हे अगदी सीमारेषेवर राहिले, पहा, देवाच्या चांगल्या कार्यांची रुची घेतली आणि पाहिले, मग त्याला नाकारले.

लोक सर्वदा मंडळी सभोवती बसतात, म्हणत, "मी त्याचा विश्वास करतो भाऊ ब्रॅन्हम," परंतु त्याकडे येण्यासाठी कधी हालचाल करीत नाही. पहा, त्यांच्यासाठी कधी पलीकडे जाणे अशक्य आहे. तेव्हा मग ते त्या जागेवर येतात, आणि तुम्ही तोकड्या केसांच्या स्त्रियांना प्रचार करा; पुढच्या वर्षी त्यांचे केस तोकडे असतात, अगदी तसेच. त्यांना प्रचार करा, ते अगदी त्याच गोष्टी करतात, तुम्ही पहा. कधीही पाहत नाही - सीमारेषेवरील विश्वासू. फक्त म्हणतात, "ओह, होय, मी विश्वास करतो ते बरोबर आहे."

306 मी म्हणालो, "अर्थात, मी त्याचा विश्वास करतो." परंतु हे ... जेव्हा ते त्या जागेवर येते. "परंतु जी भूमी काटे कुसळे उपजविते ती नापसंत होण्याच्या बेतात आलेली आहे, तिचा शेवट जाळण्यात आहे." मी विचार केला, "त्याचा अर्थ काय आहे? मला ते समजू शकत नाही."

आणि मी तेथे थोडा वेळ बसलेलो होतो, आणि मी विचार केला, "देवा, जर हे काहीतरी आहे जे तुला हवे आहे की मला समजावे, मी येथे वर तुझ्यापासून एक दृष्टांत शोधत आहे, परमेश्वरा, हे अगदी समजण्यासाठी तेथे खाली सेवेबद्दल काय करावे, आणि मला हवे आहे की तू मला सांगावे, पित्या." आणि मी पाहिले, दरीच्या पलीकडे वर जाताना त्यांच्याकडे (मी चारल्सटनच्या मार्गावर आणि वरच्या बाजूस होतो) ... न्यू मार्केटकडे जाताना, त्या मार्गाने, टेकड्याच्या पलीकडे वर, आणि मी पाहिले आणि बघितले की दरीवर मेघधनुष्यासारखे लोंबकळत आहे. आणि या मेघधनुष्यामधून मी काहीतरी वळताना पाहिले, आणि मी पाहिले, आणि ते जग होते. आणि येथे एक माणूस पांढऱ्या पेहरावामध्ये गेला.

307 आता, तुमच्यातील कित्येक लोक येथे हे समजण्यासाठी फार लहान आहेत. तुम्हाला लक्षात आहे, जेव्हा आपण बीजे प्रसारित करायचो आपल्या....? एक भली मोठी पिशवी आपल्या खांद्यावर ठेवायचो, आणि तुमच्या हाताने ती फेकायचे? मिस्टर वुड, तुला ते लक्षात आहे - अशाप्रकारे बीजे प्रसारित करणे. तुमच्या हातात ती घेऊन, अशाप्रकारे त्यांना बाहेर फवारायचे. वाऱ्याला त्यांना चिखलामध्ये उडू द्या.

आणि मी एक पांढरा पेहराव केलेल्या माणसाला अशाप्रकारे पलीकडे जाताना, बीजे पेरताना पाहिले. आणि मी त्याला पूर्णपणे पृथ्वीच्या सभोवती जाईपर्यंत पाहिले. आणि मी विचार केला, "विचार करतो त्याचा काय अर्थ आहे." आणि मग, मी पाहिले; अगदी तो त्याची पाठ वळवितो न वळवितो तोच, येथे खरा एक धोकेबाज आला, सभोवती येत, अशाप्रकारे पाहत. त्याची गोण पूर्णपणे भरलेली होती आणि त्याच्या मागे, तो निंदण पेरीत होता. तो पृथ्वीसभोवती गेला; अजूनही पाहत, लपतछपत, तुम्हाला माहित आहे, अशाप्रकारे ते फेकत, आणि तो पृथ्वी सभोवती गेला.

308 मग मी त्यांना वर येताना पाहिले, आणि गहू वर आला आणि निंदण, काटेरी, काटे, कुसळे वर आले. आणि ते दोघे ही एकत्र वाढत होते. आणि तेथे एक मोठा दुष्काळ आला, आणि मी पाहिले लहान गहू त्याचे लहानसे डोके, खाली लटकवीत, "हा-हा हा-हा हा-हा हा," करीत होता, अगदी पाण्यासाठी मरत होता. आणि मी लहान जुन्या धोतऱ्याला त्याचे लहान डोके लटकवीत "हा-हा हा-हा" करीत, अगदी पाण्यासाठी मरताना पाहिले. आणि सर्वजण पाण्यासाठी प्रार्थना करु लागले, आणि अचानक प्रार्थनेचे उत्तर म्हणून मोठा पाऊस आला. आणि पाऊस साऱ्या पृथ्वीभर गेला, आणि पाण्याने पृथ्वीला स्पर्श करताच, त्या लहानशा गव्हाने वर उडी मारली आणि म्हणाला, "गौरव! गौरव! गौरव! गौरव!" आणि त्या लहानशा धोतऱ्याने वर उडी मारली आणि म्हणाला, "गौरव! गौरव! गौरव! गौरव!"

बरे, मी विचार केला, "आता ते काय आहे?" आणि अगदी तेव्हा ... "बरे, ते गहू ओरडत होते, मी ते पाहू शकतो; परंतु तो धोतरा म्हणजे काय होते?" मग तो म्हणाला, "इब्री ६ वाच."

309 पाऊस नीतिमान व अनीतिमानावर पडतो. तीच काय ती बाब आहे; त्यामुळेच काय ती आपल्याकडे आता ख्रिस्तासाठी एक वधू तयार नाही. आपण वचनाऐवजी सांप्रदायिक बीज पेरले आहे. त्याने काय केले आहे? - काही अधिक सांप्रदायिक मुले आणली आहेत. ते बरोबर आहे. परंतु त्यांच्यामध्ये तेथे काही गहू पडले आहेत. ते बरोबर आहे.

परंतु पहा, तोच आत्मा जो एका खऱ्या, वास्तविक, सत्य विश्वासूला अन्यभाषेत बोलावयास लावितो, तो खरा आत्मा जो अस्सल विश्वासूला एक ख्रिस्ती बनवितो (पहा, कारण तो एका वचनाला, एका बीजाला जलसिंचन करतो), तोच आत्मा त्याला काहीतरी पर्याय बनवितो, जसे हव्वेचे संकरण. संकरणाला तेवढेच आनंदी, अगदी तेवढेच ओरडायला लावितो, बाकीच्या उरलेल्यांसारखे अगदी तेवढेच हर्षित करितो. परंतु त्याचे सत्य काय आहे? - सुरुवातीपासूनच बीज चुकीचे आहे!

310 म्हणून तुमची सर्व दैहिक निदर्शने यांचा काही अर्थ नाही! "मी माणसांच्या व देवदूतांच्या भाषेत बोलत असलो पण माझ्याठायी प्रीति नसली, त्याचा मला काही लाभ होणार नाही. जरी मी डोंगर ढळू शकलो आणि माझ्याठायी प्रीति नसेल, त्याने मला काही लाभ होणार नाही. जरी मी माझी सर्व संपत्ती गरिबांना अन्नदानार्थ दिली आणि प्रीति नसेल, त्याने मला काही लाभ होणार नाही. जर मी माणसांच्या आणि

देवदूतांच्या भाषांमध्ये बोलत असलो, ती वाजणारी थाळी आणि झणझणणारी झांज आहे." पहा, ते काहीही नाही. ऐका, मंडळी: पेन्टिकॉस्टल - काहीही नाही! का? ते एक संकरित बीज आहे. ते वचनाकडे येऊ शकत नाही.

311 आता तेथे तुम्ही आहात. तो देह जो ख्रिस्ताच्या देहाला जन्म देतो परत तो कुमारी गर्भाशयातून यायला हवा. ते वचन, बरोबर! त्यामुळेच काय ते.... हे ऐका. त्यामुळेच काय ते तिने "'४४ मध्ये दशलक्ष उत्पन्न केले." (तेच काय ते बॅप्टिस्ट घोषवाक्य होते.) त्यामुळेच काय ते पेन्टिकॉस्टल संप्रदाय आत्मिक जन्म देऊ शकत नव्हते प्रकटीकरणे आणि ख्रिस्ताला आणण्यासाठी, कारण तो फक्त पेरणी करण्याचा पाऊस होता, आणि तिने एक सांप्रदायिक मंडळी आणली, आणि ती महान सुवार्तिकांशी संघटित झाली, आणि ती कोरहाच्या मार्गाने गेली. त्यामुळेच, ती संप्रदायांबरोबर गेली.

312 आता, काही प्रतीकांसाठी जुन्या करारात जाऊया, आणि मग मी येथे काही मिनिटांमध्ये काहीतरी सुरु करणार आहे आणि तुम्हाला जाऊ देणार आहे. या गोष्टी सिद्ध करण्यासाठी मागे जुन्या करारात काही प्रतिकांसाठी जाऊया. आता, मी येथे कित्येक तास घेतले आहेत, यावर ठेवीत आहे. आता, आपण विषय बदलत आहोत, कार्यक्रम बदलत आहोत. आता, प्रथम, माझ्याकडे काहीतरी आहे, फक्त जेव्हा मी याकडे येईन.... येथे माझ्याकडे काही पाने आहेत आणि मग मला.... ओह, माझ्या! माझ्या! माझ्या! निश्चित ते नाही! मला अगदी खरी त्वरा करायला हवी, मग मी ते वाचीन, पहा. अगदी जितक्या जलदपणे मी वाचू शकतो तेवढे वाचीन, कारण मला ठाऊक आहे आपल्याकडे जास्त नाही परंतु फार थोडा समय आहे आता, पहा. आता तुम्ही थकलात का? नाही! बरे, मग तो मी आहे. पुढे जा, ते ठीक आहे.

313 आता, त्यामुळे काय ते आपल्याकडे सर्व गोष्टी आहेत ज्या आपल्याकडे आहेत. आता या सर्व गोष्टी ज्या मी म्हणालो आहे, जर त्या पवित्र शास्त्रानुरुप नसतील किंवा देवाच्या वचनाबरोबर मेळ खात नसतील - त्या चुकीच्या आहेत. त्या चुकीच्या आहेत. आणि हे सर्व चित्र.... आता, यातील काहींवर मी अगदी त्वरा करणार आहे (त्याला स्पष्ट करणार नाही, परंतु फक्त त्वरा करणार आहे जेणेकरुन आपण ते समजू शकू; मी तुम्हाला अभिवचन दिले आहे, अगदी जेवढे त्वरेने मला शक्य असेल तेवढे).

येथे मी अशा ठिकाणी आलो जेथे मी इतका आत्म्याने संचारीत झालो. मी मंडळीला ते दाखविण्यासाठी आणि वचनामध्ये ते सिद्ध करण्यासाठी येथे आणले तंतोतत सुरुवातीपासून काय घडले. आणि मग जेव्हा मी केले, मी विचार केला, "प्रभू, येथे माझ्याकडे लोक उभे आहेत आता - मी त्यांना तेथे उभे केले आहे; मी त्यांना काय सांगू शकतो? मी भविष्यकाळाचे भाकीत करु शकत नाही. काय करावे हे मी त्यांना सांगू शकत नाही. मी काय करीन? मी त्यांना डहाळीवर उभे असे सोडीन." आणि मी माझे हात उंच केले, मी म्हणालो, "देवा, मी विचार करतो मी हे तुझ्या इच्छेकरिता करीत आहे. अगोदर मी हे कधीही केले नाही, कधीही केले नाही.", कारण बीज अजूनही पेरले गेले नव्हते. मी म्हणालो, "आता माझ्याकडे आहे.... मी विश्वास करतो हे सांगण्याची ही माझ्यासाठी वेळ आहे; परंतु आता, मी काय सांगणार आहे आता?"

314 आणि अगदी स्पष्टपणे जसा तुम्ही माझा आवाज ऐकता, काहीतरी म्हणाले, "तुझी लेखणी उचल." मी एका मिनिटात तुम्हाला ते वाचून दाखवील. आणि जेव्हा मी ते संपविले, तेथे ते होते, फक्त उत्तर. मला अगदी ठाऊक ही नव्हते मी काय लिहीत होतो, मी फक्त लिहावयास सुरुवात केली. आणि जेव्हा मी संपविले, मी लेखणी खाली ठेवली; मी पाहिले, मी विचार केला, "देवा दया कर, तेथे हे आहे, अगदी तेथे. तेच काय ते मी शोधीत आहे." आता, तेथे काही गोष्टी आहेत ज्या मला वगळाव्या लागल्या. परमेश्वराची इच्छा असल्यास, आपण काही वेळाने त्याकडे जाणार आहोत.

315 सर्व जुना करार प्रतीक होता जो ख्रिस्त आणि त्याच्या मंडळीला निर्देश करतो. तुम्ही विश्वास करता आदाम आणि हव्वा ख्रिस्त आणि त्याच्या मंडळीला निर्देश करते? तुम्ही विश्वास करता यहोवा आणि त्याची पत्नी ख्रिस्ताला आणि त्याच्या मंडळीला निर्देश करते? बरे, जर ते प्रतीक आणि हे पूर्वदर्शीत चिन्ह आहे, त्याला प्रतिकासारखे असणे आहे, कारण प्रतीक घेते त्याकडून ... पूर्वदर्शीक चिन्ह प्रतीकातून घेतले जाते. ख्रिस्त हा मस्तक आहे, देवाचा खरा खडक. तुम्ही ते विश्वास करता? तो खरा शब्द. वधू हे शरीर आहे.

तुम्हाला यावर काही शास्त्रलेख हवे आहेत, जेणेकरुन तुम्ही ते पाहू शकता? (मी शास्त्रलेख वाचणार होतो, परंतु मी वाचणार नाही.) १ पेत्र २:१-६; इफिस करांस ५:२२; (पहा), १ पेत्र २:१-६, इफिस करांस ५:२३. तो अध्याय वाचा, तेथील दोन्ही, पहा.

316 तो जुना करार: ख्रिस्त, येथे पहा. फक्त हे एक उदाहरणादाखल घेऊया. (कदाचित जर माझ्या पत्नीने माझा डॉलर घेतला नसेल. येथे तो आहे. काही काळापूर्वी काही सँडविचसाठी दिलेला होता. मला क्षमा करा, मित्रांनो, मी ते सांगायला नको हवे होते, परंतु ... माझ्याकडे एक चांगली पत्नी आहे.) आता, या डॉलरच्या पाठी ... (जर ती नसती, माझ्याकडे डॉलर नसता, मी अंदाज करतो; देवाची दया ते आम्हाला देत आहे आणि ती मला मदत करते.) आता, याच्या पाठी, असे दिसते, जर ते आपले पैसे असतील, तो अमेरिकेचा शिक्का डॉलरच्या डाव्या बाजूस या देशातील एक महान शिक्का असावयास हवा होता. ते बरोबर आहे का? बरे, ते असे का की पिरॅमिडला तो महान शिक्का म्हटले गेले आहे? अगदी तुमच्या पैशाला देखील याची साक्ष देणे आहे. होय, प्रत्येक वेळी तुम्ही एक पोस्टकार्ड किंवा तार पाठविता, तुम्हाला त्याची साक्ष.... ते साक्ष देते: आपल्या परमेश्वराचे वर्ष, एकोणीसशे आणि बासष्ट. सर्वकाही ख्रिस्ताची साक्ष देते, पहा.

317 तुम्ही पाहिले की तो महान शिक्का, तो ते पिरॅमिड आहे? कोणाला कधी ठाऊक आहे त्या पिरॅमिडची कधीही अच्छादन शिला घातली गेली नाही? कितीजणांना ते माहित आहे? निश्चित. मी तेथे इजिप्त, कैरोमध्ये, तेथून गेलो आहे. कधी अच्छादन शिला नव्हती. का? - ती नाकारण्यात आली, ती कोनशिला. ती ती कोनशिला होती ज्याने इमारत धरुन ठेवली - ती एक आधारभूत शिला आहे. कितीजणांना ठाऊक आहे की आधारभूत शिला काय आहे? जेव्हा कमान उभारली जाते, तेव्हा कमानीचा मध्यवर्ती दगड ती एकत्र धरुन ठेवते. ती कोनशीला असते जी इमारतीला धरुन ठेवते, ते बरोबर आहे का? आणि ती कोनशिला पिरॅमिडमध्ये तो आच्छादनाचा खडक होता ... जो मध्यवर्ती दगड होता

ज्याने इतर सर्वांना एकत्र राखले होते. आता, हा मध्यवर्ती दगड नाकारला गेला होता.

तुम्ही निरीक्षण केले, तेथे वर, तो वर उभा आहे, पिरॅमिडच्या वर. आता, जेव्हा हनोखाने तो उभारला त्याने काय दर्शविले?

318 येथे काय घडले: ते अगदी जसे काही सुवार्ता मंडळीचे येणे होते. पहा, आता पिरॅमिडच्या खाली रुंद भागामध्ये, जे सुधारणूकीचे प्रारंभीचे दिवस दर्शवितात. फक्त तुम्ही स्वतःला ख्रिस्ती म्हणविणे, कॅथोलिक मंडळीला नाकारणे, त्याचा अर्थ त्यासाठी तुम्हाला ठार होणे होते. त्यानंतर मग ते सोबत आले ... त्यांनी विश्वासाद्वारे नीतिमान ठरण्याचा प्रचार केला.

मग सोबत.... आता पहा ते तिघे परत मागे आले. जॉन वेस्ली, पवित्रीकरणाचा प्रचार करीत सोबत आला. ती मंडळी अधिक अल्पसंख्यांक होत गेली. पहा, या बाजूने खाली या.

319 आणि मग जॉन वेस्लीच्या पवित्रीकरणाच्या दिवसानंतर, पेन्टिकॉस्टल मंडळी आली, आणि देवाने त्यातून उरलेले घेतले; प्रत्येकजण जो वचन स्वीकारेल, पहा. आता, जेव्हा ते खाली पेन्टिकॉस्टलकडे आले, त्याने ते फार निकट आणले कारण ती दानांची पुनःस्थापना होती. ती सरळ वर आणीत होती.... ते काय आहे? येथे खाली ते मस्तकाच्या दिसण्यापासून खूप पुढे होते. येथे खाली ते मस्तकाच्या थोडेसे नजीक होते. येथे वर ते थोडेसे निकट होते, परंतु ते पूर्णपणे बाकी उरलेल्यांबरोबर घट्ट जुळणे होते. ते धारदार करणे होते. त्या पिरॅमिडमध्ये, तुम्ही वस्तऱ्याचे पाते घेऊन, ते तुम्ही दोन दगडांमध्ये जेथे सिमेंट लागलेले आहे, तेथे ते टाकू शकत नाही; ते इतके घट्टपणे एकत्र लावले गेले आहेत. ते म्हणतात शलमोनाचे मंदिर ही त्याच प्रकारे होते, पहा.

320 देव त्या पेन्टिकॉस्टल मंडळीमधून निवडलेले बाहेर घेत आहे (ती संकरित), त्यांना बाहेर खेचत आहे आणि वचन पूर्ण करीत आहे. आणि ते इतके निकट असायला हवे की वचन स्वतः या वचनाबरोबर जोडले जाईल. तेथे शिखराचा खडक, ओरडत येतो, "कृपा, कृपा, आश्चर्यकारक कृपा." - तो शिखराचा खडक. येथे तुम्ही अशाप्रकारे आहात, पहा, यावर. पहा, कसे ते खाली येथे रुंद आहे? आणि ते निकट, निकट, निकट होत जाते (सेवा), थोड्या वेळानंतर येथे येते.... येथे लुथर आहे: नीतिमान ठरणे, नीतिमान ठरलेला. येथे वेस्ली येतो: पवित्र केलेला जमाव. येथे पेन्टिकॉस्टल येतात: दानांची पुनःस्थापना.

आता, देव तेथून घेत आहे, जमावाला धारदार करीत आहे अशी एक सेवा बनविण्यासाठी अगदी तंतोतंत तेथील त्या वचनासारखी, कारण तिला वचनाबरोबर घट्ट जुळणे आहे. तेथे वधू आहे; तिला वर घेतो.

321 आता, दुष्टाची कार्ये नाश करण्यासाठी ख्रिस्त प्रकट झाला. तुम्ही त्याचा विश्वास करता? आता, मी हे सर्व स्पष्ट करु शकत नाही; मी फक्त त्यातून जाणार आहे, फक्त त्वरित आता; उंच जागांवर प्रहार करतो जेणेकरुन तुम्हाला जास्त वेळ राहावे लागणार नाही. सैतानाच्या कार्यांचा नाश करण्यासाठी ख्रिस्त प्रकट झाला. ते बरोबर आहे? तुम्ही सर्व त्याचा विश्वास करता? त्यामुळेच.... तो काय होता? - देवाचा शब्द, जो सैतानाची, संकरणाची कार्य नाश करतो. ते बरोबर आहे? तो केला गेला तसे करण्यासाठी; तसे करण्यासाठी, सैतानाची कार्ये नाश करण्यासाठी त्याचा जन्म झाला.

आता, त्याच्या देहाला तीच गोष्ट करणे आहे कारण देह हा ... ते मस्तक आणि देह एकत्र आहे. ते बरोबर आहे? जर ख्रिस्त मस्तक आहे ... जो वचन होता, त्याचा देह तीच गोष्ट असायला हवी जसे त्याचे मस्तक होते. ते बरोबर आहे? वचनाची मंडळी, वचनापासून जन्मलेली. वचनापासून जन्मलेली कुमारी, आता सांप्रदायिक नाही. वचनापासून जन्मलेली कुमारी.

322 मस्तकाद्वारे शरीर कार्य करते. ते बरोबर आहे? माझे शरीर तोपर्यंत हलू शकत नाही जोपर्यंत माझे मस्तक त्याला हलायला सांगत नाही. बरे, काय जर ते मस्तक मांसाचे आहे आणि माझे शरीर काँक्रिटचे आहे? - हलू शकत नाही. मस्तक सांगू शकते, "सरक, सरक, सरक, सरक, सरक," परंतु तेथे संदेश पाठविण्यासाठी काही नाही. ते बरोबर आहे? बरे, जर माझे मस्तक ख्रिस्त आहे आणि माझे शरीर एक संप्रदाय आहे, कसे काय ते कार्य करणार आहे? कशी काय पवित्रता आणि कलावंतीण एकत्र कार्य करु शकते?

बंधुजनांनो, मला हे आवडते; मी तुम्हाला सांगतो. काही वेळासाठी मला यातील काहीवर प्रचार करायला आवडेल. ज्याप्रकारे शरीर कार्य करते ते मस्तकाद्वारे आहे, आणि मस्तक हे वचन आहे. ते बरोबर आहे? मस्तक वचन आहे.

323 आता, आधुनिक मंडळीची तुलना करा. का आपल्याकडे त्यामध्ये चमत्कार नाहीत? आपल्याकडे त्यामध्ये वचन का नाही? त्यामध्ये ते वचन घेऊ शकत नाहीत; तो संप्रदाय त्याला थांबवितो. निश्चित.

म्हणा, येथे एक चांगला देवाचा संत मनुष्य, देवाचे वचन प्रचार करीत येतो, अगदी थेट पवित्र शास्त्रातून जेवढे तो करु शकतो. तो संप्रदाय: "हम्म, नाही! नाही, महाशय! त्याला येथून बाहेर घालून द्या!" पहा? शरीर हलू शकत नाही; घट्ट बसलेले आहे ... बसणेच आहे.

324 आता, ते शरीर कार्ये करते, कार्ये करते आणि ती कार्ये करते जे मस्तक त्याला करण्याचा आदेश देते. सांगा मला त्याने कधी कुठे "संस्थागत व्हा" असे सांगितले! सांगा मला कुठे मस्तक म्हणते, "स्त्रियांसाठी केस कापणे ठीक आहे"! त्याचा उल्लेख करा? - ते तेथे नाही. मला सांगा कुठे मस्तक कधी म्हणाले, "ही कार्य मी करतो, परंतु तुम्ही ती करणार नाही!" मला ते सांगा! परंतु मस्तक हे म्हणाले (जर तुम्हाला शास्त्रलेख लिहून घ्यायचा असेल, मी तो तुम्हाला देईन: योहान १४:१२), "जी कार्ये मी करतो, तुम्ही देखील कराल." तो त्याचा देह आहे, पहा.

आता पहा, ज्याप्रकारचे बीज जे मी शरीरासाठी पेरले आहे त्याबाबत मी इतका इर्ष्यायुक्त का आहे? लवकरच पाऊस पडणार आहे; मला म्हणायचे आहे खरा पाऊस. आणि तो बीजावर पडणे आहे. मी आशा करतो ते पाहण्यासाठी मी जगावे. आता तुम्हाला समजले? तो जिवंत

शब्द असेल जसा तो सुरुवातीला होता - देवाचा बोललेला शब्द, त्याचे सामर्थ्य होते; कारण ते त्याच्यामध्ये आहे त्याच्या स्वतःच्या शरीरामध्ये, त्याच्या स्वतःच्या मार्गाने कार्य करीत होते. त्या अभिवचनांकडे पहा जी देवाने या शरीराला दिली आहेत.

325 आता, आपण कशाजवळतरी येत आहोत. आपण सियोन डोंगरावर येत आहोत, आता. तो या शरीराला काय बोलला ते पाहूया - मला म्हणायचे आहे कुमारी जन्मलेल्या. आता आपण त्याची नक्कल पाहतो. आपण ते प्रत्येक दिवशी पाहतो. परंतु वास्तविक शरीराकडे येऊया, पहा तो याबद्दल काय म्हणाला. पाहूया. ठीक आहे, येथे आहे जे काही त्याने अभिवचन दिले.

तुम्ही विश्वास करता की योहान ३:१६ हे बरोबर आहे? मला ते लगेच वाचायचे आहे. बस तेवढेच तेथे आहे. ठीक आहे. तुम्ही ... सर्वजण जे योहान ३:१६ विश्वास करतात: "देवाने जगावर इतकी प्रीति केली की त्याने त्याचा एकुलता एक पुत्र दिला," आणि इत्यादी, म्हणा, "आमेन." मी तुम्हाला बाकीचे सर्व विश्वास करण्याची हिंमत करण्यास सांगतो! आता, मी शरीराबद्दल बोलत आहे.

326 सुरुवातीपासूनच योहान २० घेऊया. ठीक आहे, योहान २० वा अध्याय घ्या, आणि पाहूया. योहान २० वा अध्याय आणि आपण सुरुवात करणार आहोत, ओह, मी ९ व्या पदाबद्दल सांगेन. संत योहान २०, (मी विश्वास करतो तेच जे काही मी येथे खाली खूण करुन ठेवले आहे), आणि १९ व्या पदाने सुरुवात करुन. आता, लक्षपूर्वक ऐका.

ते विश्वास करण्याचे मी तुम्हाला आवाहन करतो! ओह, मला अगदी चांगले वाटत आहे. ओह, जर मी फक्त.... मी इच्छा करतो मी अगदी पवित्र आत्म्याला येथे अगदी दाटीवाटीने एकत्र येताना पाहू शकलो असतो, अशाप्रकारे; म्हणाला असता, "आता, तो मी आहे." ऐका:

... त्याच दिवशी, म्हणजे आठवड्याच्या पहिल्या दिवशी संध्याकाळी, जेथे शिष्य होते तेथील दारे यहुद्यांच्या भीतीमुळे बंद असता, येशू आला व मध्ये उभा राहून, म्हणाला, तुम्हास शांती असो.

असे बोलून, त्याने आपले हात व कूस त्यांना दाखवली. [आणि जेव्हा त्याचे शिष्य ... पाहूया ... त्याची कूस आणि जेव्हा ...] मग तेव्हा प्रभूला पाहून, शिष्यांना आनंद झाला.

मग येशू त्यांना म्हणाला ... तुम्हास शांती असो: [ओह, तुम्ही तयार आहात?] जसे पित्याने मला पाठविले आहे, [तो वचन आहे, ते बीज, वचन-बीज] तसे मी ही तुम्हास पाठवितो. [तुम्ही त्याचा विश्वास करता? थांबू नका; तेथे त्यामध्ये अधिक आहे.]

असे बोलून, त्याने त्यांच्यावर फुंकर टाकला, आणि त्यांना म्हटले, पवित्र आत्म्याचा स्वीकार करा:

ज्या कोणाच्या पापांची तुम्ही क्षमा करता, त्यांची क्षमा झाली आहेत; आणि ज्या कोणाची तुम्ही तशीच ठेवता, ती तशीच ठेवलेली आहेत.

327 ते सत्य आहे का? तो ते कोणाला म्हणाला? - त्या बीजाला, त्या वचनाला. का? - तेच केवळ वचनाद्वारे जन्म घेऊ शकतात. त्याच कारणास्तव. तुम्ही त्याचा विश्वास करता? आता मत्तय १६ घेऊया, एका मिनिटासाठी. मत्तय १६:१९. फक्त एक मिनिट हे वाचूया. ठीक आहे:

आणि मी तुला स्वर्गाच्या राज्याच्या किल्ल्या देईन: आणि पृथ्वीवर जे काही तू बांधशील ते स्वर्गात बांधले जाईल: व पृथ्वीवर जे काही तू मोकळे करशील ते स्वर्गात मोकळे केले जाईल.

ते विश्वास करण्यासाठी मी तुम्हाला आव्हान देतो. जर ते वचन नसेल, योहान ३:१६ हे वचन नाही. का तुम्ही काही घ्यायला हवे आणि दुसरे घ्यायला नको? देवाची सर्व वचने बरोबर आहेत, परंतु ती कुमारी गर्भाशयात यायला हवी जेथे काही नाही परंतु ते बीज पडलेले आहे. तुम्ही ते विश्वास करता? ठीक आहे. आता, हे लक्षपूर्वक पहा.

328 मला माहित आहे वेश्या ह्याचा दावा करते, आणि त्यांच्या सांप्रदायिक सामर्थ्याने ते पापांची क्षमा करतात. परंतु त्यांच्या मुलांकडे पहा: प्रत्येक नृत्याच्या सभागृहात, त्यांचे केस कापतात, जोकराप्रमाणे रंगरंगोटी करतात, पुरुष बाहेर इतर पुरुषांच्या पत्नीबरोबर राहतात, रस्त्यावर प्रेमाचे ढोंग करीत सभोवती धावतात, मिश्र स्नान; इतर सर्वकाही. निश्चित, ते क्षमा करतात; त्यांच्या स्वतःच्या मार्गाने ते पापांची क्षमा करतात, परंतु ते काय आहेत ते त्यांची फळे दाखवितात. ते त्यांच्यासाठी बरोबर नाही, नाही, महाशय. ते काय करतात? - ते तोकड्या विजारी परिधान करतात, त्यांचे केस कापतात, चेहऱ्यावर रंगरंगोटी करतात. येशू म्हणाला, "त्यांच्या फळावरुन त्यांची ओळख होते," कोणत्या प्रकारचे बीज ते आहेत. तेथेच जेथे ते आहे.

सांप्रदायिक बीज सांप्रदायिक क्षमा देते. ते तंतोतंत बरोबर आहे. देव म्हणाला, "शब्द आपापल्या परी उपजवो," आणि तसेच ते आहे. ते बरोबर आहे. ओह, भावा, शास्त्रलेख सत्य आहे. त्याचा तुम्ही विश्वास करता?

329 आणि ज्या पूर्वनिर्धारित दानांचा मंडळी दावा करते की तिच्याकडे आहेत, त्याची पवित्र आत्मा साक्ष देतो? काय? वचनाला जलसिंचन करुन, वचनाला आमेन या शब्दाद्वारे जोर देऊन.

जेव्हा ते म्हणाले, "पश्चाताप करा आणि येशू ख्रिस्ताच्या नावात बाप्तिस्मा घ्या" ... "आमेन!" जेव्हा ते या इतर गोष्टी म्हणते ... "आमेन!" ते ते आहे: "आमेन" सर्व गोष्टींसाठी, पहा. ते वचनाला जोर देते. आणि पापांची क्षमा करण्यासाठी, देवाने दान येण्यासाठी पूर्वनिर्धारित केले. परंतु ते आत्म्याने भरलेल्या वचन देहाला दिले गेले, कारण केवळ वचन पापांची क्षमा करु शकते, कारण ते वचन देव आहे.

330 कसे ते परुशी खरे होते. मी आज सकाळी उल्लेख केला आपण याकडे येणार आहोत, आता मी माझी वेळ घेतलेली आहे. परंतु ते परुशी म्हणाले, "हा मनुष्य पापांची क्षमा करतो. आम्हाला माहित आहे तो एक दुर्भाषण करणारा आहे. केवळ देव पापांची क्षमा करु शकतो,

आणि हा मनुष्य पापांची क्षमा करतो" - हे न समजून की तो वचन होता. ते वचन पापांची क्षमा करते कारण तो देव आहे. आणि जेव्हा तुम्ही तुमचे स्वतःचे राहत नाही - देवाला ठाऊक आहे ... माहित होते आणि पूर्वज्ञानाद्वारे अगोदरच ठाऊक होते कोण हे दान घेईल आणि कोण त्याचा योग्यरितीने वापर करील. ज्यांच्याकडे ते आहे, ते देवाच्या वचनाद्वारे बाकीच्या वचनाबरोबर आणि आत्म्याबरोबर प्रमाणित केलेले आहेत. ते स्पष्ट आहे? काही ज्यांनी विश्वास केला आहे ते शाळेने, शिष्यवृत्ती, पदवीद्वारे आलेले आहेत; जर तुम्ही इतका काळ शाळेत जाल; जर तुम्ही एक बिशप व्हाल, पोप होण्यासाठी अभ्यास कराल, किंवा तुम्ही कार्डिनल किंवा अशाप्रकारे काहीतरी व्हाल (की काही आम्हाला विश्वास करायला लावतील की तेथूनच जेथून ते येते) जेव्हा मनुष्यांनी, हात ठेवण्याद्वारे, तुम्हाला काहीतरी करण्यास लावले. परंतु ते वचनाबाहेर आहेत!

331 रोमकरांस ११:२९ म्हणते, "दाने आणि पाचारण पश्चातापाविना आहे." देव ते देतो. आणि योहान १५:१६ देखील, जर तुम्हाला ते लिहून घ्यायचे असेल. आता लक्षपूर्वक, ऐका. येशू त्याच्या दिवसातील संप्रदायांपेक्षा किती भिन्न होता! ते त्याला मागे खुणावत होते - थोड्या वेळाकरिता यावर मला धरुन ठेवायचे आहे, व्हिव! ते त्यांच्या खांद्यावरुन खुणावत होते, समयातून मागे आणि म्हणाले, "आम्ही मोशेचे शिष्य आहोत. आम्हाला ठाऊक आहे देवाने मोशेला अग्नीच्या झुडुपात दर्शन दिले, आम्हाला ठाऊक आहे." त्यांना मोशेचा इतिहास ठाऊक होता, परंतु त्यांना मोशेचा देव ठाऊक नव्हता, कारण तो योहान ६ मध्ये त्यांच्यासमोर उभा राहिला आणि म्हणाला, "मोशेअगोदर ... अब्राहामाअगोदर, मी आहे." - ते जळणारे झुडूप. त्यांना मोशेचा इतिहास ठाऊक होता.

तसेच आज आहे. त्यांना देव माहित आहे ... ते दावा करतात त्यांना ख्रिस्ताचे वचन ठाऊक आहे, परंतु त्यांना देव ठाऊक नाही जो ख्रिस्तामध्ये होता. रंगविलेला अग्नी. कोणाला रंगविलेल्या अग्नीद्वारे उब मिळू शकते - एक विद्यालयाचा अनुभव? त्यांना मोशे ठाऊक होता, परंतु त्याचा देव नाही.

332 येशू म्हणू शकला असता आणि म्हणाला आमेन! भावा, हे ऐक. व्हिव! आता, मला दाविदासारखे वाटत आहे, ती गोफण आता गुंडाळीत आहे. मी आशा करतो की मी तुम्हाला अधार्मिक भासत नाही, मित्रांनो. मी ठीक आहे, परंतु मला अगदी चांगले वाटत आहे. आता फक्त मला चांगले वाटू लागले आहे.

येशू म्हणू शकला असता आणि म्हणाला, "ज्या पित्याने मला पाठविले तो माझ्यामध्ये आहे, आणि जसे त्याने मला पाठविले, तसे मी तुम्हाला पाठवितो" - त्याच्या शिष्यांना. "ज्या पित्याने मला पाठविले तो माझ्यामध्ये आहे. जर माझ्या पित्याने अभिवचन दिलेल्या वचनाची कार्ये मी करीत नसेन, मग माझा विश्वास करु नका, कारण ती एक आहेत जी माझी साक्ष देतात." हालेलूया! ओह, मंडळी, तुम्ही कुठे आहात? येशू म्हणाला.... ते म्हणतात, "ओह, आम्हाला महिती आहे की देवाने हे केले आहे, परंतु आज नाही." येशू तेच म्हणाला.... "आम्हाला माहिती आहे देव मोशेबरोबर होता."

"परंतु तो देव जो माझ्याबरोबर होता तो माझ्यामध्ये आहे, कारण जर तुम्ही ते विश्वास करीत नाही, पहा माझ्याबाबत काय लिहिले आहे. पहा शास्त्रलेख काय म्हणतो मी काय करीन, आणि जर मी शास्त्रलेखाप्रमाणे करीत नसेन, मग माझा विश्वास करु नका."

333 मला हे अधार्मिकप्रमाणे सांगू देऊ नका, परंतु मला सांगू द्या त्या संदेशाबद्दल जो मी प्रचार करीत आहे: जर देव हे सत्य आहे असे प्रमाणित करीत नाही, मग ते नाही; परंतु जर वचन प्रमाणित करते की मी तुम्हाला सत्य सांगत आहे, मग वचनाचा विश्वास करा! ती ती आहेत जी साक्ष देतात की मी तुम्हाला सत्य सांगतो किंवा नाही. ते साक्ष आहेत; ती माझ्यासाठी साक्ष देतात ... त्या सेवेसाठी जी त्याने मला दिली. त्याने हे शेवटच्या दिवसांसाठी अभिवचन दिले. येथे ते आहे! तो म्हणाला तो काय करील. येथे ते आहे; आपण सरळ त्यामध्ये जात आहोत आता! तुम्ही पहा ते सत्य आहे किंवा नाही.

देवाला साक्ष देऊ दे. जर ती कार्ये, त्या गोष्टी ज्या मी प्रचार करीत आहे त्या परत साक्ष देत नाहीत की हे सत्य आहे, मग ते सत्य नाही; परंतु, जर वचन याबद्दल बोलते, आणि येथे ते आहे, मग तुम्ही याबद्दल काय करावयास जाणार आहात?

334 येशू म्हणाला, "मला तुम्ही ठाऊक आहात; तुम्ही विचार करता तुम्हाला मोशे ठाऊक आहे. तुम्हाला कदाचित मोशेचा इतिहास ठाऊक असेल, परंतु तुम्हाला त्याचा देव ठाऊक नाही; कारण मोशेअगोदर मी होतो. मी एक होतो जो मोशेबरोबर बोललो. मी एक आहे जो आहे; मी वचन आहे." ते ते पाहू शकले नाही कारण ते त्यांचा पिता, सैतान, यापासून आहेत. त्यांच्या संप्रदायाने त्यांना पाहू दिले नाही. त्याने वचनाला अगदी तसेच पुढे जाण्यापासून रोखले नाही. ते काहीजणांवर पडले, आणि त्यापासून त्या पिढीमध्ये एक वधू आली.

335 ठीक आहे, किती भिन्न ... रंगविलेला अग्नी. येशू म्हणू शकत होता, "ज्या पित्याने मला पाठविले तो माझ्यामध्ये आहे, आणि जी कार्ये मी करतो ती साक्ष देतात कारण मी त्याच गोष्टी करणार आहे ज्या शास्त्रलेख म्हणतो मी करीन." यहुद्यांना त्यांचा ऐतिहासिक देव ठाऊक होता. आता तसेच, होय. का त्यांना ऐतिहासिक देव ठाऊक होता कारण त्यांच्याकडे ऐतिहासिक बीज होते! का त्यांनी त्याला स्वीकारले नाही? - कारण ते संप्रदायाबरोबर संकरित झालेले होते. येशूला ठाऊक होते त्याला कोणी पाठविले होते, कारण ज्याने त्याला पाठविले होते तो त्याच्यामध्ये होता, आणि तेथे कोणता संप्रदाय त्याला बांधलेला नव्हता. आमेन! "मला सांगा कोणता एक...? तो कोणत्या शाळेतून आला होता?" ते म्हणतात. "त्याला हे शहाणपण कोठून मिळाले? हे शिक्षण कोठून आले?" त्यांना एक शाळा सापडू शकत नव्हती ज्यामध्ये तो कधी गेला होता, आणि तरीही वयाच्या बाराव्या वर्षी त्याने शास्त्री आणि परुश्यांना कुंठित केले. ओह, माझ्या! त्याने त्याबद्दल बोलले.

336 एक मूल म्हणून का ते त्याला काहीतरी बोलले नाहीत? तो देवाचा शब्द होता. ते त्याला अडवू शकले नाहीत. आश्चर्य नाही की लोक त्याच्या शिकवणीने थक्क झाले होते. तुम्ही कधी ते वाचले आहे? मार्क १:२२, जर तुम्हाला ते लिहून घ्याचे असेल. लोक त्याच्या शिकवणीने थक्क झाले कारण तो कोणीतरी एक ज्याकडे अधिकार आहे असे शिकवीत असे. त्याला ठाऊक होते तो कशाबद्दल बोलत होता, पहा.

मंडळीला आता आत्म्याचा दुप्पट वाटा असायला हवा. कारण ते सत्य आहे, जसा एलीयाचा झगा जो अलिशावर पडला (एक दुप्पट वाटा), तीच गोष्ट येशू ख्रिस्ताकडून आली.

आता तुम्ही म्हणता, "ओह, भाऊ ब्रॅन्हम, तुम्ही त्याच्या मंडळीबद्दल बोलत आहात." ते बरोबर आहे. ती त्याचा देह आहे. माझी पत्नी माझ्या देहाचा भाग नाही का? तुमची पत्नी तुमच्या देहाचा भाग नाही का? तुमच्या मांसातील मांस आणि तुमच्या हाडातील हाड; एक पवित्र ऐक्य, ते बरोबर आहे? त्याच कारणास्तव एका ख्रिस्तीजनाने एका वेश्येबरोबर विवाह करु नये, पहा. ते बरोबर नाही. नाही, महाशय, कारण ते देवाच्या सर्व गोष्टींना मोडते.

337 तुम्ही म्हणता, "ओह, आता, भाऊ ब्रॅन्हम, एक मिनिट थांबा; तुम्ही ख्रिस्ताचा आत्मा वर असल्याबाबत बोलता...." पवित्र शास्त्र म्हणते तो असेल. ते बरोबर आहे? यशया ९:६, ते म्हणते, "आम्हाला बाळ जन्मला आहे, आम्हांस पुत्र दिला आहे; त्याला मंत्री, शांतीचा अधिपती, समर्थ देव, सनातन पिता म्हणतील, आणि त्याच्या सत्तावृद्धीला अंत नसेल, आणि त्याच्या.... सत्ता राहील." काय? [मंडळी उत्तर देते: "खांद्यावर."] तो त्याच्या शरीराचा भाग आहे. ते त्याचे शरीर आहे, ते आहे? त्याचे खांदे हे त्याचे शरीर आहे. पृथ्वीवर त्याची सत्ता कुठे असेल? - त्याच्या शरीरात. संत पृथ्वीचा न्याय करतील. ते बरोबर आहे का?

पौल म्हणाला, "तुम्ही आपले प्रकरण पवित्र जनांपुढे न आणता; न्यायालयात नेण्याचे धाडस करीत आहात." ते बरोबर आहे. संत पृथ्वीचा न्याय करतील. सत्ता कुठे असणार आहे? - त्याच्या खांद्यावर, त्याचे शरीर. सत्ता त्याच्या खांद्यावर असेल. तो शरीराचा एक भाग आहे.

ते काय आहे? - त्याचे पृथ्वीवरील सामर्थ्य. देवाचे पृथ्वीवरील सामर्थ्य हे त्याचे वचन आहे जे त्याच्या शरीरात देहरुपाने वसले आहे येथे या पृथ्वीवर, जे प्रत्ययास आणील. मोशे....

338 ऐका, यातील काही वगळूया. देवाचे संदेशवाहक नेहमी नाकारले गेले आहेत. तुम्ही ते विश्वास करता? मोशे नाकारला गेला. ते बरोबर आहे? येशू नाकारला गेला. आणि लूक म्हणाला, १०:१६ मध्ये (जर तुम्हाला ते लिहून घ्यायचे असेल, ठीक आहे) ... नाकारले; १ शमुवेल ८:७, देवाचा संदेश नाकारला गेला. देवाकडे एक संदेशवाहक, एक शमुवेल नावाचा संदेष्टा होता. तुम्ही तो विश्वास करता? त्याला आणि त्याच्या संदेशाला नाकारले गेले. त्यांनी जग घेतले. हा देवाचा नियम आहे. ते जात आहे.... मला ठाऊक नाही हे सांगावे किंवा नाही. हा देवाचा नियम आहे. देवाचा नियम हा एका प्रामाणित केलेल्या दासाला स्वीकारणे आहे. ते अगदी एका मिनिटात सिद्ध करुया. मला येथे शास्त्रलेखातील एक घ्यायचे आहे: योहान १३:२०. अगदी पाहूया; मी येथे काहीतरी लिहून ठेवले आहे. मी अगदी एक प्रकारे ... मला ते मनात येते फक्त मग.... ओह, होय, येथे आपण आहोत.

मी तुम्हाला, खचित, खचित सांगतो की, मी ज्याला पाठवितो त्याचा जो स्वीकार करतो तो माझा स्वीकार करतो; आणि जो मला स्वीकारतो तो ज्याने मला पाठविले त्याला स्वीकारतो.

एक प्रमाणित केलेला दास. ओह, भावा, तेथे हजारो उपदेश सरळ येथे पडलेले आहेत आता, पहा. ते बरोबर आहे. ओह, माझ्या, तो देवाचा एक नियम आहे; त्याचा स्वीकार करा!

339 शमुवेल खाली आला आणि म्हणाला, "मला तुम्हाला काहीतरी विचारावयाचे आहे. मी कधी तुम्हाला परमेश्वराच्या नावात काही सांगितले आहे जे प्रत्ययास आले नाही?"

ते म्हणाले, "नाही."

"मी कधी कोणते अर्पण घेतले मोठ्या इमारती उभारण्यासाठी आणि महान खूप गोष्टी करण्यासाठी, आणि स्वतःला गौरविण्यासाठी?"

"नाही!"

"जे वचन मी सांगितले ते सिद्ध करण्यासाठी देवाने उत्तर पाठविले?"

"होय!"

"बरे, का नाही तुम्ही माझे ऐकत?"

340 येशू परुश्यांना म्हणाला.... "आम्हाला माहित आहे तुम्ही व्यभिचारात जन्मला." तो म्हणाला, "तुमच्यापैकी कोण मला पापाबाबत दोषी ठरवितो? मला तुम्हाला देवाचे वचन दाखवू दे आणि पाहू दे जर तुम्ही त्याचा विश्वास करता. पाहू दे जर देव ते तुमच्यामध्ये साबित करतो. आणि मला माझ्याबद्दल बोलू दे. जर मी माझ्याबद्दल बोललो, मी एक खोटा आहे; परंतु जर मी देवाचे बोलत असेल आणि देव माझ्यामधून त्याच्या वचनाद्वारे बोलतो, मग ते सत्य आहे. मग देवाचे वचन कोण विश्वास करते: मी किंवा तुम्ही?" अहा! तेथे, ते मिळाले!

येशू म्हणाला, "तो जो त्यांना स्वीकारतो ज्यांना मी पाठवितो, मला स्वीकारतो." आणि आता - ते ज्यांना तो पाठवितो. "आणि ते जे मला स्वीकारतात, ज्याने मला पाठविले आहे त्याला स्वीकारतात." इच्छा करतो आपल्याकडे त्यावर रेंगाळण्यासाठी समय असता.

341 तुम्ही केवळ देवाची सेवा करु शकता जशी तुम्ही करता आणि दासांवर विश्वास करता ज्यांना देव पाठवितो. तुम्ही पृथ्वीवर केवळ देवाची सेवा करु शकता (पहा) जसे देवाचे दास जे दैवी प्रेरणेद्वारे पाठविलेले आहेत जे वचनाचा तुम्हाला अनुवाद करतात.

तुम्ही त्याचा विश्वास करता? त्यासाठी तुम्हाला काही शास्त्रलेख लिहून घ्यायचे आहेत? १ करिंथकरांस १४:१६. पौल म्हणाला, "जसा मी ख्रिस्ताचे अनुकरण करतो तुम्ही माझे अनुकरण करा." ११:१, देखील; लूक १०:१६. पहा तो काय म्हणाला; तेथे येशू काय म्हणाला. लूक १०:१६. विश्वास करतो आपण येथे सरळ याच्या निकट आहोत. पाहूया येथे एका वेळेस ते काय म्हणते. लूक १०:१६, ते बाकीचे इतर लिहीत असताना. आता, ते १ करिंथकरांस १४:१६, ११:१, देखील आणि लूक १०:१६ आहे. आता, वाचूया. मी येथे लूक १०:१६ काढीत आहे फक्त वाचण्यासाठी, जेव्हा तुम्ही इतर सर्व इतरांकडे आता पाहत आहात, फक्त एका क्षणासाठी. ठीक आहे, येथे आपण आहोत.

जो तुमचे ऐकतो तो माझे ऐकतो; ... जो तुमचा अव्हेर करतो तो माझा अव्हेर करतो; ... जो माझा अव्हेर करतो तो ज्याने मला पाठविले त्याचा अव्हेर करतो.

ते सिद्ध करते की देव त्याचा संदेश त्याच्या दासांतून बोलतो. नेहमीच बोलला आहे; ते बरोबर आहे.

342 आता, विश्वास करणाऱ्या मंडळीचे सामर्थ्य: ख्रिस्ताला आकाशात आणि पृथ्वीवर सर्व अधिकार आहे. तुम्ही त्याचा विश्वास करता? मग काय जर तो तुम्हामध्ये असेल? ख्रिस्ताला सर्व अधिकार आहे? मत्तय २८:१८. ठीक आहे.

तो त्याच्या शरीरात बीज-वचन आहे, आणि तो आपल्यामध्ये ते वचन-बीज बनतो. का...? "तो सर्व जो देव होता, त्याने ख्रिस्तामध्ये ओतले, आणि सर्व ख्रिस्त होता, त्याने ते मंडळीत ओतले." तो अधिकार आहे.

343 आता पहा! लक्षात ठेवा देवाचा पुनरुत्पादनाचा नियम. आता लक्षात ठेवा, आपापल्या परी. ते बरोबर आहे? ख्रिस्ताचे बीज, ते वचन, ते त्याच्या देहातूनच यावयास हवे. (तुम्ही थकत आहात का? ठीक आहे, फक्त एक मिनिट, आता. फक्त शांत राहूया आणि प्रार्थना करु.) मला खरोखर हे चांगल्या प्रकारे समजवायचे आहे. मला हे दळून काढायचे आहे. ख्रिस्ताचे बीज आ-ले-च, आलेच पाहिजे, आलेच पाहिजे त्याच्या देहातून - एका संप्रदायातून नाही, परंतु एका नव्याने जन्मलेल्या वचनाच्या बीजातून - त्यातून आलेच पाहिजे.

आता लक्षात ठेवा, ते काय आहे? ख्रिस्ताचे बीज - माझे बीज कसे येते? - देहातून. सफरचंदाच्या झाडाचे बीज कसे येते? - शरीरातून. बीज हे शरीरातून येते, आणि मंडळी हे ख्रिस्ताचे शरीर आहे. ते बरोबर आहे? पवित्र शास्त्राची मंडळी. हा जन्म (जो नवीन जन्म आहे) स्वतःला शरीरात उत्पन्न करितो. त्याची मंडळी हा त्याचा शब्द आहे, जेणेकरुन लोक इब्री १३:८ चे पुष्टीकरण पाहू शकतात: "येशू ख्रिस्त काल, आज, आणि युगानुयुग सारखा आहे." तुम्ही त्याचा विश्वास करता? आता, हे सांप्रदायिक संकर नाहीत. हे ते आहेत जे भ्रमणकक्षेत उलट्या गणतीची वाट पाहत थांबलेले आहेत (तुम्हाला ठाऊक आहे माझ्या म्हणण्याचा अर्थ काय आहे), अग्निबाण घेण्याचे कायम झाले आहे. गौरव! हे सांप्रदायिक संकर नाहीत, येथे उभे राहिलेले नाहीत, ते नाहीत. नाही, महाशय. ते बीज आहेत.

344 पौलाला भीती होती की लोक काही प्रकारचे ते भले मोठे शब्द पाहतील जे तो बोलेल (त्याचे काही शिक्षण). १ करिंथकरांस २:१-८, तुम्हाला ते लिहून घ्यायचे आहे. १ करिंथकरांस २:१-८, पौल म्हणाला, "मी कधीही तुमच्याकडे शब्द बोलत आलो नाही (बौद्धिक, तुम्हाला माहित आहे) की तुमचा विश्वास कोणत्या विद्यालयाच्या गोष्टीवर असावा, परंतु मी तुमच्याकडे साधेपणाने, पवित्र आत्म्याच्या सामर्थ्याने आणि निदर्शनाने आलो की तुमचा शब्द ... की तुमचा विश्वास देवाच्या वचनावर उभारलेला असावा." होय, महाशय.

345 जरी सांप्रदायिक मंडळ्या वधूसाठी संख्येने एकास हजार अशा जास्त असतील.... तुम्ही ते विश्वास करता? तुम्ही विश्वास करता पवित्र शास्त्र ते शिकविते? यशया ५४:१. त्याने त्याचे अभिवचन दिले. कारण.... तुम्हाला हवे आहे की मी ते वाचावे? ठीक आहे, ते घेऊया. जर तुम्हाला पाहायचे आहे ते कुठे आहे कुठे त्याने त्याचे अभिवचन दिले, ते संख्येत जास्त असतील, यशयाच्या ५४:१ मध्ये येऊया.

मूल न झालेल्या, वांझ, आनंदाने गजर कर; ज्या तुला प्रसूती वेदना माहित नाहीत, ती तू आनंदाने जयघोष कर, आनंदाची आरोळी मार: कारण विवाहित स्त्रीच्या मुलांपेक्षा सोडलेलीची मुले पुष्कळ आहेत, असे परमेश्वर म्हणतो.

ते बरोबर आहे? विवाहित पत्नीपेक्षा कलावंतिणीची मुले अधिक आहेत. निश्चित, कित्येक पटीने संख्येने जास्त भरतील. जरी ते संख्येने पुष्कळ असतील त्यांना खरा पिता नाही!

आता, सांप्रदायिक प्रकारचे यहूदा ८:१३ मध्ये दर्शविले आहे. ती ऐहिक मंडळी आहे. "निर्जल मेघ, लज्जारुपी फेस दाखविणाऱ्या समुद्राच्या लाटा." पेन्टिकॉस्टल मंडळी त्या सांप्रदायिक गटातील २ तिमथ्य ३:१-८ मध्ये दर्शविले आहे. "सुभक्तीचे केवळ बाह्य स्वरुप असेलेली" - त्यांची बीजे त्यांच्यापरी उत्पन्न करतात.

346 लक्ष द्या, तो षंढ.... ओह, येथे, आपण काहीतरी गहन मिळविणार आहोत आता. आता पहा, हे बीज मंडळी, ही बीज मंडळी, ही खरी मंडळी त्या खऱ्या वास्तविक शुक्रजंतूसह. लक्ष द्या, ते षंढ त्या सर्व डी.डी. बरोबर होते. आता लक्षात ठेवा, देवाने कधीही त्याचा प्रचार आणि त्याची सुवार्ता दूताला बहाल केली नाही. किती जणांना हे ठाऊक आहे? किती जणांना ठाऊक आहे की गलतीकरांस १:८ म्हणते, "जर स्वर्गातून दूत आला आणि जो त्यांनी प्रचार केला आहे त्या व्यतिरिक्त काही प्रचार केला, तो शापभ्रष्ट असो"? तेव्हा तो दूत चुकीचा आहे, जर तो वचनापासून भिन्न आहे. देव दूतांच्या खाली आला, आणि ते मनुष्याला सोपवून दिले, जे पुत्र होते. तुम्ही त्याचा विश्वास करता? आता पहा! आता, त्याने ते कधीही दूतांना सोपविले नाही. लक्ष द्या, त्याने ते केले नाही.

347 आता, फिलिप्प पेन्टिकॉस्टला, उपासनेसाठी, यरुशलेमेत होता. किती जण त्याला, "आमेन" म्हणतील? तो षंढ, तो सर्व डी.डी आणि एल.डी. आणि सर्वकाही बरोबर गेला होता. परंतु का त्याला काही मिळाले नाही? तो परत यशयाच्या भविष्यवाणीचा अभ्यास करीत खाली आला.

जरी दूतांनी फिलिप्पाला त्याच्याकडे वाट दाखविली, परंतु जीवनाचा जंतू शरीरातून येणे होते - फिलिप्प. ओह, भावा, आता आपण रेषेवर आहोत! जंतू कोठून आला? दूतामधून? दूताने त्याला दाखविले कोठे जायचे. एक दूत हा संदेशवाहक आहे; येथे एक पुत्र आहे. फिलिप्पाकडे जंतू होता, संदेश, वचन. तसेच जसे एक मूल जन्म घेऊ शकते. फिलिप्पाने त्याच्यावर आपले हात ठेवले. फिलिप्पाने त्याला येशू ख्रिस्ताच्या नावात बाप्तिस्मा दिला. तेथे देवाचा आत्मा आला. निश्चित.

आता, जंतूला शरीरातूनच येणे होते. कोणते शरीर? - ख्रिस्ताचे शरीर. बरोबर. आणि फिलिप्प त्या शरीराचा सदस्य होता.

348 आता ऐका, तीच गोष्ट प्रेषित कृत्य १०:४८ मध्ये घडली. पेत्र घराच्या धाब्यावर होता. दूताने त्याला कर्नेल्याच्या घरची वाट दाखविली, परंतु वचन कोठून आले? - शरीरातून. ओह! मला फार बरे वाटत आहे; मला प्रवासात असल्यासारखे वाटत आहे. दूत आला आणि म्हणाला, "चिंता करु नको; कशालाही अशुद्ध म्हणू नकोस, फक्त पुढे जा; कसलाही विचार करु नकोस." आणि पेत्राने हे शब्द बोलताच (दूताने नाही, कार्डिनलने नाही), पेत्राने हे शब्द बोलताच. काय? तो शरीर होता. त्याच्याकडे वचन होते. वचनाने ताबा घेतला. ओह, भावा! व्हिव! मम्म! ओह, माझ्या! दूताने निर्देशित केले, परंतु जीवन ख्रिस्ताच्या शरीरातून आले.

349 पौल, त्याच्या मार्गावर दिमिष्काला चालला होता, एका दृष्टांताने त्याला निर्देश केला; परंतु हनन्याकडे (तेथे जंतू आहे) वचन होते. आमेन! त्या संदेष्ट्याने, हनन्याने, एक दृष्टांत पाहिला आणि म्हणाला, "तेथे वर जा आणि त्याच्यावर तुझे हात ठेव."

म्हणाला, "भाऊ शौल, येथे रस्त्यावरुन खाली येताना, परमेश्वराने तुला दर्शन दिले आहे." त्याला ते कसे कळले? त्याच्याकडे वचन होते. परमेश्वराचे वचन संदेष्ट्याकडे आले. भविष्यवाणी केली, तेथे वर गेला, आणि म्हणाला, "त्याने मला येथे वर पाठविले आहे की मी माझे हात तुझ्यावर ठेवावे, आणि तू बरा व्हावा आणि पवित्र आत्मा प्राप्त करावा - तुझी दृष्टी तुला मिळावी!" आणि त्याच्या डोळ्यावरुन खपल्या पडल्या, आणि तो उठला आणि येशूच्या नावात बाप्तिस्मा घेतला आणि अभ्यास करण्यासाठी गेला. दूतांनी त्याचा निर्देश केला. ते बरोबर आहे. परंतु, पौलाकडे बीज-जंतू होता.

बीजाला अनंत जीवन देण्यासाठी, देवाच्या आत्म्याची गरज असते. व्हिव! माझ्या!

350 अजून दोन वाजलेले आहेत? मला ते माहित आहे. मग मी काही वाचणार आहे. मला फक्त सुमारे दहा मिनिटांसाठी वाचू द्या, तुम्ही द्याल? माझ्याकडे एक चांगली संकल्पना आहे.... मी येथे राहू शकत होतो, परंतु बरे होईल मी थोडासा पुढे जाईन, आणि आपल्याकडे आपला वेळ आहे. ती फक्त पाच वाजण्यास पंचवीस मिनिटे बाकी आहेत. मला ठाऊक नाही आम्ही जॉर्जियामध्ये कधी पोहोचू! मी इच्छा करतो मी येथे थांबू शकलो असतो आणि यावर थोडेसे भाष्य करु शकलो असतो, परंतु मी फक्त ते वाचणार आहे, खरोखर हळुवारपणे.

351 आता लक्षपूर्वक ऐका. येथेच ज्यासाठी मी लेखणी उचलली होती, त्याचा एक भाग. तुम्ही पाहता, मित्रांनो, माझ्याकडे काय आहे ... ज्याप्रकारे मी उभा राहिलो जसा मी राहिलो? पहा का मी झटत आहे - त्या संप्रदायापासून दूर जात आहे आणि देवाची खरी मंडळी मिळवित आहे? पहा का ते वचनातून येणे आहे? ते माणसाच्या बुद्धीद्वारे येऊ शकत नाही; ते देवाच्या वचनाद्वारे येणे आहे. त्या कारणामुळेच मी वचनाचा विश्वास करतो अगदी ज्याप्रकारे ते लिहिलेले आहे. मी काही भर घालणार नाही किंवा काढून घेणार नाही; फक्त त्याचा त्या प्रकारे प्रचार करणार; फक्त पुढे जात राहणार.

आता, भावांनो (तुम्ही सर्व ध्वनिमुद्रणपट्टीवर), जर तुम्ही माझ्याबरोबर असहमत आहात, मी तुमच्यासाठी प्रार्थना करेन; जर मी चुकीचा आहे, तुम्ही माझ्यासाठी प्रार्थना करा. मी आता काही वाचणार आहे फक्त.... मला हवे आहे की तुम्ही हे खरोखर लक्षपूर्वक ऐकावे. येथे जेथे आत्मा म्हणाला, "लेखणी उचल." मला यातील काही सोडावे लागणार आहे, परंतु यातील काही मला तुमच्याकडे आणणे आहे.

352 ठीक आहे. आता, येथेच जे मी तुम्हाला सांगण्याचा प्रयत्न करीत आहे: पुनरुत्पादनाचा नियम आपापल्यापरी उपजविते (उत्पत्ती १:११). या शेवटच्या दिवसात, खरी मंडळी वधू शिखराच्या शिलेपाशी येते. ती एक उत्कृष्ट मंडळी असेल; एक उत्कृष्ट वंश जसे ते त्या महान शिखर शिलेपाशी येतात. ते इतके त्याच्यासारखे असतील, ते प्रत्यक्ष त्याच्या प्रतिमेत असतील, त्याच्याबरोबर संयुक्त होण्याकरिता. ते एक असतील. ते जिवंत देवाच्या वचनाचे प्रत्यक्ष प्रकटीकरण असतील. संप्रदाय हे कधीच उत्पन्न करु शकत नाही. हे असेल ... ते त्यांचे पंथ आणि मतप्रणाल्या वचनाबरोबर मिश्रित करुन उत्पन्न करतील व एक संकरित उत्पादन आणतील.

353 तो पहिला पुत्र, हा देवाचा बोललेला बीज-वचन होता. त्याला एक वधू दिली गेली होती. (मी फक्त आत्म्याची उजळणी करीत आहे, आणि मी जे काही बोललो ते मी उचलीत होतो, पहा.) एक वधू स्वतःला उत्पन्न करण्यासाठी. ती पडली ... (पहा, त्याचकरिता काय ती वधू दिली गेली होती, स्वतःला उत्पन्न करण्यासाठी परत देवासाठी दुसरा पुत्र, परंतु संकरणाद्वारे ती पडली, पहा.) स्वतःला उत्पन्न करण्यासाठी - परंतु ती पडली; त्याला मरण्यास कारणीभूत ठरली.

त्या दुसऱ्या पुत्राला, एक देवाचा बोललेला बीज-वचन त्याला एक आदामासारखी वधू दिली गेली, परंतु त्याने तिच्याशी लग्न करण्याअगोदर, ती सुद्धा, पडली; कारण आदामाच्या पत्नीसारखे तिला देखील मुक्त नैतिक प्रतिनिधी असे ठेवले होते, देवाचा शब्द विश्वास करुन, जगणे, किंवा त्याचा संशय करुन, मरणे - आणि तिने केले.

354 मग त्या खऱ्या वचनाच्या बीजाच्या लहानशा गटापासून, देव ख्रिस्ताला एक परमप्रिय वधू सादर करील, एक कुमारी - त्याच्या वचनाची वधू - आणि त्यांच्यातून आणि त्यांच्याद्वारे जे काही अभिवचन दिले गेले आहे कुमारीमध्ये त्याच्या वचनासाठी ते पूर्ण होईल, जिला मानवनिर्मित पंथ किंवा मतप्रणाल्या ठाऊक नाहीत. स्वतःमध्ये अभिवचनाचा शब्द जसा तो मरीयामध्ये होता - देव स्वतः प्रकट झाला. तो स्वतः, कार्य करील,

त्याच्या स्वतःच्या अभिवचनाच्या शब्दाद्वारे जेणेकरुन जे सर्व त्याच्याबद्दल लिहिले गेले आहे ते पूर्ण होईल. जसे त्याने केले जेव्हा तो कुमारी गर्भाशयातून आला (आत्मिक गर्भाशयाचे प्रतीक आता), तसेच आता कुमारी, त्याचा शब्द स्वीकारुन: "जसे तू म्हणाला आहेस तसे मला होवो," जरी ते दूताद्वारे म्हटले गेले जेव्हा अजूनही तो लिहिलेला शब्द होता. (यशया ९:६) ते त्याला प्रेम करतील, त्याचे प्रेम ... आणि त्याचे गुणधर्म असतील, कारण तो त्यांचे मस्तक आहे, आणि ते त्याची प्रजा आहेत, त्याच्या मस्तकाच्या अधीन. ख्रिस्ताचा अधिकार त्याचा होता.

355 लक्ष द्या, काय सुसंवाद. येशूने कधीही काहीही केले नाही जोपर्यंत त्याने पित्याकडून पाहिले नाही किंवा प्रथम पित्याने त्याला दाखविले नाही. (देव व ख्रिस्तामधील सुसंवाद, पहा. योहान ५:१९.) तशीच वधू असेल, आणि तो तिला त्याच्या जीवनाचे वचन दाखवितो (तो तिला दाखवितो), आणि ती ते स्वीकारते. ती कधीही त्याचा संशय घेत नाही.

तिला काहीही इजा पोहोचू शकत नाही, अगदी मृत्यूही नाही; कारण जर बीज पेरले गेले असेल पाणी त्याला परत उठविल. आमेन. (आता मला एक महान मोठा हालेलूया मिळाला!) येथे ते गुपित आहे: वधूमध्ये वचन आणि ख्रिस्ताचे मन आहे हे समजण्यासाठी की वचनाबरोबर त्याला काय करायचे आहे, आणि त्याच्या नावात ती ते करते. तिच्याकडे "परमेश्वर असे म्हणतो" आहे.

मग ते अंकुरित होते; तेव्हा पवित्र आत्मा त्याला तोपर्यंत जलसिंचन करतो जोपर्यंत ते वाढत नाही आणि त्याचा उद्देश पूर्ण करीत नाही. ते फक्त त्याची इच्छा करतात. (आमेन! मी त्याचा विश्वास करीन.) त्यांना इतर कोणीही काही करण्यासाठी मन वळवू शकत नाही. त्यांच्याकडे "परमेश्वर असे म्हणतो" आहे, किंवा ते स्तब्ध राहतात. मग ते देवाची कार्ये करतील. कारण तो स्वतः त्यांच्यामध्ये आहे, त्याचे वचन सुरु ठेवीत आहे पूर्ण करण्यासाठी जसे त्याने त्याच्या दिवसात पूर्ण केले. सर्व गोष्टी - जेव्हा तो येथे होता - त्याने त्या सर्व पूर्ण केल्या नाहीत जेव्हा तो येथे होता, कारण अजूनही ती वेळ नव्हती.

356 आता, आपण यहोशवा आणि कालेबसारखे उभे राहूया. (आता, लक्षपूर्वक पहा, ह्याला एक आत्मिक पार्श्वभूमी असणार आहे.) आता, यहोशवा आणि कालेब सारखे उभे राहूया जेव्हा आपण वचनदत्त भूमी नजरेत येताना पाहतो. तो समय निकट येत आहे. दिलेले असताना.... हिब्रूमध्ये यहोशवा म्हणजे तारणारा आणि अंत समयातील नेता जो मंडळीला पुढे नेणारा, अभिवचन दिलेला दर्शवितो. कालेब खऱ्या विश्वासूला दर्शवितो जो यहोशवाबरोबर राहिला. देवाने इस्राएलाची सुरुवात त्याच्या वचनाने, एक कुमारी म्हणून केली, परंतु त्यांना काहीतरी वेगळे हवे होते. तशीच शेवटच्या दिवसातील मंडळी आहे.

357 लक्ष द्या कसे देवाने इस्राएलाला हलविले नाही जोपर्यंत त्याचा स्वतःचा नेमलेला समय आला नाही. (आता ऐका. हे काहीतरी असणार आहे.) यहोशवा त्या समयासाठी थांबला! ओह, कसे .... काही फरक पडत नाही लोक कदाचित म्हणाले असतील, "देवाने आपल्याला भूमी दिली आहे, अभिवचन; आता जाऊन, ती घेऊया." ते कदाचित म्हणाले असतील, "यहोशवा, तुझी कामगिरी संपुष्टात आली आहे. तू पूर्णपणे संपला आहेस. तू का नाही काहीतरी करीत? तुला क्षणात माहित पडत असे 'परमेश्वर असे म्हणतो' आणि देवाची काय इच्छा होती." परंतु या देवाने पाठविलेल्या शहाण्या संदेष्ट्याला देवाचे अभिवचन ठाऊक होते परंतु त्या अभिवचनासाठी थांबावे हे देखील ठाऊक होते - त्याच्या समयासाठी देवाकडून एक स्पष्ट निर्णय.

(पहा हे दाखले? आता पहा.) आणि जेव्हा ती वेळ आली, देवाने तो यहोशवाला दिला, जो वचनाद्वारे त्याच्याबरोबर राहिला, कारण तो इतरांवर भरवसा ठेवू शकत नव्हता; तो त्याच्यावर भरवसा ठेवू शकत होता. तसेच ह्याची पुनरावृत्ती होईल!

358 जसा पराक्रमी अभिषिक्त संदेष्टा मोशेला ठाऊक होते देव त्याचा वापर करील, कारण मोशे त्याचा दास आहे हे त्याच्या असाधारण जन्माद्वारे त्याने सिद्ध केले होते. योग्य वेळी, अब्राहामाच्या बीजाची सुटका त्या वेळी झाली. (तुम्हाला ते कळते आहे?) मोशेने कधीच मिसरात राहून, त्याच्या शास्त्रालेखीय मुद्द्यांनी त्यांच्याबरोबर वादविवाद केला नाही. तो कधीच याजकांशी भांडला नाही, परंतु तो अरण्यात गेला आणि परमेश्वरावर विसंबून राहिला जोपर्यंत लोक त्याला स्वीकारण्यासाठी तयार झाले नाही. त्याच्याबद्दल साक्ष देण्यासाठी तो आला होता, परंतु त्यांनी त्याला स्वीकारले नाही. देवाने त्याच्या संदेष्ट्याला अरण्यात बोलाविले. देवाने साक्ष दिली होती; त्याने त्याला निवडले होते, परंतु उशीर मोशेद्वारे नव्हता, परंतु लोकांना मोशेला स्वीकारण्यासाठी तयार होणे होते. मोशेने विचार केला की मुले समजतील की त्याला पाठविले होते. (मी कधीच ते लिहिले नाही, त्याने लिहिले; तसेच आता देखील आहे.)

359 एलीयासारखे, तो पराक्रमी प्रमाणित केलेला संदेष्टा ज्याकडे देवाचे वचन आले ज्याने ते आधुनिक अमेरिकन गटाला पहिल्या महिलेच्या त्यांच्या केस कापलेल्या आणि ईजबेल रंगरंगोटी गटाला त्याचा संदेश प्रचार करण्याचे संपविल्यानंतर.... देव त्याच्या संदेष्ट्याला दृढ करीत होता; प्रत्येक वेळी त्याने भविष्यवाणी केली, ते सत्य होते. देवाला त्याला कार्यक्षेत्रातून बाहेर बोलवावे लागले, त्याच्या संदेष्ट्याचा संदेश आणि देवाचे वचन, जे त्याने त्यांच्यासाठी पाठविले होते, ते नाकारल्याबद्दल, जोपर्यंत त्याने त्या पिढीला मोठ्या मरीने पिडले नाही.

देवाने त्याला अरण्यात लपण्यासाठी पाठविले. अगदी राजादेखील त्याला बाहेर बोलावू शकत नव्हता. आणि ते ज्यांनी देवाच्या इच्छेविरुद्ध त्याचे मन वळविण्याचा प्रयत्न केला ते तसे करण्यासाठी मेले. ओह, देवा! व्हिव! मम्म! परंतु जेव्हा देव त्याच्या विश्वासयोग्य संदेष्ट्याशी दृष्टांताद्वारे बोलला, तो "परमेश्वर असे म्हणतो" या बरोबर अरण्यातून बाहेर आला. त्याने काय केले? थेट वचनाकडे, तो परत मागे वचनाकडे गेला. बारा दगड आणले आणि त्यांना एकत्र केले.

360 बाप्तिस्मा करणाऱ्या योहानासारखे, ख्रिस्ताचा विश्वासयोग्य अग्रदूत, तो अभिषिक्त संदेष्टा, त्याच्या पित्याची शाळा, परुश्यांची शाळा, संप्रदाय त्याला त्या अरण्यातून बोलावू शकत नव्हते जेथे देवाने त्याला पाठविले होते तोपर्यंत की त्याने देवाची वाणी, मसिहाच्या कोकऱ्याची वाणी ऐकली!

आत्मिक मन तुम्ही ऐकत आहात का? येथे मी अधिक काय सांगू शकत होतो? मी येथे काहीतरी वगळत आहे, आता.

361 किती भिन्न आज आहे! कित्येक तथाकथित सुवार्तिक दावा करतात की त्यांच्याकडे लोकांसाठी देवाकडून उत्तर आहे, अगदी जसे कोरहाने केले - नाकारतात, देवाच्या प्रमाणित केलेल्या अभिषिक्त संदेष्ट्याच्या अधिकाराशी वाद करीत, मोशेशी, दावा केला की त्याच्याकडे उत्तर आहे. ही एक पैसे बनविण्याची योजना होती, एक सोन्याचे वासरु - देखील, जसे कित्येक आज करतात - मोठ्या इमारती, मोठ्या शाळा, त्यांच्या समान बीजाला उपजविण्यासाठी उबवण पात्रे. आणि मग ... लोक मग, जसे आता, त्यांनी एक अभिषिक्त संदेष्ट्याद्वारे जो प्रमाणित केलेला होता, देवाचे सत्य वचन ऐकल्यानंतर त्यासाठी पडले.

ते कोरहाच्या लबाडीला पडले. देवाने सिद्ध केलेला संदेष्टा, आणि देवाला ठाऊक होते ... आणि ठाऊक होते देवाने त्यांना सांगितले होते.... इस्राएलाला ठाऊक होते देवाने त्यांना स्पष्टपणे सांगितले होते की तो त्याच्या संदेष्ट्यांना त्याच्या वचनाद्वारे प्रमाणित करणार होता. कोरहा एक शास्त्रालेखीय संदेष्टा नव्हता, परंतु तो लोकांना भयंकर चांगला दिसला; अगदी तसेच जसे ते आता दिसते. आज ते तुमच्या हातावर रक्त आहे, व्यासपीठावर अग्निगोल आहेत, तुमच्या बोटांवर तेल आहे; आणि तीच गोष्ट स्त्री प्रचारक उत्पन्न करते, तोकडे केस, कापलेले ... शृंगार. तुमच्याकडे काय आहे? तुम्ही विचार करणार नाही लोक त्यासाठी पडतील, परंतु ते कोरहासाठी पडले, आणि आता ते तीच गोष्ट करीत आहेत आणि संप्रदायांसाठी खऱ्या वचनापासून मागे हटतात. तोकड्या विजारी: दाखविते की त्यांच्यामध्ये कोणत्या प्रकारचे बीज आहे.

362 परंतु देवाला धन्यवाद सर्व इस्राएल कधीही कोरहासाठी पडले नाही. काही मोशेबरोबर राहिले, जो देवाच्या वचनाबरोबर अभिषिक्त संदेष्टा होता. आजही तसेच आहे, त्याच्या वचनाद्वारे आणि त्याच्या आत्म्याद्वारे, कित्येक देवाच्या निवडलेले.

363 लक्षात ठेवा, ते काटे कुसळे, ते निंदण, गोळा करुन, पेंढ्या बांधल्या जातील. ते बरोबर आहे? हे प्रत्ययास येणे आहे. ती धर्मभ्रष्ट संस्था मंडव्ळ्या ह्या इतक्या घट्ट बांधल्या जात आहेत जेवढ्या कधी बांधल्या गेल्या नसतील. त्या मंडळ्यांच्या संघटनेमध्ये एकत्र बांधल्या जात आहेत, देवाच्या न्यायाच्या अग्निसाठी तयार आहेत. (मी कधीही हे लिहिले नाही, मला वाटते की त्याने ते लिहिले.) पेन्टिकॉस्टल हे तथाकथित भरलेले आहे ... त्यांच्यासारखेच. तो गहू वचन कधीतरी एकत्र केला जाईल, ते धन्यासाठी निघून गेल्यानंतर.

364 देवाने अभिवचन दिले आहे ... (काळजीपूर्वक असा!) या शेवटच्या दिवसासाठी देवाने मलाखी ४ चे अभिवचन दिले आहे, आणि मलाखी ४ अजूनही पूर्ण झाले नाही, परंतु ते पूर्ण होणेच आहे कारण तो देवाचा अंकुरित झालेला शब्द आहे, मलाखी संदेष्ट्याद्वारे, बोललेला. येशूने त्याचा उल्लेख केला. ते अगदी ख्रिस्ताच्या दुसऱ्या आगमनाअगोदर असेल.

(आता, लक्षपूर्वक ऐका.) सर्व शास्त्रलेख जे पूर्ण झाले नाहीत, ते त्या वेळेअगोदर, पूर्ण होणेच आहेत. पवित्र शास्त्र पूर्ण होणे आहे; मंडळी युगाबरोबर परराष्ट्रीयांचा कालखंड संपणे आहे. जेव्हा हा अभिषिक्त दूत येईल, अर्थात, तो अखंड पवित्र शास्त्राचे बीज पेरील, सरळ सर्पापासून ते दुतापर्यंत, आगोटीच्या पावसामध्ये. मग त्याच्या पूर्वजांसारखा, योहान आणि एलीया, तो सांप्रदायिक लोकांपासून नाकारला जाईल, जसे आपल्या परमेश्वराद्वारे बोलले गेले होते ... लोक, जसा एलीया पहिल्या वेळेस अहाबाच्या समयात होता. ते येथे या देशात घडेल, जसा हा देश इस्राएलाचे प्रतीक आहे.

365 वाचा, किंवा ऐका "ईजबेल धर्म." जसा हा देश.... आपले पूर्वज जशी त्यांना हवी होती तशी उपासना करीत, या देशात आले आणि मूळ रहिवाश्यांना मागे ढकलले आणि ताबा घेतला; तसाच इस्राएलाने ताबा घेतला जेव्हा ते मिसरातून बाहेर आले. आपल्याकडे पापभिरु मनुष्ये होती जसे वॉशिंग्टन, लिंकन. त्यांच्याकडे महान पापभिरु मनुष्ये होती जशी दावीद आणि इत्यादी. मग त्यांच्याकडे सिंहासनावर अहाब आला ईजबेलीबरोबर जी त्याला पाठीमागून चालवीत होती - तसेच आपल्याकडे आहे! तसेच या समयी आहे, या देशामध्ये, की ती व्यक्ती दृश्यात येईल. कारण ते शास्त्रलेखात आहे, आणि हे एक "परमेश्वर असे म्हणतो" आहे.

366 मग वळवाच्या पावसात तेथे एक कार्मेल डोंगरावरील, कसोटी असेल - पवित्र शास्त्र शब्दानुरुप पूर्ण होईल. योहान बाप्तिस्मा करणारा, त्याचा दूत त्याच्यापुढे मलाखी ३ मध्ये, ज्याने आगोटीचा पाऊस पेरला आणि त्याच्या दिवसांतील मंडळ्यांकडून (संप्रदाय - परुशी आणि सदुकी) नाकारला गेला. येशू आला आणि रुपांतराच्या डोंगरावरील कसोटी पूर्ण केली. हा शेवटच्या दिवसांतील अग्रदूत आगोटीच्या पावसाकरिता पेरणी करील. संप्रदाय आणि पंथांमध्ये येशू हा कसोटी असेल (जे त्याचे वचन आहे). जेव्हा तो येईल, कसोटी - त्याच्या वधूचे रुपांतर! पहिली कार्मेल डोंगर होता; दुसरी रुपांतराचा डोंगर होता; तिसरी सियोन डोंगर असेल! गौरव!

367 एलीयाचे वर्तन, मोशेचे वर्तन, योहानाचे वर्तन, त्यांच्या सेवेचे क्षेत्र सोडणे - लोकांतील कित्येक त्यांना समजले नाही. त्याचे कारण ते आणि त्यांचा संदेश नाकारला गेला होता. बीज पेरले गेले होते; न्यायनिवाडा पुढे होता, आणि ते लोकांना देवाकडून एक चिन्ह होते की न्यायनिवाडा हाताशी होता. पेरणी संपली होती.

368 मी विश्वास करतो कधीतरी ख्रिस्ताच्या खऱ्या वधूला देवाच्या वचनाचा प्रचार थांबविण्यासाठी सक्ती केली जाईल. प्रकटीकरण १३:१६ मध्ये (जर तुम्हाला ते लिहून घ्यायचे असेल.) पवित्र शास्त्र याची भविष्यवाणी करते. संप्रदाय ते थांबविण्याची किंवा त्याची खूण घेण्यासाठी त्याची सक्ती करतील. मग जेव्हा कोकरा त्याची वधू घेईल आणि यासाठी कलावंतिणीचा न्यायनिवाडा करील.

369 मोशेची आठवण करा, कार्यासाठी जन्मला होता, त्या कार्यासाठी अतिरिक्त दानासाठी देवावर विसंबून राहणे होते. (त्याला मागे जाऊन, थांबणे होते.) आणि देवाद्वारे नेमलेल्या समयात एका विशिष्ट फारोला सिंहासनावर येणे होते. आणि देवाने त्याला परत पाठविण्याआगोदर लोकांना जीवनाच्या भाकरीची चणचण भासणे होते. आता, या शेवटच्या दिवसात हजारो चिन्ह कार्यकर्त्यांनी एक चिन्ह शोधकांची पिढी निर्माण केली आहे, ज्यांना अजून काही माहित नाही ... अधिक काहीही नाही देवाच्या खऱ्या हालचालीबद्दल त्याच्या वचनामध्ये या शेवटच्या दिवसांत.

जसे मी म्हणालो आहे, "त्यांना व्यासपीठावर रक्त आणि तेल आणि दैहिक निदर्शने द्या, आणि ते त्याला पाठिंबा देतील जरी ते देवाचे

वचन असेल वा नसेल, ते शास्त्रलेखीय असेल वा नसेल." येशूने अशा गोष्टीबाबत या अंत समयात आपल्याला चेतावणी दिली होती. जसे मी म्हणालो, मत्तय २४ मध्ये, दोन आत्मे, इतके निकट असतील, एक सारखे, जर शक्य असेल तर प्रत्यक्ष निवडलेल्यांस फसविल. कसे काय तुम्ही त्यांना सांगू शकता? त्यांना वचन चाचणी द्या. तुम्हाला ते कसे कळेल? वचन बोला; पहा ते त्याबद्दल काय बोलतात. जर ते वचनाचा विश्वास करीत नाहीत, त्यांच्यामध्ये बीज जंतू नाही. ते त्या दुष्टाचे आहेत आणि तुम्हाला फसवितील. जशी पहिली वधू फसवली गेली, मग ती दुसरी वधू फसवली गेली. ते तिसऱ्या वधूला वचनाला संकरित करण्याद्वारे फसविणारे, किंवा फसविण्याचा प्रयत्न करणारे आहेत.

370 देवाने कधीही त्याच्या वचनापुढे चिन्हे ठेवली नाहीत. (आमेन! ते जाळणारे आहे.) देवाने कधीही त्याच्या वचनापुढे चिन्हे ठेवली नाहीत. त्यांची वचनाच्या पुराव्यासाठी भर घातली गेली होती, परंतु वचन प्रथम आहे.

ते सिद्ध करण्यासाठी, एलीया त्या स्त्रीला म्हणाला, "प्रथम, माझ्यासाठी एक भाकरी भाज." मग पहा चमत्कार घडेल. प्रथम वचनावर या आणि मग चमत्कार पहा. स्वतः बीज शब्दालाच काय तो पवित्र आत्मा शक्ती निर्माण करतो. कसा काय एक दूत देवाकडून पाठविलेला फक्त काही शास्त्रलेखांवर विश्वास करु शकतो आणि सर्व वचनावर नाही? - त्यातील भाग नाकारतो.

371 देवाचा खरा संदेष्टा शेवटच्या दिवसांत जाहीररित्या वचनाची घोषणा करील; संप्रदाय त्याचा तिरस्कार करतील. तो त्यांची काही आडकाठी ठेवणार नाही. तो तसा असेल जसा जेव्हा तो ख्रिस्ताच्या पहिल्या आगमनाच्या वेळी आला होता. "तुम्ही सापाच्या पिल्लांनो! परंतु पूर्वनिर्धारित ते ऐकतील आणि उलट गणतीसाठी तयारी करतील. अब्राहामाच्या विश्वासाचे शाही बीज (त्याच्यासारखे) देवाच्या वचनाला पर्वा न करता धरुन राहील, कारण तो पूर्वनिर्धारित होता. मलाखी ४ चा दूत देवाच्या नेमलेल्या समयी दृश्यात येईल. आपण सर्व त्याची वाट पाहत आहोत. आपण विश्वास करतो तो येईल. ते त्याच्या वचनानुसार आहे; ते अंत समयात असेल, जो आता तो समय आहे ते पाहण्यासाठी.

372 तो योग्यप्रकारे वचनाला समर्पित असेल जसे ते नेहमी होते; देवाच्या वचनाद्वारे सूचित केलेले - आणि साबित केलेले. तो जो काही प्रचार करतो ते सत्य आहे ते देव साबित करील जसे त्याने एलीयाला केले; कारण एलीयाचे हे आगमन आहे, सियोन डोंगराच्या रुपांतरासाठी तयारी करण्यासाठी. येशू म्हणाला शेवटच्या दिवसांत लोटाच्या समयासारखे असेल. त्याचा प्रचार आत्म्याने आणि देवाच्या वचनाच्या सरळ रेषेवर असेल. कारण इतक्या गोष्टींना देवाचे सत्य म्हटले गेले आहे, कित्येकजण या खऱ्या दूताचा गैरसमज करतील. (मी येथे लिहिलेले आहे भ-वि-ष्य-वा-णी, भविष्यवाणी.) कारण ढोंग्यांकडून कित्येक गोष्टींना देवाचे सत्य म्हटले गेले आहे, की कित्येक खरे सेवक त्या दूताचा गैरसमज करतील.

373 जसा अंत समय ... भविष्यवाण्यांची पुनरावृत्ती होईल, मी विश्वास करतो. जसा पहिला अग्रदूत अरण्यातून आला आणि ओरडला, "देवाचा कोकरा पहा," तो दुसरा अग्रदूत कदाचित तीच गोष्ट करील वचनाने जन्म झालेल्या वधूकडे लोकांना निर्देश करुन. ख्रिस्ताच्या वधूला आकाशाकडे संकेत केला जाईल येशूच्या येण्याच्या वेळी, ओरडत, "देवाचा कोकरा पहा!" तेच त्याच्या ओठांतून येईल. देव आपल्याला या निकटच्या घटनेसाठी तयार करण्यास साहाय्य करो.

374 आता, बरे होईल मी सरळ येथेच ते सोडून देईन.

तुम्ही विश्वास करता? हे का झाले आहे? आता तुम्हाला चांगली समज आली का? हे वचन आहे, मित्रांनो. हे सुमारे सहा तासांचे झाले आहे (सरळ त्याच्या निकट), साडे पाच किंवा सहा तास. तेथे खूप काही अधिक सांगण्यासारखे होते, परंतु निश्चित या वेळेपर्यंत पवित्र आत्म्याने तुमच्यामध्ये ते खोलवर रुतविले असेल, की तुम्हाला माहित आहे मी कशाबद्दल बोलत आहे. आपण अंत समयात आहोत. बीजे आता पेरली गेली आहेत; वळवाचा पाऊस येण्याच्या तयारीत आहे.

लक्षात ठेवा, तेथे लवकरच अशाप्रकारे सांप्रदायिक मेळावा जमेल; ते भयंकर असेल. आणि ते स्वतःला या मंडळ्यांच्या संघटनेत एकत्र आणतील, आणि मग या प्रकारची मंडळी ही कार्य करण्याबाहेर टाकली जाईल (जेवढे त्यांना माहित आहे). तो त्या समयी येशू दृश्यात येईल, आणि तो दाखवील कोणती वधू आहे आणि कोणती नाही.

375 आणि लक्षात ठेवा, ख्रिस्ती मित्रांनो, मी एक मनुष्य आहे; मी चुका करु शकतो, परंतु देव, देव असल्यामुळे, चुका करु शकत नाही. सर्व वचने जी लिहिली गेली आहेत ती पूर्ण होणेच आहे, येशू तसे म्हणाला. तेव्हा आपल्याकडे येथे शास्त्रलेखात काही गोष्टी आहेत ज्या पूर्ण व्हायलाच हव्यात, आणि ही त्या गोष्टींतील एक गोष्ट आहे - हा बहिष्कार येणे. परंतु हा बहिष्कार येण्याअगोदर (पशुची खूण), तेथे बीज पेरले जाणे आहे देवाने त्यातून मंडळीला घेण्यासाठी. तुम्ही आता समजलात? एक बीज पेरले जाणे आहे. एक सांप्रदायिक बीज - एक स्वरुप किंवा मूर्ती बनविण्यासाठी पशुची (ती रोमची मंडळी); आणि तेथे एक खरी वधू असणे आहे.

376 आणि आपण समजतो की ती ती तथाकथित वधू ही नाकारली गेली आहे. जीवन आणण्यासाठी आदामाची वधू नाकारली गेली. तिने मरण आणले; आपण तिचे उत्पादन आहोत (आपली शरीरे); आपण सर्व मरतो. आपल्याकडे पहा, तुम्ही पाहू शकता.

यहोवाची वधू मेली; त्याने तिला घटस्फोट दिला आणि त्याच्या नावासाठी परराष्ट्रीयातून लोक घेतले. ते बरोबर आहे? त्याचे नाव ... जसे एक स्त्री एका पुरुषाचे नाव घेते, एक वधू. आता तिने काय केले आहे? तीच गोष्ट जी त्यांनी इतर समयी केली, स्वतःला सांप्रदायिक केले; प्रदूषित केले. परंतु प्रत्येक पिढीत, प्रत्येक संजीवन देवाचा कोणीतरी संदेष्टा आणतो (एक संदेष्टा हा एक प्रचारक आहे, एक खरा प्रचारक वचनावर जो वचनाबरोबर राहतो), आणि ते संजीवन आणतात जे त्या पिढीतील निवडलेल्यांस एकत्र करते. मग ती बीजात जाते. मग देव त्याला परत कधीच वापरणार नाही. मी कोणत्याही धर्मशास्त्रज्ञानाला विचारतो, कोणत्याही इतिहासकाराला विचारतो त्याने मला सांगावे एक वेळेस कधी संप्रदाय उठला; तो कधीच उठला नाही. ती जेव्हा सांप्रदायिक झाली ती मृत पावली, आणि तेथेच जेथे ती पडलेली आहे.

377 मी ड्वाइट मुडीचा विचार करतो (ते मुडी पवित्र शास्त्र), मध्यरात्रीसारखे मृत आहे. मी मेथडिस्ट यांचा विचार करतो, ते पेन्टिकॉस्टल, ते प्रेसबायटेरियन, ते लूथरन, ते नाझरीन, ते पिलग्रिम होलीनेस; पापभिरु मनुष्ये उदयास आली, बडी रॉबिन्सन आणि जॉर्ज वाईटफिएल्ड आणि ती सर्व थोर पापभिरु मनुष्ये ज्यांनी सुवार्ता प्रचार केली, आणि त्या पिढीने बीज स्वीकारले जे त्यांच्या भागासाठी पेरले गेले होते. मक्यासारखे - जरी तो दाणा होता, ते पान होते, तो देठ होता, किंवा गोंडा होता, जे काही ते आहे, त्या सेवकाने त्या दिवसासाठी वचन आणले. त्याने पृथ्वीवरील चार वाऱ्यांतून पाचारण केले आणि त्या पिढीतील निवडलेल्यांस घेतले. त्या निवडलेल्यांमधून जिवंत देवाचे घर उभारले आहे.

378 आता, ही सेवा येथे अशा ठिकाणी येणे आहे की प्रत्यक्ष जी कार्ये येशूने केले - कारण जेव्हा तो येईल, शिखराची शीला सरळ ती त्यामध्ये पकडली जाईल, कारण ते नाहीत.... तेथे रुपांतर येईल, आणि त्यांना घेतले जाईल, आणि उरलेला देह त्याच्याबरोबर येईल; आणि ती स्वर्गात गेलेली असेल. एक संप्रदाय नाही, मित्रांनो; देवाच्या वचनाची मंडळी. तुम्ही हा विश्वास करता? येथे काही हातरुमाल आहेत, येथे.

379 आता, मी जातो, मला ठाऊक नाही कुठे. मी शोधत आहे, जसे तुम्ही, देवाची इच्छा. मी इच्छा करतो मी या प्रार्थना मंदिरात राहू शकलो असतो; ते करु शकत नाही. तेथे हजारो ... मी रडणे ऐकतो ... ते अशुद्ध आत्मे त्यांना फाडीत आहेत. मी महत्प्रयासाने झोपू ही शकत नाही. मी लहान मुलांना रडताना ऐकतो आणि आयांना त्यांच्या बाळांना प्रार्थना रांगेतून ढकलताना पाहतो, कोणत्या आईला बाळाला वारा घालताना पाहतो, अंगणात बाळाला पावसापासून राखण्यासाठी त्याच्यावर एक पत्रा धरताना पाहतो. माझे हृदय त्यांच्यासाठी रक्त स्रावते.

380 जेव्हा मी हे प्रार्थना मंदिर उभारले, ज्या दिवशी मी बाहेर तेथे कोनशिला टाकली, मी त्या सकाळचा दृष्टांत लक्षात करतो. तो येथे सरळ तेथे त्या कोनशिलेत लिहिलेला होता; म्हणाला, "हे तुझे प्रार्थना मंदिर नाही. सुवार्तिकाचे काम कर; तुला सोपविलेली सेवा पूर्ण कर." मला ते आवडते; मला सर्वत्र देवाची लेकरे आवडतात. मला ठाऊक नाही तो मला कुठे घेऊन जाणार आहे. मला माहित नाही; मी वाट पाहत आहे. मी एका वर्षापासून वाट पाहत आहे. मी कदाचित दोन वर्षे वाट पाहीन; मी कदाचित तीन वर्षे वाट पाहीन, मला ठाऊक नाही. मला पुढची हालचाल ठाऊक नाही. मी त्यासाठी वाट पाहत आहे. परंतु, वचनानुसार मी विचार करतो, वचन पेरले गेले आहे. पुढची गोष्ट ही आत्म्याचे आगमन आहे.

381 बिली ग्रॅहम कदाचित सर्वत्र प्रचार करु शकतो; ओरल रॉबर्ट्स, ही पापभिरु मनुष्ये कदाचित सर्वत्र प्रचार करु शकतात. परमेश्वर मला बीजे पेरण्यासाठी कदाचित इतर कोणत्या जागी पाठवू शकतो (कोणत्या शेतात), परंतु मी विश्वास करतो आपला देश हा पेरला गेला आहे, मी विश्वास करतो तो कापणीसाठी आता तयार आहे.

जेव्हा त्या आत्म्याचा वर्षाव होईल आणि तेथील लोकांमध्ये हालचाल सुरु होईल, ते संप्रदाय एकत्र हेलकावतील अगदी तितक्याच निश्चितपणे जसा मी या उपदेशमंचावर उभा आहे. आणि देवाची मंडळी हद्दपार केली जाईल, आणि ते अशा प्रकारची कुटयोजना बनवितील की ते तिला संघटित करतील आणि ते कोणावरही बहिष्कार टाकतील जे त्यांच्या मालकीचे नाहीत. रोम, फक्त एका तासासाठी जगावर राज्य करील. ती थोड्या वेळासाठी राज्य करील. साम्यवाद नाही - रोमनवाद, जगावर राज्य करील प्रोटेस्टंट वादाच्या सहकार्याने, मंडळीच्या सांप्रदायिक स्वरुपाने, ज्याला देवाने नाकारले आहे. ते तेवढ्या निकट आहे जेवढे मला देवाचे वचन ठाऊक आहे.

382 मी तुम्हाला प्रेम करतो. मी तुमची प्रशंसा करतो. कदाचित मी सुमारे रविवारी एका आठवड्यात परत येईन. आता मी खाली फ्लोरिडाला जात आहे, परमेश्वराची इच्छा असल्यास, खाली जॉर्जियामध्ये उद्याच्या रात्रीसाठी. माझ्याकडे काही लहानशा सभा विखुरलेल्या आहेत. जर परमेश्वराने नेतृत्व केले, माझ्याकडे एक पूर्ण पुस्तक भरलेले आहे जे भाऊ रॉबरसन ... किंवा बॉर्डर्सने त्या दिवशी मला पाठविले. मी अंदाज करतो तेथे ... जागा होत्या जेथे तीस आणि चाळीस मंडळ्या सहकार्य करण्यास इच्छुक आहेत, परंतु आत्मा मला धरुन ठेवताना भासतो. का मला माहित नाही. मला माहित नाही का. तेव्हा तुम्ही माझ्यासाठी प्रार्थना करा, मी तुमच्यासाठी प्रार्थना करीन. आपण एकत्र उभे राहू. देव आपल्याला मदत करो. तेथे तुमच्यापैकी एकही कोणी नसावा जो कधी अपयशी होईल आणि तो महान आगमनाचा समय चुकविल.

383 आता, खूप गोष्टींचा माझ्यावर आरोप करण्यात आला आहे, मित्रांनो, आणि कित्येक गोष्टींचा मी अपराधी आहे. मी निष्काळजी आहे; ते खरे आहे. मला माहित नाही ते का आहे. कोणालातरी मला कोपऱ्यात ढकलावे लागते मला लढाई करण्यासाठी. मला ठाऊक नाही; तो एक स्वभाव आहे. मी अशा गोष्टी केल्या आहेत ज्या मी करावयास नको होत्या, स्वेच्छेने नाही, परंतु मी त्यामध्ये लुबाडला गेलो आहे. आणि तीच जी काही गोष्ट आहे ती मला इतकी घाबरविते, या दिवसात पाहता (या दिवसात ज्यामध्ये आपण राहत आहोत) - आणि तुम्ही आता पाहता मी काय विश्वास करतो. मला देवाकडून ऐकायचे आहे जर ते अक्षरशः शक्य असेल, मी हालचाल करण्यापूर्वी, पहा, कारण मला त्याला अपयशी करायचे नाही. मला सर्वत्र त्याच्याबरोबर असायचे आहे. आणि मला हवे आहे तुम्ही माझ्यासाठी प्रार्थना करावी.

384 आणि लक्षात ठेवा, मी तुम्हाला सत्य सांगितले आहे. आणि येथे हा सर्व दिवस बसल्याबद्दल मी तुमचा आभारी आहे (या सकाळपासून); तुमच्यातील कित्येक भिंतीभोवती उभे आहेत आणि सभागृहात अजूनही, पाय आणि पायाला पेटके आलेले, बाहेर गाड्यांमध्ये बसलेले आहात; ऐकण्याने तुमच्या बॅटऱ्या जवळ जवळ संपलेल्या आहेत, आणि येथे ते आहे: ते सर्व या ध्वनिमुद्रणपट्टीवर आहे. मुलांनी हे तेथे मागे ध्वनिमुद्रण केलेले आहे, तुम्हाला ते मिळू शकेल.

आणि जर तुम्हाला ते मिळाले, ते घरी न्या आणि त्याचा खूप लक्षपूर्वक आणि हुशारीने अभ्यास करा, आणि पहा परमेश्वर तुम्हाला काय प्रकट करील. तुम्ही त्याला प्रेम करता? टेडी कुठे आहे? अगदी आपण या हातरुमालांसाठी आणि लोकांसाठी प्रार्थना करण्याअगोदर, मला तुमच्यातील प्रत्येकासाठी प्रार्थना करायची आहे. आता मला हे गाणे गायचे आहे, आणि मग भाऊ नेविल इतर सेवेसाठी त्याची घोषणा करील.

मी त्याला प्रेम करतो, मी त्याला प्रेम करतो
(तुम्ही त्याच्या वचनाला प्रेम करता?)

कारण प्रथम त्याने मला प्रेम केले
आणि माझे तारण खरेदी केले
त्या कलवरीच्या झाडावर.

385 त्याला ज्याने आम्हाला चालविले, आणि यामध्ये आता या तासांच्या प्रचारामध्ये, स्पष्टीकरणात, कसे करावे चांगले जसे मला ठाऊक आहे माझ्या सहकारी मनुष्यांसाठी, ज्या गोष्टी मी बोलल्या आहेत त्या समजाव्या असा प्रयत्न करताना, आणि मी या गोष्टी का केल्या आहेत.

परमेश्वरा, आता मी या लोकांना, तुझ्याकडे आणतो, दृश्यात असलेले आणि लोक जे ध्वनिमुद्रणपट्टी यानंतर ऐकतील.

[ध्वनिमुद्रणत्तीवर रिक्त स्थान]

विचार करतो, देव, स्वतः, दैवी अनुवाद देवो; आणि मी निश्चित आहे, प्रभू, जर मी वचन आणले असेल, ते त्यांच्यावर पडेल जे पडण्यासाठी पूर्वनिर्धारित आहेत. तुझे वचन सत्य आहे. पित्या, मला क्षमा कर की मी तुला कित्येक वेळा अपयशी केले. मी प्रार्थना करतो मला माफ कर. मी प्रार्थना करतो माझ्या श्रोत्यांना क्षमा कर, दृश्य आणि अदृश्य, त्यांच्या सर्व पापांची; की परमेश्वर देवा, आम्हाला जाणीव आहे की आम्ही मार्गाच्या अंतावर आहोत. प्रत्येक चिन्ह येथे सरळ आमच्यासमोर आहे. मी निश्चित आहे ते आत्मिक मनाने, ताडले आहे, परमेश्वरा, जे अगदी काही मिनिटांपूर्वी मी बोललो आहे. मी प्रार्थना करतो की ते समजतील, परमेश्वरा, की काय आपण ... आपण कुठे आहोत. आम्ही कशाच्यातरी निकट आहोत. आम्ही भंजकांना ऐकू शकतो; आम्ही निकट आहोत.

386 स्वर्गातील परमेश्वरा, आम्हाला साहाय्य कर. मी प्रत्येक व्यक्तीसाठी प्रार्थना करतो जो येथे बसलेला आहे. मी या हातरुमालांसाठी प्रार्थना करतो जे आजाऱ्यांना दर्शवितात जे माझ्यामध्ये भरवसा करतात, परमेश्वरा, की मी सर्वांसाठी विश्वासाची प्रार्थना करतो. आता, त्यांच्यासाठी जे देवाच्या वचनासाठी खुल्या हृदयाचे आहेत, मी विश्वासाद्वारे हे बीज पेरतो. मी येशू ख्रिस्ताच्या नावात त्याचा दावा करतो आणि देवातील विश्वासात, की, परमेश्वर देवा, मी आता त्यांना तुला सोपवितो. त्याला जलसिंचन कर; त्यावर आत्मा पाठिव, परमेश्वरा, जे तेथे वचन अंकुरित करेल, की तू तोच महान देव आहे आरोग्य देणारा, तोच महान देव वाचविणारा, तोच महान देव पुनरुत्थानाचा. तू देव आहेस. त्यांनी पीक उत्पन्न करु दे, एक वधू आमच्या प्रभू येशूसाठी, एका हृदयाचे पवित्र गर्भाशय वचन स्वीकारण्यासाठी. ते मान्य कर, परमेश्वरा. मी तुझ्याकडे त्यांची प्रशंसा करतो परमेश्वरा, जर शक्य असेल, प्रत्येकाला तुझी वधू म्हणून, येथून घे. येशू ख्रिस्ताच्या नावात. आमेन.

387 मी त्याला प्रेम करतो, मी त्याला प्रेम करतो
कारण त्याने प्रथम मला प्रेम केले
आणि माझे तारण खरेदी केले
त्या कलवरीच्या झाडावर.

सर्व एकत्र आता आपले हात वर करुन.

मी त्याला प्रेम करतो, मी त्याला प्रेम करतो
कारण त्याने प्रथम मला प्रेम केले
आणि माझे तारण खरेदी केले
त्या कलवरीच्या झाडावर.

आता, वचनाच्या सहा तासांच्या, उपदेशानंतर. मी तुमची पहिल्या प्रथम वाखाणणी करतो. पश्चाताप करा...?... देव आणि तुमच्या पापांची क्षमा व्हावी म्हणून काही मिनिटांत येशू ख्रिस्ताच्या नावात बाप्तिस्मा घ्या, आणि तुम्हाला पवित्र आत्मा देण्याचे देवाने अभिवचन दिले आहे, कारण हे अभिवचन तुम्हाला व तुमच्या मुलाबाळांना आणि जे दूर आहेत, त्यांना आहे. ते मेथडिस्ट, बॅप्टिस्ट, कॅथोलिक, प्रेसबायटेरियन, आणि जो कोणी वचनाचा स्वीकार करील तेवढ्यांना आहे, त्याला येऊ दे. तुम्ही त्याचा विश्वास करता?

मी पाहतो तुमच्याकडे पाळक आहे...?... सेवेमध्ये. जर तुम्ही आता तयारी कराल कारण आम्ही भाऊ नेवीलला विचारण्याची तयारी करीत आहोत. आता फक्त एक क्षणभर बसा. आमचे भाऊ नेवील, आता, आमचे पाळक, सरळ आता तुम्हाला सेवेचा अनुक्रम सांगतील, फक्त एका मिनिटात. देव तुम्हाला आशीर्वादित करो जोपर्यंत मी तुम्हाला परत पाहीन.

Sermons By
विल्यम मॅरियन ब्रॅन्हम ह्यांच्या द्वारे प्रचार केले गेलेले उपदेश
"...वाणी होईल त्या दिवसात..." प्रकटी. १०:७

www.messagehub.info